प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामिमहाराज विरचित श्रीकृष्णालहरीचे

# श्रीकृष्णालहरीतरंगसौंदर्य





समीक्षक:

डॉ. गु. वा. पिंपळापुरे

नागपूर

# समर्पण



तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्म कुसमांची वीरा ।
पूजा केली होय अपारा । तोषालागीं ।। १८.९१७
भरोनि सद्भावांची अंजुळी । मियाँ ओंविया फुले मोकळीं ।
अर्पिलीं अंध्रियुगलीं । विश्वरूपाच्या ।। १८.७०८

– ज्ञानेश्वरी

प.प. श्री. सद्गुरु श्री वासुदेवानंद सरस्वती
स्वामी महाराज यांचे चरणी समर्पण ।।

स्वामीभक्त पुत्र

ग. वा. पिंपळापुरे

# समर्पण



तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्म कुसमांची वीरा ।
पूजा केली होय अपारा । तोषालागीं ।। १८.९१७
भरोनि सद्भावांची अंजुळी । मियाँ ओंविया फुले मोकळीं ।
अर्पिलीं अंघ्रियुगलीं । विश्वरूपाच्या ।। १८.७०८

– ज्ञानेश्वरी

प.प. श्री. सद्गुरु श्री वासुदेवानंद सरस्वती
स्वामी महाराज यांचे चरणी समर्पण ।।

स्वामीभक्त पुत्र

गु. वा. पिंपळापुरे

# श्रीकृष्णालहरीतरंगसौंदर्य

समीक्षक :
**डॉ. गु.वा. पिंपळापुरे**
नागपुर

**श्रीवासुदेव निवास प्रकाशन,**
पुणे ४११००४

**प्रकाशक :**

**श्री. शरदभाऊ ज. जोशी**

श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज व

श्रीलोकनाथतीर्थ स्वामिमहाराज ट्रस्ट

श्रीवासुदेव निवास, ४२/१७ एरंडवणे,

म. कर्वे पथ, पुणे ४११००४.

**© सर्व हक्क प्रकाशकाधीन**

वेबसाईट : www.vasudevniwas.org

ई-मेल : info@vasudevniwas.org

**प्रथमावृत्ती :**

आषाढ शुद्ध १, शके १९१५, दि. २१ जून १९९३

**पुनर्मुद्रण** : २०१३

**द्वितीय आवृत्ती :**

श्रावणशुक्ल अष्टमी शके १९३८,

कन्यागत महापर्व प्रारंभ १२ ऑगस्ट २०१६

**मूल्य** : रुपये १००/-

**समीक्षक :**

(कै.) डॉ. गु.वा. पिंपळापुरे, ४१ मॉडर्न हौसिंग सोसायटी, प्रतापनगर, नागपूर ४४००२२.

**मुद्रक :**

के. जोशी आणि कंपनी

भिकारदास मारुतीमंदिराजवळ, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

फोन : ०२०-२४४७१४०९, २४४८२७४८

ई-मेल : kjoshipress@gmail.com

# : अनुक्रमणिका :


१. वाङ्मय संकल्प — प. पू. श्री. वा.द. गुळवणीमहाराज

२. प्रार्थना, प्रेरणा व मांगलिक — प. पू. श्री. दत्तमहाराज कवीश्वर

३. प्रकाशनातर्फे कृतज्ञता — पू. श्री. अ. सि. पोटभरे

४. समीक्षकाचा ऋणनिर्देश — डॉ.(कै) श्री. गु.वा. पिंपळापुरे

५. वाङ्मयनिर्माणभूमि आणि वाङ्मय विविधबंध
   वाङ्मयनिर्माणभूमि — १७
   वाङ्मय विविधबंध — ३०

६. श्रीकृष्णालहरी श्लोक–अर्थ–पद्यानुवादक्रम — ५१

७. श्रीकृष्णालहरी भाष्यचिन्तन — ९३

८. परिशिष्ट — १७३

# श्रीवासुदेवानंदसरस्वती ग्रंथ प्रकाशन मंडळाचे अध्यक्ष
# प.पू. श्रीयोगिराज श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज
# यांचा वाङ्मयकार्यासंबंधीचा संकल्प



(प.प. श्रीमत्वासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज यांच्या शतसांवत्सरिक जयंती - श्रावण कृष्ण पंचमी, गुरुवार शके १८७६, दिनांक १९ ऑगस्ट इ.स. १९५४ रोजी प्रकाशित झालेल्या श्रीवासुदेवानंदसरस्वती ग्रंथमाला 'द्वादशं पुष्पं' या ग्रंथाचे प्रारंभी जे 'प्रकाशनाचे निवेदन' प्रसिद्ध झाले आहे, त्यातील भावीकालात श्रीस्वामींच्या वाङ्मयाचे कार्यची जी संकल्पना प्रगट केली तेवढी खाली लिहित आहोत.)

।। श्रीगणेशदत्तगुरुभ्योनमः ।।

## प्रकाशकाचे निवेदन

गुरो तुझी ही पदवारिधारा । धुवो सदा कायिक दोष सारा ।
सदैव माझे मन, वाणि शुद्ध । करो तुझे नाम पवित्र सिद्ध ।।

आजच्या मंगलमय दिवशी ही द्वादश सुवर्णपुष्पात्मक दक्षिणा सर्वात्मक वासुदेवाला समर्पण करीत आहोत. आज चार वर्षे ग्रंथ प्रकाशनात्मक अंशाने चालू असलेला हा ज्ञानयज्ञ काही काल थांबवीत आहोत. आज फक्त महाराजांचे उपलब्ध वाङ्मय एकत्र झाले. त्या वाङ्मयातील मंतव्य आणि निदिध्यासितव्य विभाग जनतेच्या पुढे येणेबद्दल विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. हा संकल्प ईश्वरकृपेने फलद्रूप होण्याचा योग कधीतरी येईलच. यादृष्टीने हा संकल्प आम्ही जनतेपुढे मांडला आहे आणि तो केवळ स्वार्थमूलक नसून सर्वजनहितसंबंधी असल्याने विशुद्ध आहे, यात शंका नाही. असेच अनेक गुरुभक्तांचे विशुद्ध संकल्प

एकत्र झाल्यास श्रीमहाराजांच्या संप्रदायातील अनेक साधकांना व तत्संबंधी इतरांनाही आपली पारमार्थिक भूमिका दृढ करता येऊन पुढच्याही उच्च भूमिकेवर अनायासाने आरूढ होता येईल यात शंका नाही.

श्रीमहारजांनी, 'कलौ श्रीपादवल्लभ:' या वचनास अनुसरून श्रीदत्त-संप्रदायाचा विशेष प्रचार सर्वत्र केला. श्रीमहाराजांच्या सर्व ग्रंथांचा अभ्यास सर्वत्र सुरू झाला पाहिजे. ज्यांना ग्रंथार्थ समजणार नाही त्यांच्याकरिता तत्प्रांतीय भाषांतून या ग्रंथांचे शब्दश: भाषांतर, तात्पर्यविवरण, सिद्धान्त-प्रतिपादक निबंध, इ. रूपाने वाङ्मय निर्माण होऊन त्याचा प्रचार सदाचार पर्यवसायी झाला पाहिजे. याकरिताच श्रीमहाराजांनी यावज्जीव तसे आचरण करून हे ग्रंथ लिहून ठेवले आहेत. यांचा उपयोग कृतिपर्यवसायी झाला तरच श्रीमहाराजांच्या ऋणांतून अंशत: तरी आपण मुक्त होणे शक्य आहे.

म्हणून हे कार्य अविच्छिन्न चालू राहण्याकरिता श्रीमहाराजांच्या संप्रदायातील जी जी स्थाने आहेत त्या त्या स्थानातील कार्यकारी व इतरही सांप्रदायिक योग्य सद्भक्त यांना विनंती करून त्या सर्वांचे एक स्वतंत्र मंडळ तयार व्हावे अशी आमची इच्छा आहे व त्याप्रमाणे आम्ही त्या त्या स्थानांशी संबंध असणाऱ्या तत्प्रांतीय सज्जनांना विनंती करून तसे एक सर्व प्रांतीय प्रातिनिधिक मंडळ स्थापण्याचा प्रयत्न करणार आहोत. प्रसंगानुसार चालू ग्रंथप्रकाशन मंडळाचे विसर्जन त्या नवीन होणाऱ्या मंडळात करावे लागले तरी हरकत नाही. नवीन मंडळानेच यापुढे विविधभाषाद्वारा प्रकाशन कार्य चालू ठेवून श्रीमहाराजांच्या संप्रदायातील सर्व स्थानातून कर्म - उपासना व ज्ञान या तीनही योगांची जोपासना त्या त्या साधकांचे द्वारा चालू रहावी याबद्दल प्रयत्न करणे आवश्यक आहे.

श्रीमहाराजांचे विस्तृत चरित्र व त्यंच्या लहानमोठ्या ग्रंथांचे समालोचन हे कार्य फार महत्त्वाचे असे अद्यापि शिल्लक आहे. त्याकरिता माहिती मिळविण्याचे दृष्टीने आसेतुहिमाचल प्रवास

करावा लागेल. ती सर्व माहिती नंतर सर्व भाषांतून सविस्तर चरित्र विभागातून प्रसिद्ध व्हावी, म्हणजे या संप्रदायाचे महत्त्व सर्वांच्याच लक्षात येऊ शकेल. प्रत्येकाने काही पैसे जमवून काही ग्रंथ छापावा असा व्यक्तीच्याच स्वार्थाकरिता यापुढे प्रयत्न न होता, नवीन स्थापन होणाऱ्या मंडळासच सर्वांनी सहाय्य करून त्याचे द्वाराच सर्व कार्य करवून घ्यावे. सामुदायिक शक्तीने घडून आलेले कार्य केव्हाही सर्वोपकारक व स्थिर असे होऊ शकेल. हा आमचा संकल्प लवकरच मूर्त स्वरूपात येण्याकरिता प्रयत्न करता यावा, म्हणूनच चालू यज्ञाचा प्रकाशनात्मक अंश काही काल स्थिगत करीत आहोत.

सर्वांच्या अंत:करणात धर्मवासना उदित व्हावी व सर्वांनी श्रीगुरुदेवांच्या कृपाप्रसादाने ईश्वरप्रवण होऊन सुखी व्हावे; हीच शेवटी प्रार्थना आहे.

सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥

श्रीगुरुकृपाभिलाषी
**वामन दत्तात्रेय गुळवणी**
अध्यक्ष, श्रीवासुदेवानंदसरस्वती
ग्रंथ-प्रकाशन मंडळ,
२०, नारायण पेठ,
पुणे ४११००२

श्रावण कृष्ण ५, गुरुवार
शके १८७६,
श्रीमहाराजांची शतसांवत्सरिक जयंती
दि. १९-८-१९५४

।। श्रीकृष्णावेणीभ्यांनमः ।।

# प्रार्थना – प्रेरणा व मांगलिक



पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर
श्रीवासुदेव निवास, पुणे
भगवानआचार्य जयंती,
वैशाख शु. ५.

न च प्राज्यं राज्यं न च विबुधपूज्यं सुरपदम् ।
पदं पूष्णो जिष्णोरपि मम न विष्णोरभिमतम् ।।
मतं दत्तात्रेयप्रपदपरिपूतं तव तटम् ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।६।।

**श्रीकृष्णालहरी**

*प.प. श्रीमत् वासुदेवनंदसरस्वती स्वामिमहाराज यांच्या शतसांवत्सरिक जयंती महोत्सवात श्रीस्वामिमहाराजांचे सर्व वाङ्मय बारा खंडांत प्रकाशित करून त्यांचे चरणी समर्पित केले. त्याप्रसंगी बाराव्या खंडाच्या प्रारंभी प्रकाशन मंडळाचे अध्यक्ष आणि प्रकाशक प.पू. श्रीसद्गुरुमहाराज यांनी केलेला संकल्प या ग्रंथामध्ये प्रारंभी देऊन श्रीस्वामिमहाराजांचे वाङ्मय प्रकाशनाच्या संकल्पना स्पष्टपणे सर्वही भक्तांना ज्ञात करविण्याचे कार्य होत आहे. त्यादृष्टीने डॉ.श्री. गु.वा. पिंपळापुरे, नागपुर यांनी "श्रीकृष्णालहरीतरंगसौंदर्य" हा श्रीकृष्णालहरीवरील मंतव्य आणि निदिध्यासित्व सरसतेने, उत्कट श्रद्धेने आणि शास्त्रीय प्रमाणाधारे प्रकट करणारा ग्रंथ लिहून श्रीस्वामिमहाराज यांच्या वाङ्मयाची अलौकिकता समाजापुढे ठेवली आहे. या वाङ्मयावरील समीक्षादृष्टीने लिहिलेला हा ग्रंथ लेखनदृष्टीला प्रेरक आहे. त्यांचेवरील श्रीस्वामिमहाराजांचे कृपेने असे उत्कृष्ट लेखन झाले आहे. संकल्पाचा प्रारंभ या दिव्यलहरीकाव्याने कन्यागत कालात घडणे हे मांगल्यदर्शक आहे. यापुढेही या संपूर्ण वाङ्मयाचे अंतरंग दर्शन अनेक चिंतनशील, स्वामीकृपापात्र, अभ्यासू भक्तहृदयाकडून होत रहावे ही श्रीचरणी प्रार्थना आहे.*

*या ग्रंथाचा सर्वही वाचकांना भरपूर लाभ होणार आहे. एतदर्थ सर्वांनी ग्रंथाचा आदराने संग्रह करावा व नित्य पठनाने जीवन कृतार्थ करावे ही बुद्धी धीप्रेरकाने सर्वांना द्यावी ही त्या धीप्रेरकास प्रार्थना आहे.*

श्रीवासुदेव निवास,
पुणे ४११००४

श्रीदत्तप्रियाश्रीकृष्णानुरागी
दत्तात्रेय धुंडिराज कवीश्वर

# प्रकाशनातर्फे कृतज्ञता

कृष्णां यो वृणुते भक्तः पदं यायान्निरन्तरम् ।
तृष्णां यो वृणुतेऽभक्तः खेदं यायान्निरन्तरम् ।।५२।।

**श्रीकृष्णालहरी**

प.प. श्रीमत्वासुदेवनंदसरस्वती स्वामिमहाराज यांनी श्रीकृष्णालहरी या दिव्य भावगीतामध्ये वरील अन्तिम श्लोक देऊन 'कृष्णा'भक्तांना अभय देऊन परम मांगल्याचा आशीर्वाद दिला आहे, तर 'कृष्णा'भक्ती सोडून 'तृष्णा'भक्तांना शापही देऊन ठेवला आहे. वास्तविक 'तृष्णा' हीच सर्व दुःखाचे मूळ आहे, ते येथे प्रकर्षाने स्पष्ट केले असल्याने जणू हा शापच देऊन ठेवला आहे, असा उल्लेख केला इतकेच. कृष्णामाहात्म्य या एकाच श्लोकातून आगळ्या वैशिष्ट्याने श्रीस्वामिमहाराजांनी सांगितले आहे, अशा दिव्य, आगळ्या लहरीकाव्याचे रहस्योद्घाटन करणारा 'कृष्णालहरीतरंगसौंदर्य' हा ग्रंथ कन्यागत वर्षकालात श्रीवासुदेव निवास प्रकाशनातर्फे प्रकाशित होण्याचा कुंभपर्वणीतुल्य योग येत आहे, याचा आनंद सर्व स्वामीभक्तांना तर होईलच, परंतु सर्वही मुमुक्षु पथिकांना हे श्रीकृष्णालहरीचे जीवन-तरंगाचे मानसिक मार्जन पापविनिर्मुक्त करून परमपदारूढ करण्यासही समर्थ आहेत.

श्रीस्वामींच्या वाङ्मयाची अंतरंग बैठक, अधिकारी साधक-भक्ताशिवाय आकलन होणे आणि पेलणे अवघड आहे. पूज्यपाद भगवान् श्रीमत् शंकराचार्यमहाराजांचे वाङ्मयसुद्धा सामान्य वाचकांच्या बुद्धीच्या आवाक्यात येण्यास कठीण आहे. हे काठिण्य शास्त्रनिष्ठसूत्रपद्धतीची मांडणी, तर्कशुद्ध विश्लेषण पद्धती, विसंगत विचारांचे खंडण, अद्वैत-वेदान्त तत्त्वाचे प्रभुत्वदर्शन, अशा तात्त्विक ज्ञानाचे हे वाङ्मय असल्याने सामान्यांना कठीण वाटणे स्वाभाविक आहे. त्यातही वर्तमानकाळात पूर्ण उपेक्षित केलेल्या संस्कृत भाषेत हे वाङ्मय असल्याने सामान्य वाचक त्या क्षेत्रात प्रवेशही करण्याचे धाडस करीत नाही. फार काय, बुद्धीचे भांडवल असलेले बुद्धीवान् लोकही या भारतीय अक्षय रत्नभांडाराकडे 'प्राचीन' 'जुने' 'कालबाह्य' आदि परमतदृष्टीने उपेक्षेने पाहतात.

विचारांचे श्रेष्ठत्व साक्षेपी, निःपक्षबुद्धीने, तौलनिक दृष्टी ठेवून मनन चिंतन केल्यावर कळून येते. याहीपेक्षा विशेष असे आहे की, तत्त्व आणि

अनुभूती याची प्रचिती घेऊन मानवमांगल्याच्या कळवळ्याने सांगणारे हे महामना महात्मे आहेत. या श्रद्धेने त्यांच्या वाङ्‌मयाचे चिंतन झाले; तरी व्यक्ति, समाज, संपूर्ण मानवजात शाश्वतकल्याण साधू शकतील. म्हणून आचार्यादींच्या वाङ्‌मयातील ग्रंथावर सुबोध भाष्यकारही अनेक झाले आहेत. सोप्या, प्रादेशिक मातृभाषेतून त्या त्या ग्रंथांची भाषांतरेही झाली आहेत; होत आहेत. हीच प्रक्रिया प.प. श्रीमत् वासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराजांच्या ग्रंथांच्या संदर्भात ईशकृपेने घडून येत आहे.

श्रीस्वामिमहाराजांच्या 'द्विसाहस्री'सारख्या ग्रंथावर प.पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वर यांचे 'द्विसाहस्रीसुबोधदर्शन' लवकरच ग्रंथरूपाने प्रसिद्ध होईल. 'माघ माहात्म्य' हे प्राकृतातील काव्य सुद्धा किती अलौकिक आहे याचा खुलासा नुकतेच प्रकाशित झालेल्या 'माघ माहात्म्य' पुस्तकाच्या प्रस्तावनेत तत्त्वचिंतक श्री.डॉ. गु.वा. पिंपळापुरे, नागपुर यांनी प्रकर्षाने दाखवून दिले आहे. श्रीस्वामींच्या एकूण वाङ्‌मय-ग्रंथांची व्याप्ती, वैशिष्ट्ये, विषय, त्यांची जीवनदृष्टी आदींचा संक्षिप्त पण ठाशीव उल्लेख करणारा एक विशेष ग्रंथ 'दत्तावतारी श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज यांची समग्र वाङ्‌मयसंपदा आणि जीवनदृष्टी' श्रीवासुदेव निवास प्रकाशनाने प्रसिद्ध केला आहे. या ग्रंथाचे लेखन डॉ. सौ. सुनीता ज. जोशी यांनी केलेले आहे. हा मूळ ग्रंथ पीएच्.डी. च्या निमित्ताने डॉ.सौ. सुनीता ज. जोशी यांचेकडून लिहिला गेला. या ग्रंथाद्वारे श्रीस्वामींचे वाङ्‌मय विश्वविद्यालयाच्या ग्रंथभांडारात सन्मानाने समाविष्ट झाले.

महापुरुषांच्या वाङ्‌मयाचा विशेष असा आढळतो की ते त्यांच्या सिद्धस्थितीतून संजीवन अमृतधारेप्रमाणे प्रगट झालेले असते. नंतर ते शास्त्र चौकटीतून परीक्षण करतांना त्याचे अलौकिकत्व सिद्ध करीत जाते. शास्त्राच्या सर्व कसोट्या पूर्ण करून त्याहीवर "परस्पर्श" केलेले हे वाङ्‌मय असते.

**"श्रीमत्‌भगवान् शंकराचार्यांच्या दिव्य वाङ्‌मयसंपदेनंतर, तत्तुल्य वाङ्‌मयनिर्मिती प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराजांचीच आढळते" असा उल्लेख वाराणसीचे प्रकांड पंडित राजेश्वरशास्त्री द्रवीड यांनी श्रीस्वामींच्या एका ग्रंथाच्या प्रस्तावनेत केला आहे.**

श्रीमत्‌वासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराजांचे भारतभर भ्रमण झालेले आहे. या भ्रमणकाळात जेथे जेथे चातुर्मासानिमित्त एके ठिकाणी राहणे झाले वा जेथे जेथे अधिककाल वास्तव्य झाले अशा अनेक ठिकाणी श्रीस्वामींनी

ग्रंथलेखन, प्रवचने, जिज्ञासूंना ग्रंथाध्यापन या धर्मप्रचारार्थ कार्यात काळ घालविला आणि दीन, आर्त बांधवांच्या समस्या सोडवून त्यांना ईशभक्तीकडे आकर्षून घेतले. भारतभर स्वामींचे हजारो भक्त आहेत. माणगाव - गरुडेश्वर - नारेश्वर - श्रीनृसिंहवाडी - गाणगापुर - कारंजे - गुंज - झिरी - सिप्री - इंदोर - पुणे - पवनी - कुरवपुर - पीठापुर इ. स्थानी त्यांच्या भक्तांनी स्वामींचे कार्य चालविले आहे. अजूनही तिलकवाडा, चिखलदा, ब्रह्मावर्त, मंडलेश्वर, कर्नाळी, होशंगाबाद, नरसी, तंजावर, मुक्त्याला आदि अनेक स्थाने अशी आहेत की या स्थानी श्रीस्वामींच्या पदस्पर्शाच्या, वास्तव्याच्या, उपदेशाच्या स्मृती मूर्त अमूर्त स्वरूपात विद्यमान् आहेत.

श्रीदत्तउपासना आणि अद्वैतवेदान्तसाधना याचा अविच्छिन्न संगम असलेली ही अनादि गुरुपरंपरा श्रीस्वामींनी, आसेतु हिमालय व्यापून राहिली असल्याचे सुस्पष्ट केले आहे. ब्रह्मा विष्णु महेशस्वरूप श्रीदत्तदेवता ही ''गुरुणांगुरु'' असल्याने या संप्रदाय परंपरेत - अनेकविध साधन परंपरा आढळतात, शैव-वैष्णव उपासनासमन्वय आढळतो, भक्ति - कर्म - ज्ञान - योग याही उपासनांचा संगम व समन्वय आढळतो, लौकिक व पारलौकिक प्राप्तव्य प्राप्त होते. थोडक्यात, वर्तमानयुगात भारतीय वेद, धर्माचे अभ्युत्थान आणि भारतीय समाजाची एकात्मता सांधणारी ही गुरुपरंपरा असल्याने श्रीस्वामींच्या वाङ्मयाचा आणि उपासनेचा प्रसार आगत्याने आणि तत्परतेने होणे अत्यावश्यक आहे.

या दृष्टीने श्रीक्षेत्र गरुडेश्वर संस्थान-पू. श्रीरंगावधूतनिवासक्षेत्र नारेश्वर संस्थान आणि पू. श्रीवामनरावजी गुळवणीमहाराज स्थापित श्रीवासुदेव निवास संस्थान येथील श्रीस्वामीभक्तांनी या वाङ्मयाचे प्रसारार्थ संघटित प्रयत्न सुरु केले आहेत. विद्यावाचस्पती, राष्ट्रीय पंडित ब्रह्मश्री पू. श्रीदत्तमहाराज कवीश्वरशास्त्रीजी या कार्याचे प्रमुख मार्गदर्शक ईशकृपेने प्रथमपासून लाभलेले आहेत. यामध्ये श्रीस्वामींचे सर्वही भक्तांना आणि संस्थांना आग्रहाचे आवाहन आहे, की त्यांनी या स्वामीकार्यात आपला सहयोग द्यावा.

श्रीस्वामींच्या वाङ्मयातील 'श्रीकृष्णालहरी' काव्यातील श्रीस्वामींचे प्रगट झालेले दिव्यभाव सुबोध - सोप्या भाषेत उकलवून दाखविण्याचे लोकोपकारक कार्य या ग्रंथातून साधले जात आहे. श्रीस्वामींच्या उदात्त भावलहरी - सामान्य वाचकांना सहज आकलन झाल्या तर वाचक -भक्तांचे ईशभावही उदात्त होत होत पुष्टही होत जातील असे श्रीस्वामींचे

शब्दसामर्थ्य आहे. ''श्रीकृष्णालहरीतरंगसौंदर्य'' हे श्रीस्वामींच्या विशाल वाङ्मय उद्यानातील एक गुलाबपुष्प आहे. या वाङ्मय उद्यानात अनेक पुष्पगुच्छ आहेत, एवढे जरी वाचक-भक्तांचे ध्यानी आले तरी या उद्यानातून उत्तमोत्तम पुष्पांचे रसास्वादन करून घेण्याची तीव्र जिज्ञासा वाचक भक्तांमध्ये निर्माण होईल.

श्रीएकनाथमहाराज म्हणतात,

श्रवणे उपजे सद्‌भावो । सद्‌भावे प्रकटे देवो । तेणे निर्दळे अहंभावो ।
ऐशी उदार पहा हो हरिकीर्ति ।। १/३०५ (एकनाथी भागवत)

''श्रीकृष्णालहरीतरंगसौंदर्य'' हे या ग्रंथाचे नाव प्रकाशनाने ठेवले आहे. याची प्रचिती ग्रंथाच्या अंतरंगातून मनोदृष्टीने प्रवास करताना ठायी ठायी येईल. ५२ श्लोकांचा अर्थ - समश्लोकी मराठी पद्य - श्रीस्वामींच्या भाष्यावर सुबोध विवरण - विविध महामनाकवींच्या काव्यांतील समानधर्म - शब्दाशब्दातून हृदयस्पर्शी - 'परस्पर्श' काव्याची गेयता - आदि सर्वंकष भावगुण अर्थसमृद्धी जी मूळ संस्कृत श्रीकृष्णालहरीत आहे ती हळूवारपणे उकलवून दाखविण्यात समीक्षक डॉ.श्री. नानासाहेब पिंपळापुरे पूर्ण यशस्वी झाले आहेत. ही प्रकाशन संस्था अंत:करणापासून डॉ.श्री. नानासहेब पिंपळापुरे यांची ऋणी आहे. ही केवळ श्रीस्वामींची इच्छा म्हणून श्रीस्वामींनी कृपा केली आणि आपल्याच दासानुदास असलेल्या सद्‌भक्ताकडून हे कार्य करविले आहे. डॉ.श्री. नानासाहेबांचे पितृदेव यांना इ.स. १९०९ मध्ये पवनी येथे श्रीस्वामींचा मंत्रानुग्रह झाला आहे. त्यांच्या मातृदेवता यांनाही प.प. श्रीदीक्षित स्वामिमहाराजांचा मंत्रानुग्रह झाला आहे. असा मातृपितृभक्ती-संयोग लाभलेल्या डॉ. नानासाहेबांचे हे कार्य म्हणजे गुरुस्वामी-सेवा आहे. त्यांचे फल देणारे श्रीस्वामी समर्थ आहेत. डॉ. नानासाहेबांनी आपले हृदयातील हे ज्ञानधन उदारतेने तृषित स्वामीभक्तांना देऊन ते सर्वांचे मंगलदुवे घेत आहेत, यापुढेही घेत राहतील.

ग्रंथनिर्मितीमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनेक सहकारी असतात. त्या सर्वांचेबद्दल प्रकाशनसंस्थेच्या मनात कृतज्ञता आहे. पण प्रत्यक्ष ग्रंथाकार देणारी मुद्रणसंस्था ही आपल्या सर्व सामर्थ्यानिशी - सहकाऱ्यांसह तत्परतेने आणि आत्मीयतेने प्रयत्नशील राहिली, म्हणूनच अमूर्ताला मूर्त-स्वरूप आले. हे ग्रंथरूप देणारे श्री. शं.द. घाटपांडे, जय-भारत प्रिंटिंग प्रेस, ठाणे यांचे सहकार्याबद्दल संस्था कृतज्ञ आहे. डॉ. त्र्यं.गो. पण्डे, नागपूर यांनी

श्रीकृष्णालहरीचा सुरस मराठी पद्यानुवाद केला आहे. त्यांचेही आम्ही कृतज्ञ आहोत.

श्रीवासुदेव निवासचे विश्वस्त मंडळ या प्रकाशनसंस्थेचा आधार आहे आधार, प्रेरणा आणि सहकार्य देते म्हणून ही 'इमारत फळासी आली' म्हणून इमारतीने आधाराचे कृतज्ञ राहिलेच पाहिजे. ही कृतज्ञता व्यक्त करणेही संकोचाचे होत असते.

सर्वांना ग्रंथवाचनाने श्रीस्वामींच्या ग्रंथसंपदेमध्ये प्रवेश करण्याची प्रेरणा होवो आणि सर्वांचे श्रीस्वामीकृपेने परम कल्याण होवो ही श्रीस्वीचरणी प्रार्थना!

श्रीवासुदेव निवास प्रकाशनातर्फे
**अच्युत सिद्धनाथ पोटभरे**

पुणे, अक्षय्यतृतीया,
एप्रिल, १९९३.

# समीक्षकाचा ऋणनिर्देश

श्रीक्षेत्र पवनी येथे प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामी चातुर्मासाला होते. वर्ष १९०९. त्यावेळी इकडील काही जणांना त्यांचा अनुग्रह लाभला. तीर्थरूप वामन गोविंद पिंपळापुरे हे त्यातील. पुढे मातोश्रीने प.प. श्रीनृसिंहसरस्वती - (दीक्षितस्वामी) श्रीस्वामींचे शिष्योत्तम - यांच्यापासून अनुग्रह घेतला. अगदी बालपणापासूनच श्रीस्वामींचे नांव व महती कानावर पडली. हा एक मोठा सुकृताचा भाग मला वाटतो. श्रीकृष्णालहरीच्या चिन्तनिकेची सेवा वाट्याला आली हे त्याचेच फळ. संस्कृताची त्यातही वेदान्ताची काही धुळाक्षरे - ज्यांच्यापासून मला मिळाली ते ती.स्व. आप्पाजी गडीपंत - पेंडके, वकील, उमरेड यांची चिन्तनिकेच्या वेळी प्रकर्षाने आठवण झाली. विशुद्ध आचरण व विद्याधिरुची यांचा त्यांनी कित्ता तर पुढे ठेवलाच होता, पण मुलाविषयीच्या ममतेने ते मला साक्षेपाने शांकरभाष्याकडे वळवीत होते. त्यावेळेला त्याचे महत्त्व जाणवले नाही. आज ते जाणवते. तीर्थरूपांचे ते विद्यागुरुबंधु होते. त्यांच्याकडून पुत्र-प्रेम अन् शिष्य-प्रेम असा दुहेरी लाभ मला मिळाला.

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांचे शिष्योत्तम व उत्तराधिकारी प.पू. श्रीबाबाजीमहाराज पंडित यांचे ते अनुग्रहीत होते. त्यांच्यामुळेच श्रीबाबाजीमहाराजांचे दर्शन, श्रवण व अल्पसे सान्निध्य मलादेखील मिळाले. हे त्यांचे माझ्यावरील दुसरे ऋण. श्रीमहाराजांच्या प्रवचनातून शांकर वेदान्त व संतवाङ्मय याची दिशा प्रत्येकालाच मिळे. मलाही ती अल्पशी मिळाली. श्रीगुलाबरावमहाराजांच्या वाङ्मयाची ओळख - तोंड ओळख देखील झाली. श्रीस्वामिमहाराजांच्या वाङ्मयाकडे लक्ष गेले ते मागाहून. घरात श्रीस्वामींची उपासना होती. पण ग्रंथ नव्हते. दत्तमाहात्म्याचे नाव मधून कानी पडे ते तेवढेच. श्रीस्वामींचे ग्रंथ त्यावेळी फारसे रुढ झाले नव्हते. मागाहून लक्ष गेले ही सुद्धा श्रीस्वामींचीच योजना मला दिसते. स्वतःच्या जडबुद्धीने श्रीस्वामींच्या वाङ्मयाचा अर्थ मला कितीसा कळला असता? श्रीकृष्णालहरीचा पाठक्रम व अर्थक्रम वेगळा मानावा ही कल्पना श्रीबाबाजीमहाराजांनी हरिपाठ रहस्यात दिलेल्या दोन 'क्रमां'वरून. मूळची ही मीमांसकाची संकल्पना श्रीगुलाबरावमहाराजांनी हरिपाठाला लावली व श्रीबाबाजीमहाराजांनी हरिपाठ रहस्यात तिचा पुरस्कार केला. चिन्तनाला

त्यामुळे नवी दिशा तर मिळते. पण श्रुतिविचारासाठी मीमांसकांनी घेतलेल्या या संकल्पनेचा असा वापर करताच संतवाङ्मयाची श्रुतितुल्यता अनायासेच सिद्ध होऊन जाते. किती उसनवारीवर मी पोसलो आहे हे या एका उदाहरणानेदेखील स्पष्ट व्हावे. सारी चिन्तनिकाच त्याची उचलेगिरी आहे असे कोणी म्हटले तरी मला ते वावगे वाटणार नाही.

श्रीस्वामिमहाराज व श्रीगुलाबरावमहाराज यांच्यात काही वैचारिक ऐक्य आहे. संप्रदाय आराध्यदैवत व प्रतिपादनशैली वेगळी असूनसुद्धा हे ऐक्य आहे हे अधिक महत्त्वाचे. श्रीमच्छंकराचार्यांच्या अद्वैत सिद्धांतावर दृढ निष्ठा, ज्ञानोत्तर भक्ति व हरि-हराद्वैत ही जी दोघांची भेटीगाठीची स्थळे हेसुद्धा अनु-वाचनामुळेच कळले. श्रीकृष्णालहरीत ज्ञानोत्तर भक्ति शब्द आला नसेल पण इतरत्र श्रीस्वामींच्या ग्रंथात तो येतो. इथे शब्द नसेल पण अर्थ आहे. त्यादृष्टीने श्रीकृष्णालहरीचा घाटच वेगळा दिसतो. ज्ञानाधिष्ठित प्रेमाचा तो आविष्कार आहे.

समं साक्षात् पश्यसि ---, प्रभावस्तेऽपीदृक् --- तमोनुत्ते भासा --- अशा दोन-तीन लहरींकडे न्याहाळले तरी ते जाणवेल. त्याच्या जोडीला कुतस्त्वय्येतावद् --- किंवा प्रसङ्गोऽसङ्गोऽहम् --- हा श्लोक वाचावा म्हणजे कृष्णामाईविषयी श्रीस्वामींचे प्रेम उपनिषदर्थाने कसे ओथंबले आहे ते लक्षात येते. कृष्णामाई त्यासाठीच भुकेजली होती. "साहित्यज्ञ" पूर्वसूरींनी केलेल्या "सगुणसंपत्सुललित" आळवणीवर तिला समाधान नव्हते. "नच तव मुदे साऽपि कविता" असे श्रीस्वामींचे शब्द आहेत. तिला पूर्वसूरींच्या "मितार्था"वरून वेगळा अ(परि)मितार्थ हवा होता असे दिसते. आईची ती आस श्रीस्वामींनी पुरविली.

श्रीकृष्णालहरीवर श्रीस्वामींनी स्वत:च व्याख्या केली हे त्यांचे आपल्यावर मोठे उपकार होत. एरव्ही लहरीचे गांभीर्य तेवढे जाणवले नसते. आता श्रीस्वामींचे बोट धरून थोडे तरता येईल. "अलमतिविस्तरेण" हीही टीप तिथे आहेच. "समं साक्षात् पश्यसि" "प्रसङ्गोऽसङ्गोऽहम्" या लहरीवरील श्रीस्वामींचे अवगाहन पहावे म्हणजे किती खोलात उभे राहून कृष्णामाईचा प्रवाह श्रीमहाराज अंगावर घेत आहेत ते जाणवते. या सर्व ठिकाणी श्रीस्वामींचे शांकरभाष्यावरील प्रेम उधाणून आले आहे. यादृष्टीने श्रीकृष्णालहरी ही शांकरभाष्याची लहानशी लहरीच म्हणता येईल. दुसरा श्रीस्वामींचा आवडता विषय अर्थात् कृष्णामाईचाही हरिहराद्वैत - त्याचाही चिंतनिकेत परिचय आहे.

कृष्णालहरी चिंतनिका सर्वांगीण आहे असे मला म्हणता येत नाही. येथील अनेक विशेष – कृष्णामाहात्म्य, चित्रबंध, पाठभेद – व्याकरणविषयक टीपा व काही शंकास्थळे इ. सुटून गेले आहेत. पृष्ठ मर्यादा व बुद्धी मर्यादा हे त्यामागील कारण. तरीही पू. श्रीदत्तमहाराज यांनी प्रकाशनाला संमती दिली. श्रीस्वामींचे सारे वाङ्मय उजेडात आणण्याचे श्रेय प.पू. श्रीगुळवणीमहाराज व प.पू. श्रीदत्तमहाराज यांना. त्यांच्यासारख्या अधिकारी व्यक्तींनी चिन्तनिकेला मम म्हणण्यात वेगळी पावती मिळते याची मला जाणीव आहे. यात श्री. अ.सि. पोटभरे यांनी कन्यागताच्या पर्वकाळात हा योग आत्मीयतेने घडवून आणला.

या स्वरूपात श्रीकृष्णालहरी नव्याने सादर होत असली तरी श्रीस्वामिमहाराजांच्या समग्र वाङ्मय खंडात (१२ द्वादश खंड) ती पूर्वी येऊन गेली आहे. तिथे श्रीकृष्णालहरीवरील श्रीस्वामींच्या स्वकृत भाष्यासोबतच श्रीक्षेत्र नरसोबावाडीचे पं. बापूशास्त्री कोडणीकर यांचा लहरी अनुवाद व त्याच क्षेत्रातील पं. वामनशास्त्री उपाध्ये यांचे लहरी विवरण छापले आहे. या दोन्ही साहित्यकृती अतिशय मोलाच्या आहेत यात शंकाच नाही. पं. कोडणीकर यांनी मराठी अनुवाद देतांना कृष्णालहरी श्लोकांचा संस्कृत अन्वयदेखील अभ्यासकांसाठी दिला आहे. त्याचप्रमाणे श्रीस्वामिमहाराजांनी लहरीतील श्लोकांना दिलेल्या अवतरणिकादेखील अनुवादाला जोडल्या आहेत. कृष्णालहरीची ही चिन्तनिका व हा अनुवाद नवा असला तरी पूर्वीच्या आवृत्तीतील अनुवादाचे महत्त्व कमी मानण्याचे कारण नाही. एकाच कृतीचे अनेक अनुवाद झाले तरी ते स्वागतार्हच होत. याच भूमिकेतून हा नवा अनुवाद व चिन्तनिका प्रकाशित होत आहे.

श्रीकृष्णालहरीत अनेक पौराणिक व धर्मशास्त्रीय संदर्भ आले आहेत. पं. उपाध्ये यांनी ते अभ्यासपूर्वक एकत्र करून आपल्या विवरणात दिले आहेत. त्यांचे विवरण याच दोन मुद्याला धरून आहे. प्रस्तुत आवृत्तीत त्यातील निवडक संदर्भ परिशिष्ट रूपाने दिले आहेत. यावरून श्रीस्वामींचे प्रतिपादन पूर्वप्रमाणावर कसे आधारित आहे, याचा अभ्यासकांना नीट बोध होईल.

या दोन महनीय पूर्वसूरींविषयी अत्यंत कृतज्ञता व्यक्त करीत आहे. या सर्व ''पूर्वीयांचा'' मी अत्यंत ऋणी आहे. 'त्वयि भक्तिं मे वर्धय' असा प्रत्यय देऊन श्रीस्वामींनी ही सेवा गोड करून घ्यावी ही त्यांच्या चरणी प्रार्थना!!

स्वामी कृपांकित

**गु.वा. पिंपळापुरे**

# १) वाङ्मयनिर्माणभूमि

१) प्रवास व वाङ्मयरचना

२) श्रीदत्तप्रेरणेने ग्रंथनिर्मिती

३) हे ग्रंथ म्हणजे स्वामींचे अस्तित्व

४) सेव्य-सेवक भाव

५) जगदोद्धाराची आशा म्हणून दक्षिणपंथी आले

६) परिभ्रमणाबद्दल स्वामींचे मत

७) श्रीदत्त आज्ञेने प्रवास

८) स्वामींची प्रवासस्थळे म्हणजे भारताचे नवे मानचित्र

९) प्रवासस्थळांच्या माहितीची काही पत्रे

१०) श्रीदत्ताज्ञा पालनासाठी आटापिटा.

# २) वाङ्मय विविध बंध

१) वाङ्मय वर्गीकरण

२) द्विसाहस्रीगुरुचरित्र

३) श्रीदत्तपुराण ऋग्वेदाप्रमाणे ग्रंथ परिगणन

४) द्विसाहस्री समान्तर श्रीदत्तपुराण

५) समश्लोकी गुरुचरित्र

६) त्रिशति काव्य

७) श्रीदत्त चम्पू.



कृष्णावेणी महोत्सव प्रसंगी प.पू. गुरुमहाराज



कृष्णावेणी महोत्सव प्रसंगी प.पू. वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज

प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराजांची

# वाङ्मय निर्माणभूमि

### *प्रवास व वाङ्मयरचना*

प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराजांच्या जीवनाची जी बहुविध वैशिष्ट्ये आहेत, त्यात निरंतर प्रवास व भक्ति-वाङ्मय-निर्मिती यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. हा जोड उल्लेख सहेतुक केला आहे.

वाङ्मय-निर्मितीसाठी काहीतरी स्थिर जीवनाची अपेक्षा असते. ती स्थिरता स्वामींना अगदी शेवट शेवट मिळाली. समाधीपूर्वी साधारपणे एखादे वर्ष. परंतु ग्रंथनिर्मितीचे व्रत त्यावेळी आटोपलेच होते. सारी ग्रंथनिर्मिती धावत्या जीवनात झाली. अपवाद द्विसाहस्रीगुरुसंहितेचा. श्रीमहाराज त्यावेळी गृहस्थाश्रमात माणगावात होते. त्यावेळी गुरुसंहिता झाली, पण तीवरील टीका भ्रमन्तीच्या काळातीलच!

याप्रमाणे प्रवास व ग्रंथनिर्मिती हातात हात घालून चालत असत. असा अपूर्व संगम क्वचित आढळतो. स्वामींच्या प्रवासाचे स्वरूप लक्षात घेतले तर वाङ्मयनिर्मितीची अपूर्वता आणखीच मनात भरते. श्रीमहाराजांचा प्रवास सुरू झाला तो गृहस्थाश्रमापासूनच. माणगाव ते वाडी असा प्रवास पूर्व जीवनात श्रीमहाराजांना काही वेळा करावा लागला. पण तो इथे विचारात घ्यायचा नाही. ती केवळ एक नैमित्तिक घटना. पायाला चाक लागले तो १८९१ किंवा त्याच्या जवळपासचा काळ असावा. त्यासुमारास श्रीमहाराज कुटुंबाला घेऊन बाहेर पडले ते पुन: माणगावात परतले नाहीत.

प्रवासी जीवनाची ही सुरुवात होती. पुढे वाडीवर काही दिवस राहून कुटुंबासह गोदेच्या काठी ते आले. इथेच पत्नीला चिरविश्रांती मिळाली व महाराजांच्या अविश्रांत यति-जीवनाचा आरंभ झाला. आता परिग्रह केवळ दंड, कमंडलु, दोन छाट्या व चार लंगोट्या या वस्तूंचा! दोन हात दंड, कमंडलू घेण्यात गुंतल्यावार आणखीपरिग्रह किंवा संग्रह कसा व कुठे करणार? दौत, लिहिण्यासाठी बोरू (लेखणी), काही कागद व उपनिषदांची पोथी, आपल्या छाटीत गुंडाळून व ती कमरेभोवती घेऊन श्रीमहाराज प्रवास करीत. असल्या बद्धपरिकराने वाङ्मयनिर्मितीचे निदान दोनदशकाचे सत्र चालविले आहे. **मराठी-सारस्वताच्या त्यातही भक्तिवाङ्मयाच्या इतिहासातील हे सोनेरी पान म्हणावे लागते ते यासाठी.**

श्रीमहाराज पूर्वाश्रमात फार ग्रंथाभ्यास करू शकले ही नोंद या चरित्रग्रंथातही नाही. दोन चार वर्षांचा संस्कृत अभ्यासासाठी संपर्क आला असेल तेवढाच. ग्रंथाभ्यास हे त्यांच्या जीवनाचे वळणच नव्हते. आदर्श ब्राह्मणी जीवन, काटेकोर शब्दात बोलायते झाल्यास ऋषिजीवन ही त्यांची धाटणी होती. पूर्ववयात मांड घालून ग्रंथाभ्यास त्यांना करता आला नाही. उत्तर-वयात तर सारे जीवन वाऱ्यावर! अशा स्थितीतही वाङ्मयनिर्मितीत खंड पडला नाही हे महत्त्वाचे. प्रभावी प्रेरणा असल्यावाचून असल्या प्रतिकूलतेत ग्रंथनिर्मितीचा संभव दुरापास्तच. त्यामुळे झालेल्या ग्रंथनिर्मितीचा श्रीमहाराजांना एका बाजूने अचंबा वाटे तर दुसऱ्या बाजूने तिचे मोलदेखील जाणवे. दिसायला या दोन गोष्टी परस्पर-विरुद्ध वाटतात. परंतु त्या तशा नव्हत्या. ग्रंथनिर्मितीमागील प्रेरक शक्तीचे माहात्म्यच इतके लोकविलक्षण, की त्यामुळे उरलेल्या कृतीत ती अलौकिकता यायची असा स्वामींना आत्मप्रत्यय होता. अहंकाराचा उद्‌गार नसून आत्मप्रेरक श्रीदत्तकृपेचा महिमा आहे, असे श्रीमहाराजांचे मनोगत असे. याचदृष्टीने श्रीमहाराजांची पुढील दोन पत्रे शेजारीशेजारी ठेवून वाचली जावीत.

**द्विसाहस्रीवरील टीकेविषयी ते म्हणतात :**

"प्रत नसून तोंडानेच जसे स्मरले तसे लिहून टीका झाली." "टीका झाल्यावर पश्चात् समजून घेणाऱ्यांनी खुलासा करा म्हटल्यावरून टीप दिली." "ह्या टीकेचे जागोजाग भाष्यकारांचे संमतव उत्तरमीमांसा, न्याय व क्वचित् मीमांसा न्याय दिला. व्याकरणाचाही भाग थोडाथोडाच दिला आहे. शिवाय कठीण श्रुती व सूत्रे यांचाही अर्थ दाखविला. परंतु बरीच सूत्रे व श्रुती प्रमाणभूत असून त्याचा अर्थ दाखवावा, परंतु तशी सवड न झाली. हा ग्रंथ मुमुक्षूंना उपयुक्त आहे. मात्र संस्कृत भाषेत झाला."

"ही टीका होणे एवढा ह्या व्यक्तीचा अधिकार नाही. 'रामोहरि' करणाऱ्या मुखाचे हे माहात्म्य नव्हे तर हा श्रीस्वामींचा अनुग्रह व स्वहृदयस्थ-स्वमहिमख्याव्यापक श्रीदत्तगुरुप्रसाद जाणावा."

आश्विन व. ७ शके १८२१
२५ ऑक्टोबर १८९९
**द्वारका**

**दत्तमाहात्म्याविषयी व तदनुषंगाने इतर ग्रंथांविषयी ते लिहितात :**

"हा देह तिकडे येण्याचा इत्यादि इच्छा करण्याची गरज नाही. क्षणभंगुर नश्वर देहापेक्षा यश:काय कायम रहाणार नाही काय? **जयन्ति ते सकृतिनो रसासिद्धाः कवीश्वराः। नास्ति तेषां यश:काये जरा-मरणजं भयम्।** जरी यश:कायाने शंका-समाधान भाषणादिक कसे घडेल म्हणणे, तर प्राकृत लोकांकरिता रस-भरित भक्ति-ज्ञान-भरित दत्तमाहात्म्य प्रसिद्ध झाले आहे. शिवाय संस्कृत-प्राकृत अनेक ग्रंथांची प्रसिद्धी झाली. तेणे शंका-समाधान होईल."

**सारंगपूर**

८-२-१९०२

## *हे ग्रंथ म्हणजे स्वामींच्या अस्तित्वाचे प्रतिनिधी*

ग्रंथनिर्मितीमागील प्रेरणा कुणाची हेही इथे स्पष्ट केले असून प्रगट झालेली वाङ्मयमूर्ति जिज्ञासु-मुमुक्षु-भाविकांचे साकडे फेडीत निरंतर राहणार आहे, ही स्वामिमहाराजांनी पूर्ण ग्वाही दिली आहे. अधिकारी पुरुषांना शंका-समाधान-भाषण ह्या गोष्टींसाठी नडण्याचे कारण नाही, त्यांच्यासाठी ते सदैव आहेतच. पण एवढा ज्यांना अधिकार लाभला नाही त्या प्राकृत लोकांनी काय करायचे? श्रीमहाराजांनी वाट सुचविली आहे, त्यांचे ग्रंथ चोखाळण्याची. **त्यांच्या साक्षात् अस्तित्वाचे प्रतिनिधित्व करणारे हे ग्रंथ आहेत.** ज्यांना शंका असेल त्यांना शंका-समाधानासाठी व ज्यांना शंका नसेल त्यांना समाधानासाठी वा भाषणासाठी अथवा समाधान भाषणासाठी हे ग्रंथ आहेत. शंका-समाधान-भाषण या द्वंद्व समासाचा हा अर्थ स्वामींना अभिप्रेत दिसतो. त्यासाठी सारी आटाआटी सोसून ही ग्रंथनिर्मिती झाली आहे. स्वामींना ती आटाआटी नव्हती, तो त्यांनी बुद्ध्याच निवडलेला म्हणा किंवा श्रीदत्तकृपेने म्हणा त्यांच्या वाटेला आलेला जीवनक्रम होता.

## *सेव्य-सेवक भाव*

ते एका पत्रात म्हणतात,

"यथेच्छ संचार करणे हा पारिव्रज्य धर्म. तथापि अद्यापि सेव्य-सेवक भाव आहे. तदनुरोध जिकडे संचार होणार तिकडे यथेच्छ होवो."

**प्रभासपट्टण**

इ.स. १८९९, पत्र क्र. १७/२३

श्रीदत्तांचे ठिकाणी सेव्यभाव श्रीस्वामींनी पूर्वाश्रमातच धरला होता. परंतु या सेव्य-सेवक भावाला धरून संचार करण्याची प्रेरणा पूर्वाश्रमाच्या शेवटच्या पर्वात साधारणपणे १८९१ च्या सुमारास झाली. म्हणूनच स्वामींनी माणगाव सोडून वाडीकडची वाट धरली. तिथे काही काळ कुटुंबासह घालविल्यानंतर उत्तर दिशेच्या रोखाने ते निघाले. कुटुंबाच्या चिरनिवृत्तीनंतर व संन्यासाश्रम स्वीकारण्यापूर्वी पाठविलेल्या पत्रात ते म्हणतात,

"श्रींचे आज्ञेने उत्तरखंडी जाणे होत असता गोदातीरी वै. कृ. १४ शुक्रवारी दुपारी सौभाग्यवतीला देवाज्ञा झाली. क्रिया करून नंतर उत्तरपंथी जाणे होईल."

**गंगाखेड**

६ जून १८९१

परंतु श्रींची ही आज्ञा उत्तरखंडी जाणे झाल्यावरही सुरूच राहिली. उत्तरखंड म्हणजे हिमालय अभिप्रेत असावा. हिमालयात स्वामींचे दोन चातुर्मास झाले आहेत. ती कोणती स्थळे आहेत ते आता इतिहासाच्या पोटातच दडून राहिले आहे. "पुराणश्रवण" करायला श्रीदत्त, नर-नारायणाश्रमात प्रतिदिनी जातात. तिथेच कुठेतरी स्वामी, पुराण श्रवण करीत राहिले असतील. पण हा तर्कच! साराच हिमालय देवतास्वरूप असल्याने सारीच स्थळे चातुर्मासाच्या दृष्टीने उत्तमच असणार.

## *जगदोद्धाराची आज्ञा म्हणून स्वामी दक्षिणपंथी आले*

मुख्य प्रश्न मात्र असा की, उत्तरपंथी जाणे झाल्यावर पुनः दक्षिणपंथी स्वामी का आले? श्रीसमर्थस्वामींना जशी "जगदोद्धार" करण्याची आज्ञा हिमालयात झाली, आणि त्यांना गोदा-कृष्णेच्या परिसरात आपल्या कार्याची मुहूर्तमेढ करावी लागली, तसेच काहीसे स्वामींचेही झाले असेल काय? अशी कल्पना मनात येण्याची कारणे दोन. एकतर स्वामींचे दण्डग्रहण ज्या श्रीनारायणानन्दसरस्वतींकडून करविण्यात आले ते समर्थसांप्रदायी होते व त्याची आठवण म्हणून स्वामिमहाराज दासनवमी साजरी करीत. कुमारशिक्षेतही स्वामिमहाराजांनी महाराष्ट्र साधु मंडळातील समर्थ-स्वामिमहाराजांचा वेगळ्या संदर्भात आवर्जून उल्लेख केला आहे. तोच कित्ता स्वामिमहाराजांपुढे असणे असंभवनीय नाही. दुसरे असे की, परिभ्रमण करीत राहणे ही गोष्ट परमार्थात प्रतिबन्धक आहे असे स्वामींचे स्वतःचे मत दिसते.

### *परिभ्रमणाबद्दल स्वामींचे मत*

**परिक्रान्ता देशा भगवति चतस्रोऽपिदिश: न शान्ता दुष्टाशाप्यजनि वपुषो मेऽन्तिमदशा।।** (देवी कृष्णे, अनेक देश मी फिरलो. चारही दिशा धुंडाळल्या. दुष्ट आशा काही शमली नाही आणि आयुष्याची शेवटची दशा आता येऊन ठेपली आहे. – कृष्णालहरी) हे कृष्णालहरीतील स्वामींचे उद्‌गार केवळ अलंकारिक मानता येत नाहीत. साधकांच्या भ्रमण-प्रवृत्तीला स्वामींनी दिलेली ती सावधानतेची सूचना आहे.

अद्वैत दत्तात्रेय-वर्म स्तोत्रात ते म्हणतात,

**स्वालयक्षेत्रतीर्थेषु गमयित्वा पदौ मम ।**
**उरक्रमपद: पातु व्यर्थपर्यटनादकात् ।।** – स्तोत्रसंग्रह पृ. १२०

''माझी पावले आपल्या निवास असलेल्या क्षेत्राकडे व तीर्थाकडे वळवून व्यर्थ फिरत बसण्याच्या पापापासून, ज्याची पावले मोठा प्रदेश व्यापणारी आहेत अशा श्रीदत्ताने माझे रक्षण करावे.''

व्यर्थ भ्रमंतीविषयी श्रीमहाराज किती प्रतिकूल असत हे त्यांनी साधकांना लिहिलेल्या अनेक पत्रांवरूनसुद्धा कळून येते.

### *श्रीदत्तआज्ञेने प्रवास*

असे असूनही ''प्रवास योगा''चे निरंतर अनुष्ठान श्रीमहाराजांकडून घडले, यावरून तसाच काही संदेश हिमालयात मिळाला असेल असा तर्क अनाठायी होणार नाही.

वेगवेगळ्या पत्रांतील काही उतारे पाहिले की, वरील तर्काला बळकटीच मिळते.

''वाडीवरून निघाल्यानंतर सांगोल्यास आल्यावर संग्रहणीचा उपद्रव सुरू झाला. **'गाणगापुरास जाऊन पादुकांचे दर्शन मात्र कर'** इतके सांगणे झाले. तेव्हा प्रकृति बिघडली, कसे जाणे होईल अशी प्रार्थना केली. नंतर **'मी सांभाळून घेईन'** असे सांगणे झाल्यावरून अक्कलकोटावरून गाणगापुरास जाणे झाले. वरच्या सांगण्याचे अनेक अर्थ कळून आले. नंतर हुमनाबादावरून गोदापार येणे झाले.''

**गंगाखेड**

मे १९०५, पत्र क्र. ९५

“पुनः पुनः तिकडे येण्याचे, पण वाडीवरून जिकडे जाण्याचे सांगणे तिकडे तर जाणे झालेच नाही. यावेळी चालीचा घोटाळा होत आहे. कधी जाऊन पुनः येणे होणार ते होवो.”

**हुसंगाबाद**

१६ नोव्हेंबर १९०५

“जे प्रभूच्या इच्छेने घडेल ते खरे. वाडीवर पुनः न यावे असेही स्वतःचे म्हणणे मुळीच नाही. काशी वगैरे तीर्थयात्रा करावी हाही विचार नाही. **जे प्रभूच्या इच्छेने घडेल ते घडो.**”

५ डिसेंबर १९०५

“उत्तर दिशेस जाणेची कार्तिकापासून आजपर्यंत हयगयच ठेवली, पण काळेश्वरी जोरानेच सांगणे की ‘चल’ म्हणून उत्तर दिशा धरावी लागली.”

**मंथनकाळेश्वर**

२३-४-१९०९

“चैत्र शु. ८ रोजी काशीस जाऊन तीन रात्री राहणे झाले व पंचक्रोशीस रामेश्वरापर्यंत येता तेथून मागे फिरून नरसोबाचे वाडीचा रस्ता धरून प्रयाण करण्यास सांगितल्याप्रमाणे फिरणे झाले.”

२१-४-१९०६/२२-६-१९०६

(गोकाक व अलाहाबादचे छाप पत्रावर आहेत.)

“गुरुमहाराजांस येथून जाण्याची आज्ञा जाहली असून ती फिरवावी व तेथे रहावे याकरिता महारुद्रानुष्ठान ब्राह्मणांनी केले. पुढे काय होईल ते पहावे.”

शंकरभट सप्रे

**नरसोबावाडी**

२२-४-१९१०

पराकाष्ठेचा सेवक-भाव कसा असू शकतो याचे उत्तम प्रत्यंतर वरील पत्रातून आपल्याला मिळते. तीर्थयात्रा करावी ही स्वतःची भूमिका नाही हे स्वामिमहाराजांनी स्पष्टच सांगितले आहे. प्रवासाचा क्रम स्वामिमहाराजांचा व उद्देश श्रीदत्तप्रभूला माहीत अशी ही अनन्य निष्ठा आहे. **“जगदोद्धार”** हाच एक उद्देश असू शकतो. प्रवासात झालेली ग्रंथनिर्मिती ही त्या योजनेचाच भाग मानली पाहिजे.

या निमित्ताने भारताचे नवे मानचित्र रेखाटले गेले ही एक उपलब्धि. या मानचित्रात आता स्वामिमहाराजांच्या पदचिन्हांनी उमटलेल्या स्थळांचा एक नवा आलेख आम्हाला बघायला मिळत आहे. सर्वच साधुसंतांनी कमी-जास्त प्रमाणात भारतभ्रमण करून आपल्या पदस्पर्शाने अगोदरच पवित्र असलेली इथली भूमी आणखी पवित्र केली हे खरे. **'तीर्थीकुर्वन्ति तीर्थानि'** असा त्यांचा अधिकार असतो. हे भगवान् नारदाचार्यांनी आपल्या भक्तिसूत्रातही सांगून ठेवले आहे हेही खरे आहे. श्रीज्ञानेश्वर-नामदेव-समर्थ-गौरांगमहाप्रभु यांच्यासारखे त्यामानाने अलिकडील संतसत्पुरुष वा पूर्वीचे आद्य-शंकराचार्य-श्रीरामानुजाचार्य प्रभृति आचार्य हे महा-पर्यटक होते यातही शंका नाही.

तथापि नवीन काळात आगगाडी, मोटारगाडीसारखी नवीन वाहने काहीशी अनुकूल असूनही तिचा अव्हेर करून यंत्रारूढ राहिल्यागत आपल्या आयुष्याचा उत्तरार्ध सारखा चालता-धावता ठेवणाऱ्या स्वामिमहाराजांसारख्या व्यक्ति त्यांच्या काळात तरी किती असतील कोण जाणे? यादृष्टीने स्वामींच्या जीवनाकडे पाहिले म्हणजे आजही मन स्तिमित होते.

**श्रीमहाराज असेतोवर कोणतेही स्थायी स्थान, आश्रममठ उभारले गेले नव्हते हे लक्षात आणले की, धावत्या व अ-निकेत जीवनाचा स्वामिमहाराजांचा कित्ता आणखीच मनात भरतो.**

ज्या स्थळांना स्वामिमहाराजांनी भेटी दिल्या ती स्थळेदेखील बरीच अप्रसिद्ध व सांदी-कोपऱ्यात पडून असलेली! ती सारी एका सूत्रात गुंफून भारताचे एक नवे मानचित्र आता रेखाटता येते. आपल्या शरीरात असंख्य नाड्या आहेत असे म्हणतात. त्या जशा कोणत्या तरी एका मध्यवर्ती केंद्राशी किंवा षट्चक्राशी जोडल्या जाव्या तसाच काहीसा प्रकार स्वामिमहाराजांच्या प्रवासस्थळांचा झाला आहे. मधूनमधून होणारे चातुर्मास म्हणजे षट्चक्र अशी कल्पना सहजच इथे सुचते आणि मन:चक्षूपुढे लहान-मोठी अनेक गावे व मधूनमधून घडलेल्या चातुर्मासाची स्थळे यांनी टिंबलेले भारताचे एक नवे सांस्कृतिक सजीव मानचित्र डोळ्यापुढे उभे राहते.

सुदैवाने त्यांनी या अनेक गावांवरून पाठविलेली काही पत्रे आज उपलब्ध आहेत. आपल्या ग्रंथनिर्मितीची स्थळेदेखील स्वामिमहाराजांनी नोंदली आहेत. या सर्व नोंदी एकत्र केल्या, की या मानचित्रातील

प्रवासपथदेखील लक्षात येतो. महाकवि कालिदासाने मेघदूतातील आपल्या मेघाला अलकावतीकडे सरळ पाठवून दिले नाही. उज्जयिनीसाठी थोडी वाकडी वाटदेखील करायला लावली. स्वामींच्या प्रवासपथातदेखील अशीच काहीतरी आंतरिक योजकता होती हे त्यांच्या पत्रांवरून स्पष्टच दिसते.

स्वच्छंदाने घडलेला तो प्रवास नव्हता. श्रीदत्तच्छंदाने चाललेली ती परिक्रमा होती. त्यामुळे त्यांनी चोखाळलेली वाट, मध्ये मुक्काम पडलेली स्थाने, चातुर्मासाची ठिकाणे या सर्वांचे एक हृदयंगम श्रीदत्त-विहार-चित्र आता साकारले जात आहे. कारंजा, कुरवपुर यांसारखी ठिकाणे काही निवडक लोकांना पूर्वी माहीतदेखील असतील. पण सांस्कृतिक राजपथावर आज ती दिसतात, ती कुणामुळे? 'द्वितीय दत्तावतार श्रीनृसिंहसरस्वती' या चरित्रग्रंथात अप्रबुद्ध यांनी स्पष्टच म्हटले आहे की, श्रीदत्ताचे नक्की जन्मस्थळ प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती व ब्रह्मर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांच्यासारख्या एकदोघांनाच माहीत होते. आज "पुरा सत्र स्तोत:" असे त्या स्थळांचे पूर्वीचीओळखर्वान पटण्याइतके नेत्रदीपक स्थित्यंतर झाले आहे. कारंजा तसे मोठेच गाव. पूर्वीची मोठी व्यापारपेठ, पण कुरवपुर? श्रीमहाराजांच्या पत्रातील नोंदी वाचल्या तरी आजचे नागर मन दचकून जाईल.

### *प्रवासस्थळांच्या माहितीची काही पत्रे*

"येथे काहीच उत्सव नसल्यामुळे उत्सव नवीन करण्याकरिता येथील मंडळींनी सांगितल्यावरून श्लोक मागितले."

"येथे सत्र वगैरे काही नाही व एका पुजाऱ्यावाचून दुसरे घर नाही. चहूकडून कृष्णा भरली. नौका नाही. तुंबीच्या जोडीवरून लोक उतरतात. पौषानंतर पायउतार होतो. अजून चातुर्मासाचा नियम काही सांगण्यासारखा नाही. कदाचित् चातुर्मास्य होईल तर कोणाचीच सोय नाही. कोण आला तर तांदूळ मिळावयाची पंचाइत आहे."

**कुरुगड्डी**
१२ जून १९११

"इकडे मंडळी बहुत जमल्यामुळे फारच अडचण आली आहे. तेव्हा तिकडून काही मुले व आण्णाचे, येथून येणाऱ्या मंडळींस येऊ नये असे

कळवावे. येथे लहान देऊळ असून बरीच गर्दी आहे. आता पुढे पावसात भिजण्याचा प्रसंग येईल.''

**कुरुगड्डी**

४ ऑगस्ट १९११

अशी कितीतरी गावे असत जिथे श्रीदत्तप्रभूंनी स्वामींना नेऊन बसवावे व भाविकांचे मोहोळ जमा करून दाखवावे. ती सारी स्थळे आता एकत्र ओवता येतात व तयार झालेली तीर्थमाळा न्याहाळता येते. संन्यासी जीवनातील पूर्वीची हिमालयात दुर्गमस्थळी घालविलेली वर्षे सोडली तरी नंतर नंतरच्या जीवनात पुन: तोच दुर्गमप्रवास स्वामींच्या वाट्याला आलेला दिसतो. स्वामींच्या पत्रातील पुढील काही नोंदी –

या गावी आल्यावर येथे सतत मोठा पाऊस लागून नदीस बराच पूर आला. तेव्हा येथेच राहणे केले. येथून वऱ्हाड जवळच आहे. कयाधू नावाची एक लहान नदी आहे. येथे लहानसे राममंदिर आहे. येथेच आसन ठेविले. अन्यत्र जाण्याचा काळ नाही. तथापि कसे तरी दोन महिने लोटावयाचे. या गावी आसमंतात रेल नाही व पोस्टही नाही. ८ दिवसांनी एकदा शिपाई येतो.

**नरसी**

२३ जून १९०५

तिकडून दर्शनाकरिता कोणी मंडळी येतील तर फारच हाल होतील. ८० मैल रेल्वेपासून दूर हा गाव आहे व नर्मदेतून इतके लांब येणे, तर कदाचित नौका बुडून जाणेचा संभव आहे. शिवाय गाडीरस्ता नाही. शिवराम वगैरे येणार असे केशवशास्त्री म्हणत होते. तरी येथे माधुकरी वगैरे मिळण्याची सोई मुळीच नाही. हे वर्तमान लोकांस श्रुत व्हावे.

**चिखलदा**

२३ जुलै १९१२

बढवाई स्टेशनापासून सुमारे ८० मैल चिखलदा असून मार्गाची सोई नाही व दोन तीन दिवस नर्मदेतून येण्यास लागतील व जातेवेळी वारा न मिळाल्यास किती दिवस लागतील हे सांगता येणार नाही. अशा अडचणीत पडण्यापेक्षा पत्रद्वारा दर्शन मानून स्वस्थ रहावे.

**चिखलदा**

९ ऑगस्ट १९१२

इकडे येणेचे सर्वथा करू नये. कारण बढवाईपासून ८० मैल चिखलदा आहे व किनाराही आज बरा नाही. गाडी घोडा मिळणार नाही. बढवाईत नौकेत बसल्यास ३-४ दिवस लागतील. जातेवेळी वारा लागला तरच नौका जाईल अशी बरीच अडचण असून धोका घडण्याचाही संभव आहे.

**चिखलदा**

१९ ऑगस्ट १९१२

नांदोदपैकी गरुडेश्वर नर्मदातीरी एक लहान पर्णशाळेत राहणे आहे. तूर्त पाऊस सुरू. प्राय: येथेच चातुर्मास होईल. येथे दक्षिणेचे एकच घर आहे. शिवाय देवालय, धर्मशाळा वगैरे मुळीच नाही व या रानात उगीच मंडळी अविचाराने येतील तर अशा फजितीत येऊ नये असे कळवावे.

**गरुडेश्वर**

१८ जून १९१३

काल अष्टमीचे दिवशी एकदम १५ इंच पाऊस पडला व पुढेही पडत आहे. छाट्याही वाळविण्याचे कठीण पडते. नुसते बसण्याससुद्धा जागा नाही. याकरिता इकडे या वर्षी कोणी येऊ नये.

**गरुडेश्वर**

३० जून १९१३

या नोंदी पुरेशा बोलक्या आहेत. उपलब्ध पत्रातील ह्या नोंदी आहेत. अनुपलब्ध पत्रातील नोंदी किती असतील कोण जाणे? तंजावरसारखी सोयीची ठिकाणे क्वचितच स्वामींच्या वाट्याला आली. -

तंजावरापासून १ कोसावर एक कावेरीचा प्रवाह बरा आहे. तिला वेणुनदी म्हणतात. येथे राहणेची उत्तम सोय व भिक्षेला जवळच ब्राह्मणांची घरे. हवा उत्तम असे सौकर्य आहे.

**तंजावर**

१ ऑगस्ट १९०७

पण अशी सारी सोय झाली तरी स्वामिमहाराजांना ती कुठे हवी होती? त्यांच्या अभिरुचीचा हा प्रश्नदेखील नव्हता. सुखी जीवनात रमण्यासाठी ते आले नव्हते. स्वामींचे पुढील पत्र त्यांच्या भूमिकेची साक्ष देणारे असल्याने वाचनीय आहे.

''येथून ५० मैल गोदावरी आहे. कार्तिकीचे क्षौर तेथेच करावे असे मत आहे. पण येथील मंडळी येथेच कृष्णातीरी करावे म्हणून आड पडतात. ह्या देशात संन्याशाविषयी अतिशय भक्ति असल्यामुळे जागोजाग बरीच हरकत येते. तरी गोदावरी लौकरच जाणे करणार.''

**सत्यमंगल**

२७ ऑक्टोबर १९०७

स्वत:च्या मान-मान्यतेचाही त्यांना किती कंटाळा होता हे या पत्रावरून स्पष्ट होते. लौकिकदृष्टीने जिथे सुखावा असेल तिथे रमणारी त्यांची वृत्ती नव्हती.

अगोदरच्याच जिकिरीच्या प्रवासी जीवनात आणखी भर पडली. त्या काळच्या प्लेगच्या साथीची व सप्तग्रहीमुळे ओढवलेल्या अवर्षणाची - महर्गतेची. विशेषत: गुजराथ प्रांतात त्याकाळी दुष्काळाची फारच खडतर परिस्थिती होती असे दिसते. द्वारकेवरून स्वामींनी पाठविलेली दोन पत्रे आजही अंगावर काटा उभा करतात.

''सप्तग्रहीच चालू आहे हे कळेल तर हेच फळ. श्रावण व. ९ रोजी एक इंच पाऊस पडला. दोन वर्षे पेरे नाहीत. प्राय: गुरे मेली. गायकवाड सरकारकडून गरिबाला खायला मिळते म्हणून वाचले. बेटात पाण्याची हाकाटी आहे. दीड पायली बाजरी रुपयास मिळते असा कहर आहे.''

**द्वारका**

६ ऑक्टोबर १८९९

''येथेच ४००० गुरे मेली. काही आहेत त्यांचा काय भरवसा? नागरमोथा कुटून या दिवसापर्यंत लोकांनी घातला. झाडीवर पान नाही.''

''सर्व मंडळींचा येथे राहण्याचा अत्याग्रह आहे पण येथील हाल पाहवत नाहीत व हा प्रतिकार कोण करील? ईश्वरइच्छा. लोक पोरांसाठी नवस करीत तर तेच लोक पोरे ढोरे शहरात सोडून निष्ठुरपणे जातात. असो. **हा एक तमाशा निर्विकारत्वे साक्षीपणे पाहत पर्यटन करावे.** शंभर रुपयांची दुधाळ म्हैस पाच रुपयाससुद्धा घेत नाहीत व सुंदर स्त्रीसुद्धा पुरुषाला नको. यापरता तमाशा काय सांगावा? **हेही दोन दिवस आहेत. दिन-रात्री न्यायाने निघून जातील.**''

सर्वांचा आग्रह आहे की, का. शु. २ रोज अन्नकोट पाहून जावे, पहावे. आपण चिंता करून नये. **धान्यादिकांची महर्घता झाली तरी सच्चिदानंदानंदरूपामध्ये कधीही तूट नाही. (एष नित्यो महिमा ब्रह्मस्य न वर्धते कर्मणा नो कनीयान्).**

**द्वारका**
२५ ऑक्टोबर १८९९

पत्रामधील शेवटचे वाक्य व त्याला प्रमाण म्हणून जोडलेले बृहदारण्यकातील वचन (४.४.२३) ध्यानात घेण्याजोगे आहे. **कोणत्या बाह्य परिस्थितीत ते वावरत होते व कोणत्या आंतरभूमिकेवर ते आरुढ होते याचा उलगडा इथे होतो.**

अवर्षणासारखी दुसरी अस्मानी सुलतानी परिस्थिती म्हणजे त्याकाळी मधूनमधून येणाऱ्या प्लेगच्या साथी होत. स्वामींच्या भेटीला जाऊ इच्छिणाऱ्या भाविकांना जसा या साथीचा प्रतिबन्ध सोसावा लागे तसा किंबहुना त्यापेक्षा जास्त स्वामींना स्वत: सोसावा लागत असे. मधल्याच प्रदेशात साथ सुरू झाली म्हणजे तो भाग टाळून जाण्यासाठी दूरची वाट घेण्यावाचून दुसरा उपाय राहीना.

दक्षिण भारतातून पाठविलेल्या एका पत्रात ते म्हणतात, ''कर्नाटकाचे सरहद्दीपर्यंत जाणे झाले. चामराजपुरापासून पुढे प्लेगसंबंधी प्रतिबंधामुळे लोक पडून ह्या मार्गाने जाऊ नका असे आड आले म्हणून भवानी-कावेरी संगमावर फिरून येणे केले. पण बेंगळूराकडच्या मार्गाने प्रतिबंध रेलने जाण्यास व पादचारी याससुद्धा आहे. तरी पुन: आता कुंभ-कोणास जाऊन आलेल्या वाटेशिवाय गती नाही. येथे क्षौर करून पुढे निघून एक शैलाकडील मार्ग आहे. तेथवर प्रथम पहावे असा विचार आहे.''

**भवानी-कावेरी संगम**
१५ नोव्हेंबर १९०७

## *श्रीदत्तआज्ञा पालनासाठी आटापिटा*

श्रीदत्ताची आज्ञा पालन करण्यासाठी केवढा आटापिटा चालला होता हे यावरून ध्यानात यावे. ''**सर्व तुझेसाठी सोडुनी हिंपुटी। येता न शेवटी पोटी धरिसी**'' असे म्हणून जेव्हा स्वामिमहाराज श्रीदत्तावर जरा रागावताना दिसतात तेव्हा ते केवळ शब्द नसतात. ते वास्तवच असते. हे

सारे वास्तव लीलेने अंगावर घेऊन ठिकठिकाणच्या अनामिक भक्तांचा शोध घेत घेत, **नदी–तीर्थ–मंदिरे यांना भेटी देत, स्तोत्र–वाङ्मयाच्या रूपाने त्यांच्याशी हितगुज करीत, आर्त–जिज्ञासु–मुमुक्षु यांना दिलासा देत व त्यासाठीच सवड मिळेल त्या ठिकाणी गंभीर वाङ्मय–निर्मितीचे आपले अनुष्ठानदेखील चालवून आपले एकलेपणही मोडू न देता एक कापडी अखंड प्रवास साधना करीत होता ही आठवण आजही स्वामिमहाराजांच्या ग्रंथाविषयी नवी जाग आणू शकते.**

वाङ्मय परिचय करून देण्यापूर्वी स्वामिमहाराजांचे प्रवासरामायण जे इथे गायिले ते याच दृष्टीने. स्तोत्र–वाङ्मयाच्या संदर्भात हे आणखीच महत्त्वाचे आहे. विविध नद्यांची व देवांची जी स्तोत्रे स्वामींनी गुंफली ती तिथे तिथे जाऊन त्यांच्या त्यांच्या जागत्या सान्निध्यात! याच दृष्टीने स्वामींनी भेटी देऊन गौरविलेल्या स्थळांना वेगळा अर्थ आहे. भारताचे सांस्कृतिक मानचित्र उजळणाऱ्या भाविकांच्याही मनात नवी जाग आणणाऱ्या व श्रीमहाराजांचे चरित्र व ग्रंथकर्तृत्व आठवून देणाऱ्या त्या दीप–कळ्या आहेत, एवढे लक्षात येण्यासाठी वाङ्मय परिचयाचीही प्रस्तावना म्हणून पाहिले जावे असे मला वाटते.



श्री टेंबेस्वामिमहाराज

# वाङ्मय विविध बंध

### *वाङ्मय वर्गीकरण*

श्रीस्वामिमहाराजांनी वाङ्मयाचे विविध बंध हाताळले आहेत हे विशेष लक्षात येते. **श्रीदत्तसांप्रदायाची नीट घडी बसविण्याची त्यांच्याकडे कामगिरी होती,** असे निदान त्यांच्या वाङ्मयाकडे पाहिले की आढळून येईल. केवळ संप्रदायविस्तार वा प्रचार एवढीच त्यांची दृष्टी नव्हती. संप्रदायाला स्वत:चीच म्हणता येईल अशी विपुल व सर्वंकष रचना करून ठेवणे त्यांना महत्त्वाचे वाटत होते. श्रीदत्तआज्ञेचा तसाच संकेत असावा. या विपुल रचनेचे अभ्यासासाठी काही वर्गीकरण करता येईल. हे वर्गीकरण अंतिम स्वरूपाचे मानण्याचे कारण नाही. इतरांना आणखी वेगळ्या तऱ्हेने ते करता येऊ शकेल.

आकर रचना, अनुवाद रचना, प्रकरण रचना, स्तोत्र रचना असे एक वर्गीकरण होऊ शकते. संस्कृत रचना पुढे ठेवून हे वर्गीकरण केले आहे. संस्कृत, मराठी असा वेगळेपणा पुढे न ठेवता भाष्य रचना, टीका रचना, पुराण रचना, प्रकरण रचना, निबंध रचना, काव्य रचना, स्तोत्र रचना व संकीर्ण असेदेखील वर्गीकरण होऊ शकेल. या वर्गीकरणाचे औचित्य समजून घेण्यासाठी स्वामिमहाराजांच्या ग्रंथसंपत्तीची तोंडओळख आवश्यक आहे.

### *द्विसाहस्रीगुरुचरित्र*

द्विसाहस्रीगुरुचरित्र ही स्वामिमहाराजांची पहिली वाङ्मयकृती. मराठीतील गुरुचरित्रातील कथा संस्कृतात इथे वर्णन केल्या आहेत. एकूण अध्याय तेवीस व पद्यसंख्या सुमारे दोन हजार. ही पद्यसंख्या केवळ श्लोकांची नसून त्यात आलेले मंत्र व श्लोक यांची मिळून आहे हे वे.शा.सं. माहूरकर शास्त्री यांनी दाखविले आहे.

ग्रंथारंभ करण्यापूर्वी स्वामींनी प्रथम विस्तृत मंगलाचरण जोडले. यात मानसपूजा, श्रीदत्ताची अष्टोत्तरशतनामावलि, प्रार्थना व गुरुस्तुति यांचा समावेश होतो. ग्रंथ कर्तृत्वाकडे स्वामिमहाराज कोणत्या भूमिकेतून पहात त्याचा यावरून बोध होतो. एकूण श्लोकसंख्या एकशे चार. ग्रंथनिर्मिती हे एक स्वतंत्र पूजानुष्ठानच आहे अशी स्वामींची दृष्टी असल्याने प्रारंभीच्या मंगलाचरणातच पूजेची सारी सामग्री त्यांनी मांडली. असा प्रकार त्यांच्या अन्य ग्रंथांत किंवा इतरांच्याही ग्रंथात पाहण्यात येत नाही.

ग्रंथ समाप्तीनंतरही **योगरहस्य** व **बोधरहस्य** अशी दोन प्रकरणे (अनुक्रमे ४३ व ४४ श्लोक) स्वामींनी परिशिष्टासारखी जोडली आहेत. असाही प्रकार भक्तिग्रंथात फारसा आढळत नाही. ग्रंथ कथावर्णनात्मक असल्याने योग व बोध यासंबंधी सुस्पष्ट विवेचन येणार नाही किंवा आले तरी कथेचे अंग म्हणून त्यांना जरा दुसरेच स्थान मिळेल, पहिले मिळणार नाही असे वाटून म्हणा किंवा अन्य कारणांनी म्हणा, स्वामींनी ही प्रकरणे जोडली आहेत.

याप्रमाणे आदि व अंती एक आगळीवेगळी प्रस्तावना व उपसंहार व मध्ये श्रीगुरुचरित्र असे या ग्रंथाचे बाह्यांग आहे. या ग्रंथाला स्वामिमहाराजांच्या वाङ्मय-रचनेत वेगळे स्थान यायला हवे; केवळ तो पहिला ग्रंथ म्हणून नव्हे. तो स्वामींना अधिक प्रिय असावा म्हणूनही. **हा सारा ग्रंथ स्वामींना मुखोद्‍गत होता असे दिसते.** कारण प्रस्तुत ग्रंथावरील टीका त्यांनी ग्रंथ पुढे नसताना पूर्ण केली अशी पत्रव्यवहारात नोंद आहे. ग्रंथ गृहस्थाश्रमात माणगावी असताना झाला व त्याची टीका गुजराथेत प्रभासपट्टण, द्वारका या दोन स्थळी पुढे गुजराथ प्रांतात पूर्ण झाली. श्रीरंगावधूतमहाराजांमुळे विशेष वाढीला लागलेल्या श्रीदत्तसांप्रदायाची ही मुहूर्तमेढ होती. टीकेला आरंभ गृहस्थाश्रमातच स्वामींनी करून ठेवला होता हे निश्चित म्हणता येते.

**"श्रीदत्तात्रेयप्रेरणया आत्रेयगोत्रो वासुदेवशर्मा कश्चिद् विप्रः"**

या टीकाग्रंथातील उल्लेखावरून उघड आहे. किती टीका लिहून झाली होती हे समजायला आज मार्ग नाही. पण संन्यासाश्रमात पूर्ण केलेल्या टीकेत पूर्वाश्रमीचा उल्लेख स्वामीनी पुसला नाही यावरून काही प्रकरणे तरी निश्चितच लिहून झाली असतील असा संभव आहे. माणगाव कोकणात व प्रभास व द्वारका दूर गुजराथेत असे भौगोलिक अंतर भासत असले तरी या सटीक ग्रंथाची पूर्ण निर्मिती पश्चिम सागराच्या तीरावर झाली आहे हे विसरता येत नाही. पश्चिम-सागर हे श्रीदत्ताचे सायंसंध्यानुष्ठानाचे स्थळ. तिथेच स्वामिमहाराजांनी आपल्या "वाङ्मयीन प्रातःसंध्येचे" अर्घ्यप्रदान केले असे म्हणता येणार नाही काय?

स्वामींच्या जीवनात कोणतीच घटना यादृच्छिक नव्हती. मग ही तरी तशी का मानावी?

या ग्रंथाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे त्याची **मंत्रात्मकता**. श्रीस्वामिमहाराजांना हा ग्रंथ मंत्रात्मक म्हणून समजला जावा व वैदिक मंत्राप्रमाणे त्याचाही स्वाहाकाराच्या अनुष्ठानासाठी विनियोग व्हावा हे अभिप्रेत नव्हते. श्रीदत्तप्रभूंना

मात्र स्वामींचे मत मान्य नव्हते असे हे भांडण आहे. श्रीदत्तांनी प्रस्तुत ग्रंथाचे स्वाहाकारनुष्ठान व्हावे असा दृष्टांत दिला. पण त्यासंधी श्रीस्वामिमहाराजांकडे विचारणा करताच उत्तर मिळाले,

जे स्वप्न झाले ते श्रीगुरूने दाखविले. मंत्रशास्त्रात मनुष्यांनी केलेले अनार्षग्रंथ यांचे अनुष्ठान करू नये असे आहे. मग त्याचा स्वाहाकर करण्याचा कोणी सांगावा? व हा ग्रंथ मी केला असाही अभिमान! श्रीगुरूची जशी इच्छा असेल तसे घडो. पण स्वाहाकार करा असे अनुमोदन द्यावे अशी प्रवृत्ति होत नाही.

**पवनी**

२४ जुलै १९०९

आपणास सांगणे व आपण केला इत्यादि गोष्टी बरोबर आहेत. पण त्या कामी अनुमोदन द्यावे असे वाटत नाही. **तिकडेस परभारे श्रीचे इच्छेने जे घडेल ते खुशाल घडो.**

**पवनी**

१६-८-१९०९

गुरुचरित्र स्वाहाकारासंबंधी स्वत: निराधार काहीच सांगता येत नाही. अत एव त्यासंबंधाने देवता-निर्णय व हवन-प्रकार वगैरे कामी काहीच अप्रामाणिक बोलता येत नाही.

**पवनी**

२५-८-१९०९

श्री.रा. नारोपंत उकिडवे व श्री.रा. शंकरभट्ट सप्रे यांना पाठविलेल्या पत्रातील वरील मजकूर श्रीस्वामिमहाराजांची शास्त्राज्ञेकडे पाहण्याची दृष्टी जशी स्पष्ट करते, तसे दुसरीकडे श्रीमहाराजांचे वाङ्मय दिसायला आधुनिक व लौकिक वाङ्मयाच्या स्वरूपाचे दिसत असले तरी, प्राचीन वैदिक वाङ्मयाचा नवा आविष्कार असल्याचे ही ग्वाही देत आहे. शास्त्राज्ञा ही परमेश्वराचीच **'परोक्ष'** आज्ञा असल्याने परमेश्वराच्या प्रत्यक्ष आज्ञेइतकेच तिचे महत्त्व श्रीस्वामिमहाराजांना वाटणे स्वाभाविक होते. या शास्त्राज्ञेमुळे समाजाची मर्यादा कायम राहते. **'सेतु'** व **'विधरण'** ही भगवंताची वैदिक बिरुदे होत. ती सार्थक ठरतात ती या शास्त्र व्यवस्थेमुळे. म्हणून त्याचे महत्त्व कमी लेखता येत नाही; **ही श्रीमहाराजांची भूमिका**

**विशुद्धच होय यात शंका नाही. पण त्याबरोबर निर्माण झालेल्या स्वामींच्या ग्रंथांची 'वस्तु-शक्ति' सामान्य कोटीची नाही, ती मूळच्या वैदिक मंत्रशक्तीचेच अर्वाचीन प्रकटीकरण आहे, हेही कोणीतरी ओळखायलाच हवे. ते काम दृष्टांत माध्यमाने श्रीदत्तप्रभूंनी करून दिले. हाही त्या व्यवस्थेचाच भाग असतो हेही विसरले जाऊ नये.** जगताची व्यवस्था सामान्य नियमांनी जशी बांधली जाते तशी ती क्वचित अपवादांनीसुद्धा. **श्रीस्वामिमहाराजांची आपल्या ग्रंथाकडे एक सामान्य निर्मिती म्हणून पाहण्याची भूमिका व श्रीदत्तप्रभूंची मात्र ती विशेष निर्मिती असल्याने त्याला 'अपवाद' वाङ्मय म्हणून विशेष प्रतिष्ठा देण्याची भूमिका याच दृष्टीने आपण पाहिली तर त्याचा अन्वयार्थ आपल्याला नीट लागेल** व या दोन्ही भूमिकांविषयी सारखीच श्रद्धा वाटू लागते. पातंजल महाभाष्यात भाषेचा अभ्यास कसा करावा याचे शास्त्रीय विवेचन केले आहे. त्यातही नियम व अपवाद हेच सूत्र सुचविले आहे. जो न्याय भाषाभ्यासाला तोच जगद्व्यवस्थेला लागू पडतो. जगद्व्यवस्थेची ही दोन चाके आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाही. दोहोंचाही सांभाळ अवश्य असावा असे वरील घटनेवरून समजून येते.

यामुळे **द्विसाहस्री-सटीक गुरुचरित्र हे श्रीमहाराजांच्याकडून पुढे होणाऱ्या वाङ्मय-रचनेचे अंत:स्वरूप प्रगट करणारी प्रस्तावनाच होती असे म्हणायला आता काही प्रत्यवाय नाही.** द्विसाहस्रीच्या टीकेविषयी श्रीमहाराजांचे पुढील उद्गार महत्त्वाचे आहेत,

**ॐ श्रीगुरुदत्तप्रेरणया श्रीगुरुचरितार्थबोधिनीं कुर्वे ।**
**पूर्वाचार्यमताढ्यां टीकां पश्यन्त्वमत्सरा: सर्वे ।।१।।**

**श्रीगुरुचरित्र ज्ञानकाण्ड १.१**

**पाश्चात्यपयोधितटेनवानां टीका प्रभासेभ्युदिताखिलानाम् ।**
**श्रीद्वारकायांचरितस्य तस्य श्रीसद्गुरोर्वेदनुतस्य तस्य ।।**
**शालिवाहनशके क्ष्मा-श्वि-वसु-भूमि मिते (१८३१) त्वियम् ।**
**टीका संपूर्णतां याता चातुर्मास्ये ह्यवर्षके ।।**

**गुरुचरित बोधरहस्य ४४ श्लोक**
**उपसंहार**

**श्रीदत्तपुराण** या ग्रंथाचा द्विसाहस्रीगुरुचरित्राशी काहीसा गूढ अनुबंध आढळतो. द्विसाहस्रीगुरुचरित्र लौकिक-संस्कृत-वाङ्मयाच्या पेहरावात असले तरी ते वैदिक-मंत्र-स्वरूपाचे आहे असा निर्वाळा श्रीदत्तप्रभूंनी दिला होता. तीच मंत्रात्मकता श्रीदत्तपुराणात श्रीमहाराजांनी वेगळ्या गूढ तऱ्हेने आणली आहे. श्रीदत्तपुराणाचा प्रारंभ **'वेद-पाद-स्तुतीने'** होतो. **ऋग्वेदाचे परिगणन** दोन तऱ्हेने होते. एक **मण्डल परिगणन** व दुसरे **अष्टक परिगणन**. पहिल्या परिगणनानुसार ऋग्वेदाची दहा मंडले आहेत तर दुसऱ्या तऱ्हेने आठ अष्टके आहेत. एकूण चौसष्ट अध्याय. श्रीमहाराजांनी श्रीदत्तपुराणाचा 'बंध' निवडताना ऋग्वेदाची ही दुसरी अष्टकात्मक मांडणीच पुढे ठेवली. याप्रमाणे चौसष्ट अध्यायांचे झाले आहे. इतकेच करून श्रीमहाराज थांबले नाहीत तर वेद-पाद-स्तुतीच्या पहिल्या अध्यायात प्रारंभापासून सदुसष्टाव्या उपान्तिम श्लोकापर्यंत अशीच रचना ते करीत आले आहेत की कोणते तरी एक चरण ऋग्वेदातील त्या त्या अष्टकातून शब्द उचलून केलेले असेल. एक चरण ऋङ्मन्त्राङ्कित व उरलेले स्वामिरचित **अशी ही 'संगम रचना' आहे**.

> **अग्निमीळे** परं देवं यज्ञस्य त्वां त्र्यधीश्वरम्
> स्तोमोऽयमग्रियोऽर्थ्यस्ते हृदि स्पृगस्तु शंतमः ।।

श्रीदत्तपुराणातील हा पहिला श्लोक वाचला तरी वैदिकरचनेची त्याची मूस कोणाच्याही सहज लक्षात येईल.

> **अग्निमीळे** पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम् । होतारं रत्नधातम् ।
> अयं ते स्तोमो अग्रियो हृदि स्पृगस्तु शंतमः ।। – ऋ. १.१.१.१
>
> **अग्निमीळे** परं देवं यज्ञस्य त्वां त्र्याधीश्वरम् ।
> स्तोमोऽयमग्रियोऽर्थ्यस्ते **हृदि स्पृगस्तु शंतमः** ।। – दत्तपुराण १.१.१
>
> **अयं देवाय** जन्मने स्तोमो विप्रेभिरासया । अकारि रत्नधातमः ।
> **तद् विष्णोः** परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः ।। – ऋ. १.२.१.१
>
> अयं देवाय दूराय गिरां स्वाध्याय सात्वताम्
> स्तोमोस्त्वनेन विन्देयं तद्विष्णोः परमं पदम् ।। – दत्तपुराण १.१.२

| | अष्टक | अध्याय | वर्ग | मंडळ |
|---|---|---|---|---|
| अग्नि | १ | १ | १ | १ |
| | | हृदिस्पृगस्तु - | अष्ट.१ अ.१, वर्ग ३१, पृ. ८ | |
| अयं देवाय | १ | २ | १ | १ |
| एता या | १ | ३ | १ | १ |
| अयं वां | १ | ४ | १ | १ |
| प्रमन्महे | १ | ५ | १ | १ |
| इन्द्रो मदाय | १ | ६ | १ | १ |
| द्वे विरूपे | १ | ७ | १ | १ |
| इदं श्रेष्ठमपि | १ | ८ | १ | १ |
| प्रव: | २ | १ | १ | १ |

अशा संमिश्र रचनेमागील श्रीस्वामिमहाराजांची भूमिका काय असावी? प्रवचन-पुराणात वेदमंत्रांच्या उच्चाराला विरोध करणारे एवढेच काय 'हरे राम हरे राम' हा मंत्रदेखील वैदिक असल्याने वैदिक मंत्रांच्या निर्बन्धाच्या शिस्तीतच उच्चारला जावा असे आग्रही प्रतिपादन करणारे श्रीमहाराज वेदपादस्तुतीने श्रीदत्तपुराणाचा आरंभ का करतात? यात त्यांची शास्त्रीयदृष्टी व करुणादृष्टी यांचा सुंदर संगम दिसतो. वेदमंत्र व त्याला धरून असणारी यज्ञ-कर्म-व्यवस्था हा स्वतंत्र शास्त्रीय विषय असल्याने त्यात जाति-वर्णादिकांचे जे काही निर्बंध असतील ते तसेच पाळण्यात सर्वांचे कल्याण आहे ही त्यांची शास्त्रीय भूमिका होती.

''**शास्त्रीयेऽर्थे शास्त्रीयस्य सामर्थ्यस्यापेक्षितत्वात्**'' (शारीरभाष्य)

या वाक्याने आचार्य शंकरांनीसुद्धा हेच प्रतिपादन केले आहे. परंतु वेदमंत्रांचा अधिकार नसलेला व अधिकार असूनही तो गमावत चाललेला वर्गदेखील या मूळ प्रवाहापासून तुटू नये हे पहाणे तेवढेच आवश्यक आहे. त्यासाठी करुणादृष्टीने श्रीमहाराजांनी वरील पर्याय शोधला व कोणत्याही उपलब्ध पुराणात न आढळणारी अशी आडी-निडी रचना श्रीदत्तपुराणात करून ठेवली.

पुराणे हे सूत्रवाङ्मय व वेद हे मंत्रवाङ्मय असा भेद-भाव अलिकडचे अभ्यासक करीत असतात. श्रीस्वामिमहाराजांना त्या विचारसरणीचा प्रतिवाद या रचनेमुळे अनायासेच करता आला. पुराणे श्रुत्यर्थाचे जसे 'उपबृंहण' विस्तार व पुष्टि करतात तशी ती श्रुतिगर्भदेखील असू शकतात असे या रचनेच्या द्वारा श्रीमहाराजांना सांगावयाचे आहे. पुराणात श्रुतींचा अर्थच

केवळ असा नसून श्रुतींची पदे-शब्ददेखील पुराणांची घटक असू शकतात हे श्रीमहाराजांनी इथे दाखवून दिले.

आपण समजतो त्याप्रमाणे मंत्ररचना ही पुराणकाळातच केव्हातरी घडून गेलेली रचना नसून तिचे नवे नवे आविष्कार अधिकारी महात्म्यांकडून होतच राहतात, मंत्ररचना ही अशी अखंडित चालणारी प्रक्रिया आहे. हा बोध श्रीदत्तपुराणातील वेदपादस्तुतीवरून आम्हा सर्वांना घ्यायचा आहे. अधिकारी व अनाधिकारी यांच्यातील द्वैत संपविणारी अशी ही नवी क्लृप्ति श्रीमहाराजांनी शोधून काढली. प्रतिकरूपाने ऋग्वेदातील काही निवडकच चरण वेदपादस्तुतीत आले असले तरी संपूर्ण मूळग्रंथाच्या अनुसंधानासाठी तेवढे पुरे असते. प्रतीके दिसायला अंशरूप असली तरी तुकडा म्हणून त्याची संभावना करायची नसते. हा अंश विचार लौकिक किंवा भौतिक विषयापुरता ठीकही असेल. परंतु इथे त्याला अवसर नाही. **अमृताचे चुळोदक घ्या की डोह घ्या, मृत्यु दूर सारण्याचे सामर्थ्य तिथे समानच असणार. आकाशाचा किंवा सागराचा एक अंश संपूर्ण आकाशाचे किंवा संपूर्ण सागाराचेच दर्शन घडवीत असतो.**

नाही तरी ऋग्वेद, यजुर्वेद हे तरी त्या अनंत वेदराशीचे अंशच आहेत ना? ते जर संपूर्ण वेदांचे प्रतिनिधीत्व करू शकतात तर वेदपादस्तुतीत श्रीमहाराजांनी घेतलेली प्रतीके समग्र वेदांचे प्रतिनिधीत्व का करणार नाहीत? केवढी दूरदृष्टी ठेवून श्रीमहाराजांनी ही रचना केली असावी? केवळ सारा ऋग्वेद मुखोद्गत होता म्हणून त्यातील पदे केवळ चमत्कृतीसाठी श्रीस्वामींनी श्रीदत्तपुराणात पेरली नाहीत. वेदमार्गाच्या मर्यादा पाळत पाळतच वेदमातेजवळ सारी लेकरे कशी राहू शकतील, बागडू शकतील याची सुंदर दिशा श्रीमहाराजांनी इथे दाखविली आहे. श्रीमहाराजांनी पुढे ज्या फुटकळ स्तोत्ररचना केल्या आहेत त्यातही काही ठिकाणी मंत्रगर्भ रचनेकडे त्यांचा कल आहे असे आढळेल. **सप्तशती गुरुचरित्र** नावाची मराठीतील गुरुचरित्राची सातशे ओव्यांची जी संक्षिप्त रचना श्रीमहाराजांनी केली त्यातही श्रीमद् भवद्गीतेतील पंधराव्या अध्यायातील सारी पदे मंत्रगर्भ पद्धतीनेच गुंफली आहेत. श्रुतीइतकेच श्रीमद् भगवद्गीतेचेदेखील महत्त्व असल्याने प्रतीकरूपाने पंधरावा अध्याय श्रीमहाराजांनी तिथे ओवून गोवून दाखविला आहे. साधक कुणीही असला तीर त्याचा अधिकार वा अनधिकार श्रौत वाङ्मयाच्या बांधिलकीच्या आड कदापि येता कामा नये, यासाठी ही सारी दूरदर्शिपणाने चालिवेली योजना आहे.

याच दत्तपुराणात श्रीस्वामिमहाराजांनी एक **वेद-निवेदनि** नावाचे स्तोत्र रचले आहे. नावावरूनच प्रस्तुत स्तोत्रात वेदार्थ प्रतिपादन केला आहे हे श्रीमहाराजांना स्पष्टच सांगायचे आहे. (दत्तपुराण अष्टक १ अ. ६ श्लोक १३ ते २०) याप्रमाणे ऋग्वेदाची अष्टकरचना श्रीदत्तपुराणात आणून, ऋग्वेदातील वेगवेगळी पदे श्रीदत्तपुराणाच्या प्रत्येक अध्यायातील प्रथम श्लोकात गुंफून, वेदपादस्तुतीनेच श्रीदत्तपुराणाचा आरंभ करून व वेद-निवेदनि स्तोत्राच्या नावावरूनच प्रतिपाद्य विषयात वेदांचे किती महत्त्व आहे, हे दर्शवून स्वामिमहाराजांनी सारे **दत्तपुराणच वेदमय करून सोडले आहे.** श्रीमहाभारतात आदिपर्वात पुढील वचन येते -

पुराणपूर्णचन्द्रेण श्रुतिज्योत्स्नाः प्रकाशिताः । (पुराणरूपी पूर्णचन्द्राने श्रुतिरूपी चांदणे प्रकाशित केले आहे.) सारे वेदवाङ्मयच जणुंकाही पुराणांनी उधळलेले चांदणे आहे असे महर्षी व्यासांना म्हणावयाचे दिसते.

श्रुतिपुराणांचा हा आत्मिक संबंध पुनः एकदा आठवून देण्यासाठी श्रीस्वामिमहाराजांनी या पद्धतीने श्रीदत्तपुराणाची रचना केली. पुराणाच्या शेवटी श्रीमहाराजांनी केवळ श्लोकसंख्याच नव्हे तर अक्षरसंख्या टिपून ठेवली. साडेतीन सहस्र श्लोक व एक लक्ष बारा सहस्र अक्षरे अशी ही संख्या आहे. वेदातील पदन्पद व अक्षरन्अक्षर ज्याप्रमाणे मोजून त्यांचा सांभाळ वैदिकांनी केला, तीच धारणा श्रीदत्तपुराण रचतांना श्रीमहाराजांच्या पुढे होती, याबद्दल आता काही शंका उरत नाही. प्रत्येक अध्यायाच्या शेवटीसुद्धा "त्रिकाण्ड-मण्डितायां संहितायां श्रीवासुदेव्याम्" (ज्ञान-कर्म-भक्ति यांनी युक्त असलेली श्रीवासुदेवीसंहिता) असे शब्द आढळतात. या सर्व रचनेमागे पुराणे ही वेदांशी एकात्मभावाने निगडीत आहेत हेच दाखविण्याचा त्यांचा साक्षेपी प्रयत्न आढळून येतो.

**अत्र काण्डास्त्रयोध्यायाश्चतुष्षष्टिस्तथाष्टकाः ।**
**अष्टौ सार्धत्रिसाहस्र श्लोका ॐ कार संमिताः ॥१॥**
**सद्वादशसहस्राध्यलक्षा (११२०००)ऽ क्षरात्मकं त्विदम्**
**श्रोतुर्वक्तुर्दत्तलोकप्रदं तारं पुराणकम् ॥२॥**

(इथे ज्ञान, कर्म व भक्ति असे तीन काण्ड आहेत. अध्याय चौसष्ट असून आठ अष्टके आहेत. ओंकारतुल्य असणारे साडेतीन सहस्र श्लोक आहेत. एक लक्ष बारा सहस्र अक्षरात्मक असणारे हे उपपुराण श्रोता व वक्ता यांना तारणारे व दत्तलोकाची प्राप्ती करून देणारे आहे.) - **श्रीदत्तपुराण - उपसंहार**

**श्रीदत्तपुराणाचा द्विसाहस्रीगुरुचरित्राशी** आणखी एका वेगळ्या दृष्टीने **अनुबन्ध आढळतो.** दोहोंचाही प्रास्ताविक भाग यादृष्टीने अभ्यासण्यासारखा आहे. द्विसाहस्रीगुरुचरित्रात प्रारंभी श्रीगुरुस्तुति नावाच्या प्रास्ताविक भागात **मानसपूजा** (४३ श्लोक) **अपराधक्षमापन स्तोत्र** (१० श्लोक) श्रीदत्तात्रेयांची दकारादि **अष्टोत्तर शतनामावलि** (११ श्लोक) वर्णन व प्रार्थना (४८ श्लोक) अशी मांडणी आहे.

**श्रीदत्तपुराणातील** प्रास्ताविक भागातली **आत्मपूजा** – मानसपूजेचे दुसरे नाव (२० श्लोक) **श्रीदत्तात्रेयाष्टोत्तरशतनामावली** (२४ श्लोक) **श्रीदत्तप्रार्थना** (४+८=१२ श्लोक) श्रीदत्तपुराणातील विषयानुक्रमणिका देण्याच्या निमित्ताने केलेले **दत्तभजन** (६४ पदे) **देवप्रबोध** (१० श्लोक) असा क्रम आढळतो. पूर्वीच्या मांडणीशी ही किती समांतर आहे हे सहज लक्षात येईल.

दोहोंचा प्रतिपाद्य विषयदेखील ज्ञानकाण्ड, कर्मयोग व भक्तियोग असाच आहे. अनुक्रमात थोडे अंतर आहे एवढेच. द्विसाहस्रीगुरुचरित्रात साधारणपणे ज्ञानकाण्ड पहिले पंधरा अध्याय, कर्मयोग सोळावा ते अठरावा अध्याय व भक्तियोग एकोणावीस ते तेविसावा अध्याय अशी विभागणी आढळते.

श्रीदत्तपुराणात पहिली दोन अष्टके (१६ अध्याय) ज्ञानकाण्ड, नंतरची चार अष्टके (३२ अध्याय) उपासनाकाण्ड व उरलेली दोन अष्टके (१६ अध्याय) कर्मकाण्ड अशी विभागणी आढळते.

द्विसाहस्रीरचनेचेच प्रतिबिंब इथे पडले आहे असे म्हटले तर अयोग्य होणार नाही.

श्रीदत्तपुराणाचा स्थलनिर्देश श्रीमहाराजांनी जसा सुस्पष्टपणे केला तसा कालनिर्देश केला नसला तरी प्रस्तुत रचना समश्लोकी गुरुचरित्राच्या नंतरची असावी असे मानण्यास अवसर आहे. सप्तशतीगुरुचरित्राच्या शेवटी श्रीमहाराजांनी पुढीलप्रमाणे उल्लेख केलेला आढळतो.

**झाले अठराशे सहा शकात। द्विसहस्र संस्कृत गुरुचरित।**
**त्यावरती टीका अवर्षणाब्दात। द्वारिका क्षेत्री जाहली।।**
**गुर्जरेच्छेने तयेवरी। चूर्णिका झाली त्याच वत्सरी।**
**अठराशे तेवीस वत्सरी। त्रिशती त्यावरी हो संस्कृत।।**

**ओवी समानार्थ श्लोक संस्कृत । हो अठराशे चोविसात ।**
**गंगातीरी दुजा कार्तिकात । मराठी भाषेत हे सप्तशती ।।**
**दत्तपुराण संस्कृत । माहात्म्यसार प्राकृत ।**
**ग्रंथत्रय रसभरित । वदवी दत्त वासुदेवमुखे ।।**

यात दत्तपुराणाचा उल्लेख **समश्लोकी गुरुचरित्रानंतर** येतो. त्यावरून **श्रीदत्तपुराण** त्यानंतरचे म्हणजे शके अठराशे पंचवीस किंवा त्याच्या आसपास झाले असावे. परंतु हा कालनिर्देश मनात काही शंका निर्माण करीत राहतो. कारण श्रीदत्तपुराणावरील टीका श्रीमहाराजांनी सिद्धाश्रमात असताना केली असा उल्लेख आहे. श्रीमहाराज ब्रह्मावर्ताला १८२४, २५ व २६ असे तीन चातुर्मास करून पुढे मातृगयेला सिद्धाश्रमात गेले असतील तर मग वरील निर्देश जुळतो. परंतु उपलब्ध सामग्रीवरून गुजराथेत जाऊन नंतरच श्रीमहाराज ब्रह्मावर्तास आले व तीन वर्ष तिथे राहिले असे दिसते. त्यामुळे वरील कालनिर्देश केवळ मराठी सप्तशतीचा मानावा लागेल व उल्लेखिलेल्या ग्रंथत्रयाचा या कालनिर्देशाशी संबंध नाही असा अर्थ काढावा लागेल.

स्थलनिर्देश मात्र स्पष्ट आहे. ते म्हणतात,

**श्रीदत्तेनोदिता टीका वासुदेव सरस्वतीम् ।**
**निमित्तिकृत्य विभुना चरितस्य गुरोर्वरा ।।१।।**
**अथान्यापि तथैवेयं स्वमाहात्म्यार्थबोधिनी ।**
**स्वल्पग्रन्था स्फुटार्था च टीका तेनैव तन्यते ।।२।।**
**सरस्वती महानद्यास्तीरे सिद्धाश्रमेऽश्रमे ।**
**श्रीक्षेत्रे विमले दत्तभक्तप्रार्थनया स्फुटम् ।।३।।**

**कलौ प्रत्यक्षफलप्रदस्य भगवतः श्रीदत्तात्रेयस्येदं माहात्म्यं पुराणेतिहाससारभूतं काण्डत्रयात्मकं भागीरथीतीरे ब्रह्मावर्ते उदितम् ।**

**श्रीदत्तपुराण – वेदपादस्तुती १.१.१**

**प्रस्तावना**

(सर्व समर्थ असणाऱ्या श्रीदत्तप्रभूने वासुदेवसरस्वतीला निमित्त करून द्विसाहस्री गुरुचरित्राची हृदयंगम टीका (व्याख्या) सांगितली, प्रगट केली. नंतर ही दुसरी, तशीच स्वामाहात्म्य आकलन करून देणारी, आटोपशीर पण स्पष्टार्थक असणारी टीका, सरस्वती या महान् नदीच्या तीरावर अत्यंत उल्लसित अशा सिद्धाश्रमासारख्या पवित्र क्षेत्रात श्रीदत्तभक्तांच्या प्रगट विनंतीवरून त्यानेच संपादित केली.

कलियुगात साक्षात् फल देणाऱ्या भगवान् श्रीदत्तात्रेयाचे पुराण-इतिहासाचे सारभूत असणारे व ज्ञान-कर्म-भक्ति-रूप त्रिकाण्डात्मक असणारे श्रीदत्तपुराण श्रीगंगेच्या तीरावर ब्रह्मावर्तात उदयाला आले.

वरील वर्णनावरून मूळ दत्तपुराणाची रचना ब्रह्मावर्तात तर त्यावरी टीका गुजराथेत मातृगयेसारख्या पवित्र ठिकाणी झाली याबद्दल शंका उरत नाही. ब्रह्मावर्तात श्रीमहाराजांचे एकूण चार चातुर्मास झाले आहेत. शके १८१४/२४/२५/२६. प्रस्तुत टीकेच्या प्रसंगी श्रीमहाराजांना द्विसाहस्रीचरित्र टीकेचीही आठवण होत आहे हे लक्षात घेण्याजोगे आहे. यावरून द्विसाहस्रीच्या टीकेनंतर लागलीच याही टीकेचा योग आला असावा. यादृष्टीने पुढील पत्र महत्त्वाचे आहे.

"तूर्त येथे विशेष पाठ वगैरे देण्याचे नसल्यामुळे रोज दोन घटिका गुरुचरित्रावर टीका लिहिण्याची होत असते. पहिले चार अध्याय आताच पुरे झाले. संस्कृतात टीका करणेची लहर लागली आहे. तूर्त चारशे झाली. पुढे कशी लहर लागेल कोण जाणे... तेव्हा ही टिपणं देण्याच्या उपयोगाची नाही. येथे प्रत मुळीच नाही. बरोबरची प्रत सारंगपुरास पूर्वीच पाठविली. तोंडानेच चालते. कदाचित पाठाक्षरभेद होईल तर तो पुढे सुधारला जाईल. टीप देणे तर समास सोडून लिहिलेल्या पोथीवर कठीण जागी दुसरी दिली जाईल. तूर्त येथे पत्र पाठवू नये. लवकरच प्राची सरस्वतीकडे जाण्याचा विचार आहे."

**प्रभास**

फाल्गुन व ३०, शके १८२०, १० एप्रिल, १८९९

प्रस्तुत पत्रात द्विसाहस्रीटीकेचा विषय तर आलाच आहे. पण प्राची-सरस्वतीकडे जाण्याचाही विचार प्रगट केला आहे. यावरून **द्विसाहस्रीटीके**नंतर लागलीच श्रीदत्तपुराणाचीही टीका श्रीमहाराजांकडून लिहून झाली असावी. तसे असेल तर शके १८१४ च्या ब्रह्मावर्तातील पहिल्या चातुर्मासातच हा ग्रंथ (शके १८१४) निर्माण झाला. अर्थात् **समश्लोकीगुरुचरित्र** ही रचना त्यानंतरच्या चातुर्मासातील (शके १८२४) म्हणावी लागते. हा कालानुक्रम बरोबरच असो की चूक असो, एक गोष्टमात्र निश्चित आणि तीही की, श्रीमहाराजांचे दोन मोठे टीकाग्रंथ - **द्विसाहस्रीटीका** व **श्रीदत्तपुराणटीका** ही गुर्जर देशाची संस्कृत सारस्वताला दिलेली मोठीच देणगी होय. पुढेही काही टीकाग्रंथ श्रीमहाराजांकडून लिहून झाले पण ते एकतर प्रकरणग्रंथावरील टीकाग्रंथ होते किंवा मोठ्या ग्रंथावरील ती टिपणे होती. **'वरा'** व **'स्वमाहात्म्यार्थबोधिनी'**

**ही जी दोन बिरुदे वरील दोन टीकाग्रंथांना लावली आहेत ती अन्वर्थक असून श्रीमहाराजंचे श्रीदत्तस्वरूप विषयक व दत्तसंप्रदाय विषयक मनोगत जाणून घेण्यासाठी प्रामुख्याने या दोन टीकाग्रंथांकडे कोणत्याही अभ्यासकाला वळावे लागेल यात काहीच शंका नाही.**

या दोन ग्रंथांपैकी एक चरित्रग्रंथ तर दुसरा पुराणग्रंथ आहे हेदेखील श्रीमहाराजांनी आपल्या टीकेत लक्षात आणून दिले.

**सर्गश्च प्रतिसर्गश्च वंशो मन्वन्तराणिच**
**वंश्यानुचरितं चैव पुराणं पञ्चलक्षणम् ।।**

हे प्रसिद्ध वचन टीकेत प्रारंभीच उद्धृत करण्यात आले आहे. यावरून मंत्ररचना ही जशी कोणत्यातरी प्राचीन काळातच होऊन गेलेली घटना नव्हे, तिची नवी नवी रूपे प्रगट होतच राहणार. त्याचप्रमाणे पुराणांचेही मानावे लागते. **अधिकारी महात्मे मधून मधून प्रगट होऊन या वाङ्मय रचनेला उजाळा देत राहतात. भूतकालीन संस्कृतीशी अभंग संबंध कायम राहतो तो या प्रक्रियेमधून. ही प्राचीन संस्कृती नित्य-नूतन राहण्यामागचे हेच रहस्य होय.** या प्रक्रियेला उजाळा देण्याचे ऐतिहासिक कार्य श्रीस्वामिमहाराजांकडे आले होते हा एकूण इत्यर्थ. अलिकडे काही विधर्मी लोक आपल्या आराध्य दैवतेच्या वर्णनाला पुराण म्हणून संबोधतात. तो एक हौसेचा प्रकार मानला पाहिजे. भारतीय पुराण संकल्पनेशी त्याचे कोणतेच नाते असू शकणार नाही. मागे उद्धृत केलेल्या महाराभारतातील वचनानुसार श्रुतीचे चांदणे उधळण्यासाठी पुराणांचा पूर्ण चन्द्रोदय असतो. सर्ग-प्रतिसर्गादिकांचे त्यात वर्णन असावे लागते ते वेगळेच. म्हणून **या भूमीत अवतरणारे व वैदिक संस्कृतीशी बांधिलकी असणारे महापुरुषच पुराणरचना करू शकतात.** त्या दृष्टीने श्रीदत्तपुराण हे 'पुराण' संज्ञेला पूर्णपणे पात्र ठरते.

### *समश्लोकी गुरुचरित्र*

ही श्रीस्वामिमहाराजांच्याकडून घडलेली आणखी एक मोठी रचना. **मराठीतील श्रीगुरुचरित्राची ही संस्कृत समश्लोकी.** एकूण सहा सहस्र चारशे एकाहत्तर श्लोक (६४७१). विस्ताराचा जर केवळ विचार केला तरी श्रीमहाराजांच्या ग्रंथसंभारात एवढा ग्रंथराज दुसरा नाही. द्विसाहस्रीगुरुचरित्र ही श्रीमहाराजांची स्वतंत्र ग्रंथरचना, तर ही अनुवादरचना. अनुवादकाचे माध्यम अनुवादकाच्या पदरात यशापेक्षा अपयशच अधिक टाकते, असा आजवर

सर्वांचाच अनुभव व निष्कर्ष आहे. त्यादृष्टीने अभ्यासकांनी या रचनेकडे अवश्य लक्ष द्यावे. **मराठीतील गुरुचरित्र हा निखळ मराठी भाषेतील इतर भाषीय शब्दांचा संपर्क न येऊ देता झालेला एकमेव ग्रंथ आहे.** हे श्री. अप्रबुद्ध यांनी श्री. कामत यांच्या गुरुचरित्राच्या प्रास्ताविकात स्पष्ट केले आहे. सरळ, सोप्या, ओघवत्या व प्रसन्न रचनेत सरस्वतीगंगाधर या कानडी गुरुभक्ताने सादर केलेले हे मराठी गुरुचरित्र आता श्रीमहाराज संस्कृतात अनुवादित करायला बसले आहेत.

संस्कृतातून प्राकृतात अनुवाद करण्याच्या नेहमीच्या प्रथेविरुद्ध चाललेला हा खडतर प्रवास होता. लौकिक अर्थानेच तो खडतर म्हणावा लागतो. कारण महिना सव्वा महिन्यात प्रस्तुत ग्रंथ पूर्ण झाला. समश्लोकी गुरुचरित्राच्या पुष्पिकेतील ही नोंद महाराजांनी मुद्दाम करून ठेवली.

**संग्रथ्य लिखिताः प्रायोऽन्वहं श्लोकाः शताधिकाः ।**
**श्लोकाः पञ्चदिनान्यस्य प्रत्यहं द्विशताधिकाः ।।१।।**

(प्रतिदिवशी साधारणतः शंभरावर श्लोक गुंफून लिहिण्यात आले आहेत. पाच दिवस तर दोनशेपेक्षा अधिक श्लोक लिहून झाले.)

**गुरुसंहिता**

५१ अध्याय, उपसंहार

एका पत्रातही श्रीमहाराजांनी ही घटना लिहून कळविली आहे. लीला लाघवी श्रीगुरुच्या प्रेरणेचे त्यांनादेखील कौतुक वाटले हे या पत्रावरून स्पष्ट दिसते.

"ब्रह्मावर्तास असताना गावात प्लेग आल्यामुळे सर्व लोक बाहेर गेले होते. काही वृद्ध राहिले होते. त्यावेळी तेथे समश्लोकी करण्याचे सांगणे झाले व तेथे एक लेखी जुने पुस्तक ५१ अध्यायांचे होते. त्यावरून करण्याचे सांगणे झाले. हे मोठे काम कधी संपावे असे त्याचवेळी मनात येताच पुनः सांगणे झाले की तूर्त पाठ वगैरे नसल्यामुळे रोज २००/२५० श्लोक होऊन महिना-सव्वामहिन्यात संपेल असे म्हणून ६।। हजार श्लोकसंख्या दाखविली. नंतर त्या गुरुचरित्राची जास्त संख्या पाहून ६-२६-३६-३७-४१-४२ अध्यायांपैकी ओव्या काहीशा अर्थानुसंधानास अडथळा न येणाऱ्या कमी करून समश्लोक केल्यावर ही संख्या भरते तसे करावे काय? अशी प्रार्थना केल्यावर तसेच करण्याची आज्ञा झाली. तसा ग्रंथ झाला. आता कमजास्त करता येत नाही."

**बिठूर**

चैत्र व. १२ शके १८२५

वरील पत्रावरून श्रीमहाराजांच्या ग्रंथनिर्मितीचा मुख्य स्रोत कुठे होता हे स्पष्टच दिसते. तो अखंड हाताशी असताना वाङ्मय निर्मितीचा प्रवास सुखाने होणे ही गोष्ट काही मोठी नव्हती. अनुवादाचे काम कष्टसाध्य निदान कालसाध्य, ही शंका स्वामिमहाराजांच्या मनात आल्याचे स्पष्टच दिसते. पण हाच वाङ्मयबन्ध श्रीगुरूने निवडण्यात व तो श्रीस्वामिमहाराजांकडून गिरवून दाखविण्यात फार मोठी योजना दिसते.

प्रादेशिक भाषेतील वाङ्मय कितीही मोलाचे असले तरी जोवर ते सांस्कृतिक भाषेत उतरणार नाही तोवर या खण्डप्राय देशात ते सर्वांच्या आध्यात्मिक जीवनाचे अंग कसे होणार? श्रीदत्तात्रेयांची दिनचर्या पाहिली तर ती दक्षिणेतील 'तुंगेपासून उत्तरेकडील नर-नारायणाश्रमापर्यंत व्यापून राहते. तो अखिल भारतीय आयाम श्रीदत्तवाङ्मयालाही लाभणे ही ऐतिहासिक निकड श्रीगुरूंना वाटली असावी. श्रीगुरुचरित्राचे संस्कृतात रूपांतर द्विसाहस्रीच्या रूपाने श्रीस्वामिमहाराजांनी यापूर्वी केले होते खरे, पण तेवढ्यावर श्रीदत्तप्रभूंचा संतोष नव्हता. केवळ दत्तचरित्र संस्कृतात उतरणे प्रभूला पुरेसे वाटले नाही. ज्या सरस्वतीगंगाधराने आपल्या अपूर्व शैलीने गुरुचरित्र वर्णन करून महाराष्ट्रातील समाज-मानस भारावून टाकण्याची कामगिरी करून दाखविली, तोही वारसा अखिल भारतीय स्तरावर पुढे चालावा, हे श्रीदत्तप्रभूंच्या मनात आले असावे.

राजकीय क्षेत्रात शिवशाहीची झेप जशी दिल्ली किंवा त्याही पलिकडे सिंधुनदीच्या तीरापर्यंत काही काळ झेपावली तोच प्रभाव सांस्कृतिक व आध्यात्मिक क्षेत्रात चिरंतन स्वरूपात पडत रहावा व या राष्ट्राचे उत्थान सुलभ होत रहावे अशी श्रीदत्तप्रभूंची योजना असावी. श्रीसरस्वतीगंगाधराच्या गुरुचरित्राचे संस्कृत समश्लोकीकरण त्या दिशेकडे संकेत करीत असावे. **यापुढील काळात ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोध प्रभृति मराठीग्रंथांचे असेच तोलामोलाचे 'संस्कृतीकरण' देशाच्या अभ्युदय निश्रेयसासाठी आवश्यक आहे. अर्थात् हे काम केवळ भाषान्तर स्वरूपाचे नाही. त्यासाठी आवश्यक असणारी कलाकुसर किंवा दोन्ही भाषांवरील प्रभुत्व या गोष्टी दुय्यम आहेत. आवश्यक आहे तो सरस्वतीगंगाधरासारख्या मूळ ग्रंथकर्त्याच्या आध्यात्मिक भावजीवनाचा तोल सांभाळणारा निदान तेवढ्याच कोटीचा महापुरुष.** तो समसमा संयोग श्रीदत्तसंप्रदायापुरता श्रीस्वामिमहाराजांमुळे साधला गेला व समश्लोकीच्या रूपाने अव्वल मराठी ग्रंथाला अखिल भारतीय आयामाचा लाभ झाला. अशीच उपलब्धी इतरही

ज्ञानेश्वरीप्रभृति ग्रंथांच्या संबंधात जर पुढे घडून आली तर त्या घटनेचे तोरणद्वार श्रीस्वामिमहाराजांच्या समश्लोकीने बांधले असे होईल. तसे व्हावे हीच प्रभुचरणी प्रार्थना. महाराष्ट्र मंडळ हे राष्ट्रमंडल होण्यासाठी हे फार आवश्यक आहे.

समश्लोकीच्या उपोद्घातात श्रीमहाराज म्हणतात,

**चरितं यन्महाराष्ट्रभाषया रचितं हितम्।**
**सरस्वत्याख्य विप्रेण वच्मि तद् देवभाषया ।।११।।**
**महाराष्ट्रीय भाषा तु न सर्व विषयोचिता।**
**अतः सुगमया देववाण्येदं तन्यते मया।।२।।**

(श्रीसरस्वतीगंगाधर ब्राह्मणाने जे हितप्रद गुरुचरित्र मराठी भाषेत सांगितले ते मी संस्कृतात सांगणार आहे. मराठी भाषा ही सर्व प्रदेशात रूढ असणे शक्य नाही म्हणून मी सुगम संस्कृतातून ते चरित्र वर्णन करीत आहे.)

**श्रीगुरुचरित्राची प्रादेशिकता संपावी हा हेतू येथे स्पष्टच दिसतो.**

"एक भाषा एखादे सिद्ध देशी चालेल. पण संस्कृत सर्वत्र चालते." (द्वारका - आश्विन व. ७ शके १८२१) या पत्रोद्गारावरूनदेखील श्रीमहाराजांचे तेच मनोगत कळून येते.

हे विचार ज्यांना अतिरिक्त स्वरूपाचे वाटतील त्यांनी निदान संस्कृत भाषेच्या अभिवृद्धीच्या मर्यादित दृष्टीकोणातून ह्या वाङ्मयकृतीकडे बघायला हरकत नाही. प्रादेशिक भाषांना ज्याप्रमाणे संस्कृत भाषेचा आधार स्वतःच्या अभिवृद्धीसाठी आवश्यक आहे, त्याचप्रमाणे संस्कृत भाषेनेदेखील प्रादेशिक भाषांचे बोट धरून चालणे आवश्यक आहे. त्यावाचून नवीन नवीन कथावस्तू, नवीन नवीन शब्द, नवनवीन वाक्प्रचार यांचा पुरवठा होणार कसा व भाषेचा तजेला कायम राहणार कसा? **कोणत्याही दृष्टीने का होईना, सरस्वतीगंगाधराच्या मराठी गुरुचरित्राचे संस्कृतात समश्लोकीकरण ही ऐतिहासिक घटना आहे यात शंका नाही.**

आकाराने हा ग्रंथ पुरेसा मोठा म्हणजे गुरुचरित्राइतकाच मोठा आहे. मूळ ग्रंथाप्रमाणे याचेदेखील एकावन्न अध्याय आहेत. **श्रीमद्भागवताचे प्रसिद्ध टीकाकार श्री श्रीधराचार्य** प्रत्येक अध्यायाच्या आरंभी अध्यायाचे सार श्लोकबद्ध करून सांगतात. इथेही समश्लोकीच्या प्रत्येक अध्यायाची तीच रीत श्रीमहाराजांनी आपल्या टीकेत अवलंबिली आहे. अध्यायसार श्लोकासाठी श्रीमहाराजांनी नवनवीन वृत्तांची निवड केली. मूळ ग्रंथासाठी

अनुष्टुभ वृत्तच अधिक प्रमाणात उपयोगात आणले आहे. ग्रंथाच्या शेवटी एकावन्नव्या अध्यायात (एकूण श्लोक ७३) विविध वृत्तांची श्रीमहाराजांनी निवड केली. द्विसाहस्रीगुरुचरित्र व श्रीदत्तपुराण यांचा जसा अनुबंध आपण दाखविला तसा इथे नाही. द्विसाहस्रीतील कथावस्तूच इथे विस्ताराने आली आहे. एवढाच काय तो संबंध. उघडउघडच हा अनुवाद ग्रंथ असल्याने पूर्वीच्या दोन ग्रंथांहून याचा बंध वेगळा असणार हे ओघाचेच होते.

**याप्रमाणे श्रीमहाराजांचे संस्कृतातील तीन मोठे ग्रंथ – द्विसाहस्रीगुरुचरित्र – श्रीदत्तपुराण व समश्लोकीगुरुचरित्र हे तीन वेगळ्या वाङ्मय प्रकारात मोडतात असे म्हणता येईल.**

पूर्वीच्या दोन ग्रंथांप्रमाणे या ग्रंथावर श्रीमहाराजांनी टीका लिहिली, पण ती केवळ शब्दार्थ स्पष्ट करण्यासाठी. तिला महाराज **चूर्णिका** म्हणत आहेत. पूर्वीच्या दोन टीकांचे स्वरूपच वेगळे. **'वरा' स्वमाहात्म्यार्थबोधिनी (श्रीदत्तपुराण प्रास्ताविक – वेदपादस्तुति)** किंवा पूर्वाचार्यमताढ्य **(द्विसाहस्री प्रस्तावना)** ही विशेषणे पूर्वीच्या टीकाग्रंथाचे स्वरूप स्पष्ट करीत आहेत. त्यामानाने ही टीका केवळ कठीण शब्दांचे अर्थ विशद करणारी टिपणी आहे, असे म्हणता येईल. त्या टीकेचे प्रस्तुत ग्रंथावरील टीकेशी साम्य एवढेच की मूळग्रंथ व टीकाग्रंथ एका स्थळी झाले नाहीत.

| | | | |
|---|---|---|---|
| **द्विसाहस्री** | मूळ ग्रंथ | माणगाव–कोकण | महाराष्ट्र |
| ,, | टीका ग्रंथ | प्रभास/द्वारका | गुजराथ |
| **श्रीदत्तपुराण** | मूळ ग्रंथ | ब्रह्मावर्त | उत्तर प्रदेश |
| ,, | टीका ग्रंथ | सिद्धाश्रम | गुजराथ |
| **समश्लोकी** | मूळ ग्रंथ | ब्रह्मावर्त | उत्तर प्रदेश |
| ,, | टीका ग्रंथ | तंजावर | तामिळनाडू. |

समश्लोकीच्या टीकेविषयी उपसंहारात श्रीमहाराजांनी केलेली नोंद अशी :

**गुरुचरितचूर्णिका कावेरीतीरे समाप्ता अ. ५१**

श्रीमद्भागवतावर श्रीधराचार्यांची भावार्थदीपिका व चूर्णिका अशा दोन टीका प्रसिद्ध आहेत. **समश्लोकीवरील चूर्णिका भागवतावरील चूर्णिकेसारखी सुगम तर इतर दोन ग्रंथांवरील टीका श्रीधराचार्यांच्या टीकेसारखी विवेचक असे तुलनेच्या भाषेत म्हणता येईल.** त्या धर्तीची टीका श्रीमहाराजांनी पुढे 'वृद्ध–शिक्षा' नावाच्या प्रकरण ग्रंथावर व

श्रीदत्तचंपूवरदेखील केली आहे. याप्रमाणे **श्रीमहाराजांच्या टीकाग्रंथांची वर्गवारी करायची झाल्यास** द्विसाहस्री – श्रीदत्तपुराण, वृद्ध शिक्षा, दत्तचंपू यावरील टीकाग्रंथ एका वर्गात तर उरलेले टीकाग्रंथ वेगळ्या प्रकारात मोडतात असे म्हणता येईल.

### *त्रिशतीकाव्य*

तीनशे श्लोकांचे हे काव्य श्रीमहाराजांनी समश्लोकी गुरुचरित्राच्या अगोदर एक वर्ष लिहिले. हे मागे दिलेल्या सप्तशतीगुरुचरित्रातील उद्धरणावरून उघड आहे. शके १८३३ वर्षी श्रीमहाराजांचा क्षिप्रा नदीच्या काठी **महत्पुर** गावी चातुर्मास्य झाला. याच ठिकाणी संस्कृतातील त्रिशतीकाव्य व मराठीतील श्रीदत्तमाहात्म्य या दोन ग्रंथांची निर्मिती झाली. श्रीदत्तमाहात्म्याविषयी पुढे लिहायचे आहेच. त्रिशतीकाव्यात तीन शतके आहेत. प्रथम शतकात शंभर श्लोक, द्वितीय शतकात एकशे दोन तर तृतीय शतकात एकशे सात श्लोक आहेत. श्रीगुरुचरित्रातील साऱ्या कथा इथे संक्षेपाने सांगितल्या आहेत. श्रीमहाराज त्रिशतीकाव्याच्या प्रारंभी म्हणतात,

**धीशुद्ध्यै प्राक्चरित्रार्थ एष संगृह्यते स्फुटः।**
**प्राज्ञैः प्रेक्ष्योऽत्र तत्सारः दर्पणेऽल्पे यथा मठः ।।५४।।**

(पूर्वी वर्णन केलेल्या गुरुचरित्राचा आशय चित्त शुद्ध व्हावे या हेतूने इथे स्पष्टपणे संकलित केला आहे. लहान आरशात ज्याप्रमाणे (मोठ्या) मठाचे प्रतिबिंब बघावे, त्याप्रमाणे सुजाण माणसांनी इथे त्यातील सार ग्रहण करावे.)

वरील श्लोकात श्रीमहाराजांनी एका चपखल दृष्टान्ताच्या आधारे त्रिशतीकाव्याचे स्वरूप स्पष्ट केले आहे. आरसा लहान असला तरी तो जर निर्मळ असेल (स्वच्छ – स्फुट) तर प्रतिबिंबित वस्तूचे स्वरूप ग्रहण करण्याला काहीच आडकाठी नसते. अर्थात् त्यासाठी सुजाणपण (प्राज्ञैः) आवश्यक आहे. अशा लोकांना वस्तूचे यथार्थस्वरूप (सार) कळू शकते. श्रीगुरुचरित्र इथे वर्णन केले असल्याने श्रीगुरू संन्यासी वेषात प्रगटले असल्याने श्रीमहाराजांनी सहेतुकपणे घर–प्रासाद शब्दाची निवड न करता 'मठ' शब्द निवडला असे दिसते. 'गृहम्' असा शब्द निवडणे इथे अशक्य नव्हते. हा बारकावा चूक असेल, बरोबर असेल, पण त्रिशतीकाव्य हा त्या विस्तृत गुरुचरित्राचा (द्विसाहस्रीगुरुचरित्र किंवा समश्लोकी गुरुचरित्र) सारांश आहे व जाणत्यांना तो आकलन करताना इथे अडचण पडणार नाही; ही श्रीमहाराजांची ग्वाही

मात्र महत्त्वाची आहे. चिन्तनिकेच्या प्रक्रियेतील हा महत्त्वाचा भाग असतो. **एकच गोष्ट विस्तृत व संक्षिप्त स्वरूपात माहिती असली तरच तिचा मर्मवेध सोपा होतो. त्या दृष्टीने या काव्याची रचना आहे हे महत्त्वाचे.**

त्रिशतीचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे जवळपास सर्वच संस्कृत वृत्तांची इथे उपस्थिती. **लहानातील लहान वृत्तापासून तर मोठमोठ्या वृत्तापर्यंत सर्वांनाच या काव्यात स्थान मिळाले. श्रीमहाराजांचे वृत्तप्रभुत्व त्यावरून स्पष्ट होते.** केवळ त्रिशतीकाव्यच नव्हे तर श्रीमहाराजांच्या पद्यनिर्मितीचे हे वैशिष्ट्य म्हणता येईल.

या काव्यावर श्रीमहाराजांनी टीका लिहिली असून त्याविषयीचा तपशील असा दिला आहे.

**वस्वस्विनागभूतुल्ये (१८१८) शालिवाह शके कृता ।**
**मार्गशीर्षे सिते पक्षे टिकैषास्तु गुरोर्मुदे ।।१।।**
**कारनाटकदेशे तु श्रीगुर्ल्हासुरसंज्ञके ।**
**ग्रामे मलापहातीरे टीकेयं पूर्णतां गता ।।२।।**

(अठराशे अठरा या शालिवाहन शकात मार्गशीर्ष महिन्यात शुक्लपक्षात केलेली ही टीका श्रीगुरूला आनंद देवो. कर्नाटक राज्यात मलप्रभा नदीच्या काठी गुर्लहोसूर नावाच्या गावी ही टीका पूर्ण झाली.)

इथे श्रीमहाराजांनी दिवसाचा उल्लेख केला नसला तरी मार्गशीर्ष शुक्लपक्षाच्या उल्लेखावरून श्रीदत्तजयंतीच्या सुमारास हा टीकाग्रंथ झाला हे उघड आहे. टीका गुर्लहोसूरलाच प्रारंभ करून तिछे संपविली की, इथे केवळ पूर्ण केली, आरंभ मात्र दुसरीकडे केला, हे समजण्याला मार्ग नाही. गुर्लहोसूरला श्रीमहाराजांचा निवास केवळ आठदहा दिवसांपुरताच मर्यादित होता, अशी चरित्रग्रंथात नोंद आहे. तीनशे श्लोकांवरील टीका एका आठवड्यात लिहून हातावेगळी करणे श्रीमहाराजांना अवघड नव्हते. परंतु द्विसाहस्रीग्रंथावरील टीका जशी श्रीमहाराजांनी प्रभास व द्वारका या दोन ठिकाणी लिहून पूर्ण केली, तसे याही टीकाग्रंथाचे असू शकेल. विस्ताराने ही तेवढी मोठी नाही हे खरे आहे. एवढे मात्र खरे की, कर्नाटकाच्या वाट्यालादेखील श्रीमहाराजांचे ग्रंथकर्तृत्व बरेच आले आहे. कुमारशिक्षा हा एकशेचार श्लोकांचा अनुष्टुभ वृत्तातील प्रकरणग्रंथ कार्तिकस्वामींच्या पर्वत शिखरावर झाला व त्यावरील टीका कर्नाटकातच भार्गवी–बाहुदा नदीच्या

संगमावरील त्रेतेश्वर-गदाधरांच्या तीर्थक्षेत्रात कर्नाटक राज्यातच पार पडली.

**श्रीदत्तप्रेरितमतिर्वासुदेवसरस्वती ।**
**कुमार शिक्षां पौरस्त्यां कुमारस्य धरेऽकरोत् ।। (कुमारशिक्षा १०३)**
**भार्गवी बाहुदा नद्योः सङ्गमो यत्र यत्र च ।**
**तीर्थं हत्याहरं चापि त्रेतेश्वर गदाधरौ ।।१।।**
**तत्रेय रचिता टीका कुमाराणां हिताय वै ।**
**अनेन प्रीयतां देवो भगवानत्रिनन्दनः ।। (कुमार टीका – उपसंहार)**

त्रिशतीकाव्यावरील टीका तशी आकाराने लहान असली तरी केवळ काव्याचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी ती लिहिली नसून, अन्य ठिकाणी श्रीमहाराजांनी प्रतिपादन केलेल्या प्रमेयांचे संक्षिप्त दिग्दर्शन करण्यासाठी ही लिहिली आहे. दिसायला ही काव्यावरील टीका आहे, परंतु प्रत्यक्षात प्रकरणग्रंथासारखेही तिचे प्रमेयविवेचक स्वरूप आहे. काव्यावरील टीकाग्रंथ म्हणून प्राधान्याने अलंकारवृत्त व व्याकरण विषयक टीप तर प्रकरण ग्रंथ म्हणून पुराण-धर्मशास्त्र-ब्रह्मसूत्र इत्यादींचा मधून मधून निर्देश असे या टीकाग्रंथाचे स्वरूप आहे. श्रीदत्तचंपूवरील टीकेसारखी मात्र इथे शास्त्रीय विवेचनावर विशेष दृष्टी नाही.

### *श्रीदत्तचम्पू*

गद्य-पद्यमय असणाऱ्या काव्याला चम्पू असे पारिभाषिक नाव आहे. त्याला धरून या काव्यात अनेक वृत्तातील श्लोक व मधूनच गद्यमय भाग असा प्रकार आढळतो.

श्रीदत्तचंपूचे एकूण तीन स्तबक आहेत. स्तबक म्हणजे गुच्छ. पहिल्या स्तबकात एकूण १५२ खण्ड आहेत. यात १३ गद्य खण्ड अंतर्भूत आहेत. (६, १९, २०, २५, २६, २९, ३०, ५५, ७६, ९६, ९७, ९८, १५१).

दुसऱ्या स्तबकात एकूण १०३ खण्ड असून त्यात पाच गद्य खण्ड (३८, ३९, ७१, ८८, ९६) अंतर्भूत आहेत. या स्तबकात स्वामिमहाराजांनी अगदी लहान गीति-वृत्तांचा शेवटी वापर केला आहे. (तममेयं श्रुतिगणगेयं हृतमायं मुनि-विज्ञेयम् । अद्वयम् अत्रेस्तनयं भावये दत्तात्रेयम् ।।१०१।।).


तिसऱ्या स्तबकात एकूण १०० खण्ड असून त्यात दोन गद्य खण्ड (२२, ८७) अंतर्भूत आहेत. एकूण गद्य खण्डाचे प्रमाण कमीच असून वृत्ते मात्र विपुल असून त्यात विद्युन्माला, अपराजिता, तनुमध्या यासारखी कमी



कन्यागतमहोत्सव स्वारीचे दर्शन घेताना प.पू. श्रीगुळवणीमहाराज



कन्यागतमहोत्सव – श्रीनृसिंहवाडी स्वारीची पालखी शुक्लतीर्थाकडे जाताना शोभायात्रेत अग्रभागी स्थानिक ब्रह्मवृंद व भक्तांसमवेत प.पू. श्रीगुळवणी महाराज.



प्राचीन श्रीनृसिंहवाडी मंदिर – घाट, कृष्णामाई – मनोहर दर्शन

वापरात असणारी वृत्तेदेखील आढळतात.

त्रिशतीकाव्य व श्रीदत्तचंपूमधील वृत्तालंकाराचांचे विवरण स्वतंत्रपणे **पं. श्रीपादशास्त्री तापस, मुळगुंद, जि. धारवाड** यांनी परिश्रमपूर्वक केले असून श्रीवासुदेव निवासाने प्रकाशित केलेल्या स्वामिमहाराजांच्या ग्रंथमालेत ते दिले आहे. त्यावरून वृत्त व अलंकार यांचा व ज्यासहीत वृत्ताचा त्यांनी किती सहजपणे व किती वैशिष्ट्यपूर्णरितीने वापर केला आहे हे आढळून येईल.

या चम्पूकाव्यावरील स्वकृत टीकेत काव्यरचनेमागील जे प्रयोजन श्रीस्वामिमहाराजांनी दिले आहे त्यावरून काव्यरचनेविषयी त्यांचा दृष्टिकोन तर स्पष्ट होतोच, पण परमार्थाच्या वाटसरूला त्यावरून काही शिकवण मिळते. ते म्हणतात,

**सारे काव्य ज्याच्या स्वरूपाचा विलास आहे तो परमात्मा रथाच्या चाकात जसे नाभिस्थान असावे तसा मध्यवर्ती असतो. ऋग्वेदाच्या सहाव्या अष्टकात हे श्रुतिवचन आढळते. त्यावरून सारे काव्य परमात्मस्वरूपाचा एक भाग आहे हे सिद्ध होते.**

**ऋग्वेदाच्या आठव्या अष्टकात म्हटले आहे की, जो ब्रह्मदेव या सृष्टीचा अधिपति आहे त्यालाही आपल्या यथार्थ स्वरूपाचे ज्ञान असेल की नसेल कोण जाणे? यावरून आम्हा सामान्य लोकांना परमात्म्याचे यथार्थ स्वरूप कळणे शक्य नाही ही गोष्ट स्पष्ट होते.**

असे असले, तरी त्या परमात्म्याच्या सगुणस्वरूपाचे गुणवर्णनपुण्य आपल्या शक्तीनुसार जोडून आपली वाणी पवित्र करावी, या दृष्टीनेच हा माझा काव्य करण्याचा उपक्रम आहे.

श्रीदत्तपुराणात श्रीदत्तप्रभूची जी कीर्ति वर्णन केली तीच चम्पूकाव्याच्या माध्यमाने थोडक्यात सांगितली.

दत्तभक्ताने विनंती केल्यावरून या चम्पूकाव्याचा अर्थ स्पष्ट करणारी ही टीका मी करीत आहे. त्यामुळे प्रेरणा देणारे श्रीदत्त प्रसन्न होवोत.

**यस्मिन् विवानि काव्यानि चक्रे नाभिरिवेत्यृचः ।**
**षष्ठाष्टकेऽस्त्यः सर्वं काव्यमीशैकदेशभाक् ।**
**योऽस्याध्यक्षः स परमः स्वात्मानं वेद वा न वा ।**
**इत्यष्टमाष्टकश्रुत्या नेशज्ञानं हि नः स्फुटम् ।**

अथापि सगुणस्यास्य गुणवर्णनपुण्यतः ।
स्वशक्त्या गां पुनामीति प्रवृत्तिरियमेव मे ।
यच्छ्रीदत्तपुराणोक्तं श्रीदत्तस्य यशोऽपि तत् ।
चम्प्वाख्यकाव्यान्तरेण संक्षेपात्कथितं स्फुटम् ।
दत्तभक्तप्रार्थनया तदर्थस्फुटबोधदाम् ।
टीकां कुर्वेऽनया प्रीयाद् दत्तात्रेयस्तदीरकः ।।


श्रीदत्तचम्पू प्रस्तावना

---

**कृष्णेला झालेले अन्य नद्यांचे संगम**

कृष्णा + कोयना
कृष्णा + भिमा + भामा
कृष्णा + वैनगंगा
कृष्णा + पंचगंगा
कृष्णा + तुंगभद्रा

## कृष्णानदी –प्रवाह दर्शन




१. महाबळेश्वर – महाराष्ट्र
२. वाई – महाराष्ट्र
३. माहुली – महाराष्ट्र
४. औदुंबर – महाराष्ट्र
५. नृसिंहवाडी – महाराष्ट्र
६. कुरवपूर (कर्नाटक)
७. मुक्त्याला (आंध्र)

# ।। श्रीकृष्णालहरी प्रारम्भः ।।

**।। श्रीगणेशाय नमः । श्रीकृष्णावेणीभ्यां नमः ।।**

।। तत्रायं मङ्गलार्थं प्रथमः श्लोकः ।।

**चतुर्बाहुः श्रीमत्सजलजलदश्यामलतनुः ।**
**प्रकाशद्वक्त्रेन्दुः सदुडुगणमुक्तावलिरपि ।।**
**तडिद्वासा भास्वत्सुतिलकलसन्मौलिरघहृत् ।**
**क्षमाध्रस्य ह्यत्रेरपि जयति सूनुः स्वहितकृत् ।।१।।**

**अर्थ :** चार भुजा असणारी, महानीलमण्याप्रमाणे स्निग्धकान्ति असणाऱ्या बाष्पभरित मेघाप्रमाणे नीलवर्ण असलेली, जिचा मुखचन्द्र कान्तीचा वर्षाव करीत आहे अशी, टपोऱ्या नक्षत्र-माळेप्रमाणे जिच्या गळ्यात मोत्यांचा हार शोभत आहे अशी, विजेप्रमाणे झळाळणारे वस्त्र परिधान करणारी, कान्तिमान् कुंकुमतिलक भालपटलावर विराजमान असणारी, सेवकांचे दुःख व दुर्व्यसन दूर करणारी, स्वकीयांचे हित साधणारी व ज्ञात्यांच्या नित्यवैरी असणाऱ्या कामादिदोषांना नष्ट करणारी सह्याद्रीची कन्या कृष्णा, सर्वत्र विजयिनी आहे.

**दत्तात्रेय पक्ष :** क्षमाशील अत्रिमनींचे पुत्र श्रीदत्तात्रेय भक्तांचा उद्धार करीत सर्वत्र विजयी आहेत.

(पुढे टीकेवरील स्पष्टीकरणात आकाशपक्षाचा अर्थ दिला आहे. (श्रीकृष्णा-लहरीच्या प्रत्येक श्लोकाचा पद्यानुवाद नागपूरचे स्वामिभक्त श्री.डॉ. त्र्यं.गो. पाण्डे यांनी केलेला आहे, तो प्रत्येक श्लोकाच्या अर्थानंतर दिला आहे.)

**मराठी पद्यानुवाद**

**१ (अ) श्रीकृष्णापक्षे –**

**कृष्णे नीलमण्यापरी दिसतसे,**
**कान्ति अती सोज्वल,**
**भासे नीरदवर्ण संभ्रम करी,**
**मेघापरी श्यामल,**
**तुझा मुखचंद्रमा अनुभवा,**
**वर्षाव कान्ति करी,**

सह्याद्रीतनये, सदा विजयिनी,
भक्तास या उद्धरी ।।

१ (ब) शोभे मौक्तिक हार तो तव गळा,
नक्षत्रमालेपरी,
वस्त्राची जर ती झळाळत दिसे,
विद्युल्लतेच्या परी,
रम्या भालपटावरी, तिलक तो,
कुंकुम कान्ति स्थिर,
सह्याद्रीतनये, सदा विजयिनी,
भक्तास या उद्धरी ।।

१ (क) दुःखा, दुर्व्यसना, सदा कर दुरी,
हे ब्रीद तू स्वीकरी,
ज्ञात्या जाचक नित्य वैरी म्हणती,
कामादि दोषा हरी,
संतोषा वितरी, जना सुखि करी,
दैन्या करूनी दुरी,
सह्याद्रीतनये, सदा विजयिनी,
भक्तास या उद्धरी ।।

(ब)

श्रीदत्तात्रेय पक्षे (१ ब)

अत्रिपुत्र क्षमा-दयाशिल असे,
धर्मा करी अक्षय,
भक्ता तारक तो सदैव जगती,
सर्वत्र त्याचा जय ।।

अपि श्रीकृष्णे ते महिमपरपारं व्रजति को ।
न शेषोऽशेषास्यैरपि कथयितुं वा प्रभवति ।।
अतो ऱ्हीतो वाचः शुचय इह वच्म्यल्पकमिदं ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।२।।

**अर्थ :** षड्गुणैश्वर्याने मंडित असणाऱ्या श्रीकृष्णे, कोणालाही किंवा ब्रह्मदेवालाही तुझ्या सामर्थ्याचे पैलतीर दिसेल काय? (दिसणे शक्य नाही.) सहस्रमुखाचा शेषसुद्धा तुझे माहात्म्य वर्णन करू शकत नाही. म्हणून तुझे माहात्म्य वर्णन करताना मला संकोच होतो. तथापि आपली वाणी शुद्ध व्हावी या हेतूने ही लहानगी स्तुति मी गात आहे. तुला माझा नमस्कार असो. श्रीदत्तगुरूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुझा विजय असो.

**पद्यानुवाद**

**ब्रह्मा मौन धरी, सहस्रमुखिच्या,**
**शेषास ये मुग्धता,**
**वर्णाया गुणकीर्तना, मम मुखी,**
**शब्दास निःशब्दता,**
**तुझिया स्तवने, मनास स्थिरता,**
**वाणीस ये शुद्धता,**
**सह्याद्रीतनये षड्गुणयुता,**
**भक्ता नुरो बद्धता ।।**

**अलक्ष्यं ते रूपं वचनहृदयाध्वांतिगमतो ।**
**नतोऽहं ते लक्ष्यं कथमपि च विज्ञाय वरदे ।।**
**प्रवृत्तस्त्वां स्तोतुं स्वमतिगतितस्ते वरमुदे ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।३।।**

**अर्थ :** भक्तांना वर देणाऱ्या श्रीकृष्णे, वाणी व मनाला अगोचर असणारे व प्रत्यक्षादि प्रमाणांना आकलन न होणारे तुझे रूप गुरुप्रसादाने ओळखता येऊन (जाणून) तुझ्या परम प्रेमासाठी (किंवा) तुला आवडणाऱ्या श्रीदत्ताच्या प्रेमासाठी, आपल्या बुद्धीच्या मर्यादांना धरून मी तुझी स्तुति करण्यास प्रवृत्त होत आहे. श्रीदत्तगुरूंना मान्य असणाऱ्या व वासना शमवून टाकणाऱ्या श्रीकृष्णे, तुला नमस्कार असो. तुझा विजय असो. भक्तांचा उद्धार हाच तुझा विजय!

### पद्यानुवाद

श्रीकृष्णे वरदायिनी, मम मना,
वाणीस ना गोचर,
व्हावे गोचर, रम्यरूप नयना,
देता गुरू तो वर,
की यावा स्तवनी मनी क्षणभरी,
संकोच तो नाकळे,
प्रत्यक्षात दिसेल, रूप कधी का?
ते गोजिरे सावळे ।।

कृता साहित्यज्ञैरपि सुगुणसम्पत्सुललिता ।
मितार्थाऽस्तानर्था न च तव मुदे साऽपि कविता ।।
समर्थाऽथाऽपि त्वं शिशुवचनवन्मे श्रृणु मुदा ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।४।।

**अर्थ :** छन्द अलंकार, इत्यादि कवित्वगुण जाणणाऱ्या श्रीव्यास, श्रीशंकराचार्य प्रभृतींनी रचलेली, काव्यगुणांच्या वैभवाने मंडित असल्याने अत्यंत लालित्यपूर्ण असणारी, रेखीव अर्थ असणारी, जिच्यामुळे अनर्थ दूर होतात अशी, कवितादेखील तुझे प्रेम संपादन करू शकली नाही. असे असले तरी, आई कृष्णे, आपल्या मुलाचे बोल म्हणून माझ्या या स्तुतीकडे तू बघ. मुलाचे बोबडे बोलसुद्धा आईला आवडतात. तशी, कशीबशी गायिलेली ही स्तुति तुला आवडावी, ही माझी भूमिका तू लक्षात ठेव. श्रीदत्तप्रभूला मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला नमस्कार असो. तुझा जय असो.

### पद्यानुवाद

छंदादि गुणयुक्तही, रचियली,
स्तोत्रे बहू सुंदर,
व्यासादि मुनि, काव्यदिव्य प्रतिभा,
वेदाहुनी सुस्वर,
व्हावे पूजन मानसी तवरूपा,
श्रीशंकरे वर्णिले,

कृष्णाई, स्तवनास, स्वीकृत करी,
हे बोबडे बोलले ।।

**रसज्ञा मे दत्ता मुनिनमितदत्तात्रिजपदे ।**
**मुदे तस्यापीयं प्रभवति न किं साधु लहरी ।।**
**हरीशात्मा कृष्णा यत इयमभूद्दत्तदयिता ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।५।।**

**अर्थ :** मी आपले जिव्हार, सनकादि मुनींनी ज्यांना वंदन केले आहे, अशा श्रीदत्तात्रेयप्रभूंच्या चरणावर वाहिले आहे. त्यांनादेखील ही काव्यलहरी आनंद देणार नाही का? (अर्थात् निश्चित देईल.) कारण कृष्णा हरिहराद्वैतस्वरूप आहे. (पंचगंगा शिवस्वरूप तर कृष्णा विष्णूस्वरूप आहे.) त्यामुळे ती श्रीदत्तप्रभूंची आवडती झाली आहे. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला नमस्कार असो. तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**श्रीमत् सनकादि वंदित पदी,**
**मी अर्पितो वैखरी,**
**ही 'कृष्णालहरी' मनोज्ञ वितरी,**
**काव्यातली माधुरी,**
**श्रीकृष्णे, तव ठायी, विष्णुशिवही,**
**अद्वैत ते चिंतुनी,**
**दत्ता आवडली, सुरम्य स्तुति ही,**
**मोक्षप्रदा दायिनी ।।**

**न च प्राज्यं राज्यं न च विबुधपूज्यं सुरपदम् ।**
**पदं पूष्णो जिष्णोरपि मम न विष्णोरभिमतम् ।।**
**मतं दत्तात्रेयप्रपदपरिपूतं तव तटम् ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।६।।**

**अर्थ :** हत्ती, घोडे, धन या वैभवाने समृद्ध असणारे, प्रजापालनरूप राजजीवन मला नको. इतर देवांनी गौरविलेले अग्न्यादिदेवांचे स्थानही मला नको.

प्रकाशादींच्या द्वारे जगाचे पोषण करणाऱ्या सूर्याचे स्थान मला नको. विजयशील असणाऱ्या इंद्राचे पदही मला नको. इतर सर्व लोकांपेक्षा श्रेष्ठ असणारे पुनरावृत्तिरहित, विष्णूचे वैकुण्ठही मला नको. मला हवे आहे श्रीदत्तप्रभूंच्या पावलांनी पवित्र झालेले तुझे तीर! श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला नमस्कार असो. तुझा विजय असो.

**पद्यानुवाद**

**नको गजधना, नको तुरगही,**
**राज्यत्व तेही नको,**
**जयास सुरवंदिती, सकलही,**
**त्या अग्निरूपा नको,**
**नकोत रविच्या पदा, वितरी जो,**
**तेजास या भूवरी,,**
**हवीत मज दत्त पाऊले, पुनित,**
**रम्य कृष्णातिरी ।।**

**न भोगं नो योगं न च दुरितभङ्गं लषति मे ।**
**मनोऽरोगं गाङ्गं जलमपि न साङ्गं श्रुतिगणम् ।।**
**न यागं न स्वर्गं तव सततयोगं लषति मे ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।७।।**

**अर्थ :** स्त्री इत्यादि विषय भोगात माझे मन नाही, अष्टांगयोग आणि त्याचे फल (समाधि) यातही माझे मन रमत नाही. पापांचा विनाश व्हावा याची मला ओढ नाही. आरोग्याची आकांक्षाही नाही. गङ्गेचे जलदेखील मला नको. षडंग वेदाच्या अध्ययनाची मला प्रीति नाही. त्यामुळे करता येणारे प्रकृति-विकृतिरूप याग (दर्शपूर्णमासादि प्रकृतियाग व चातुर्मास्यादि विकृतियाग) यात माझे मन लागत नाही. त्यात मिळणाऱ्या दिव्य सर्वसुखाची मला इच्छा नाही. तुझ्या नित्य सान्निध्याची मात्र मला तृष्णा आहे. (कारण त्यानेच सर्व मिळत असते.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला नमस्कार असो. तुझा विजय असो.

पद्यानुवाद

**स्त्रीभोगाविषयी, नसे मज स्पृहा,**
**अष्टांगयोगी मन,**
**व्हावा पापनिरास, इच्छित नसे,**
**आरोग्य ना ते धन,**
**नाही ध्यास षडंगवेदपठनी,**
**ना गंगाजलाप्राशनी,**
**सान्निध्यात तुझ्या सदैव असु दे,**
**इच्छा दुजी ना मनी,**
**इंद्रपद न आवडे, न मज ते,**
**श्रेष्ठत्व विष्णुपदा,**
**कृष्णे तू मम वासना शमविते,**
**ही वंदना त्वत्पदा ।।**

**मनो मे श्रीकृष्णे त्वदपसरति क्वापि न कलौ ।**
**मलौघघ्नीतिघ्नी भवति भवतीहेति सततम् ।।**
**सुविश्वस्तं स्रस्तं जगति गतिदे साधनचया- ।**
**न्नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।८।।**

**अर्थ :** हे श्रीकृष्णे, तुला सोडून माझे मन कुठेही इतरत्र जात नाही. कारण या जगात, त्यातही या कलियुगात, तू सर्व दोष निवारण करणारी आहेस. तू सर्व 'इति' आपत्ति (अतिवृष्टि, अनावृष्टि, उंदीर, टोळ व पोपट यांचे उपद्रव, राज्यवंश व परदेशाचे आक्रमण अशा आपत्ति) दूर करीत असल्याने माझे मन आश्वस्त आहे. सद्गति व ज्ञान देणाऱ्या श्रीकृष्णे, ऐहिक व पारलौकिक फळ देणाऱ्या इतर साधनांच्या मागे लागून सारे जग धांदरले आहे. म्हणून हे सारेच देणाऱ्या तुला सोडून माझे मन इतरत्र कुठेही जात नाही. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला नमस्कार असो. तुझा विजय असो.

पद्यानुवाद

**आपत्ती विविध असे कलियुगी,**
**दुष्काळ दारिद्र्यही,**

सोडाया निज देश, संकटी त्वरे,
तू धावशी नित्यही,
चित्ता शांति कुठे, मिळे न जगती,
ही लौकिकी वंचना,
कृष्णे सद्‌गति, ज्ञान ते मज मिळो,
शांत्यर्थ ही प्रार्थना ।।

महाभङ्गा गङ्गा यदि दुरितभङ्गाऽत्र कथिता ।
मताऽपीह त्वत्तः कथमधिकतामेति विमता ।।
हरेः साङ्घ्र्युद्‌भूता त्वमिव ननु मूर्ता हरितनु- ।
र्नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।९।।

अर्थ : समुद्राप्रमाणे महातरङ्गशाली, अथवा अविद्या-काम-कर्मादि संसारबीजांचा नाश करणारी, सर्व पापांचा नाश करणारी म्हणून जरी गंगा या जगात प्रसिद्ध असली, तरी तुझ्यापेक्षा ती निर्विवादपणे कशी श्रेष्ठ ठरू शकते? कारण ती विष्णूच्या चरणापासून जन्माला आली आहे. तुझ्यासारखी मूर्तिमंत विष्णूस्वरूप ती निश्चितपणे नाही. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला नमस्कार असो. तुझा जय असो.

पद्यानुवाद

कृष्णे तू गमते, तरंग जलधी,
भक्तास तू तारक,
कामाचा करूनी, विनाश अवघा,
पापास तू दाहक,
गंगेला जरि श्रेष्ठ, सर्व म्हणती,
ती विष्णुपायी रत,
तू साक्षात् विष्णूस्वरूप असती,
पायी तुझ्या मी रत ।।

हरेर्गङ्गाङ्घ्र्यब्जाऽभिनवबिसवल्ली भवतु वाऽ- ।
धितिष्ठत्वीट्शीर्षं स्रगिव च पताकेव सुतरां ।।

**प्रकामं मुक्तेर्न त्वमिव भवति श्रीहरितनु- ।**
**र्नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।१०।।**

**अर्थ :** विष्णूच्या चरणकमलापासून जन्म पावलेली गंगा चरणकमलांच्या नवीन (कोवळ्या) तन्तूंनी बनलेल्या वेलीसारखी असू दे, अथवा, मालतीच्या फुलाच्या माळेसारखी असू दे, शंकराच्या मस्तकावरती विराजमान होऊ दे, त्याचप्रमाणे सुलभ सायुज्यमुक्तीच्या पताकेप्रमाणे ती भलेही राहू दे; तरीही ती तुझ्यासारखी साक्षात् विष्णूस्वरूप नाही. (कारण ती चरणापासून जन्म पावली आहे.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**गंगा उद्‌भव, विष्णुपादकमली,**
**पादस्वरूपी रमे,**
**तत्पादांबुज, तंतुवीण मृदुला,**
**वेलीपरी ती गमे,**
**शोभावी मृदु माळ, मालतीपरि,**
**राहो शिवा मस्तकी,**
**कृष्णे विष्णुस्वरूपिणे, भगवती,**
**हो स्पर्श या मस्तकी ।।**

**गते जीवे कन्यां जगति बहुमान्यां शिखरिणी- ।**
**ह सह्ये त्वां धन्यां जननि भगिनीवामरसित् ।।**
**समागत्याप्यब्दं परमनियमात्तिष्ठति मुदा ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।११।।**

**अर्थ :** दुसरे असे की, आई, कन्याराशीत गुरूचा प्रवेश झाल्यानंतर या सह्य पर्वतावर नांदणाऱ्या, सर्वांना गौरवास्पद असणाऱ्या व कृतार्थ असणाऱ्या तुझ्या भेटीला, गंगा बहीण म्हणून येऊन, वर्षभर निष्ठेने (इतरत्र कुठेही जायचे नाही अशा नियमाने) मोठ्या आनंदाने राहते. (पापी लोकांनी क्षालन केलेले) संचित पाप धुऊन काढण्यासाठी तुझ्या भेटीचे ती निमित्त करीत असते. (आमच्या पापप्रक्षालनार्थ गंगा वर्षभर

सह्यगिरीवर राहते. अजूनही तिथे वर्षभर कुंडातून ती वाहते. नंतर प्रवाह थांबतो असे आजही लोकांना बघायला मिळते.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वंदन असो. तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**कन्या राशी गुरू प्रवेश करिता,**
**गंगा धरी गौप्यता,**
**भेटी सह्यगिरी, अनेक सरिता,**
**धावोन ये स्वागता,**
**व्हावे क्षालन पाप, पर्वणिस्थळी,**
**नासोनी त्या संचिता,**
**गंगे होसी, महाबळेश्वर सुता,**
**कुंडातुनी वाहता ।।**

**महाजम्बुद्वीपे वृजिनहरतीर्थानि वरदे ।**
**समायान्ति त्वां तु त्रिविधमलदे तानि परदे ।।**
**तदा त्वत्स्नानादेः, फलमपि न वक्तुं प्रभुरजो ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।१२।।**

**अर्थ :** वर (इष्टफल) देणाऱ्या, पर (मोक्ष) देणाऱ्या, कायिक, वाचिक व मानसिक दोष नाहीसे करणाऱ्या, श्रीकृष्णे, या मोठ्या जंबुद्वीपात असणारी पाप-नाश करणारी (साडेतीन कोटी) तीर्थे तुझ्या भेटीला येतात. (तू मात्र कुठेही जात नाहीस.) त्या सर्व तीर्थांच्या संगम-काळी तुझ्या प्रवाहातील स्नादिविधींचे (दर्शन, स्पर्श - पान इत्यादींचे) माहात्म्य वर्णन करण्यासाठी ब्रह्मदेवदेखील समर्थ नसतो. (इतरांची तिथे काय केवा?) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**काया वाङ्मय दोष, सर्व हरती,**
**कृष्णे तुझ्या चिंतनी,**

व्हावे क्षालन पाप, सर्व अवघे,,
ते तीर्थचि दर्शनी,
होता संगमी स्नान, पुण्यफल ते,
ब्रह्मा न सांगू शके,
कृष्णे, वरदायिनी, कीर्ति तव ती,
वाणी न वर्णू शके ।।

**पितृनुद्दिश्यैकं वितरति निवापाञ्जलिमये ।**
**मनुष्यस्त्वय्यग्रे सकलपितरोऽस्य द्रुतरये ।।**
**गतिं यान्ति श्राद्धादपि च पुनरावृत्तिरहितां ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।१३।।**

**अर्थ :** वेगवान् प्रवाह असणाऱ्या श्रीकृष्णे, साधारण मनुष्य तुझ्या प्रवाहात आपल्या पितृगणांचा उल्लेख करून तिलांजलि देतो. हे परमश्रेष्ठ असणाऱ्या श्रीकृष्णे, त्या मनुष्याचे सर्व पूर्वज सद्गतीला प्राप्त होतात. तीर्थश्राद्धानेदेखील पुनरावृत्तिरहित लोकाला ते प्राप्त होतात. (पितृलोकाला तर प्राप्त होतातच.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

तुझ्या शीघ्र प्रवाहि, देती पितरां,
श्राद्धेय तीलांजली,
पितृवंशज, पिंडदान करिती,
अर्पून श्रद्धांजली,
लाभो पुण्यगती, न जन्म दुसरा,
याचा पुनः संप्रती,
सह्याद्रितनये, सदा विजयिनी,
जीवा मिळो सद्गति ।।

**महापाप्याकल्पं यदि विधिवशाद्दुर्गतिमितो ।**
**वृषोत्सर्गात्सोऽपि द्रुतमिह हि नारायणबलेः ।।**

**त्रिपिण्डीश्राद्धाद्वा व्रजति सुगतिं दुर्लभतरां ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।१४।।**

**अर्थ :** एखादा महापापी दैवदुर्योगाने कल्पपर्यंत नरकात गेला असेल तरी, तोही इथे कृष्णेच्या तीरावर वंशजांनी केलेल्या 'नारायण-बळि' विधानाने लवकर अत्यंत दुर्लभ असणाऱ्या मोक्षगतीला प्राप्त होतो. किंवा त्रिपिण्डी श्राद्ध विधानाने दुर्लभ सद्गतीला प्राप्त होतो, हे प्रसिद्ध आहे. हे श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**दुर्दैवी नर भोगितो, नरकिहि,**
**त्या यातना दुर्धर,**
**त्याला उत्तम लोक, पुण्यगतीहि,**
**देतील कृष्णातिर,**
**द्यावा 'नागबली-नारायणबली',**
**तेणे मिळे मुक्तता,**
**देता पिंड त्रयी, सद्‌गति मिळे,**
**स्वर्लोकिची पात्रता ।।**

**सुतं लेभे वन्ध्या ऋणहतिमृणी दुःख्यपि सुखं ।**
**नरो यो यो यं यं स्मरति हृदि कामं स स च तम् ।।**
**अवापेति ज्ञात्वा जननि पतितस्तेऽद्य पुरतो ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।१५।।**

**अर्थ :** तुझ्यामुळे वांझोटीला (संतानप्राप्ती न झालेल्या स्त्रीला किंवा संतान होऊन ते मरणाऱ्या आईला) पुत्रप्राप्ती झाली. ऋणकोला (व्यावहारिक कर्ज झालेल्या पुरुषाला) अथवा देव-पितृ-ऋषि-ऋण न चुकविलेल्या पुरुषाला ऋणातून मुक्ति मिळाली. त्रिविध दुःखात पोळलेल्या पुरुषाला वैषयिक अथा आत्यंतिक सुखाची प्राप्ती झाली. मनुष्य, मनात जे जे काही इच्छितो ते ते सर्व तुझ्यामुळे प्राप्त झाले, हे आठवून, हे आई, श्रीकृष्णे आज तुझ्यापुढे मी लोटांगण घालत आहे. श्रीदत्तप्रभूंना मान्य

असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

### पद्यानुवाद

**कृष्णे तू कनवाळु, पुत्रवरदा,**
**मातृत्व वंध्येप्रति,**
**सामर्थ्ये ऋणकोस, मुक्त करिशी,**
**संपन्नता सुस्थिति,**
**देवर्षीऋण, मातृपितृऋणही,**
**त्याते करोनी दुरी,**
**भक्ताची मनकामना, पुरविशी,**
**साष्टांग चरणावरी ।।**

**अहो माहात्म्यं ते शुकजनक आहात्र हि महा- ।**
**बलेशादासिन्धोरुभयतटसंस्थेषु बहुषु ।।**
**महातीर्थेष्वग्र्यं नृहरिपुरि तीर्थाष्टकमिदं ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।१६।।**

**अर्थ :** श्रीकृष्णे, श्रीव्यासांनी तुझे माहात्म्य गायिले आहे आणि ते असे की, महाबलेश्वरापासून (तुझ्या उगम स्थानापासून) तर पूर्व सागरापर्यंत तुझ्या दक्षिणोत्तर तीरावर अनेक महातीर्थे असली तरी, नरसोबा-वाडीमध्ये पुराणप्रसिद्ध असणरी ही आठ तीर्थे मुख्य आहेत. १) शुक्ल २) पाप-विनाशी-काम्य ३) सिद्ध ४) अमर ५) कोटि ६) शक्ति ७) प्रयाग ८) षट्कुल. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

### पद्यानुवाद

**गाती व्यासमुनी, अगाध महिमा,**
**लोकी गमे उत्तम,**
**पुण्यक्षेत्र महाबळेश्वर असे,**
**तेथे तुझा उद्गम,**

तुझे मीलन, पूर्व सागरी दिसे,
तीर्था बहू निर्मिती,
वाडी-संगमी, 'अष्टतीर्थ' असती,
तत् पुण्य वर्णू किती ।।

मुखं ते सह्याधः सदयहृदयं ते नरहरेः ।
पुरेऽप्यान्ध्रे नाभिः प्रपदयुगलं प्राच्यविषये ।।
अये श्रीकृष्णेऽदः प्रथितमिह रूपं मुनिमते ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।१७।।

अर्थ : श्रीकृष्णे, सह्यगिरीच्या पायथ्याशी असणारे वाई क्षेत्र हे तुझे मुख, नृसिंहवाटिका क्षेत्र (श्रीनरसोबावाडी) हे तुझे दयाळू हृदय, आन्ध्र देशातील कुरवपूर (कुरुगड्डी) हे तुझे नाभिस्थळ, तर पूर्वसागराला मिळणारे दोन मुख्य प्रवाह ही तुझी दोन पावले होत. श्रीदत्ताला मान्य असणाऱ्या श्रीकृष्णे, हे तुझे ध्यानाला मंगल असणारे रूप या जगात प्रसिद्ध आहे. तेच माझ्या चित्तात नांदून दे. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

पद्यानुवाद

वाई, सह्यसुते, तुझे मुख असे,
वेदध्वनी सोज्ज्वल,
नाभिस्थान दिसे, कुरवपुर ते,
जे साधकाचे बल,
वाडी क्षेत्र दयार्द्र प्रीती हृदय,
जे साधने मंगल,
भासे द्वय पाऊले, प्रवाह द्वय ते,
अब्धी जली सोज्ज्वल ।।

नरः श्रीकृष्णे ते सुलभममृतस्पर्धि मधुरं ।
वरं नाम ब्रूयात्कथमपि स निःश्रेयसमियात् ।।

**सुदूरस्थोऽस्वस्थोऽप्यथ किमुत साक्षाद्व्रजति यो ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।१८।।**

**अर्थ :** श्रीकृष्णे, कोणीहि, तुझ्या तीरापासून दूर राहणारा असला तरी, रोगादिकांनी अस्वस्थचित्त असला तरी, उच्चारणाला सुलभ असणारे (कृष्णा हे नाव), अमृतापेक्षाहि श्रेष्ठ असणारे, म्हणूनच गोड असणारे, म्हणूनच श्रेष्ठ असणारे तुझे नाव, कसेबसे (थट्टा विनोदानेसुद्धा) उच्चारील तरी, तो, मोक्षाला जाण्याला समर्थ होईल. मग जो जवळ राहून स्वस्थचित्ताने तुझी सेवा करील तो मोक्षाला जाईल हे वेगळे कशाला सांगायला हवे? तो जाईलच. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**श्रीकृष्णे अमृताहुनी मधुरता,**
**नांवात ती आढळे,**
**येता नाम मुखी, तुझे सहज ते,**
**ते दुःख दूरी पळे,**
**रोगग्रस्त असे, कुठे जरि दुरी,**
**उद्धार त्याचा करी,**
**चित्ती नाम तुझे, सदैव असु दे,**
**श्रेष्ठत्व ये वैखरी ।।**

**पुरेष्टं वा दत्तं विहितमपि पूर्तं च सुकृतं ।**
**स्वधीतं वा जप्तं श्रुतमपि यशोऽजस्य हि तदा ।।**
**भवद्दृष्टिः कृष्णे भवति भवभीहृत्खलु नृणां ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।१९।।**

**अर्थ :** श्रीकृष्णे! पूर्वी जर यज्ञ, याग केले असतील, दान दिले असेल, उद्याने, विहिरी बांधून दिल्या असतील, पूर्त कर्मे केली असतील, श्रौत, स्मार्त कर्माचे आचरण केले असेल, स्वशाखीयवेदादिकांचे अध्ययन केले असेल, गायत्री जपादिक घडले असेल, शिव व विष्णू यांची कीर्ति कानी पडली असेल, तर मग पुरुषांना संसार-भीति घालविणारे

तुझे दर्शन घडते, एरव्ही नाही. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**गायत्री जप यज्ञ, दान करूनी,**
**देवालये बांधिली,**
**केले पालन 'स्मार्त-श्रौत' विधिने,**
**उद्यापने साधिली,**
**श्री विष्णु, शिव स्तोत्र, वेद पठनी,**
**मी वैखरी योजिली,**
**संसारी भय, दर्शने पळतसे,**
**घ्या नाम रूपावली ।।**

**प्रकृत्यैक्यं भिन्नं न हरिहरयोः प्रत्ययवशात् ।**
**पृथग्वद्भातीति प्रथयितुमहो शम्भुवपुषा ।।**
**युता वेण्याऽपि त्वं भगवति पृथक्त्वं न भजसे ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।२०।।**

**अर्थ :** ''हृ - हरण करणे'', या मूळ धातूपासून हरि व हर ही दोन नामे होत असल्याने हरि व हर हे स्वभावतः (मूलतः) एकच होत. केवळ प्रत्ययामुळे आणि सत्त्व व तम या गुणामुळे ते वेगळे असल्यासारखे-एक मेघश्याम हरि व दुसरा कर्पूरगौर हर म्हणून भासतात. हे दाखविण्यासाठीच देवी श्रीकृष्णे शिवरूप वेणीशी (पंचगंगानदीशी) विष्णुस्वरूप असणारी तू मिळाली तरी कोणताही वेगळेपणा पत्करत नाहीस. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**नामे भिन्न जरि 'हरी', 'हर' गमे,**
**उत्पत्ति 'हृ' धातुनी,**
**वाटे भिन्न तमादि 'प्रत्यय' गुणी,**
**सत्त्वादि रूपातुनी,**

भासे श्यामल हरी, तथापि हर,
कर्पूरगौरा असे,
झाले मीलन, 'शिव-वेणी' सहिता,
आनंद दावीतसे ।।

अये योगिध्येये निगमगणगेयेऽब्धिनिलयेऽ ।
नपाये दत्ताये कलुषविलये सह्यतनये ।।
त्वदन्यन्नो वीक्षे सुलभशरणं लीढमरणं ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।२१।।

**अर्थ :** अष्टांगयोगसंपन्न असणाऱ्या साधकांच्या ध्यानाचा विषय असणाऱ्या, वेदगणांनी जिची कीर्ति गायिली आहे अशा, पूर्वसागराला मिळून जाणाऱ्या अ-विनाशी-स्वरूप असलेल्या, आपल्या भक्तांचे शुभ संपादन करणाऱ्या, पाप-विनाश करणाऱ्या, सह्यकन्ये श्रीकृष्णे, तुझ्यावाचून मृत्यूला तिलांजलि देणारा दुसरा कोणताहि सुलभ विसावा मला दिसत नाही. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

पद्यानुवाद

तुझे चिंतन, साधका घडतसे,
अष्टांग योगातही,
व्हावे ध्यान, तुझे म्हणून रचिले,
वेदोक्त सूक्तासही,
नाही मृत्युभया, न पापभयही,
त्याते करोनी दुरी,
श्रीकृष्णे अविनाशिनी, विजयिनी,
भक्तास गा उद्धरी ।।

परिक्रान्ता देशा भगवति चतस्रोऽपि च दिशा ।
न शान्ता दुष्टाशाऽप्यजनि वपुषो मेऽन्तिमदशा ।।
प्रशान्ताऽद्यैवाशा तव दृशिवशादास सुदशा ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।२२।।

**अर्थ :** देवि श्रीकृष्णे! या 'डाकिनी' आशे च्या मागे लागून मीही अनेक देश पायातळी घातले. चारी दिशा फिरून आलो. परंतु माझी दुष्ट आशा-वृत्ति शमली नाही आता माझ्या जीवनाची संध्याकाळ झाली आहे. तुझ्या दर्शनामुळे मात्र आज माझी आशा-वृत्ति शमली व माझी जीवनाची संध्याकाळ सुखावली. (सर्वत्र फिरूनही पुनः तुझ्या दर्शनानेच आशा शमल्यामुळे तूच खरा सोपा विसावा आहेस.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो व तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**आशा डंकिनिने, मला भुलविले,**
**जन्मा नसे सार्थक,**
**आशेच्या मृगजळी बुडुनिया,**
**मी जोडले पातक,**
**आता जीवनसंधिकाळ उरला,**
**झाले तुझे दर्शन,**
**संध्याकाळ सुखावला, भगवती,**
**माझे तुला वंदन ।।**

**त्वदीये सत्तोये जलचरगणा ये गतभया ।**
**वयांसीशे वाऽन्ये पशुमृगगणाः कीटकगणाः ।।**
**अपि स्नाताः पीताः कथमपि ततस्ते दिवमिता ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।२३।।**

**अर्थ :** सर्व-प्रभुत्व-संपन्न असणाऱ्या श्रीकृष्णे! तुझ्या या सुंदर प्रवाहात जे जलचरांचे समुदाय, पक्षी, गाई वगैरे पशु, हरिणादींचे समुदाय, किड्यांचे थवे आणि दुसरे असेच असंख्य जीव, स्वच्छन्द मनाने, यदृच्छेने स्नान करते झाले किंवा जलपान करते झाले; ते त्या स्नान-पानाने (स्नान-पान पुण्याने) स्वर्गात पोचले. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

पद्यानुवाद

स्नानादि जलपान, त्या जलचरां,
साधे प्रवाही किती,
स्वच्छंदे किती, जीवजंतु दिसती,
क्रीडेत ते रंगती,
गायी, पक्षी, पहा कसे विहरती,
येवोनी तीराप्रती,
स्वर्गादि फल, पुण्यप्राप्ति मिळुनी,
चित्तात आनंदती ।।

गतः क्रूरो जारो दिवमपि च चोरो वनचरो ।
वरोदे ते स्नानात्कथमपि नरो यः श्रुतपरः ।।
स किं स्नानात्ते न व्रजति गतिम्मब श्रुतमते ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।२४।।

**अर्थ :** तुझ्या उत्तम प्रवाहात यदृच्छेने स्नान घडून पाषाणहृदयी अथवा निर्दयी मनुष्य, परस्त्रीलंपट असणारा पुरुष, सुवर्णादिकांचे अपहरण करणारा चोर किंवा किरात वगैरेसारख्या पृथग् जातीमध्येही जन्माला आलेला माणूसदेखील स्वर्गात पोचला. तर मग शास्त्रांना मान-मान्य असणाऱ्या व मंगलप्रवाह असणाऱ्या श्रीकृष्णे, यथाशास्त्र आचार सांभाळमारा पुरुष तुझ्या स्नान पुण्याने सद्गतीला जाणार नाही काय? अवश्यच जाईल. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

पद्यानुवाद

यदृच्छे कधी स्नान, निर्मल जली,
डोळा परस्त्रीवर,
लाभे मुक्ति नरास, निर्दयी जरी,
पाषाण-पोटी नर,
कर्मे आचरिता, सशास्त्र विधिने,
स्वर्गास जाणार ना?,

आला त्वत्संगमी, किरात म्हणूनी,
दुर्लक्ष होणार का? ।।

अपि स्नातं तीर्थं सकलमखिलं दैवतमिहा- ।
र्चितं सर्वं दत्तं हुतमपि च पूर्तं खलु कृतम् ।।
तव स्नातं मातर्विधिवदिह येनाम्बु सुगते ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।२५।।

**अर्थ :** ज्ञानाची सुंदर मूर्ति असणाऱ्या, आई श्रीकृष्णे! ज्याने तुझ्या प्रवाहात यथा-विधि स्नान केले त्याने निश्चितच सर्वतीर्थात अवगाहन केले आहे. सर्व देवतांची पूजा बांधली आहे. तुलादानादि सर्व दाने सत्पात्री दिली आहेत. सोमयागादि यागांचे अनुष्ठान केले आहे आणि विहीर तटाक बांधण्याचे पुण्य जोडले आहे. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

पद्यानुवाद

ज्ञानाची अतिशुद्ध, मूर्ति गमते,
कृष्णे तुझे दर्शन,
होता स्नान, तुझ्या जलात विधिने,
लागे न तीर्थाटन,
यज्ञाचे फल, सोमयागाहि इथे,
दानादि ते अर्चन,
तैसे पुण्य, तडागी वापी फलही,
ती देवळे बांधुन ।।

अवज्ञातं तीर्थं सकलमपि देवा अवमता ।
न दत्तं मे नेष्टं मतमपि च पूर्तं किमपि नो ।।
श्रितं त्वत्सामर्थ्यादरभरयशाद्देवि सरिते ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।२६।।

**अर्थ :** देवि, सरिते, श्रीकृष्णे! तुझ्या सामर्थ्याचा सादर भरवसा धरून, मी, पुष्करादि अनेक तीर्थांची उपेक्षा केली, इन्द्रादि देवतांकडे लक्ष दिले नाही, काही दान-पुण्य जोडले नाही, यज्ञ-याग केले नाहीत अथवा

विहिरी उद्याने (लोकांसाठी) निर्माण केली नाहीत. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

### पद्यानुवाद

**नाही दैवत अन्य ते तुजविना,**
**मी मन्मनी पूजिले,**
**तैसे पुष्कर तीर्थही, तुजविना,**
**पुण्यप्रद भासले,**
**नाही दान, न यज्ञयाग घडले,**
**ना बांधिली देवळे,**
**श्रीकृष्णे, तव ठायी शक्ति अवघी,**
**विध्वातली आढळे ।।**

**क्षमः कस्याप्यग्रे क्षणमपि न च स्थातुमभवे ।**
**भवेयं तूर्ध्वास्योऽभवमिह हि हास्यास्पदमतः ।।**
**तवेयं लज्जाऽऽस्तामयि सपदि मामुद्धर हिते ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।२७।।**

**अर्थ :** संसार-निवर्तक असणाऱ्या श्रीकृष्णे, कोणाही मनुष्याच्या, देवाच्या वा तीर्थाच्या पुढे क्षणभरदेखील उभे राहण्याची माझी प्राज्ञा नाही. कोण माझ्यावर आता कृपावंत होईल, या चिंतेने माझे तोंड आकाशाकडे वळलेले असणार! तुझ्या सामर्थ्याचा भरवसा धरून सर्वांची उपेक्षाकेल्याने मी असा उपहासास्पद ठरलो. म्हणून हे श्रीकृष्णे ही लाज (आता) तुला असू दे. हे कनवाळू (हिते) (श्रीकृष्णे), हे सारे पुनः पुनः मनात आणून तुझी गाठ पडताक्षणीच (वेळ न लावता) तुला एकशरण असणाऱ्या व पतित असणाऱ्या मला उद्धरून ने. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

### पद्यानुवाद

**नाही देव, मनुष्य, तीर्थ मजला,**
**देतील गे आसरा,**

माझे चित्त पहा नभा म्हणतसे,
उद्धार माझा करा,
झाला तो उपहास, साहुन जगी,
साऱ्यांस मी निंदिले,
श्रीकृष्णे पतितास, उद्धरि अता,
का पाहिजे बोलले? ।।

त्वया प्रत्याख्यातो यदि भवति भीतोऽयमभवे ।
भवेदज्ञस्यास्य त्रिजगदुदरे किं नु शरणम् ।।
रणन्नुच्चैरुच्चैस्तदिह मरणं यामि महिते ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।२८।।

**अर्थ :** जन्म-विनाशादि विकारांनी रहित असणाऱ्या (अभवे) अथवा हरि-हर-स्वरूप असणाऱ्या (अ-विष्णु-भव-शंकर) श्रीकृष्णे! तुझ्या या भक्ताला, मी तुझा उद्धार करणार नाही म्हणून, जर तू दूर लोटलेस तर भेदरलेल्या माझ्यासारख्या जड-मूढाला या निखिल विश्वामध्ये कोण थारा देईल? (कोणीच नाही.) सर्वपूजनीय असणाऱ्या श्रीकृष्णे, अशा अवस्थेत सापडलेल्या मला पुनः पुनः आक्रन्द करीत मृत्यूकडे वळावे लागेल. (अशी घटका येण्यापूर्वीच कृपावंत हो.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

पद्यानुवाद

कृष्णे तू जरि, दूर लोटसी मला,
मागु कुणा आसरा,
विश्वी मी जडमूढ, जीव म्हणुनी,
भांबावलो अंतरा,
आक्रंदून पुनः पुनः, मन अता,
घे धाव मृत्यूकडे,
आई, थांबव, वेगवान हृदया,
मानू नको साकडे ।।

**महापापं तापं गतमपि सकम्पं गतकृपं ।**
**सशापं लोको मां हसतु तमु तापं न गणये ।।**
**बिभेम्यंहोपाये तव बिरुदभङ्गाद्भगनुते ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।२९।।**

**अर्थ :** पापांचा विनाश करणाऱ्या श्रीकृष्णे! महापापी, त्रिविध दुःखाने पोळलेल्या, (आता) कोणी वाली न उरल्याने (भीतीने) थरथरत असणाऱ्या, लोककृपेलादेखील पात्र न राहिलेल्या माझा, सारे लोक माझ्या नावाने बोटे मोडत (सशापम्) उपहास करोत. तथापि त्या वेदनांची मला पर्वा नाही. परंतु, सूर्याने जिची स्तुति केली आहे अशा श्रीकृष्णे, (त्रिभुवनात प्रसिद्ध असलेली) तुझी बिरुदे (पुढील श्लोकात वर्णिलेली) आता धुळीला मिळणार याची मला भीती (चिंता) वाटते. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**पापी मी, बहुताप ते त्रिविधही,**
**जाळीतसे मन्मना,**
**साही मी, उपहास संतत जगी,**
**त्याची नसे वेदना,**
**गातो तो रवि, नित्य स्तोत्र तुजला,**
**ख्याती त्रिलोकी तुझी,**
**सांभाळी बिरुदे, न अन्य विनती,**
**होवोत कीर्ति तुझी ।।**

**त्रितापघ्नीतिघ्नी भुवि पतितपावन्यघहरा ।**
**त्रितापघ्नी भीघ्नी विविधवरदात्री ऋणहरा ।।**
**वरा सिन्धुष्वेतद्‌बिरुदनिचयो जीवतु चिरं ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।३०।।**

**अर्थ :** आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक दुःख दूर करणारी, 'ईतींचा' नाश करणारी (श्लोक क्र. ८) जगातील अत्यंत पतितांचाही उद्धार करणारी, संकटे निवारण करणारी, कायिक-वाचिक-मानसिक

पाप दूर करणारी, दृष्टादृष्ट भयांचा नाश करणारी, आपल्या भक्तांना अनेक वर देणारी, देव-ऋषि-पितृ-ऋण दूर करणारी आणि गंगादि नद्यांमध्ये श्रेष्ठ, ही तुझ्या बिरुदांची मालिका चिरकाळ टिकून राहो!! श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

### पद्यानुवाद

**दुःखा संहरी, संकटा दुरी करी,**
**पापासहि उद्धरी,**
**व्हावे मुक्त, त्रयी ऋणातुन जिवा,**
**तू साह्य दे सत्वरी,**
**दृष्टादृष्ट भया, हरोनि सकला,**
**सन्मार्ग तू दाविसी,**
**श्रीकृष्णे, वरदायिनी, तवव्रता,**
**नित्यासही सावरी ।।**

**यदाऽस्याविर्भूता त्वमिह तत आरभ्य पतिता ।**
**विशोध्याप्युन्नीता अधिकतम एभ्योऽस्म्यत इमम् ।।**
**यदोद्धर्तुं शक्ता त्वमसि तत उत्तिष्ठ सरिते ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।३१।।**

**अर्थ** : हे कृष्णा-सरिते! या जगात जलप्रवाहाच्या रूपाने जेव्हा तू प्रगट झालीस तेव्हापासून पतितांना देखील पावन करून परमश्रेष्ठ वासुदेव-पदाला तू पोचविलेस. या (आजवरच्या) पतितांपेक्षा मी अधिक पतित आहे. अशा माझा देखील उद्धार करण्यास जेव्हा (जर) तू समर्थ आहेस तेव्हा (तर) माझा उद्धार करण्यास तू सज्ज हो. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

### पद्यानुवाद

**होता उद्गम, त्या प्रवाहजलधी,**
**केले किती पावन,**

देवोनी पद वासुदेव, पतिता,
केले व्रता पालन,
आहे मी, पतिताहुनी पतित तो,
व्हावी न गे वंचना,
श्रीकृष्णे, पतितास उद्धरि अता,
माझी क्षमा याचना ।।

**अयं सामान्योऽस्तीत्यपि मनसि मा स्थापय यतः ।**
**समस्ताघौघास्ते जननि मयि तिष्ठन्ति सुचिरम् ।।**
**अतो बद्ध्वोऽत्तिष्ठेश्वरि परिकरं त्वं दृढतरम् ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।३२।।**

**अर्थ :** हा आपल्या पुढे आलेला पापी अगदी सामान्य (पापी) आहे असे मनातही आणू नको! हे आई श्रीकृष्णे, सर्व-विध पातकांच्या राशी माझ्या ठिकाणी दीर्घकाळाच्या ठाण देऊन आहेत. म्हणून, सर्व लोकांवर अधिपत्य गाजविणाऱ्या श्रीकृष्णे, तू कंबर बांधून (अंगावरची आभूषणे देखील दूर सारून) नीट चित्त देऊन (माझ्या उद्धारासाठी) सज्ज हो. (त्यात दुर्लक्ष होऊ देऊ नकोस.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

माझी पातक श्रेणी, नगण्य जरि का,
आणू नको गे मनी,
पापाच्या बहुराशी नित्य घडल्या,
त्या दीर्घ काळातुनी,
आई होऊनी सज्ज, अता झडकरी,
एकाग्र चित्ता करी,
टाकोनी निजभूषणें, त्वरित गे,
उद्धार माझा करी ।।

**ममोद्धारेणाद्य त्रिजगति सुकीर्तिर्भवतु तेऽ- ।**
**सितेऽतीते काले न खलु विमले त्वीदृगभवत् ।।**

**प्रसङ्गोऽसङ्गोऽहं तत उपरि यास्येऽभयपदं ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।३३।।**

**अर्थ :** हे (मेघ) श्यामल श्रीकृष्णे! माझ्यासारख्या महापातक्याच्या उद्धारामुळे आजच्या मंगल दिवशी त्रैलोक्यात तुझी कीर्ति पसरू दे. हे विमल (पाप-विनाशिनी) श्रीकृष्णे, आजच्यासारखी सुवर्णसंधी तुला पूर्वी कधीही निश्चितच मिळाली नव्हती. तू केलेल्या उद्धारामुळे मी देखील आत्मस्वरूपाची प्राप्ती होऊन त्या भय-निर्मुक्त-ब्रह्म पदाला निश्चितच प्राप्त होईन. (हा माझाही मोठा लाभ होय.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**त्रैलोक्यी, तव कीर्ति पसरू दे,**
**केला असे उद्धार**
**भूलोकी अति पातकी, असुनही,**
**वांछी तुझा तो वर,**
**दावी आत्मस्वरूप, निर्मलपदा,**
**तू स्वात्मरूपी स्थिर,**
**मेघश्यामल, निर्मला, भगवती,**
**उद्धार माझा कर ।।**

**अतः प्रादुर्भूत्वा परमनिजरूपेण सहसा ।**
**ममाघाद्रीन् भित्त्वा सकलमलहन्त्रीह सहसा ।।**
**कृपाक्षीरं धृत्वाङ्क उशति च मे देहि सहसा ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।३४।।**

**अर्थ :** म्हणून सकल दोष निवारण करणाऱ्या श्रीकृष्णे! माझ्यापुढे काही एक विलंब न करता, स्वतःच्या ध्यानमङ्गल चतुर्भुज रूपाने प्रगट हो आणि सर्व शक्तीनिशी माझ्या पापांचे पर्वत चूर्ण करून हे कमनीयगात्री, (उशति) श्रीकृष्णे, मांडीवर मला घेऊन स्मित-वदनाने आपल्या कृपास्तन्याने मला भरव. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या अन वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

पद्यानुवाद

आई दाव मला, चतुर्भुजरुपा,
ते ध्यान गे मंगल,
टाकी चूर्ण करोनि, पाप अवघे,
निष्ठेस द्यावे फल,
घ्यावे अंकी, स्वस्तन्य पाजुन करी,
माझे अता सांत्वन,
कृष्णे दोष विनाशिनी, मृदुतमे,
तुझे घडो चिंतन ।।

कुतस्त्वय्येतावद्दुरितमिति शङ्काऽस्तु न यतोऽ- ।
न्यथाऽऽत्मानं सन्तं तत इतरथा वेद्मि हि मया ।।
निजात्मस्तेनेन प्रतिपदमघं किं न विहितं ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।३५।।

**अर्थ :** आई कृष्णे! तू म्हणतेस, अरे तुझ्या ठिकाणी इतकी पापे कुठून आली? (ती असणे शक्य नाही.) 'मी पापी आहे' अशी शंका तू घेऊ नकोस. पण आपण स्वतः नित्य शुद्ध बुद्ध मुक्तस्वरूप असताना त्याविरुद्ध स्वरूपाची कल्पना करून मी आत्मस्वरूपाची चोरी केली आहे. त्या पापापोटी पदोपदी कोणती पापे माझ्याकडून झाली नाहीत? (मी केली नाहीत?) (आत्मस्वरूपाच्या चोरीच्या पोटात सर्व पापांचा मी धनी झालो आहे.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. तुझा जय असो.

पद्यानुवाद

'आहे पातकी तू, महान' अशी तू,
शंकाच घेऊ नको,
तू असता, सदैव नित्य शुचिता,
ही बद्धता ती नको,
कां यावी तव ठायी, पात कि अशी,
शंका कळेना मला,

कृष्णे आत्मस्वरूपचौर्य घडले,
याचीच खंती मला ।।

समं साक्षात्पश्यस्यखिलहृदयस्थे भगवति ।
त्वदग्रे वक्तव्यं न हि न हि तथापीह वदति ।।
प्रभोरग्रे लोकस्तदनुसरणं मेऽस्तु शरणं ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।३६।।

**अर्थ :** सर्वांच्या हृदयात निवास करणाऱ्या देवी श्रीकृष्णे! तू सारे काही जाणतेस (हृदयात निवास असल्याने). म्हणुन तुझ्यापुढे सारे बोलून दाखविण्याची (तशी) आवश्यकता नाही. तथापि आपला आशय (अगोदरच) लक्षात आला आहे, हे जाणूनही धन्यापुढे माणूस आपले मन मोकळे करतो. त्या लोक-व्यवहाराचे मी (देखील) पालन करायला हवे. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

पद्यानुवाद

तुझा या हृदयी, निवास म्हणुनी,
तू जाणते सर्वही,
कैसे सांगु, उचीत त्यात दिसले,
स्वारस्य ना त्यातही,
जैसा सेवक तो, धन्यास विनये,
सांगे मनीची व्यथा,
मीही हा व्यवहार, साधित असे,
ऐकोनी घे ही कथा ।।

स्वभूरूपेण त्वं सृजसि हरिधाम्नाऽवसि हरा- ।
त्मना हंसीन्द्राद्या विसृजसि विभूतीः स्वकलया ।।
लयान्ते ते कुक्षिं विशति सकलं मङ्गलगते ।
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।३७।।

**अर्थ :** हे कृष्णा माते! तू ब्रह्मदेवाच्या स्वरूपात सृष्टि निर्माण करतेस. विष्णुरूपाने सृष्टीचे पालन करतेस. रुद्ररूपाने जगाचा प्रलय करतेस.

इन्द्रादि देवताविभूतींना तू आपल्या अंशाने निर्माण करतेस. हे चिदानन्दरूपिणी श्रीकृष्णे, प्रलयाच्या वेळी हे कला-विभूतिरूप सारे जग तुझ्या अव्यक्तरूप कुशीत विसावते आणि मुक्तीच्या प्रसंगी नाम-रूप उपाधींचा त्याग करून तुझ्या स्वरूपी एकरूप होते. हे श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**कृष्णे, ब्रह्मारूप धरोनि रचिशी,**
**सृष्टी अती सुंदर,**
**साऱ्या विश्वरुपास, रक्षित करी,**
**कार्यी अती तत्पर,**
**सृष्टीच्या प्रलयास, कारण असे,**
**तो रुद्र गौरीहर,**
**जाते सर्व गळोनि, नाम रूप ते,**
**जीवा न ते गोचर ।।**

**इहापि त्वं पापिप्रचयमलसङ्क्षालनपटू- ।**
**दकात्माभूराभूरपि सुरगणाः शापमिषतः ।।**
**स्वतन्त्रे सन्मन्त्रे सरित इह भूत्वा तव गता ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।३८।।**

**अर्थ :** आत्मस्वरूप असणाऱ्या, म्हणूनच स्वतंत्र वृत्ती असणाऱ्या, म्हणूनच स्वेच्छेने गुप्त स्वरूप धारण करणाऱ्या, श्रीकृष्णे! याही अवतारकाळी तू, पातकी लोकांचे पापक्षालन करण्याची दीक्षा घेतलेल्या जलप्रवाहाच्या रूपाने प्रगट झालीस. त्यावेळी कोयना-पंचगंगा इत्यादींचे रूप घेऊन सारे देव शापाचे निमित्त होऊन तुला येऊन मिळतात. प्रलय प्रसंगी ते तसे मिळाले (तर) त्यात काय नवल? (एकदा ब्रह्मदेवाने ज्येष्ठ पत्नी हजर असताही देवर्षी नारदांच्या सांगण्यावरून कनिष्ठ पत्नीला घेऊन यज्ञ आरंभिला. त्यावेळी अपमानित झालेल्या ज्येष्ठ पत्नीने सर्व देवांना तुम्ही जडरूप (जलरूप) व्हा असा शाप दिला.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

### पद्यानुवाद

भासे छंद तुझा, क्रिडास्वरूपिही,
स्वानंद तो घ्यावया,
आली तू जलधीरुपात म्हणुनि,
पापास संहराया,
घेती रूप कसे, पहा सुर इथे,
त्या पंचगंगामिसे,
व्हावे क्षालन पापही, म्हणूनिया,
का कोयना ही दिसे ।।

तमोनुत्ते भासा जगति खलु भास्वान्न भवति ।
स्वयंज्योति: स त्वां तपनमिव भं भासयत इत् ।।
अये भातं त्वाऽनु द्युमणिसहितं भाति सकलं ।
नम: श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।३९।।

**अर्थ :** हे श्रीकृष्णे, या जगात तुझ्या प्रभेने चंद्र, अग्नी व सूर्य हे प्रभासंपन्न झाले आहेत. ज्याप्रमाणे चांदण्या सूर्याला प्रकाशित करू शकत नाहीत, त्याप्रमाणे निश्चितच चंद्र, सूर्य, अग्नी तुला प्रकाशित करू शकत नाहीत. हे श्रीकृष्णे, तुझ्या प्राकाशशील स्वरूपाच्या मागोमाग सूर्यासहित हे सारे जग प्रकाशमान होत असते. तात्पर्य, तूच या जगाचे (अंतिम) कारण आहेस. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

### पद्यानुवाद

भासे सूर्य प्रभा, तशीच शशीचि,
जोत्स्ना किती सोज्ज्वल,
वाटे सर्व, परप्रकाशित असे,
अग्नि जरी उज्ज्वल,
तेजोरूप तुझे, कसे वितरसी,,
सूर्यादि तेजासही,
उत्पत्ति, स्थिती, लया करूनिया,
तू वेगळी राहसी।।

**गणी वेणी भूत्वाऽप्यसुरसुरवाराहतपदो ।**
**मदोद्धृत्यै यद्दग्भुवनजयिनोऽलं कुसुमगोः ।।**
**स गोवाहोऽपि त्वां परमसखिवत्संगत उत ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।४०।।**

**अर्थ :** सर्व जगाला जिंकणाऱ्या मदनाचा गर्व उतरविण्यासाठी केवळ ज्याची दृष्टी पुरेशी ठरली (युद्धाचा प्रसंगच आला नाही) देव तथा असुर ज्याचे चरण-पूजन करीत असतात असे ते प्रसिद्ध शिवगणाधिपती व नंदि-वाहन असणारे शंकरसुद्धा पंचगंगेचे (वेणी) रूप घेऊन मैत्र-भावाने तुला येऊन मिळाले. (इतर येऊन मिळाले तर त्यात काय आश्चर्य!) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

पद्यानुवाद

**क्रोधे भस्म करी, शिवाहि मदना,**
**लागे न एक क्षण,**
**भक्तियुक्त, असुरासवे सुरही,**
**अत्यादरे वंदन,**
**कृष्णा भेटिस, पंचनद्यस्वरूपी,**
**येती स्वये शंकर,**
**याचे कौतुक, भिन्न भाव जगती,**
**कृष्णे तुझा आदर ।।**

**स्वयम्भूर्ब्रह्माऽयं भुवनरचनाभिज्ञधिषणः ।**
**ककुद्मत्याभिख्या सरिदिह हि भूत्वाऽपि सुतवत् ।।**
**समायातस्त्वां सम्मुखमु करहाटाख्यविषये ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।४१।।**

**अर्थ :** या साऱ्या चराचरविश्वाच्या निर्मिती प्रक्रियेत ज्याची बुद्धी कुशल आहे असे ब्रह्मदेवदेखील ककुद्मती (कोयना) नदीचे रूप घेऊन करहाट-स्थळी (कऱ्हाडात) मुलगा जसा पित्याला सामोरा जातो, त्याप्रमाणे तुझ्या भेटीला आले. (वेणी-कृष्णेचा संगम ही मित्र-मित्राची भेट तर कोयना-कृष्णा संगम ही पिता-पुत्राची भेट होय.) श्रीदत्तप्रभूंना मान्य

असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**चातुर्ये सृष्टि, रचोनी ब्रह्मदेव,**
**आले असे भूवर,**
**होती ककुद्मतीस्वरूप सरिता,**
**वृत्ती फुले आदर,**
**आनंदे करहाटी, संगम घडे,**
**कृष्णा मिळे कोयनी,**
**वेण्या-कृष्णी, अतूट मैत्री बघुनी,**
**आनंद देवांगणी ।।**

**द्विजा: काले काले शुचिषु च चतुर्भि: फलदृश- ।**
**श्चतुर्भिर्द्वाभ्यां पञ्चभिरपि बुधा जुह्वति सति ।।**
**पुनर्द्वाभ्यां स्नानादपि नयसि नाकं त्वमखिलान् ।**
**नम: श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।४२।।**

**अर्थ :** हे साध्वी श्रीकृष्णे, आत्मविषयक (मर्यादित) ज्ञान असून स्वर्गादि फलाकडे चित्त असणारे त्रैवर्णिक (ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य) त्या त्या शास्त्रोक्त काळी, दक्षिणाग्नि-गार्हपत्य व आहवनीय अशा तीन अग्नीच्या ठिकाणी (१) ओ ३ श्रावय, (२) अस्तु श्रौषट्, (३) यज, (४) ये ३ यजामहे, (५) वौषट् या पाच इष्टध्वनिपूर्वक आहुती समर्पण करतात (व स्वर्ग मिळवितात). तू मात्र अधिकार-अनाधिकाराचा विचार न येऊ देता सर्वांना केवळ स्नानाने स्वर्गाला घेऊन जातेस. (पदोपदी वैगुण्याचा धाक असलेल्या यज्ञ-विधीपेक्षा तुझे स्नान सुकर आहे, हा भाव.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**तुझ्या पुण्य जलात, स्नान करिता,**
**मुक्ति मिळे सत्वर,**

देती त्रैवर्णिक, पंच आहुती सदा,
यज्ञातही सादर,
यज्ञा 'गार्हपत्य-दक्षिणाग्नि ह्या',
दे आहुती नित्यही,
स्नानादि फल, पुण्य ते सकलही,
राहो सुखे स्वर्गीही ॥

**प्रभावस्तेऽपीदृग्दहति दहनो वाति पवनो ।**
**मनोल्हादे भीतस्तपति तपनो धावति मृतिः ॥**
**वृषा वर्षत्यन्ये त इह बलिमुञ्झन्ति नियतम् ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ॥४३॥**

**अर्थ :** मनाला आल्हाद देणाऱ्या श्रीकृष्णे! तुझे सामर्थ्य असे आहे की, तुझ्या भीतीने अग्नी दहन-कार्य करतो, वारा वहात राहतो, सूर्य उष्णता देण्याचे काम करतो, मृत्यू मरण देण्याचे काम करतो व इन्द्र पाऊस देतो. इतर दुसरे देव आपापल्या अधिकारात मोठे असले तरी तुझ्या धाकाने आज्ञापालनाचे आपले काम व्यवस्थित करीत राहतात. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

अग्नी दाहक, वायु वाहक, असे,
सामर्थ्य तूझे असे,
तुझ्यावाचून, उष्णता जगभरी,
तो सूर्य ना देतसे,
मृत्यू देई, नरा मरण, तो इंद्र,
पर्जन्य ते देतसे,
स्वर्गी देवही, दक्षता समजुनी,
आचार पाळीतसे ॥

**क्व शक्तिस्तेऽनन्ते विविधकुकृताद्रिप्रहरण- ।**
**क्षमा सामान्यं मे त्रिविधमपि पापं क्व नु कियत् ॥**

**तवाग्रे (वह्न्यग्रं) विरसबहुशष्पाद्रिवदहो ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।४४।।**

**अर्थ :** अनंत ब्रह्मरूपिणी श्रीकृष्णे! नानाविध (सर्व तऱ्हेच्या) पापांचे पर्वत विदीर्ण करण्याचे तुझे सामर्थ्य कुठे आणि माझे केवळ तीन प्रकारचे (कायिक-वाचिक-मानसिक) सामान्य पाप कुठे आणि केवढे? (अहो) अगे श्रीकृष्णे! अग्नीपुढे वाळलेला पाचोळा असावा असे ते त्रिविध पाप म्हटले पाहिजे!! श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**कायी, वाचिक, पाप ते त्रिविधही,**
**सामान्य तुला असे,**
**पाचोळा अग्नीस, नगण्य दिसतो,**
**मत्पाप तैसे असे,**
**त्वत्सामर्थ्ये विदीर्ण होतील झणी,**
**पापाचिये डोंगर,**
**कृष्णे, ब्रह्मस्वरूपिणे, त्वरित या,**
**भक्तास गे उद्धर ।।**

**न कृच्छ्राद्याः शक्ता यदघहरणायापि बहुशो ।**
**न च प्रायश्चित्तं हवनजपनाद्यं क्षममभूत् ।।**
**स कृष्णे त्वत्स्नाद् व्रजति सुशुचिः सन्दिवमहो ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।४५।।**

**अर्थ :** दुसरे असे की, कृच्छ्-चान्द्रायण प्रभृति अनेक प्रायश्चित्ते किंवा अनेक प्रकारे अनुष्ठान केलेली तिल-होम-गायत्री-जपादि साधने देखील ज्या पातकी पुरुषाचे पाप दूर सारण्यासाठी पुरेशी ठरली नाहीत, तो पुरुष हे श्रीकृष्णे, (इतर साधनांच्या वाट्याला न जाता) केवळ तुझ्या प्रवाहात आंघोळ करून अत्यंत शुद्ध होऊन स्वर्गात जातो हे केवढे आश्चर्य!! श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**नच पापविनाश, होई जगती,**
**गायत्री यज्ञे जप,**
**निष्ठेने व्रत, 'कृच्छ' नित्य नियमे,**
**चांद्रायणाचे तप,**
**प्रायश्चित्त म्हणोनि, कुंडी दिधल्या,**
**मंत्रोक्त त्या आहुती,**
**कृष्णे, तारक स्नान निर्मल जली,**
**ते पुण्य परमागति ।।**

**कुसङ्गान्यार्त्यर्थापहरणमुखं कायिकमघं ।**
**हरे ज्याऽऽर्योन्निन्दाकदशनमुखं वाचिकमघम् ।।**
**कुचिन्ताऽन्यानर्थस्मरणमुखरं मानसमघं ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।४६।।**

**अर्थ :** हे श्रीकृष्णे! (माझ्याकडून झालेली) दुराचारी पुरुषांचा सहवास, परपीडा, परधनाचा अपहार व त्यासारखी इतर कायिक पापे, पूजनीय देवता व सज्जन यांची निंदा आणि कदन्नभक्षण इत्यादि जिभेकडून होणारी पापे, तसेच दुर्विषयांचे चिंतन व दुसऱ्याचे वाईट घडावे अशी इच्छा इत्यादि मानसिक पापे तू नाहीशी कर. श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**झाली दुर्जनसंगती, परधना,**
**मी मानले आपुले,**
**ब्राह्मणा देवा, सज्जना, सकलिका,**
**मी नित्यही निंदिले,**
**चित्ती दुर्विषया, मनी परपीडा,**
**पापास आलिंगिले,**
**जावो कायिक दोष, मानसिकही,**
**यासाठी मी प्रार्थिले ।।**

**त्वदीयात्मस्पृष्टः स्पृशतु गतिदे स्पर्शन उत ।**
**त्वदीयं पानीयं पततु वदनाब्जे मम बत ।।**
**उताहो त्वन्नीरे तुहिनशिशिरेऽङ्गं पततु मे ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।४७।।**

**अर्थ :** हे सद्गती व ज्ञान देणाऱ्या श्रीकृष्णे! (तुझ्या प्रवाहाला) तुला स्पर्शून गेलेला वारा मला स्पर्श करो. तसेच तुझे जल माझ्या मुखात पडो. हे श्रीकृष्णे, हिमाप्रमाणे गार असणाऱ्या तुझ्या प्रवाहात माझे शरीर पडू दे. (पापांचा नाश कर अथवा करू नकोस, पण एवढे मात्र कर. त्याने मी धन्य होऊन जाईन.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

**पद्यानुवाद**

**वारा स्पर्शुनिया, प्रवाहित जली,**
**अंगास या स्पर्शु दे,**
**होता स्पर्श पदरजा, ममसुखी,**
**तत्तीर्थ ते घेऊ दे,**
**तसेच तवजली, सुखद स्नान,**
**पुण्यप्रदा होऊ दे,**
**नको मजसि, पापमुक्तता, मज**
**त्वत्दर्शना घेऊ दे ।।**

**नुतां तीर्थैः सर्वैरपि जगिति सर्वाभिरमले ।**
**सरिद्भिर्देवेन्द्रैरपि मुनिभिरत्यादृततटाम् ।।**
**न कस्त्वां सेवेत प्रवरसरिदत्राऽऽधिमथने ।**
**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।।४८।।**

**अर्थ :** मनस्ताप दूर करणाऱ्या, विमल असणाऱ्या व नद्यांमध्ये मुख्य असणाऱ्या श्रीकृष्णे, या जगात, सर्व तीर्थांनी, सर्व नद्यांनीसुद्धा स्तविलेल्या आणि देव व मुनीश्रेष्ठ यांनीसुद्धा जिच्या तीराचा आदर केला आहे अशा तुला कोण भजणार नाही? (सर्वच तुझी भक्ती करतील.) श्रीदत्तप्रभूंना मान्य असणाऱ्या व वासना शमविणाऱ्या श्रीकृष्णे, तुला वन्दन असो, तुझा जय असो.

पद्यानुवाद

देवर्षी मुनि श्रेष्ठही, तव तिरी,
अत्यादरे राहती,
तुझा तो महिमा, अगाध म्हणूनी,
तीर्थासही वंदिती,
पुण्यादि विमला, अनेक सरिता,
श्रेष्ठत्व ते मानिती,
श्रीकृष्णे भवताप, तो हरुनिया,
द्यावी मला सन्मति ।।

अतस्त्वद्दर्शनं नित्यमस्त्विति – पृथ्वी वृत्तेनाह –

धरेन्द्रतनयेऽभयेऽस्म्युपगतोऽनुकम्पोदये ।
जयेश्वरि हरीशरूपिणि मणिद्युते त्वाऽर्थये ।।
अये नदि न दीनतां व्रजतु हृन्मदीयं स्वयेऽ– ।
क्षये वपुषि तेऽसिते भवतु दृक्त्वदीयेऽम्मये ।।४९।।

**अर्थ :** दयेचा उगम जिच्यापासून होतो अशा अभय देणाऱ्या सह्यकन्ये श्रीकृष्णे! तुला मी शरण आलो आहे. हे हरिहरस्वरूपिणी, जगदीश्वरी, श्रीकृष्णे, माझा उद्धार करून आपला जय (उत्कर्ष) तू प्रगट होऊ दे. हे इन्द्रनीलकान्ति असणाऱ्या श्रीकृष्णे, तुला मी विनवीत आहे. हे नदी! यापुढे माझ्या मनात दैन्य उरू देऊ नकोस. हे श्यामले, भाग्य घडविणाऱ्या तुझ्या जलमय नित्य स्वरूपावर माझी दृष्टी (सतत) राहू दे.

पद्यानुवाद

श्रीकृष्णे, जगदेश्वरी, कर तुझा,
आशीर्वचा देऊनी,
करी प्रकट रूप ते, झडकरी,
भक्तास चिंतामणी,
तुझे रूप प्रवाही, मंगल गमे,
दृष्टीपुढे येऊ दे,
श्रीकृष्णे, तुजला विनम्र विनती,
एकात्मता येऊ दे ।।

कृष्णाया अविकृतत्वमाह – शार्दूलविक्रीडितेन –

काचित्क्षालयति प्रभोः पदयुगं काचित्कमारोहति ।
स्वेदात्कापि जटादितः प्रकटिता बद्धा परोद्वाहिता ।।
उच्चैः काचन मानिनीह पतिता जाता गता काप्यध– ।
स्त्यक्तं ते न च नाम रूपमपि सत्कृष्णे दशायामिह ।।५०।।

**अर्थ (५० अ) :** एक (यमुना) कालिन्दीच्या नावाने कृष्णप्रभूची पत्नी होऊन सेविकेसारखी चरण–युगल धुऊ लागली. दुसरी (गंगा) प्रभू शंकराची द्वितीय पत्नी होऊन त्यांच्या मस्तकावर आरोहण करते. कोणी एक (नर्मदा) शंकराच्या घामापासून प्रगट झाली. दुसरी (गोदावरी) शंकर प्रभूच्या जटा वगैरेतून प्रगट झाली. (आदिपदाने चरणाङ्गुष्ठ वगैरेचा समावेश होतो.) तिसरी (मंदाकिनी) प्रभूच्या जटेत अडकून पडली.

**(५० ब) :** कोणी एक (गंगा) शंतनुराजाची पत्नी झाली. भीमसेनाने नर्मदेशी विवाह केला. दुसरी एक (गंगा व सरस्वती) मानाच्या भरीला पडून एकमेकींशी भांडत विष्णुलोकातून या जगात येऊन पडल्या. आणखी एक (भोगावती) खाली नागलोकात शिरली. तू यात कुठेच नाहीस. कारण, हे श्रीकृष्णे, या अवतारात (या अवस्थेत) तू कृष्ण हे गोंडस नाव व मेघश्यामल रूप (देखील) सोडून दिले नाहीस.

### पद्यानुवाद
### (५० अ)

कालिंदी, तूच कृष्ण पत्नि म्हणुनी,
सेवा किती साधिली,
कृष्णे तू शंकर–पत्नि दुसरी ती,
गंगा शिरी भासली,
वाटे शंकर–स्वेद–निर्मित कुणी,
ती निर्मला नर्मदा,
भूलोकी शिव–जटा–पूनित गमे,
गोदावरी मोक्षदा ।।

(५० ब)

कृष्णे, शंतनु-पत्नि रूप धरिले,
मंदाकिनी पुण्यदा,
पाताळी गुप्त सुप्त, तूच दिसते,
भोगावती प्राणदा,
लक्ष्मी आणि सरस्वती कलह तो,
प्रीतीत ना गोडवा,
हे कृष्णे तव रूप शामल गमे,
नामातही गोडवा ॥

स्रग्धरावृत्तेन हारबन्धेन स्तौति -

देवेड्ये वेदवेद्ये जय जय भयहृत्त्वं कृपाकृष्टकृष्णे ।
त्राहि त्राहि ग्रहीतृंस्तव भवहवराख्यां सदा सत्यसन्धे ॥
भूयो भूयोऽभयोक्तीर्वितर तव तनुर्येह मोहप्रहर्त्री ।
सा मे कामेश मेध्या मनसि नयनयोरादरादस्तु दत्त ॥५१॥

**अर्थ :** हे देवांना स्तुत्य असणाऱ्या, वेदांना वेद्य असणाऱ्या व भय हरण करणाऱ्या कृष्णे! तुझा जय असो!! दयेने सांद्र असणाऱ्या कृष्णे, तू संसारभय निपटून टाकणारे तुझे गोंडस नाव घेणाऱ्यांचे रक्षण कर, रक्षण कर. (माझ्या भक्ताचे कधीही अकल्याण होत नाही.) सत्यप्रतिज्ञ असणाऱ्या कृष्णे, तू मला निरंतर अभय वचन देत रहा. हे मनःकाम पूरका दत्ता, या कृष्णातीरांवर संसार मोह नाहीशी करणारी तुझी पवित्र मूर्ती नांदते, ती माझ्या मनात, डोळ्यातही आदराचे नित्यस्थान मिळवीत राहू दे. डोळ्यांनी ती मूर्ती पाहून व मनाने तिचे ध्यान करून मी कृतार्थ होऊन जाईन.

पद्यानुवाद

देवा स्तुत्य दिसे, वेदा वंद्य असे,
कृष्णे, तुझा गे जय,
कृष्णे सांद्र, तशी दयाशिल गमे,
होवो तुझा गे जय,

कृष्णे गोंडस नाम ते तव तुझे,
येवो मुखी गे सदा,
भक्ताचे करशील रक्षण त्वरे,
येताच ती आपदा ।।

**श्रीकृष्णाश्रयान्मुक्तिरित्यनुष्टुभाह गोमूत्रिकाबन्धेन -**

**कृष्णां यो वृणुते भक्तः पदं यायान्निरन्तरम् ।**
**तृष्णां यो वृणुतेऽभक्तः खेदं यायान्निरन्तरम् ।।५२।।**

**अर्थ :** जो भक्त स्नानादिकांनी कृष्णेची आराधना करतो तो नित्य-अभय-पदाचा अधिकारी होतो. जो वासनेची निवड करतो तो अभक्त निरंतर खेदाचा धनी होतो.

**पद्यानुवाद**

स्नानादि शुभ कर्म नित्य करूनी,
आराधना साधितो,
त्या भक्तास, सदा मिळे अभयता,
स्वर्लोकिही पूज्य तो,
ज्याचे चित्ति-मनी, अती रुचि असे,
दुर्वासनाची सदा,
कैचा मोक्ष मिळेल, त्यास जगती,
चिंता मनी ही सदा ।।

**कृष्णास्थप्रेरितमतिर्वासुदेवसरस्वती ।**
**कृष्णामस्तौदतः प्रीयान्नरसिंहसरस्वती ।।१।।**

**इति श्री प.प. वासुदेवानंदसरस्वती विरचिता कृष्णालहरी समाप्ता।**

**अर्थ :** कृष्णातीरावर राहणाऱ्या दत्ताने बुद्धीला प्रेरणा दिल्यानुसार वासुदेवसरस्वतीने कृष्णेची स्तुती केली. त्यामुळे श्रीनरसिंहसरस्वती प्रसन्न होवोत!!

याप्रमाणे श्री प.प. वासुदेवानंदसरस्वती विरचित कृष्णालहरी समाप्त झाली.

## पद्यानुवाद

(समाप्ति श्लोक)

दत्ता वास तुझा, अजून गमतो,
त्या पुण्य कृष्णातिरी,
ही 'कृष्णालहरी' तुवा वदविली,
माझी न ती वैखरी,
भक्तीने 'नरसिंहसरस्वती' तुम्हा,
संतोष व्हावा मनी,
सद्भावे पदी, 'वासुदेव' नमितो,
प्रेमाश्रु हे लोचनी ।।

(पद्यानुवादित काव्याचे समर्पण)

ही 'कृष्णालहरी', गमे रचियली,
गीर्वाण भाषेतुन,
त्याची ती रुचि, चिंतनी सुलभही,
त्या मायबोलीतुन,
भक्तियुक्त मने, 'विराग' जुळवी,
त्या काव्य पंक्तीतुन,
व्हावे संमत वासुदेव हृदयी,
हे भक्तिचे चिंतन ।।

(विराग - डॉ. त्र्यं.गो. पाण्डे, कवीचे काव्यातील नाव.)

# कृष्णालहरी – भाष्यचिन्तन (विषय अनुक्रम)

१) नद्या म्हणजे परमेश्वरी अवताराचा प्रत्यय
२) लोकमाता गिरिकन्यांचे महामण्डल
३) 'कृष्णालहरी' नामवैशिष्ट्ये
४) सहस्रारातून प्रस्फुटित – विशुद्धभावधारा, वृत्तही शिखरिणी
५) आत्मनिवेदन – भक्तिभावप्रधान काव्य
६) 'कृष्णालहरी' निर्मितीची हृदयंगम पार्श्वभूमी
७) लहरीचे विशेष वृत्त
८) जीवनाचा सर्वंकष दृष्टीकोन
९) मंगलाचरण व प्रयोजन
१०) अमूर्त आकाशाचे मूर्तिकरण व नाते
११) विलोभनीय भावमधुर ध्रुपद योजना
१२) 'श्रीकृष्णे' व 'गुरुमते' विशेषण वैशिष्ट्य
१३) 'शमिततृष्णे'चे वैशिष्ट्य
१४) कृष्णालहरीचे पठन हा यज्ञ आहे
१५) कृष्णास्नानाचे माहात्म्य
१६) 'जय' शब्दाची मार्मिकता
१७) पाठक्रम व अर्थक्रम
१८) कृष्णाप्रवाहाची माहिती
१९) कृष्णामाईचे इतर नद्यांशी नाते
२०) कृष्णातीरावरील तीर्थांचे माहात्म्य
२१) अपराधाचे तत्त्वज्ञान
२२) अपराध निराकरणासाठी प्रार्थना व त्यासाठी युक्तिव
२३) कृष्णेचे ईश्वरी स्वरूप
२४) हरिहरात्मत्व
२५) कृष्णेची आळवणी
२६) पूर्वसुकृत व कृष्णाप्रेम यांचा संबंध
२७) कृष्णेने पावन केलेले जीव
२८) कृष्णेजवळ मागणे

# कृष्णालहरी - भाष्यचिंतन

## *नद्या म्हणजे परमेश्वरी अवताराचा प्रत्यय*

प.प. श्रीस्वामिमहाराजांनी आपल्या भारत-भ्रमणात ''तीर्थीकुर्वन्ति तीर्थानि'' या न्यायाने अनेक तीर्थस्थळांचे दर्शन व अवगाहन केले. आपल्याकडील संत महापुरुषांची तीच रीत असे व आहे. जिथे जाणे घडेल तिथे देवतांची व नद्यांची स्तुती हाही त्यांचा परिपाठ होता. नद्या म्हणजे उताराकडे वाहणारे पाणी किंवा लोकांवर उपकार करणारी निसर्गशस्ती एवढीच त्यांची दृष्टी नव्हती. परमेश्वराचा एक चालता बोलता अवतार या भूमिकेतून ते नदीप्रवाहाकडे बघत. तसे त्यांना अनुभवदेखील यायचे.

दक्षिणेतील पिनाकिनी नदीचा एक अनुभव. अधिक चैत्र मास. अमावस्या किंवा पौर्णिमेचा दिवस असेल. क्षौर करून श्रीमहाराज पिनाकिनीच्या तीरावर गेले. उन्हाळ्याचे दिवस. प्रवाह असला तरी कितीसा असणार? त्यात स्नान कसे घडणार? परंतु ते प्रवाहात उतरताच क्षणात तो वाढला. किती वाढला याची नोंद नाही. पण श्रीस्वामींचे मात्र स्नान झाले. या विषयीची पिनाकिनीच्या स्तोत्रात श्रीस्वामींनी कृतज्ञमनाने नोंद अशी केली आहे,

**याऽधिमासवशाच्चैत्र्यां कृतक्षौरस्य मेऽल्पका ।**
**स्नापनाय क्षणाद् वृद्धा सा ह्यासेव्या पिनाकिनी ।।**

''स्नापनाय क्षणाद् वृद्धा'' न्हाऊ घालण्यासाठी क्षणात मोठी झाली.

मातृहृदयाचा असा साक्षात्कार अनुभविल्यानंतरही नदीविषयी जड-भाव मनात कसा येईल? यात मातृ-वात्सल्याचे दर्शन त्यांनी रचलेल्या स्तोत्रात घडते. गंगा, यमुना, गोदा, तापी, नर्मदा व कावेरी अशा मोठ्या नद्यांना त्यांनी आळविले यात नवल नाही. क्षिप्रा, वेत्रवती, पयोष्णी, वैनगंगा, तुंगा, चन्द्रभागा, पिनाकिनी, बाहुदा अशा सान-थोर अनेक नद्यांना त्यांनी गौरविले.

## *लोकमाता गिरिकन्यांचे महामण्डल*

भरत-भूमीच्या पृष्ठावर निर्व्याजपणे खेळत शेवटी सागराला मिळणाऱ्या या गिरिकन्यांचे एक महामण्डल आहे. देशाचा सांस्कृतिक इतिहास त्यांनीच घडवला आहे. कारण त्यांच्याच स्तन्यावर या भूमीतील पुत्रांचे पोषण झाले आहे. अनेक देव व ऋषी, संतसत्पुरुष त्यांच्या तीरावर विसावले

आहेत. न बोलता या देशाची सांस्कृतिक कहाणी सांगणाऱ्या त्या लोकमाता आहेत. ही श्रीस्वामिमहाराजांची धारणा. त्यामुळे प्रत्येक नदीस्तोत्रात कमी अधिक प्रमाणात ती प्रतिबिंबित झालेली आढळते. त्यातही कृष्णामाईवर स्वामिमहाराजांचा लळा विशेष. श्रीकृष्णालहरी स्तोत्रात तो प्रकर्षाने आढळतो.

### *"श्रीकृष्णालहरी" नामवैशिष्ट्य*

श्रीकृष्णालहरी एकूण त्रेपन्न श्लोकांची जगन्नाथ पंडितांच्या गङ्गालहरीसारखी. नर्मदालहरी हेही श्रीस्वामींचे दुसरे लहरीकाव्य. परंतु ते लहान आहे, केवळ तीस श्लोकांचे. श्रीस्वामींनी लिहिलेली इतरही स्तोत्रे अनेक आहेत. परंतु एवढा विस्तार कृष्णालहरीचाच आढळतो. लहरी हे नावदेखील श्रीमहाराजांनी नर्मदा व कृष्णा या दोन नद्यांवरील या दोन प्रस्तुत रचनांनाच दिले आहे.

नर्मदालहरीव्यतिरिक्त लिहिलेल्या दुसऱ्या एका रचनेला त्यांनी स्तोत्र हे नाव दिले आहे. तीच गोष्ट कृष्णेवरील इतर स्तोत्रांची. श्रीकृष्णापंचक स्तोत्र, श्रीकृष्णा-वेणी-पंचगंगा स्तोत्र, कृष्णा-पञ्चगङ्गा संगम स्तोत्र, श्रीकृष्णाष्टक अशी कृष्णेवरील इतर स्तोत्रे आहेत. पण त्या लहरीरचना नाहीत. त्यादृष्टीने श्रीस्वामींच्या हातून झालेल्या लहरी रचना दोनच. एक नर्मदालहरी व दुसरी कृष्णालहरी.

### *सहस्रारातून प्रस्फुटित विशुद्धभावधारा-वृत्तही शिखरिणी*

श्रीस्वामींनी लहरी नाव कशाला दिले असेल? किंवा कशाला श्रीस्वामींनी लहरी रचना केली असेल?

श्रीशंकराचार्यांच्या सौंदर्यलहरीत, सौंदर्यलहरी हा शब्द येतो (श्लोक ४४) व चिदानन्दलहरी शब्दही आला आहे. त्यावरून सौंदर्य व चिदानंदाशी काहीशी संगती लागते. गङ्गालहीच्या शेवटी **'इमां पूयूष-लहरीम् जगन्नाथेन निर्मिताम्'** असा उल्लेख येतो. लहरी शब्दही तसा गङ्गालहरीत अनेकदा आला आहे.

**"ययोर्नान्तर्यातस्तव लहरिलीलाकलकलः"**। ३२
**त्वदीयानां लीलाचलितलहरीणां व्यतिकरात्** । ३५
**तटाभोगप्रेङ्खल्लहरिभुज संतानविधुतिः** । ३८
**करेणोक्षिप्तास्ते जननि विजयन्तां लहरयः** । ४०

कृष्णालहरीतसुद्धा लहरी शब्द एकदाच का होईना आला आहे. कृष्णालहरी हे नाव प्रस्तुत काव्याला स्वामींना का द्यावेसे वाटले असेल? इतर स्तोत्र-रचनेत व लहरी रचनेत काही साधर्म्य-वैधर्म्य असलेच पाहिजे. ते कोणते?

लहरी रचना प्राय: शिखरिणी वृत्तात दिसते. लहरी रचनेचे प्रसिद्ध उद्गाते श्रीशंकराचार्य. त्यांची सौंदर्यलहरी पूर्णपणे शिखरिणीवृत्तात आहे. त्यांच्याच शिवानन्दलहरीत हा नियम तेवढ्या काटेकोरपणे पाळलेला नाही. इतर बऱ्याच वृत्तांची सरमिसळ आहे. जगन्नाथ पंडितांच्या गङ्गालहरीत शेवटचे काही श्लोक सोडले तर शिखरिणीवृत्तच आहे. तसेच काहीसे अनुसरण कृष्णालहरीत आढळते.

एकोणपन्नास - **'धरेन्द्रतनये'** (पृथ्वी), पन्नास - **'काचित् क्षालयति'** (शार्दुलविक्रीडित), एकावन्न - **'देवेड्ये वेदवेद्ये'** (स्रग्धरा), बावन्न-त्रेपन्न - **'कृष्णां यो वृणुते व कृष्णास्थ प्रेरित'** (अनुष्टुभ) असे एकूण पाच श्लोक वेगळ्या वृत्तात आहेत. नर्मदालहरीतदेखील शेवटचे दहा श्लोक - एकवीस ते तीस - वेगळ्या वृत्तात आहेत. यावरून शिखरिणीवृत्ताव्यतिरिक्त इतर वृत्ते लहरी रचनेत असतच नाहीत असे म्हणता येत नाही.

दुसऱ्या बाजूने पुष्पदन्ताच्या **शिव-महिम्न** स्तोत्रात शिखरिणीवृत्तच उपयोगात आणले असून फलश्रुतीचा भाग इथे विचारात घेतला नाही. तो अर्थातच इतर वृत्तात आहे. त्याला कोणी लहरीकाव्य म्हणत नाहीत. तर मग लहरीकाव्य व स्तोत्रकाव्य यात वेगळे वैशिष्ट्य काय? हा प्रश्न उरतोच.

### *आत्मनिवेदन भक्तिभावप्रधान काव्यप्रकार*

वर्णन प्राधान्य व निवेदन प्राधान्य हे दोन निकष स्तोत्रवाङ्मय व लहरीवाङ्मय या दोहोंतील एक स्थूल विभाजक रेषा मानता येईल. तसे ते आत्मनिवेदन वर्णनात असू शकते किंवा आत्मनिवेदनातही वर्णन असू शकेल. गौण-मुख्य भावनेनेच या निकषाकडे पाहावयाचे आहे एवढेच. आत्मनिवेदन म्हटले की तिथे सलगी आली. हळूवारपणा आला. भावनांची कोवळीक आली. अपार संवेदनशीलता आली. लहरी हे एक गीतिकाव्यच असते. त्यामुळे नादमाधुर्य, प्रवाहिता, लयात्मकता हे विशेष इथे प्रकर्षाने आढळतात.

लहरीकाव्य बन्दिगीतही नव्हे. इथे मर्यादा पाळायची असते व पाळलेली असते. परंतु तिलाच अगदी चिकटून बसण्याचा भाव नसतो.

मूल आईशी कसे वागेल तसा इथे प्रकार असतो. **लहरीकाव्य म्हणजे आईपुढे नेलेले गाऱ्हाणे आहे.** आईशी मर्यादेत वागण्याचे भान अवश्य आहे, परंतु तिच्यावर आपला विशेष अधिकार आहे ही जाणीव आईला करून देण्याची धिटाई देखील आहे. पुष्टी-प्रेमातील उत्तानभाव इथे नसेल, पण मातृभावाचा विसर पडून न देता थोडे स्वातंत्र्य घेण्याची प्रवृत्ति मात्र इथे आहे. हृदय पूर्णपणे उकलून-उलथून आईला इथे दाखवायचे आहे. आईशी काहीसा लोकांतात पण काहीसा एकांतात होणारा हा संवाद आहे. हे तन्तु-संगीत आहे, मृदङ्गनाद नव्हे. वृन्दगीतही नव्हे. काव्यातील हे अत्यंत हळूवार माध्यम आहे. तसलीच मनाची आर्तता निर्माण झाली तरच लहरी, भावलहरी उमटतील आणि काव्य लिहून होईल.

## *कृष्णालहरी निर्मितीची हृदयंगम प्रार्श्वभूमि*

सौंदर्यलहरीला कोणते निमित्त घडले हे माहीत नाही. जगन्नाथाच्या गङ्गालहरीची पार्श्वभूमी मात्र सर्वांना माहीत आहे. श्रीमद्‌भगवद्गीतेची पार्श्वभूमी जशी आगळी तशीच गंङ्गालहरीचीदेखील. अर्जुनाला ऐन समरांगणावर कारुण्याचे भरते येते. जिथे वीरवृत्ती उफाळून यायची तिथे कारुण्य! केवढा तो गंभीर प्रसंग असेल? प्रत्यक्ष परमेश्वरच पाठीराखा म्हणून निभावले. म्हणूनच भगवंतांनी केलेल्या उपदेशाला एकदम ऐतिहासिक महत्त्व प्राप्त होऊन गेले. तशी पार्श्वभूमी रामगीता, गणेशगीता इ. गीताग्रंथांना लाभली नाही. गङ्गालहरीची पार्श्वभूमीदेखील अशीच असामान्य.

एक उद्‌भट पाण्डित्य जगन्नाथ पण्डिताच्या रूपाने अवतरते काय आणि साऱ्या शास्त्रमर्यादा व लोकमर्यादा झुगारून एक उन्मत्त जीवन निवडते काय! सारेच कल्पनातीत!! अशा मनाला अनुताप झाला म्हणजे त्याचा संवेगही किती तीव्रतम असतो, हे गङ्गालहरीत बघायला मिळते. लहरीकाव्याच्या निर्मितीसाठी मनाला असाच काहीचा धक्का किंवा जाग आवश्यक असते. त्याचे स्वरूप सर्व ठिकाणी एकाच तऱ्हेचे असणे आवश्यक नाही.

श्रीस्वामिमहाराजांचे जीवन अगदी विशुद्ध. '**जया निजेल्याने उपासी। वैराग्य गा ।।**' हा त्यांचा अधिकार. ज्ञान-भक्ति-योग-वैराग्याची बाळलेणी घेऊन आलेल्यांची वाट कशी चुकेल? ती जर न चुकली, तर जगन्नाथ पण्डिताच्या जीवनात उद्‌भवला तसा प्रसंग येणार कसा? मग लहरीकाव्याच्या माध्यमाकडे स्वामींना वळण्याचे कारण काय?

कृष्णामाईची इतर स्तोत्रे श्रीस्वामींनी रचलेली होतीच. ती लहरीनंतरची की अगोदरची हे समजायला मार्ग नाही. ती पूर्वीची असतील की नसतील हा प्रश्न तसा महत्त्वाचा नाही. पण कृष्णामाईनेच स्वत: प्रगट होऊन स्वामींना आपले कवन गाण्याचा आग्रह धरला. हा तीव्र अनुतापाइतकाच प्रसंग मनाला भारावून टाकणारा होता. आपल्या मुखातून निघालेले शब्द आईला आवडतात व त्यांचीच ती वाट बघत आहे, हे पाहिल्यावर मनाला गहिवर आल्यावाचून कसा राहील? आपला अधिकार केवळ ''रामो हरि'' करण्याइतपतच!, ही जाणीव असल्यावर तर, आईने धरलेल्या अपेक्षेचे मनातून केवढे स्वागत होत असेल, याची सहज कल्पना करता येते. प्रत्यक्ष आईने इच्छा व्यक्त करण्याइतपत आपण वाट बघावी व यापूर्वी हे काम आपल्याला सुचू नये याची मनात बोचही असू शकते.

आपण आपले जिव्हार श्रीदत्ताला विकले म्हणून त्या व्यतिरिक्त इतरत्र तोंड उघडायचे नाही हा निग्रह आपण फार ताणून धरला असे वाटू शकते. तिच्या तीरावर विहार हा श्रीदत्ताचा आवडता छंद. श्रीदत्ताची कृष्णामाई कोणी लागत नव्हती की काय? मग आपण कशाला इतके दिवस माईला चुकलो? असे अनेक विचार किंवा भावकल्लोळ कृष्णामाईने आपले कवन करण्याची आज्ञा करता-बरोबर श्रीस्वामींच्या मनात जागे झाले असतील. त्यांना वाट मोकळी करून देण्यासाठी कृष्णालहरीचा जन्म झाला.

### *लहरीचे विशेष – वृत्त*

कृष्णालहरीचे वृत्त शिखरिणी हे मागे आले आहे. त्याचे औचित्य सांगताना स्वामिमहाराज आपल्या स्वकृत टीकेत म्हणतात,

**शिखरिणी वृत्तमिदम् । तस्य जलदेवताक – जगण – मुखत्वाद्**
**जलरूपेण दृश्यमानाया: श्रीकृष्णाया: स्तवनार्हत्वात् ।**

हे शिखरीणीवृत्त आहे. ते ज-गणाद्वारा सुरू होत असून त्याची देवता 'जल' आहे. स्वाभाविकच जलरूपाने प्रकट झालेल्या श्रीकृष्णेची स्तुती करण्याला ते योग्य आहे.

इथे एक लहानशी शंका येते. शिखरिणीवृत्ताचा आरंभ ज-गणाने होत नाही, य-गणाने होतो. मुद्रणदोषामुळे य या अक्षराऐवजी ज अक्षर पडले असेल अथवा वेदांच्या काही शाखांत य च्या ऐवजी ज चा उच्चार करतात. जसे यज्जाग्रत: = ज जाग्रत:। त्याला धरून हे विधान असू शकते. काही

का असेना, वृत्ताच्या निवडीपासूनच चोखंदळपणा आहे हे महत्त्वाचे आहे. आपल्याकडे प्रत्येक गोष्टीचे शास्त्र आहे. मोठी माणसे तिकडे अनुसंधान ठेवून वागत असतात. कधी कधी त्यांच्या अनुसंधानामुळे नवे शास्त्र उदयाला येते. **सामान्य व असामान्य यांच्यातील विभाजक सीमारेषा आहे, ती ही. ज्यांच्या प्रत्येक कृतीमागे किंवा उक्तीमागे काही शास्त्र असते किंवा शास्त्रीय परंपरा घालून देण्याचे सामर्थ्य असते ती असामान्य माणसे!** येर ते सकळ!! लहरीचे वृत्त माध्यम निवडताना काही स-हेतुकता व स-शास्त्र-ता आहे हे महत्त्वाचे.

### *जीवनाचा सर्वंकष दृष्टिकोन*

दुसरा महत्त्वाचा विचार म्हणजे जीवनाचा सर्वंकषदृष्टिकोन. प्रत्येक गोष्टीला आधिदैविक, आधिभौतिक, आध्यात्मिक स्तर असतात. आपल्याला वस्तूचे हे तीन स्तर दिसत नाहीत. म्हणूनच आपला विचार फुटकळ असतो. त्याला एकसन्धपणाची जोड असत नाही. ज-गण असो की य-गण असो त्याचे नाते ऱ्हस्व-दीर्घ अक्षरांच्या विशिष्ट ठेवणीशी जसे आहे, तसे ते जलदेवतेशीसुद्धा आहे. जलाशी आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. असा हा आंतरिक नातेसंबंध आहे. स्वामिमहाराज त्याची आपल्याला आठवण करून देत आहेत. कुठे शिखरिणीवृत्त, त्यातील य-गण व कुठे कृष्णामाई असा विचार करून आता चालणार नाही. साध्या य-गणाचे सूत्र धरून जलदेवता व त्याच्या मूर्तरूपाने होणारा नदी-प्रवाह-रूप आविष्कार इथपर्यंत अनुसंधानाची उत्तरोत्तर श्रेष्ठ श्रेणी गाठता येते. उलट क्रमानेसुद्धा सर्व दृश्य असणारा नदीप्रवाह त्याचे चर्मचक्षूने न दिसणारे अमूर्त देवतात्मक रूप व त्याचाच व्यंजक असणारा ज-गण असा संबंध ध्यानी ठेवता येतो. **मूर्ता-अमूर्ताची ही जी खेळी आहे तिचा परिचय करण्यासाठीच स्वामिमहाराजांनी शिखरिणीवृत्ताचे औचित्य इथे सांगितले आहे.** हा शास्त्रीय विचार ज्यांच्यासाठी अफलातून असेल त्यांनी अन्य तऱ्हेनेसुद्धा शिखरिणीवृत्ताचे औचित्य स्वत:शी गुणगुणून पाहण्यासारखे व ते येथील आशयाशी किती संवादी आहे हे ताडून पाहण्याजोगे आहे.

**मेघदूतात 'मन्दं मन्दं' किंवा 'विश्रान्तः सन्'** अशा चालीने मेघाने सुदूर अलकेला जावे हे सुचविण्यासाठी ह्याला संवादी असणाऱ्या मन्दाक्रान्तावृत्ताची निवड **कविश्रेष्ठ कालिदासाने** केली. तेवढीच अक्षरे शिखरिणीवृत्तात देखील आहेत. पण तिथे तीन विसावे आहेत. इथे मात्र

दोन. त्यामुळे शिखरिणीवृत्त धावत्या प्रवाहाची आठवण करून देते असे दिसेल. श्रीस्वामिमहाराज म्हणतात त्याप्रमाणे ते जलदेवतेचे परिचायक असो की ते धावतेपणाचे द्योतक असो ते या ठिकाणी साजिरेपणाचा लाभ करून देणारे आहे हे निश्चित.

## *मंगलाचरण व प्रयोजन*

लहरीकाव्याला तसे स्वतंत्र मंगलाचरण आढळत नाही. सर्व काव्यच मंगलरूप असते. इथे मात्र श्रीस्वामींनी श्रीकृष्णेचा जय-जय-कार करून लहरीला आरंभ केला आहे. एवढेच नव्हे तर प्रस्तुत काव्याच्या प्रयोजनाचा सुस्पष्ट व स्वतंत्र विचार कृष्णालहरीवरील स्वकृत टीकेत दर्शविला आहे. साहित्यकार काव्याची विविध उद्दिष्टे प्रतिपादन करीत असतात. काव्यप्रकाश-प्रकाश मम्मटाचार्यांनी ती पुढीलप्रमाणे सांगितली आहेत,

**काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहार-विदे शिवेतरक्षतये ।**
**सद्यः परनिर्वृतये कान्तासंमित-तयोपदेश-युजे ।**

**(काव्यप्रकाश १.२)**

(कीर्ती, धनलाभ, व्यवहारज्ञान, पाप-विनाश, ब्रह्मास्वाद-सहोदर-आनंद व रसाळ शब्दाने उपदेश, ही काव्यप्रयोजने होत.)

श्रीस्वामींना या उद्देश मालिकेतील **पाप-विनाश** या उद्देशाकडे प्रथम लक्ष द्यायचे आहे. पाप-विनाश हे अंतिम उद्दिष्ट मात्र नव्हे. **नित्य-निरुपाधिक आनंद प्राप्तीसाठी ज्ञानाची निकड, ज्ञानासाठी प्रतिबंधक पाप-विनाश** होण्याची गरज. यादृष्टीने पाहता **मोक्ष-ब्रह्मानंदप्राप्ती हे या काव्याचे अंतिम उद्दिष्ट मानता येईल.** साऱ्याच भक्तिरचनांचे तेच मुख्य प्रयोजन, ब्रह्मास्वाद-सहोदर आनंद हे इतर काव्याचे उद्दिष्ट सांगितले असले तरी किमान पात्रता असल्यावाचून - विशुद्ध रसिकता असल्यावाचून सर्वांनाच तो आनंद लाभत नसतो.

**रसिक त्या विमल-प्रतिभान-हृदय असावा असे अभिनव गुप्ताचार्यांनी नाट्यशास्त्रावरील आपल्या टीकेत स्पष्ट केले आहे. ती पात्रता नसेल तर ब्रह्मानंद-सहोदर आनंदाऐवजी विषयास्वाद सहोदर दुःखानुभवच पदरी येतो.** भक्तिकाव्यात त्यापेक्षाही हृदय विमल असावे लागते. लौकिक विषयांचे आकलन इथे पुरेसे होणार नाही. अन्य काव्यातही ते पुरेसे नसतेच. व्यक्तिनिष्ठ लौकिक अनुभव, स्वतः निर्व्यक्तिक होऊन व

अनुभवातील व्यक्तिनिष्ठता घालवून तिथे आस्वादावयाचा असतो. इथे तर त्यापेक्षा किती तरी उच्च पातळीवर जायचे आहे. येथील विषय तसा लौकिक नव्हेच.' त्याच्या खऱ्या आस्वादासाठी किती तरलता व संवेदनशीलता आवश्यक असेल, हे सहज ताडता येईल. लहरीवरील टीकेत श्रीस्वामींनी केलेले विवरण अभ्यासण्याजोगे आहे.

> **अत्यन्तक्लेशदेभ्योऽविद्या-काम-कर्माख्य-बन्धेभ्यो ज्ञानं विना मोक्षासंभवान्मोक्षं विना नित्य-निरुपाधिक-निरतिशय-स्वरूपभूत-परमानन्दा-त्मनावस्थानासंभवाज् ज्ञानोत्पत्तेश्च प्रतिबन्धकपापक्षयापेक्षत्वात्तदर्थं सर्व-पाप-परिहरणक्षमाया: श्रीकृष्णाया: स्तुतिरारभ्यते।**
>
> **(कृष्णालहरी - प्रस्तावना)**

अविद्या, काम व कर्म या अत्यंत दु:ख देणाऱ्या बंधनांपासून ज्ञानाव्यतिरिक्त अन्य उपायाने मोक्ष (सुटका) होत नसल्याने, मोक्षावाचून चिरंतन, उपाधि-रहित असा स्वरूप-भूत परमानंद मिळू शकत नसल्याने आणि **ज्ञानाची उत्पत्ती ज्ञान-प्रति-बंधक पापांच्या नाशावर अवलंबून असल्याने त्यासाठी सर्व तऱ्हेच्या पापांचा विनाश करण्यासाठी समर्थ असणाऱ्या श्रीकृष्णेची स्तुती आरंभिली आहे. - भावार्थ**

**वरील अवतरणावरून साहित्यकारांनी पाप-विनाश हे काव्याचे एक उद्दिष्ट म्हणून मानण्यात जी भूमिका सुचविली आहे, त्यापेक्षा ही भूमिका वेगळी व व्यापक आहे असे दिसेल. साहित्यकारांनी याबाबत सूर्यशतकाची** रचना करून आपले कुष्ठ दूर करू शकलेल्या **मयूर कवीचे** उदाहरण दिले आहे. उघड उघडच ते उदाहरण एका आर्त अथवा कामनिक भक्ताचे आहे. स्वरूप-भूत-परमानंदप्राप्तीचा तिथे फारसा संबंध दिसत नाही. इथे मात्र एक साखळी दाखविली. **पाप-विनाश ही त्याची पहिली कडी तर परमानंदलाभ ही शेवटी कडी, असे येथील चित्र आहे व निश्चितच ते वेगळे आहे.'** ही भूमिका कृष्णालहरीसारख्या ज्या काही रचना असतील त्यांनाही लागू पडेल. एकूण कृष्णालहरीच्या प्रयोजनाचा श्रीस्वामींनी प्रतिपादन केलेला विचार नवीन जाणीव देणारा आहे, हे मान्य करावे लागेल.

या ठिकाणी आणखी एक महत्त्वाची शंका उपस्थित करून श्रीमहाराजांनी तिचे निराकरण केले आहे. ते शंका उपस्थित करतात -

यज्ञ, दान, तप, ही खरी ब्रह्मसाक्षात्काराची परंपरासक्त साधने श्रुतीने सांगितली आहेत. इथे तर आपण नदी–तीर्थ–सेवनावर भर देत आहोत. हे कितपत सयुक्तिक आहे?

उत्तरादाखल स्वामिमहाराज म्हणतात, तीर्थयात्रादेखील एक प्रकारचा **भौमयज्ञच होय व स्मृतीमध्ये त्यांचे साधन** म्हणून वर्णनदेखील केले आहे.

यावरून इथे ब्रह्मप्राप्तीचे साधन म्हणून श्रीकृष्णेची केली जाणारी स्तुती सुसंगतच मानावी लागते.

### *यज्ञसंकल्पना*

**ननु तमेतं वेदानुवचनेन ब्राह्मणा विविदिषन्ति यज्ञेन दानेन तपसाऽनाशकेन इति श्रुत्या यज्ञादीनां ब्रह्म साक्षात्कारं प्रति परम्परया साधनत्वापेक्षा श्रूयते न नदीतीर्थसेवनमिति चेत्तीर्थयात्राया अपि भौम–यज्ञत्वेनोक्तत्वात्स्मृत्यादौ प्रोक्तत्वाच्चेयं स्तुतिरनवद्या।**

**कृष्णालहरी अवतरणिका**

या उदाहरणावरून यज्ञविषयक सर्वसाधारण रूढ संकल्पना नव्याने समजून घेण्याची गरज वाटते. यज्ञ म्हटला की यज्ञकुण्ड, मन्त्रघोष, ब्राह्मण–आहुती हेच चित्र मनापुढे उभे राहते. आहुती जशी अग्निकुण्डात समर्पण करतात तशी 'अवभृथेष्टि' सारख्या विधीत जलप्रवाहात अर्पण करतात हे प्राय: लोकांना माहीत नसते. अग्नीप्रमाणेच जल–प्रवाहदेखील आहुतीचा साक्षात् स्वीकार करून यजमानाला सुखवीत असतो. द्रव्य,–देवता व यजमान ही यज्ञाची तीन प्रमुख अंगे, यज्ञाच्या साऱ्या प्रकारात या ना त्या रूपात असतातच. त्यामुळे अमुक द्रव्य–देवता असली तरच यज्ञ नाव देता येईल असा आग्रह धरता येत नाही. ही अंगेसुद्धा बाह्यांगेच होत. "**प्राणापन–परिचलनवत्या वाचश्चित्तस्य चोत्तरोत्तरक्रम: यद् यज्ञ:।**"

(यज्ञ म्हणजे प्राण व अपान यांच्या गतीसमवेत असणारी वाणी व चित्त यांचा चढत्या श्रेणीने विकास अशी अंतरंग स्वरूपाला धरून यज्ञ व्याख्या आचार्य शंकरांनी केली आहे.)

'**एवं बहुविधा यज्ञा**' (गीता ४.३२) याप्रमाणे यज्ञ अनेक प्रकारचे आहेत असे श्रीमद्भगवद्गीतेतच म्हटले आहे, तेही येथे ध्यान देण्याजोगे आहे. त्यामुळे यज्ञ म्हणजे विशिष्ट विधि अशी समजूत करून उगाच रुसून बसणाऱ्या किंवा रूढ यज्ञसंस्थेवर टीका करणाऱ्या लोकांना श्रीस्वामिमहाराजांच्या वरील

दृष्टिकोनाने नवी दृष्टी लाभेल. तीर्थयात्रेसारखे यज्ञ-विधी, अनधिकार-अधिकार या निर्बंधापलीकडील असल्याने, सर्वांनाच सताड उघडे असलेले हे यज्ञ-मण्डपाचे द्वार आहे असा आता भरवसा बाळगायला काही अडचण नाही. **कोणत्याही प्रकाराने का होईना, चित्त व वाणी यांचा उत्तरोत्तर विकास होत जावा हीच दृष्टी किंवा शिकवण साधुसंतांनी दिली आहे. याच दृष्टीने ''तीर्थ-व्रती भाव धरी'' असे आवाहन हरिपाठात श्रीज्ञानेश्वरमहाराज करीत आहेत.**

श्रीस्वामिमहाराजांनी गद्य-पद्यात्मक शैलीने लिहिलेल्या नृसिंहवाडी वर्णनात (संस्कृत) तीर्थविषयक स्वतःचा दृष्टिकोन फार सुंदर रितीने मांडला आहे. श्रीदत्त-स्वरूप विषयक श्रीस्वामींचे विचार पाहताना त्याविषयी अधिक मोकळेपणाने लिहिता येईल. इथे एवढेच पुरे की उत्स्फूर्तपणे कृष्णालहरीची रचना झाली असली, तरी त्यापाठीमागील त्यांची एक विशिष्ट शास्त्रीय भूमिका होती हे लक्षात यावे.

**मंगलाचरणाचे दुसरे एक वैशिष्ट्य आहे. कृष्णा-दत्तात्रेय-विष्णु व आकाश (आकाशाभिमानिनी देवता) या चारांचे ध्यान या एका श्लोकात गुंफले आहे.**

चार बाहु, वर्षाकाळच्या मेघाप्रमाणे स्निग्ध श्यामल कान्ति, सुंदर मुखमण्डल (चंद्राप्रमाणे) नक्षत्रमालेप्रमाणे टपोऱ्या मोत्यांचा हार, झळाळणारे वस्त्र या सर्वच गोष्टी वर्णनात समान आहेत.

त्यावरून कृष्णामाईचे श्रीदत्तरूपाशी अथवा विष्णुरूपाशी किती साम्य आहे ते सहज लक्षात येते. हीच गोष्ट स्वामी पुढेही स्तोत्रात अनेक ठिकाणी लक्षात आणून देतात. **नाटकातील पुढील समग्र संविधानकाचे बीज जसे पहिल्या अंकात कुशल नाटककार पेरून ठेवतो व त्याचा पुढे हळूहळू विकास करण्यात आपले कौशल्य पणाला लावतो व तेच त्याचे नैपुण्य समीक्षकांना भारावून टाकते; तसे काहीसे इथे झाले आहे.**

हरिहराद्वैत संकल्पना कृष्णालहरीत स्वामिमहाराजांनी पुढे प्रतिपादन केली. त्याचे सूतोवाच पहिल्याच श्लोकात चार देवतांचे वर्णन गुंफून स्वामिमहाराजांनी करून ठेवले. **श्रीदत्त व विष्णू या सगुण विग्रहाबरोबर आकाशाचा निर्देश सुचवून निर्गुणतत्त्वाचेसुद्धा अवधान ठेवले आहे. परमात्म्याच्या व्यापकतेचे प्रत्यय घडविणारे या जगातील तत्त्व**

**म्हणजे आकाश. म्हणून भगवान शंकराचार्य म्हणतात, ''योग्यं मनो ब्रह्मदृष्टेराकाशश्च.''**

**ब्रह्म–भावना करण्यासाठी मन व आकाश फार योग्य होत.**

## *अमूर्त आकाशाचे मूर्तिकरण व नाते*

त्याच दृष्टीने स्वामिमहाराजांनी पहिल्या श्लोकात आकाशाची ही उपस्थिती लावून दाखविली. श्रीदत्तविष्णुप्रभृती **सगुण विग्रहाच्या बाबतीत चार बाहूंचा उल्लेख सुसंगत, पण आकाशाला चतुर्बाहु कसे करणार?** स्वामिमहाराज म्हणतात,

**राशित्रयात्मक एको बाहुर्भुजः। एवं द्वादशराशि कल्पिताश्चत्वारो बाहवो यस्मिन्सः। (कृष्णा. श्लोक १)**

मेष–वृषभ इ. बारा राशींचे चार भागात विभाजन करता येते. तेच चार बाहू होत. (भावार्थ)

सूर्याच्या गतीवरून बारा राशींची संकल्पना आली आहे. सूर्यगती म्हणजे काळाचा प्रवास. तो अवकाश–स्वरूप आकाशच नसेल तर कसा शक्य आहे? याप्रमाणे दिक् (अवकाश) व काल यांचा परस्परसंबंध आहे. त्यामुळेच कालगणनेचा भाग असलेल्या बारा राशी आकाशाचे चार बाहू म्हणून शोभू शकतात. अमूर्ताचे मूर्तिकरण व दोन अमूर्त वस्तूंचे श्रीस्वामिमहाराजांनी इथे दाखविलेले नाते आम्ही लक्षात ठेवायला हवे. अमूर्त आकाशाचे चार बाहू हे त्याचे एका बाजूने मूर्तिकरण व दुसऱ्या बाजूने कालांश असणाऱ्या राशींचे आकाशाशी नाते अशा दोन गोष्टी श्रीस्वामिमहाराजांनी इथे साधल्या आहेत. ज्ञानयुक्त प्रेम किंवा प्रेमयुक्त ज्ञान यांच्या परम किंवा चरम अवस्थेत सामान्य माणसांना अशक्य वाटणाऱ्या संकल्पनादेखील कशा साकारतात ते इथे पाहण्याजोगे आहे.

हा केवळ श्रीस्वामींचा कल्पना–विलास नव्हे. केवळ कल्पना–विलासासाठी रानोमाळ भटकण्याची व सारे जीवनच त्यासाठी समर्पित करण्याची आवश्यकता नसते. हा एक अनुभूतीचा प्रांत आहे. जिथे मूर्त–अमूर्तांच्या सीमा एकमेकांत सहज मिसळून जातात. त्यामुळे सगुणसाकार–चतुर्बाहूरूप मूर्तीरूपाने दर्शन होऊ शकते, हे श्रीस्वामींनी इथे दाखविले आहे.

श्रीकृष्णालहरीवर स्वामिमहाराजांची स्वकृत टीका नसती तर कदाचित हे सारेच विचार अप्रस्तुत व अगडबंब देखील वाटले असते. पण आता ती

सोय नाही हे बरे आहे. कृष्णालहरीतील प्रत्येक पदाचा वरील चार दैवतांकडे श्रीमहाराजांनी कसा अर्थ वळविला हे अभ्यासकांना मुळातून पाहता येईल. इथे तो विस्तार फार होईल.

## *विलोभनीय भावमधुर ध्रुपद योजना*

ध्रुपदयुक्त लहरी हेही कृष्णालहरीचे एक विलोभनीय वैशिष्ट्य. मंगलाचरणाचा पहिला श्लोक संपला की त्यानंतरच्या दुसऱ्या श्लोकापासून तर अठ्ठेचाळीसाव्या श्लोकापर्यंत.

**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते।**

हे पालुपद प्रत्येक श्लोकाला जोडले आहे. (हे श्रीकृष्णे, तुला वन्दन असो. श्रीदत्तात्रेयांना मान्य असणाऱ्या व तृष्णा शमविणाऱ्या श्रीकृष्णे तुझा जयजयकार!!)

कोणतीतरी मध्यवर्ती कल्पना महत्त्वाची वाटल्यावाचून असे पालुपद कोणीही जोडणार नाही. यातील श्रीकृष्णे व गुरुमते ही संबोधने पहिल्या श्लोकातील श्रीकृष्णेच्या ध्यानाची आठवण करून देतात. ते तिचे ध्यान कृष्ण (विष्णू) व दत्तात्रेय यांच्या ध्यानाहून वेगळे नाही. कृष्णा हे केवळ नावच नव्हे तर तिचे रूपदेखील विष्णूशी पूर्ण सारूप्य दर्शविते. अशा रीतीने नाम-रूपांनी कृष्णा विष्णूस्वरूपच आहे. दत्तात्रेयाशी तिचे नामसादृश्य नसेल पण रूपसादृश्य तर आहेच.

पहिल्या श्लोकातच श्रीमहाराजांनी ती संकल्पना स्पष्ट केली. तीच चतुर्भुज मूर्ती, तीच स्निग्धश्यामलता, तीच प्रसन्न मुखकांती व इतर आभरणे वगैरे सर्व तेच. समान साकारमूर्ती एवढेच एक कारण कृष्णामाईला श्रीदत्तांची मान्यता मिळण्यामागे आहे असे नव्हे. आणखी दुसरे कोणते आहे ते पुढे श्रीस्वामींनी १९/२० श्लोकात स्पष्ट केले आहे.

## *'श्रीकृष्णे' व 'गुरुमते' विशेषण वैशिष्ट्य*

हरि-हरांचे ऐक्य हे कृष्णामाईचे आवडते तत्त्व. श्रीदत्तांचेही तेच. त्यामुळेच गुरुदत्तात्रेयांची मान्यता श्रीकृष्णेला मिळाली. कारण कोणतेही असो, संपूर्ण कृष्णालहरी स्तोत्रभर 'श्रीकृष्णे' व 'गुरुमते' ही दोन विशेषणे ओठावर खेळत रहावी हे या पालुपद योजनेवरून उघडच दिसते. गुरू शब्दाचा केवळ दत्तात्रेय असाच अर्थ न घेता इतरही परममान्य महर्षी-संत

असाही अर्थ स्वामींनी सुचविला आहे. या पर्यायी अर्थाला धरूनच पुढे अठ्ठेचाळीसावा "नुतां तीर्थैः सर्वैः" हा श्लोक येतो. त्या श्लोकाबरोबरच पालुपद संपते ते लक्षात ठेवण्याजोगे आहे. 'गुरुमते' शब्दाचा आणखी एक अर्थ संभवतो. श्रीस्वामींना तोदेखील मान्य होईल असे वाटते.

**'गुरौ स्थिरा मतिः यस्याः सा तत्संबोधनम्।'**

(गुरुदत्तात्रेयाचे ठिकाणी जिची मती म्हणजे बुद्धी वा चित्त जडले आहे अशी.) मती शब्द मनन म्हणजे चित्तवृत्तीचे सातत्य दर्शवितो. पहिला अर्थ गुरूचे कृष्णामाईवर प्रेम असल्याचे दर्शवितो, तर दुसरा अर्थ कृष्णामाईचे श्रीदत्तरूपावरील प्रेम दर्शवितो. त्यावाचून एवढे दत्त-सारूप्य मिळालेच कसे असते? असे हे अन्योन्य प्रेम आहे. भक्ताचे भगवंतावर व भगवंताचे भक्तावर. कविकुलगुरु कालिदासाने सागरनदीच्या दृष्टांताच्या मिषाने एका ठिकाणी अन्योन्य प्रेमाची कल्पना दिली आहे.

**पिबत्यसौ पाययते च सिन्धूः ।**

(सागर नद्यांचे पाणी पितो व नद्यांनाही आपले पाणी पिववितो!!)

### *'शमिततृष्णे' विशेषणाचे वैशिष्ट्य*

गुरुमते इतकेच महत्त्वाचे दुसरे विशेषण आहे 'शमिततृष्णे'. जिने तृष्णा शमविली आहे अशी. तृष्णा म्हणजे तहान. शरीराची तहान म्हणजेच तहान नव्हे. मनालादेखील तहान असते. ती काही केल्या शमत नाही. गरुडपुराणाचे वचन उद्धृत करून श्रीमहाराज म्हणतात,

**"शंभर असणाऱ्याला हजार जवळ असावेसे वाटतात, हजाराचे लक्ष्य लक्षसंख्येवर असते. लक्षाधीशाला राज्य हवे. राज्य मिळाल्यानंतर चक्रवर्ती पदाची अभिलाषा सुटत नाही." असा हा तृष्णेचा सतत प्रवास सुरू असतो.**

**कृष्णालहरी टीका २**

तृष्णेची व्याख्या श्रीमहाराज अशी करतात,

**तृष्णा नामायताशा तस्या व्याप्तौ नरकगतिरेव।**

**कृष्णालहरी श्लोक २**

तृष्णा म्हणजे लांब आशा - तिची व्याप्ती वाढली की नरकगती ठेवलीच. (भावार्थ)

क्षितिज जसे पुढे पुढे सरकतच जाते तसे तृष्णेचे आहे. म्हणून तृष्णा उपशम आवश्यक आहे. याप्रमाणे अगदी सहेतुकपणे श्रीमहाराजांनी ध्रुवपदासारख्या या प्रत्येक श्लोकातील चतुर्थ चरणात शमिततृष्णे हे पद घातले आहे. कृष्णे-शमिततृष्णे अशी अनुप्रासाची केवळ रुणझुण वाढविण्यासाठी प्रस्तुत पद आले नाही. तोही त्याचा अवांतर लाभ होतो ही गोष्ट वेगळी. ही जाणीव करून देण्यासाठीच लहरीच्या उपांत्य श्लोकात श्रीमहाराज आठवण करून देतात.

**कृष्णां यो वृणुते भक्तः पदं यायान्निरन्तरम् ।**
**तृष्णां यो वृणुतेऽभक्तः खेदं यायान्निरन्तरम् ।।**

जो भक्त स्नानावगाहनादिप्रकारांनी श्रीकृष्णेची सेवाकरतो तो शाश्वत पदाचा अधिकारी होतो व जो अ-भक्त तृष्णेकडे वळतो त्याच्या वाट्याला निरंतर दुःख येते.

याप्रमाणे कृष्णा-तृष्णेचे हे आगळे-वेगळे द्वंद्व आहे. त्यातून एकाची, कृष्णेची निवड करायची आहे. इतर द्वंद्वात ज्याप्रमाणे दोहोंच्या अतीत व्हावे लागते तसे इथे करायचे नाही. उजेड व अंधार हेही द्वंद्वच. तिथे जसे प्रकाश निवडायचा असतो, तसे इथे कृष्णेला निवडायचे आहे. त्यामुळे हळूहळू तृष्णेचा उपशम होत जाणार, **तृष्णेच्या उपशमावरच निरंतर-पदाची प्राप्ती अवलंबून आहे.**

कृष्णा-तृष्णेची जोडी अगदी आरंभापासून तर शेवटपर्यंत दृष्टीपुढे ठेवून श्रीमहाराजांनी कृष्णालहरीतील भक्तिमय संविधानकालात एक प्रकारचा सुसूत्रपणा आणला आहे. कृष्णालहरीचे 'प्रबन्ध'स्वरूप केवळ समान वृत्ताच्या बांधणीमुळे आले नाही. त्यात आलेल्या विविध भावछटांना कृष्णा-तृष्णेच्या जोडसूत्रात गोवल्यामुळे त्या सर्वांना एक संविधानकाची प्रतिष्ठा वा प्रतिमा लाभली आहे; असे म्हणता येईल.

कीर्तनकार जसा उत्तररंगाच्या शेवटी पूर्वरंगातील मुख्य पद आळवून कथेची समाप्ती करतो, तसा इथे प्रकार आहे. उपक्रमोपसंहाराच्या या एकतेमुळे मध्यंतरी कितीही वेगवेगळे विषय आले तरी त्या सर्वांना एकात्मता लाभते.

### *कृष्णालहरीचे पठन हा यज्ञ आहे*

या ध्रुपदातील तसे सर्वांच्या परिचयाचे म्हणूनच थांबून लक्ष न द्यावेसे पद आहे 'नमः' हे अव्यय. पद नेहमीचे असले तरी नेहमीच्या दृष्टीने त्याकडे न बघतां

वेगळ्या तऱ्हेने त्याकडे बघावे, अशी श्रीमहाराजांची अपेक्षा आहे. ते म्हणतात,

> **नम इति नमस्काररूपो यज्ञोऽभिहित:। ''उक्तं च सूत्रकृताश्वलायनेन... यज्ञो वै नमः इति हि ब्राह्मणं भवतीति।''**

(नम: = नमस्कार असो, या पदाने नमस्काररूप यज्ञ इथे दर्शविला आहे. सूत्रकार आश्वलायन म्हणतात, नम: हा यज्ञ आहे याअर्थाचे 'ब्राह्मण' आहे - भावार्थ)

वरील अवतरणावरून कृष्णालहरीचे पठन हा यज्ञ होय हे श्रीस्वामींना म्हणायचे आहे. तो नम: औपचारिकतेचा भाग नव्हे किंवा भावनिक उमाळ्यातून उठलेला तो उद्‌गार नव्हे. सुजाणपणे आरंभिलेल्या यज्ञ-प्रक्रियेचे ते अंग होय.

लहरीच्या अवतरणिकेत श्रीस्वामींनी मुद्दाम उत्थाप्य शंका घेऊन भौम-यज्ञाची संकल्पना मांडली हे आपण पाहिले. या दुसऱ्या श्लोकात ते त्याच संकल्पनेला पुन: उजाळा देत आहेत आणि यज्ञदृष्टी मनातून जाऊ नये, यासाठी कृष्णालहरीच्या बेचाळीसाव्या श्लोकात रूढ यज्ञविधी व कृष्णास्नान याची ते तुलना करीत आहेत. तीर्थसेवन हा भौम-यज्ञ होय हे पहिल्या श्लोकाच्या अवतरणिकेच आले असले तरी रूढ यज्ञविधीचे आकर्षण सर्वांना असते. त्यातील प्रत्यवाय-वैगुण्य साधारण माणसाला दिसत नाही.

### *कृष्णास्नानाचे माहात्म्य*

श्रीमहाराजांनी रूढ यज्ञविधीची व कृष्णास्नानाची तुलना करून पहिल्यापेक्षा दुसऱ्याचे माहात्म्य अधिक आहे हे दर्शविले आहे.

श्रौतविधि त्रैवर्णिकासाठी असतो. त्याचे अधिकारी स्वर्ग-कामनेकडे वळलेले असतात. त्यांना देवता वगैरेचे ज्ञान असते हे खरे आहे, पण जीव ब्रह्मैक्याचा त्यांना प्रत्यय नसतो. ज्यांना असा प्रत्यय असतो त्यांना कर्माचा उपयोग नसतो. देहाहून आत्मा वेगळा आहे एवढेच मर्यादित ज्ञान त्यांना असते.

असे हे कर्माधिकृत जीव जेव्हा श्रौतविधी आचरण करतात तेव्हा त्यांना कितीतरी बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष द्यावे लागते.

दक्षिण, गार्हपत्य व आहवनीय अशा वेगवेगळ्या कुंडात असलेल्या तीन अग्नींत आहुती द्यावी लागते.

योग्य मुहूर्ताकडे दृष्टी असावी लागते.

आहुती देताना -

| | |
|---|---|
| ओ ३ श्रावय | अध्वर्यु चार वेळा |
| अस्तु श्री ३ षट् | आग्नीध्र चार वेळा |
| यज | अध्वर्यु चार वेळा |
| ये ३ यजामहे | होता पाच वेळा |
| वौ ३ षट् | होता दोन वेळा |

होता-अध्वर्यु-आग्नीध ही यज्ञात सहभाग घेणाऱ्या ब्राह्मणांची नावे आहेत. त्यांच्या त्यांच्या यज्ञातील अधिकारानुसार ही नावे दिली जातात. या सर्वांनी योग्य वेळी वरीलप्रमाणे शब्दोच्चार केल्यानंतर, यज्ञकुंडात आहुती पडते. केवढा हा खटाटोप! तो येथेच संपत नाही. शब्दोच्चार कोणत्या पट्टीत करायचा याचेही शास्त्र आहे. त्याविरुद्ध कर्म-अनुष्ठान झाले की त्यात वैगुण्य आलेच. यज्ञाचा अधिकारी होण्यासाठी विशिष्ट वर्गात जन्म, अव्यंग शरीर, पुत्रलाभ, तरुण वय इ. कित्येक अटी प्रथम पूर्ण कराव्या लागतात. म्हातारे-अपंग, पुत्रहीन अशा लोकांना यज्ञात अधिकार नसतो. हे सांगून श्रीमहाराज म्हणतात, या कोणत्याही अटी पूर्ण न करणाऱ्यांनादेखील कृष्णामाउली केवळ स्नानमात्राने स्वर्ग-प्राप्ती करून देते. तात्पर्य यज्ञापेक्षा स्नानाचे माहात्म्य अधिक आहे.

**आतो यज्ञापेक्षया तव स्नानमाहात्म्यमधिकमिति भाव: ।**

**कृष्णालहरी श्लोक ४२ टीका**

तीर्थसेवन हा भौम-यज्ञ आहे हे प्रथम सांगून आता रूढ यज्ञापेक्षा स्नान-माहात्म्य अधिक आहे असे ते म्हणतात. कृष्णालहरी लिहित असता यज्ञ-संकल्पना श्रीमहाराजांच्या मनात किती भरली होती ते यावरून दिसून येते.

### *'जय' शब्दाची मार्मिकता*

आता पालुपदातील उरलेला शब्द 'जय'. 'जि' धातूचा अर्थ सर्वात उत्कृष्ट असणे असा होतो. त्यादृष्टीने मनुष्याच्या जय-जय-काराला काही अर्थ आहे. परंतु परमात्मा तर सर्वदा उत्कृष्टच असतो. आणखी त्याचा उत्कर्ष काय होणार? श्रीमहाराजांनी त्याचे फार मार्मिक उत्तर दिले आहे.

**जय-निजभक्तोद्धरणरूपमुत्कर्षमाविष्कुरु ।**

"स्वत:च्या भक्तांचा उद्धार हाच उत्कर्ष. तो तू प्रगट कर."

परमात्मा धर्म, यश, श्री या सर्व गुणांनी परिपूर्ण असला, तरी नवनव्या

भक्तांच्या उद्धारामुळे परिपूर्ण असलेल्या कीर्ती गुणात भर पडल्यासारखी होत असते. सूर्यप्रकाश गुणाने परिपूर्ण आहे. त्याला आता नवीन काही सामग्री जोडून नवी दीप्ती जोडण्याची आवश्यकता नाही व शक्यता नाही. पण पृथ्वीचा नवा नवा पृष्ठभाग सूर्याच्या समोर आला की, त्याला उजाळा मिळतो व त्यामुळे सूर्याचे माहात्म्य नव्याने वाढल्यासारखा आपल्याला प्रत्यय येत जातो. हाच उत्कर्ष! परमात्म्याचे तसेच आहे. भक्तांची मालिका कधी संपायची नाही व परमात्म्याच्या कीर्तिगुणात नित्य नवी भर पडल्यावाचून रहायची नाही.

यापमाणे 'नम: श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते' या पालुपदात श्रीमहाराजांनी कृष्णालहरीत जे पुढे काही सांगायचे आहे त्याचा एक आराखडाच आपल्यापुढे ठेवला आहे. कृष्णालहरीची ही प्रस्तावना आहे व त्यातील ही 'चतु:सूत्री' सर्व प्रमेयांची गुरुकिल्ली आहे.

**१) प्रत्यवायाचा प्रतिबंध नसलेला तीर्थसेवन हा यज्ञच आहे. नमस्काररूप यज्ञ हा त्याचाच भाग.**
**२) हरिहराद्वैत-भक्तीचे प्रतिनिधित्व कृष्णामाई करते.**
**३) कृष्णामाई तृष्णा शमवून अत्युच्च पद मिळवून देते.**
**४) निर्गुण-सगुणाच्या सीमा फार जाड नाहीत.**

**पाठक्रम व अर्थक्रम**

अर्थानुरोधाने कृष्णालहरीचा काही क्रम आखता येतो का किंवा पाठक्रमानेच कृष्णालहरी वाचून भागेल, असा प्रश्न मनात येतो. पाठक्रम व अर्थक्रम ही मीमांसाशास्त्रातील संकल्पना आहे. ती स्पष्ट करण्यासाठी पुढील उदाहरण देण्यात येत असते.

**अग्निहोत्रं जुहोति । यवागूं पचति ।**

वरील वाक्यात यवागूं पचति - यवागू (विशिष्ट भात) शिजवितो हे वाक्य नंतर आले आहे खरे पण ते अगोदर घ्यायचे आहे. कारण भात अगोदर शिजविला नाही तर आहुति कशाची देणार? स्वयंपाक कर. पाणी आण हे वाक्य पाणी आण या वाक्यालाच पहिला क्रम अभिप्रेत धरते. प्रत्यक्षात पाणी आण हे वाक्य मागाहून उच्चारले गेले तरी. कारण पाणी नसेल तर स्वयंपाक करणार कसा?

पाठक्रम व अर्थक्रम यांचे हे असे बलाबल श्रीस्वामिमहाराजांनी आपल्या ग्रंथात एके ठिकाणी मान्य केले आहे. त्याला धरून आपण

कृष्णालहरीचासुद्धा आपल्या अभ्यासाच्या सोयीसाठी वेगळा अर्थक्रम ठरवू शकतो. त्यामुळे कृष्णालहरी स्तोत्रावरील क्रम अमान्य करण्याचे किंवा त्याचे महत्त्व कमी लेखण्याचे कारण नाही. कृष्णालहरीचा जो पाठ करायचा तो लहरीच्या क्रमानेच करायचा. परंतु अर्थाचे मनन करायचे किंवा त्याचे महत्त्व कमी लेखण्याचे कारण नाही. कृष्णालहरीचा जो पाठ करायचा तो लहरीच्या क्रमानेच करायचा. परंतु अर्थाचे मनन करायचे तर मात्र आपल्या विशिष्ट क्रमाने करायला काही हरकत नाही. या संबंधात आचार्यांनी वेगळ्या संदर्भात मुंग्यांचे दिलेले उदाहरण चपखल वाटते. मुंग्यांना क्रमानेच चालण्याची सवय असते. आपले मनदेखील तसेच आहे. त्याला कोणतातरी क्रम हवा. त्यादृष्टीने कृष्णालहरीचा पहिला मंगलाचरणाचा श्लोक सोडला तर उरलेले पुढील श्लोक अर्थानुरोधाने वाचता येतील.

**१) कृष्णेच्या प्रवाहाची भौगोलिक माहिती**

मुखं ते सह्याधः

**२) कृष्णेचे इतर नद्यांशी (भगिनी) संबंधाचे श्लोक –**

| | |
|---|---|
| महाभङ्गा | १० |
| गते जीवे | ११ |
| महाजम्बुद्वीपे | १२ |
| इहापि त्वं | ३८ |
| स्वयंभूब्रह्मार्यं | ४१ |
| नुतां तीर्थैः | ४८ |
| काचित् क्षालयति | ५० |

**३) कृष्णेचे व तिच्या तीरावरील तीर्थांचे माहात्म्य –**

| | | |
|---|---|---|
| पितृनुद्दिश्यैको | १३ | |
| महापाप्याकल्पम् | १४ | प्रायश्चित्तरूप |
| सुतं लेभे | १५ | |
| अहो माहात्म्यं ते | १६ | |
| नरः क्रूरो | २४ | |
| त्रिपातपघ्नीतिघ्नी | ३० | |
| द्विजाः काले काले | ४५ | |

**४) कृष्णेपुढे आत्मनिवेदन – अपराधांची मोकळी कबुली – अपराधाचे तत्त्वज्ञान**

| | |
|---|---|
| कुतस्त्वय्येतावद् | ३५ |
| अयं सामान्यो | ३२ |
| अवज्ञातं तीर्थं | २६ |
| क्षमः कस्याप्यग्रे | २७ |
| यदास्याविर्भूता | ३१ |
| त्वया प्रत्याख्यातो | २८ |

**५) अपराध निराकरणासाठी प्रार्थना व प्रेमपूर्वक युक्तिवाद**

| | |
|---|---|
| महापापं तापं | २९ |
| त्रितापघ्नी | ३० |
| ममोद्धारेणाद्य | ३३ |
| क्व शक्तिस्तेऽनन्ते | ४४ |
| कृता साहित्यज्ञैरपि | ४ |

**६) कृष्णेचे ईश्वरीरूप व सामर्थ्य**

| | |
|---|---|
| अपि श्रीकृष्णे | २ |
| अलक्ष्यं ते रूपं | ३ |
| अतः प्रादुर्भूत्वा | ३४ |
| समं साक्षात् | ३६ |
| स्वभूरूपेण त्वं | ३७ |
| तमोनुत्ते भासा | ३९ |
| प्रभावस्तेऽपीदृग् | ४३ |

**७) कृष्णेचे हरिहरात्मकत्व**

| | |
|---|---|
| रसज्ञा मे दत्ता | ५ |
| प्रकृत्यैक्यं भिन्नं | २० |
| गणी वेणी | ४० |
| स्वभूरूपेण | ३७ |
| मूर्ता हरितनुर् | ९ |
| श्रीहरितनुर | १० |
| हरीशरूपिणी | ४९ |

**८) कृष्णेचा विशेषणात्मक परिचय – श्रीकृष्णे**

(१) गतिदे ८, ४७ (२) जननि ११, १५, ३२ (३) मातः २५ (४) अम्ब

२४ (५) श्रुतमते २४ (६) वरदे (७) त्रिविधमलदे १२ (८) परदे १२ (९) द्रुतरये १३, अग्र्ये १३, मुनिमते १७ (१०) योगिध्येये २१ (११) निगम-गणगेये २१ (१२) अब्धि-निलये २१ (१३) अनपाये २१ (१४) कलुष-विलये २१ (१५) सह्यतनये २१, ईशे २३ (१६) वरोदे २४, सुगते २५ शोभनज्ञाने (१७) सरिते २६, ३१ (१८) हिते २७ (१९) अ-भवे २७, २८ (२०) महिते २८ (२१) भगनुते २९, अंहोपाये २९ (२२) ईश्वरी ३२, ४९ (२३) असिते ३३, ४९, उशति (कमनिये) ३४ (२४) विमले ३३, अमले ४८ (२५) भगवति ३६ (२६) अखिलहृदयस्थे ३६ (२७) मङ्गलगते ३७, आभूः ३८, स्वतन्त्रे ३८, सन्मन्त्रे ३८ (२८) मनोल्हादे ४३, अनन्ते ४४, स्वयंज्योतिः ३९, सति ४२ (२९) प्रवरसरित् ४८ (३) धरेन्द्रतनये ४९ (३१) आधिमथने ४८ (३२) अभये ४९ (३३) अनुकम्पोदये ४९ (३४) हरीशरूपिणि ४९ (३५) नदि ४९ (३६) मणिद्युते ४९ (३७) स्वये ४९ (३८) अक्षये ४९ (३९) अम्मये ४० (४०) देवेड्ये ५१ (४१) वेदवेद्ये ५१ (४२) कृपाकृष्टकृष्णे ५१ (४३) सत्यसन्धे ५२.

श्रीकृष्णे शमिततृष्णे गुरुमते २ ते ४८

श्रीकृष्णे २, ८, १७
(अपि श्रीकृष्णे) (मनो मे श्रीकृष्णे) (अये श्रीकृष्णे)

| | | |
|---|---|---|
| श्रीकृष्णे | १८ | नरः श्रीकृष्णे |
| कृष्णे | १९ | भवद्दृष्टिः कृष्णे |
| कृष्णे | ४५ | स कृष्णे त्वत्स्नानम् |
| कृष्णे | ५० | व्यक्तं ते नच नाम रूपमपि सत्कृष्णे |

## ९) कृष्णेची प्रथमान्त विशेषणे

चतुर्बाहुः १ पूर्ण श्लोक

हरीशात्मा ४, कृष्णा ५, दत्तदयिता ५

मलौघघ्नी ८, ईतिघ्नी ८, हरितनुः ९, श्रीहरितनुः १०, बहुमान्याम् ११, त्रितापघ्नी ३०, ईतिघ्नी ३०, पतितपावनी ३०, अघहरा ३०, त्रितापघ्नी ३०, भीघ्नी ३०, विविधवरदात्री ३१, ऋणहरा ३२

पापि-प्रचय-मल-संक्षालन पटूदकात्मा ३८

**१०) पूर्वसुकृत व कृष्णाप्रेम यांचा संबंध**

पुरेष्टं १९

अपि स्नानं २५

**११) कृष्णेने पावन झालेले जीव**

त्वदीये सत्तोये २३

गत: क्रूरो २४

**१२) कृष्णेजवळ मागणे**

| | |
|---|---|
| परिक्रान्ता | २२ |
| न च प्राज्यं | ६ |
| न भोगं नो योगं | ७ |
| अये योगिध्येये | २१ |
| क्षम: कस्याप्यग्रे | २७ |
| ममोद्धारेणाद्य | ३३ |
| अत: प्रादुर्भूत्वा | ३४ |
| कुसुङ्गान्यर्थापहरण | ४६ |
| त्वदीयात्मस्पृष्ट: | ४७ |
| नुतां तीर्थै: | ४८ |
| धरेन्द्रतनये | ४९ |
| देवेड्ये | ५१ |

***कृष्णाप्रवाहाची माहिती***

कृष्णेचे बाह्यरूप व आंतररूप यांचा वेगवेगळा विचार श्रीस्वामींनी सुचविला. मंगलाचरणाच्या पहिल्या श्लोकातच कृष्णामाईचे पारमार्थिक रूप श्रीस्वामींनी वर्णन केले आहे. साक्षात्कार व्हायचा तो त्या रूपाचा. ''अत: प्रादुर्भूत्वा'' (श्लोक ३४) या श्लोकात त्याच चतुर्भुजरूपाने प्रगट होण्याची कृष्णामाईला श्रीमहाराज विनंती करीत आहेत. परंतु त्या रूपाबरोबर हे दिसणारे भौगोलिक रूपदेखील महत्त्वाचे आहे. एकदमच त्या चतुर्भुज रूपाचा साक्षात्कार होणार कसा? साक्षात्कार झाला तरी भक्ता-अभक्तांना अवगाहनाचा आनंद देणारा कृष्णाप्रवाह कमी महत्त्वाचा ठरत नाही. म्हणून त्या रूपाचे श्रीमहाराज वर्णन करीत आहेत.

मुख-हृदय-नाभि व पावले यांचाच प्रातिनिधिक स्वरूपात श्रीमहाराज उल्लेख करतात. चरणापासून डोक्यापर्यंत देवतांचे वर्णन करण्याची प्रथा आहे. श्रीस्वामींनी मात्र इथे मुखापासून आरंभ केला. सागराला नदी मिळते ती मुखांनी अशी कल्पना रूढ असली तरी श्रीस्वामींनी ती बदलून टाकली. उगमस्थळ हे मुखस्थळ ही श्रीस्वामींची धारणा. मुख हा उत्तमांगाचा भाग. ते उंच स्थळीच असायला हवे. समुद्राला मिळालेल्या सखल प्रदेशात नदीचे मुख कसे शोधता येईल?

कृष्णेचे मुख सह्यपर्वताच्या पायथ्याशी आहे. पायथ्याशी असा साधारण उल्लेख मूळ श्लोकात असला तरी वाई हे स्थळ श्रीस्वामींच्या पुढे कृष्णेचे मुख म्हणून आहे हे टीकेवरून स्पष्ट होते. या विषयात त्यांनी दिलेली उपपत्ती महत्त्वाची.

ते म्हणतात,

**हे श्रीकृष्णे, सह्यस्याध: प्रदेशे तव मुखं वाई इति प्रसिद्धक्षेत्रे ब्राह्मण-बाहुल्यान्मुखत्त्वेनोपचर्यते । ब्राह्मणोऽस्य मुखमासीत् इति श्रुत्या मुखत्वेन ब्राह्मण एवोक्तस्ततो ब्राह्मणबाहुल्यदेश एव तव मुखत्वेनोपचर्यते ।**

**श्लोक १७ टीका**

हे श्रीकृष्णे, सह्यपर्वताच्या पायथ्याशी असलेले वाई क्षेत्र, त्यात ब्राह्मण अधिक प्रमाणात राहत असल्याने, मुख म्हणून **(लक्षणावृत्तीने)** मानले आहे. पुरुष सूक्तातील नारायण-पुरुषाच्या वर्णनात ब्राह्मणवर्णालाच मुख-स्थानी दर्शविले आहे. त्यामुळे ब्राह्मणवर्ग अधिक असलेला भगच तुझे मुख आहे असे **(गौणवृत्तीने)** मानावे लागते.

या अवतरणावरून केवळ भौगोलिकवर्णनावर इथे भर नाही हे उघड आहे. भौगोलिक वर्णनात फार तर पूर्व-मध्य-उत्तर प्रवाह हे शब्द चपखल बसतील. मुख-हृदय-नाभींना त्यात कुठे स्थान असणार? **भौगोलिक प्रवाहाकडे सांस्कृतिक दृष्टीने बघण्याची इथे सूचना आहे.**

वाई-क्षेत्राला कृष्णेचे मुख म्हणून लाभलेली प्रतिष्ठा तेथिल वेदाध्यायी ब्राह्मणांमुळे आहे, ती केवळ जाती-ब्राह्मणामुळे नाही हेही श्रीस्वामींनी तसे स्पष्ट म्हटले नसले तरी संदर्भावरून स्पष्ट दिसते. यादृष्टीने वाई क्षेत्रात निवास करणाऱ्या ब्राह्मणांवर विशेष दायित्व श्रीमहाराजांनी सोपविले आहे. याचा दुसरा अर्थ असाही निघतो की जिथे कुठे - त्यातही कृष्णातीरावर

– ब्राह्मणसमाज वेदरक्षणाचे अन तप:पालनाचे आपले व्रत चालवील तिथे ती कृष्णेचीच मुख-विभूती म्हणून अनायासे प्रतिष्ठा पावेल. अशा ब्राह्मणा-अभावी वाई क्षेत्राचे भौगोलिक स्थान तर हिरावून घेता येणार नाही. सांस्कृतिक दृष्टीने मात्र काहीतरी उणेपणा येणार.

**नृसिंहवाडी हे कृष्णेचे सदय-हृदय होय.** कारण इथे पादुकारूपधारी भगवान दत्तात्रेय निवास करीत असतात. वाई क्षेत्रासारखी कोणतीही बाह्यसामग्री – वेदाध्ययन, शील, ब्राह्मणाचे सान्निध्य यासारखी – अनुकूल प्रतिकूल असण्याचा इथे प्रश्न नाही हा मोठाच भरवसा मानायला हवा. याप्रमाणे कृष्णेचे निरपेक्ष दयाळू हृदय वाडीक्षेत्रात नित्य बघायला मिळायचे आहे.

**कुरुगड्डी हे नाभिस्थळ.** कारण तो कृष्णेचा मध्यदेश होय. कुरुगड्डीचे नाभिस्थळ व त्याच्याच पूर्व भागातील चरण ही दोन्ही स्थळे आंध्र प्रदेशात आहेत. पूर्व आंध्र प्रदेशातील प्रवाहाला चरुणयुगल म्हणण्याचे कारण इथे कृष्णा दोन मुखांनी सागराला मिळते. म्हणून त्यांना चरणयुगलाची उपमा म्हणा किंवा धारणा म्हणा शोभून दिसते. अर्थात् त्या प्रवाहांना मुख न म्हणता चरण-स्थानी मानायचे आहे. रूढ परिभाषेनुसार समुद्राजवळ मिळणाऱ्या नदी प्रवाहाला मुख म्हणण्याची प्रथा असली तरी ध्यानाच्या दृष्टीने ती उपयुक्त नसावी असे श्रीस्वामींच्या टीका-विवरणावरून म्हणावेसे वाटते. ते म्हणतात,

**उभयतः प्रवाहतः समुद्रं प्रविष्टत्वादुभयप्रवाहौ पादत्वेनोपचर्येते। महाबलजटोद्भूता कृष्णा ह्युभयतोमुखा इति स्मरणात्। .... इदं प्रसिद्धं तव रूपम् इह भूमण्डले प्रथितं विख्यातमस्ति तदेव ध्यानमङ्गलं मच्चित्तेऽस्त्विति भावः।**

कृष्णेने दोन प्रवाहाच्या द्वारा समुद्रात प्रवेश केला म्हणून या दोन प्रवाहांना पाय असे लाक्षणिकरित्या म्हटले. कृष्णा महाबळेश्वराच्या जटेतून निर्माण झाली असून तिला दोन मुखे आहेत असे पुराणात वर्णन आहे. हे प्रसिद्ध असणारे रूप जगात ख्याती पावले आहे. तेच ध्यानमङ्गल असणारे रूप माझ्या मनात राहो!

**'कृष्णा उभयतो-मुखा'** असे पुराणातही वर्णन असले तरी श्रीमहाराज मात्र त्या प्रवाहांना पायाच्या स्थानी मानतात. समुद्रात प्रवेश करण्याचे साधन म्हणून प्रवाहांना चरण म्हणण्याचे शोभून दिसते. परंतु त्यापेक्षाही महत्त्वाचा प्रश्न ध्यानाचा आहे. पुढे चौतिसाव्या श्लोकात ज्या कृष्णेच्या चतुर्भुजरूपाला "निज-रूप" म्हणून श्रीमहाराज संबोधतात, त्याचे ध्यान समुद्राजवळील

नदीच्या प्रदेशाला मुख मानून कदापि समर्पक होणार नाही. हे लक्षात घेऊनच श्रीस्वामींनी त्या उत्तर प्रवाहाला चरणाच्या स्थानी मानले. उत्तमांग उंच स्थळी, तर पावले सखलस्थळी ही अर्थ-व्यवस्था त्यादृष्टीने सुसंगत मानावी लागते. याप्रमाणे या श्लोकात श्रीमहाराजांनी कृष्णेचा लोक-प्रसिद्ध प्रवाह भौगोलिक व सांस्कृतिक या दोन्ही अंगांनी वर्णन केला आहे.

सुरुवातीच्या व पुढे चौतिसाव्या श्लोकात कृष्णेच्या चतुर्भुजमूर्तीचा श्रीस्वामींनी उल्लेख केला असला तरी इथे मात्र मुख-हृदय-नाभि-चरण या चार घटकांचाच उल्लेख येतो. शरीरातील षट्चक्रांचा तो प्रातिनिधिक उल्लेख असेल काय हा एक विचारणीय प्रश्न आहे. **श्रीस्वामींनी मात्र त्यासंबंधी टीकेत कोणताही संकेत देऊन ठेवला नसल्याने आपण स्वस्थ राहणे योग्य ठरेल.**

## कृष्णामाईचे इतर नद्यांशी नाते

कृष्णेचे रूप कोणत्याही इतर वस्तुरूपाप्रमाणे किंवा व्यक्ती स्वरूपाप्रमाणे मर्यादित स्वरूपाचे किंवा देश-मर्यादित दिसत असले तरी ते तसे नाही. याचे कारण भारतातील इतर नदी प्रवाहांशी कृष्णेचे जिव्हाळ्याचे आंतरिक संबंध आहेत. त्यांच्या परस्पर भेटी-गाठी होत असतात. त्यामुळे विशिष्ट प्रदेशाशी निगडित असणारा धावता प्रवाह एवढेच कृष्णेचे मर्यादित रूप मानणे योग्य नव्हे.

**विशेषतः कृष्णा व गङ्गा यांचे संबंध आगळेवेगळे आहेत.** कन्या राशीला गुरू आला की गङ्गा - नव्हे कृष्णामाईची बहीण - कृष्णेच्या भेटीला येते आणि वर्षभर रहाते. हा तिचा नियम ती कधी मोडत नाही. त्याचा जागता पुरावा म्हणजे राजापूरची गङ्गा. कृष्णेची भेट हे वरचे निमित्त. खरे निमित्त पापी लोकांची स्वतः धुतलेली व साचून राहिलेली पापे धुण्यासाठी गङ्गा यावेळी येते व वर्षभर अन्यत्र कुठेही जात नाही. (श्लोक ११)

**बारा वर्षांतून एकदा असा प्रसंग येतो. यावळी गङ्गानदीच नव्हे, तर जंबुद्वीपातील इतर साडेतीन कोटी तीर्थे कृष्णेकडे येतात. कृष्णा मात्र कोणाकडे जात नाही. त्वं तु न क्वापि गच्छसीति सूचितम् । श्लोक १२ टीका.**

**या साऱ्या नद्या म्हणजे शापभ्रष्ट देव होत.** एकदा ब्रह्मदेवाने मुहूर्त टळू नये यासाठी ज्येष्ठ पत्नी जवळ नसताना देखील कनिष्ठ पत्नीला घेऊन यज्ञारंभ केला. मागाहून ज्येष्ठ पत्नी आली. तिला ते सहन झाले नाही. तिने उपस्थित असलेल्या देवांना, त्यांचा कटात भाग आहे असे समजून, शाप दिला - तुम्ही जडरूप व्हाल! ते हे देव होत. ते ककुद्मती, वेणी इत्यादि रूपांनी

इथे आले आहेत कृष्णेत लीन होण्यासाठी. श्रीस्वामींनी निष्कर्ष काढला, की या अवतारात जर हे सारे देव - ब्रह्मरुद्रादि - तुझ्या रूपात लीन होतात, तर प्रलयकाली ते तुझ्या कुशीत प्रवेश करतात हे काय वेगळे सांगायला हवे?

**यदि तवास्मिन्नवतारेऽपि त्वद्रूपे ककुद्मती - वेण्याद्यात्मना ब्रह्मरुद्रादयो देवा अपि त्वयि लयं गतास्तर्हि किमु वक्तव्यं लयान्ते ते कुक्षिं विशन्ति सकलमिति । एतत्सर्वं पुराणे द्रष्टव्यम् । श्लोक ३८**

या नद्यांत गङ्गेच्या खालोखाल किंवा गङ्गेच्या बरोबरीने दोन नद्यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. गङ्गा कृष्णेला भेटते ती दिव्यरूपाने. ककुद्मती व वेणी यांचे तसे नाही. त्या प्रत्यक्षच कृष्णेला मिळतात. त्यात ककुद्मती म्हणजे ब्रह्मदेवाचा अवतार. ब्रह्मदेव म्हणजे विष्णूचा-कृष्णेचा पुत्र. अर्थात् **कऱ्हाडात कृष्णा-कोयनेचा होणारा संगम म्हणजे पिता-पुत्राची प्रेमाची भेट होय.** श्रीमहाराजांच्या शब्दात बोलायचे झाल्यास,

> **अतोऽयं पितृ-पुत्र सङ्गमः वेणी-कृष्णयोस्तुल्यत्वात् प्रीतिसंगमः । श्लोक ४१**

कऱ्हाडातील कृष्णा-कोयना संगम नृसिंहवाडीतील पंचगंगा-कृष्णा संगमासारखा श्रीस्वामींना वाटतो हे वरील अवतरणावरून स्पष्ट आहे. **कृष्णा-वेणी ही हरिहराची बंधुभेट तर कोयना-कृष्णेचा संगम म्हणजे पिता-पुत्राची भेट होय.** दुसऱ्या दृष्टीने पाहिले तर **कोयना-पंचगंगा-कृष्णा** यांचे हे मीलन म्हणजे **ब्रह्मा-विष्णू-महेशांचे** मीलन आहे. हे त्रैमूर्तींचे मीलन आहे म्हणून त्याचे विशेष महत्त्व. दृश्यरूपाने किंवा अदृश्यरूपाने होणाऱ्या या भेटी-गाठीबरोबरच कृष्णा व इतर तीर्थांचा सेव्य-सेवक-भाव श्रीस्वामींनी मुद्दाम आठवून दिला आहे. सेव्य किंवा आराध्य कृष्णा तर सेवक किंवा आराधक आहेत सारी तीर्थे. साऱ्या तीर्थांनी गायिलेल्या कृष्णेच्या या बंदिगीतात सारे देव व मुनी यांनादेखील सहभाग घ्यावासा वाटतो. त्यासाठी ते तिच्या तटावर मुद्दाम प्रेमाने येऊन राहतात. (श्लोक ४८)

**सर्व नद्यांत कृष्णेला असामान्य स्थान मिळावे व इतर नद्यांनी तिच्यापुढे हात जोडून उभे रहावे हा केवळ योगायोग नव्हे. कृष्णेच्या स्वतःसिद्ध गुणामुळे तिला मिळालेला हा बहुमान आहे.** कृष्णा हे नाव व त्या नावाला साजेसे मेघःश्यामल रूप कृष्णामाईशी सदैव निगडित आहेत. नाम व रूप या दोहोंच्यामाध्यमातून श्रीकृष्णाशी सदैव एकरूपता साधली ती कृष्णेने. वस्तूला वेगळेपणा येतो तो नामाने किंवा रूपाने. कृष्णेने आपले

वेगळेपण कुठे येऊच दिले नाही.

तत्त्वत: परमेश्वराशी एकभाव जगातील प्रत्येक वस्तूचाच असतो. त्या तात्त्विक एकभावाने कृष्णा परमेश्वराशी एकरूप झाली नाही. त्यात मोठे नवल ते काय राहणार होते? तिने जो अग्रमान मिळविला तो नाम-रूपेदेखील परमेश्वराचीच लेवून.

तसा एक-भाव इतरांना साधला नाही. त्यात यमुना एखाद्या परिचारिणीसारखी कृष्णाचे पाय धूत राहिली. गंङ्गा शिवाची द्वितीय पत्नी होऊन त्याच्या डोक्यावर जाऊन बसली. नर्मदा शंकराच्या घामापासून प्रगट झाली. गोदा शिवाच्या जटेतून बाहेर पडली. मंदाकिनी शंकराच्या जटेत अडकून पडली. गङ्गेने शंतनूशी विवाह केला. भीमसेनाने नर्मदेशी संसार थाटला. गङ्गा, सरस्वती परस्परात भांडून विष्णुलोक सोडून इथे येऊन पडल्या. भोगावतीला तर पाताळात जावे लागले. इतर साऱ्यांच्या जीवनातील नोंदी निर्मळ नाहीत. कृष्णा मात्र त्याला अपवाद. स्वरूपत: नामत: व रूपत: ती कृष्णापासून जराही ढळली नाही. तिला जर अशी वरिष्ठता लाभली तर ते स्वाभाविकच नव्हे काय? (श्लोक ५०)

**या सर्व नद्यांत गङ्गेचा बोलबाला जरा जास्त आहे हे खरे आहे. ती तशी मोठीच आहे. तिचे मोठमोठे तरङ्ग समुद्राची आठवण करून देतात आणि साहजिकच तार्किक बुद्धीला असे वाटायला लागते की पातकांचा विनाश करण्यात तीच अग्रगण्य असावी. पण या तार्किक बुद्धीला तार्किक बुद्धीनेच उत्तर द्यावेसे वाटते. मोठ्या प्रवाहामुळे ती मोठी ठरत असेल, तर मग विष्णूच्या चरणापासून तिचा जन्म झाला असल्याने साक्षात् विष्णुरूप असणाऱ्या कृष्णेच्या मानाने ती धाकटी ठरणार नाही काय? श्रीस्वामींनी अनुमानघटित भाषेत हे युक्तिवाद प्रतियुक्तिवाद मांडले आहेत, हे पाहून मौज वाटते. श्रद्धेच्याही विषयात विचाराची शास्त्रीय चौकट सोडण्याचे कारण नाही हेच श्रीस्वामींनी दाखवून दिले आहे.**

**पूर्वपक्ष :** १) विमता गङ्गा सर्वाभ्यो नदीभ्यो महती। (प्रतिज्ञा)

२) महाभङ्गात्वात् दुरितभङ्गत्वात्। (हेतु)

३) आब्धिवत्। (दृष्टान्त)

**उत्तरपक्ष – प्रयोग**

१) विनता गङ्गा कृष्णाया अधिका न भवति । (प्रतिज्ञा)

२) हरिपादोत्पन्नत्वात् । (हेतु)

३) व्यतिरेके साक्षाद्धरितनुकृष्णावत् । (दृष्टान्त) (श्लोक ९)

**या अनुमान वाक्याच्या अधिक स्पष्टीकरणाची इथे गरज वाटत नाही. श्रद्धेय विषय मुळात शास्त्रीयच असतो व त्यामुळेच तो त्या परिभाषेतही मांडून दाखविता येतो, ही स्वामिमहाराजांची भूमिकाच प्रामुख्याने इथे लक्षात ठेवायची आहे.**

कृष्णा प्रत्यक्ष कृष्णरूपच आहे व तशी तिची बरोबरी कोणालाच करता येणार नाही, अर्थात गङ्गादेखील त्यात आली हे पुन: जोरकसपणे श्रीमहाराज प्रतिपादन करतात.

श्रीवाल्मिकीने आपल्या एका स्तोत्रात गङ्गेचा फार गौरव केला आहे. गङ्गा श्रीविष्णूच्या चरणकमलापासून निघाली असल्याने ती नव्या मृणाल-तन्तूच्या माळेसारखी शोभून दिसते. श्रीशंकराच्या डोक्यावर शोभणारी ती, मालतीची माळच होय आणि सायुज्यमुक्तीचा लाभ तिच्यामुळे सहज होत असल्याने मोक्ष-लक्ष्मीची ती पताकाच होय असा वाल्मिकींचा आशय.

**श्रीमहाराज म्हणतात, हे सारे खरे! पण ती विष्णुपदापासून निर्माण झाली आणि आमची कृष्णा प्रत्यक्ष विष्णूस्वरूपच आहे, हे कसे अमान्य करता येईल. (श्लोक १०)**

**शेवटी कृष्णा ती कृष्णाच राहणार. श्रीमहाराजांचे हे सारे युक्तिवाद प्रेमापोटी आहेत हे लक्षात आणले की त्या युक्तिवादात बोचरेपणा उरत नाही. गङ्गेचाही महिमा तेवढ्याच उत्कटतेने श्रीस्वामींनी गायिला आहे. बहिणी बहिणी माहेरी आल्यावर आवाज चढवून चाललेला हा त्यांचा प्रेमाचा संवाद आहे. एवढ्या निरामय भूमिकेतून या सर्व युक्तिवादाकडे आम्हाला पाहायचे आहे. यात विजय-पराभव कोण्या एकट्याचा नाही. सारेच विजयी!**

### *कृष्णातीरावरील तीर्थांचे माहात्म्य*

**कृष्णेची थोरवी तिच्या पाप-विनाशक सामर्थ्यात आहे. तिच्या काठावरील तीर्थे, तिचे नाव व तिच्या सान्निध्यात तिच्या साक्षीने केलेले कर्माचरण या सर्वांचेच विलक्षण सामर्थ्य आहे. कर्माचरण शब्दाचा प्रामुख्याने इथे जो अर्थ घ्यायचा तो प्रायश्चित्तरूप कर्माचरणाचा. इहजन्मी वा पूर्वजन्मी अनेक दुष्कर्मे हातून घडली असतात. त्यांचा**

**निचरा करून टाकणाऱ्या प्रयोगशाळा म्हणजे कृष्णेसारखे प्रवाह.** मनात आणील त्याला त्या उघड्या प्रयोगशाळांचा उपयोग करून आपलीच नव्हे तर आपल्या पूर्वजांचीदेखील पारलौकिक उन्नती करून घेता येते.

पितरांना उद्देशून कृष्णेच्या तीरावर जो शास्त्राने सांगितलेल्या दिशेने श्राद्धविधी पार पाडतो तो त्या श्राद्धविधीनेदेखील (श्राद्धादपि) पुनरावृत्ती नसलेल्या लोकांप्रत आपल्या पूर्वजांना नेऊ शकतो. इतरत्र केलेल्या श्राद्धविधीचे असे अपूर्व असेल किंवा काय हे सांगता येत नाही. इथे मात्र ते आहे हे श्राद्धाद् अपि = श्राद्धापासूनदेखील - या पदाने स्पष्ट केले आहे. **पूर्वज = पितर या शब्दाने महालय श्राद्धात ज्यांचा समावेश होतो त्या सर्वांचा समावेश होतो असे स्वकृत टीकेत श्रीस्वामींनी दर्शविले आहे.**

**ताताम्बात्रितयं सपत्नजननी मातामहादित्रयं ।**
**सस्त्रिस्त्रीतनयादि तातजननी स्वभ्रातरः सस्त्रियः ।**
**ताताम्बात्मभगिन्यपत्य धवयुग्जाया पिता सद्गुरुः ।**
**शिष्याप्ताः पितरो महालय गयातीर्थे तर्पणे ।। टीका १३**

**एकाच्या हातून घडलेल्या शास्त्रीय विधीने किती जणांचा सद्गति-लाभ होतो हे अभ्यासण्यालायक आहे.** या श्लोकात (१३) गतिं गान्ति = पूर्वज सद्गतीला प्राप्त होतात हे एक वाक्य असून पुनरावृत्ती रहितां गतिं यान्ति = पुनरावृत्ती = जन्ममृत्यूचा फेरा नसलेल्या पितरांच्या गतीला जातात असे दुसरे वाक्य आहे. एकूण साधारण सद्गति हे फळ तर पुनरावृत्ति-रहित गति असे दुसरे फळ अभिप्रेत आहे. पुनरावृत्तिरहित 'गति' या शब्दाचा अर्थ करतांना श्रीमहाराज म्हणतात,

**पुनरावृत्ति रहितां पितृणां चिरलोकलोकानां गतिं च यान्ति ।**

पुनरावृत्तिरहित असणारे हे पितृलोक कोणते हा प्रश्न महत्त्वाचा आहे. उपनिषदामधून **पितृयाण मार्ग व देवयान मार्ग असे दोन मार्ग सांगितले असतात. त्यात पितृयाण मार्ग पुनरावृत्तिसहित तर देवयान मार्ग मात्र पुनरावृत्तिरहित अर्थात् क्रममुक्ती देणारा समजला जातो. इथे मात्र पितृ लोकांनादेखील पुनरावृत्तिरहित असे संबोधिले आहे.** त्यावर अधिकारी लोकांनी अधिक विचार करायला हवा. तूर्त असे वाटते की उपनिषदातील देवयान-पितृयाणांची जोडी श्रीमहाराजांना इथे अभिप्रेत

नसावी. पितृवर्गातील अनेक जीव देवयान मार्गाचे देखील अधिकारी असू शकतात. **कृष्णातटावरील श्राद्धविधीने देवयान मार्गाची ती पात्रता पितरांना लाभू शकेल, असे श्रीस्वामींना म्हणायचे असेल.**

इथे द्रुतरथे = जिचा वेग जलद आहे अशी नदी द्रुतरथा असे सहेतुकपणे म्हटले आहे. कृष्णेचा शीघ्र वेग तिच्या स्वभावाचा निदर्शक असून भक्तांच्या इच्छा पूर्ण करतानादेखील तिची तातडी कायम असते. श्रीमहाराज म्हणतात,

**द्रुतरये इत्यनेन शीघ्रफलदत्वं सूचितम् । श्लोक १३**

**द्रुतरये या विशेषणातून ती शीघ्रफल देणारी आहे हे सुचविले.**

**श्राद्धाप्रमाणे नारायणबलीच्या विधानाचेही कृष्णेच्या काठी फार महत्त्व आहे. श्राद्धविधी तसा नित्याचाच विधी होय. परंतु नारयणबली हा खास विधी आहे. व तो खास उद्दिष्टासाठी आवश्यक असतो. आपल्या पूर्वजांपैकी एखादा जीव काही कारणास्तव कल्पभर जर दुर्गतीत पडला असेल तर काही शास्त्रीय उपायांनी त्याची निष्कृती होऊ शकते. अशा जीवाच्या वंशजाने वृषोत्सर्ग, नारायणबली किंवा त्रिपिंडी श्राद्ध केल्यास अत्यंतदुर्लभ सद्गति त्याला लाभते. ही सद्गति म्हणजे अत्यंत दुर्लभ अशी मोक्षगतिसुद्धा असू शकते.** त्यासाठी मूळच्या जीवाचा काही वेगळा अधिकार असणे आवश्यक आहे काय या संबंधी श्रीस्वामींनी कोणतेही विवरण जोडले नाही. तथापि, अथवा शब्द जोडल्याने तशी शक्यता वाटते. **नारायणबली केल्याने मोक्ष व त्रिपिंडी श्राद्धाने दुर्लभ गति अशीदेखील अर्थ व्यवस्था करता येणे संभवनीय आहे.** (श्लोक १४)

पारलौकिक किंवा आध्यात्मिक कल्याण फलद्रूप करण्याचे सामर्थ्य जिच्यात आहे तिच्यात या जगीच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्याचे सामर्थ्य असावे ही फार मोठी गोष्ट नव्हे. कृष्णामाईने आजवर अशा अनेक आकांक्षा पूर्ण केल्या आहेत. वंध्येला पुत्रलाभ झाला आहे. वांझ स्त्रियांचे दोन वर्ग श्रीस्वामींनी दिले आहेत. जाति-वंध्या व मृत-वंध्या असे ते दोन वर्ग होत. अशा दोघींना दीर्घायुषी पुत्र झाला आहे. ऋण शब्दाचेसुद्धा दोन अर्थ आहेत - लौकिक व शास्त्रीय ऋण. शास्त्रीय ऋणात देव-ऋषि-पितृ-ऋणांचा समावेश होतो. या दोन्ही ऋणांची फेड कृष्णामाईच्या कृपेने होत असल्याचा निर्वाळा स्वामींनी दिला आहे. सुख शब्ददेखील ऋण शब्दाप्रमाणे दोन अर्थाचा आहे. वैषयिक सुख व अतीन्द्रिय सुख दुसरे सुख आत्यंतिक

असते असे श्रीस्वामी म्हणतात. अतीन्द्रिय म्हणजे इन्द्रियांनी न मिळणारे असे सुख आत्म्याचे स्वरूप-भूत सुखच राहणार व ते अत्यंतिक म्हणजे निरतिशय व अखंडितच असणार. त्याही सुखाचा लाभ कृष्णामाई करून देते. कृष्णेचे सामर्थ्य इतके उदण्ड की ती नराला - **कर्मणः नृत्यतीति नरः** (श्लोक १५) कर्माच्या तालावर नाचत राहणाऱ्या जीवाला - हव्या त्या इच्छापूर्तीची कृतार्थता मिळवून देते. श्रीस्वामी म्हणतात, आई, हे सर्व आठवून तुढ्यापुढे मी लोळण घेत आहे. (श्लोक १५)

**कृष्णेच्या या माहात्म्याची कंठरवाने स्तुती श्रीव्यासांनी केली आहे.** त्या अनुसार महाबळेश्वर हे कृष्णेचे उद्‌गम स्थान. तिथून तर ती समुद्रास मिळेपर्यंत तिच्या तीरावर असणाऱ्या अनेक तीर्थांत नरसोबाची वाडी व त्यात असणारी आठ तीर्थे यांचा महिमा विशेष आहे. ती आठ तीर्थे म्हणजे : १) शुक्ल २) पापविनाशि ३) काम्य ४) सिद्ध ५) अमर ६) कोटि ७) शक्ति ८) प्रयाग. (श्लोक १६)

कृष्णाकाठच्या तीर्थांचा त्यातही नरसोबावाडीचा जसा अपार महिमा तसाच तिच्या नावाचादेखील आहे. कोणीही ते घेतले तरी ते मोक्षाप्रत घेऊन जाते. कोणीही या शब्दाचे दोन अर्थ श्रीमहाराजांनी दिले आहेत. दूरदेशी असणारा अथवा शारीरिक पीडेसारख्या काही निमित्ताने चित्त अस्वस्थ असणारा हे ते दोन अर्थ होत. शरीराच्या विकल दशेत तेवढी एकाग्रता कशी साधणार? अशाही दशेत नाम घेतल्यास निःश्रेयसापर्यंत पुरुषाला घेऊन जाते. मुळात नरः - पुरुष एवढाच शब्द असला तरी श्रीमहाराजांनी 'कोऽपि' अशी पुस्ती त्याला जोडली आहे. सुदूरस्थः - दूर असणारा, अस्वस्थः - अस्वस्थ असलेला. या दोन विशेषणांमुळे तसा अर्थ आपोआपच निघतो. कोऽपि - कोणीही असे पद मुळात नसले तरी तसे तरी 'कथमपि' हे पद मात्र आहे. त्याचा अर्थ करताना **महाराज म्हणतात विनोद किंवा कुत्सितपणा मनात राहूनही हे नाव जो घेईल तो मोक्षाचा अधिकारी होईल. इतके कृष्णेचे माहात्म्य अपरंपार आहे.**

**जो प्रत्यक्ष सान्निध्यात राहून कृष्णेची भक्ती करील त्याच्याबद्दल तर बोलायलाच नको.** (श्लोक १८)

"बोलायलाच नको" या रचनेला संस्कृतात **कैमुतिक न्याय** हे नाव आहे. कृष्णेच्या माहात्म्याच्या विषयात पुनः एकदा याच न्यायाचा अवलंब श्रीमहाराज करीत आहेत. कथमपि हे शब्दही तिथे पुनः येतात. कृष्णेच्या

उत्तम प्रवाहात स्नान करणारा पुरुष अत्यंत निष्ठुर, जार, चोर, वनचर इ. कोणत्याही वर्गात मोडत असला तरी स्वर्गात पोचला असा इतिहास आहे. तर मग विधि-प्रणीत आचार संपादन करणारा पुरुष त्या अवस्थेप्रत जाईल हे वेगळे कशाला सांगायला हवे? (श्लोक २४)

अशा रीतीने कृष्णामाईचा सारा इतिहासच अनेक माहात्म्यकथांनी गाजत असल्याने तो आता सांभाळून ठेवण्याचे तिच्यावर दायित्व आहे. **न मिळालेले मिळविणे याला योग म्हणतात तर मिळाल्या वस्तूचे परीरक्षण करणे याला क्षेम म्हणतात.** पहिल्यापेक्षा दुसरा प्रकार अधिक महत्त्वाचा. त्यादृष्टीने श्रीस्वामिमहाराज कृष्णामाईला आठवून देतात, ''तुझी त्रिताप दूर सारणारी, अतिवृष्टि, अनावृष्टि इ. नैसर्गिक आपत्ती दूर सारणारी, पतितांना पावन करणारी इ. पदव्यांची जी मालिका तुला लाभली आहे, ती आता दीर्घ-काल टिकायला हवी.'' **बिरुद-निचयो जीवतु चिरम्। श्लोक ३०**

''कृच्छ-चान्द्रायणादि अनेक प्रायश्चित्ते शास्त्रात सांगितली आहेत खरी, अथवा वेगवेगळ्या होमांची वा जपांची अनुष्ठानेदेखील शास्त्रात सांगितली आहेत. **पण ती सारी जिथे अक्षम ठरतात तिथे केवळ तुझ्या प्रवाहात स्नान केल्याने सारे पाप धुतले जाऊन पुरुष स्वर्गात जातो असा इतिहास आहे. ज्याला कुठेही शुद्धी लाभत नाही तो तुझ्या स्नानाने शुद्ध होऊन स्वर्गात जातो हे महाश्चर्य आहे!''**

> **यस्य क्वापि न शुद्धिः सः त्वत्स्नानतः शुचिर्भूत्वा स्वर्गं व्रजत्येतन्महदाश्चर्यमिति भावः। श्लोक ४५**

या स्नानमाहात्म्याची सर चातुर्मास्यादि जे अनेक याग श्रौत-याग म्हणून प्रसिद्ध आहेत त्यांनाही येणार नाही. कारण **प्रत्येक यागात वैगुण्य तर निर्माण होणार नाही ना असा पदोपदी धाक असतो. इथे कोणताच धाक नाही. कारण अधिकारी-अनधिकारी या सर्वांना खुले असणारे हे सोपे साधन आहे.** (श्लोक ४२)

### *अपराधाचे तत्त्वज्ञान*

**अधिकार-अनधिकाराचा इथं प्रतिबन्ध नसला तरी एक गोष्ट आवश्यक आहे व ती आहे आपल्या अपराधांची जाणीव.** ती नसेल तर कृष्णामाईचे सान्निध्य, तिच्या प्रवाहात अवगाहन, तिच्या तटावर धार्मिक

अनुष्ठान हे सारे वाया जाईल, असा अर्थ नव्हे. कृष्णेच्या वस्तुमाहात्म्याचा काही तरी लाभ मिळणारच. पण आपल्या अतिनि:शंक किंवा बेडर वृत्तीमुळे या साऱ्या क्रिया यान्त्रिक होऊ लागतात; एवढेच काय ते! त्यामुळे प्रेम निर्माण होणार नाही. प्रेम नाही तर पुढील वाढ खोळंबली असे म्हणण्यास प्रत्यवाय असू नये.

**अधिकार-अनधिकाराचा एवढा मोठा अडसर कृष्णामाई आड येऊ देत नाही या तिच्या निर्व्याज करुणेचे तरी एक प्रकारचे दडपण मनावर येऊन आपल्या अपराधांची जाणीव आम्ही कां ठेवू नये?** पण आपण ठेवीत नाही ही वस्तुस्थिती आहे. क्वचित् एखादा दोष आपल्या स्वभावात आपल्याला आढळला तर तो नगण्य वाटत असतो. इतरांच्या दोषाकडे अशावेळी आपले लक्ष जाते. त्या तुलनेत आपला अपराध काहीच नव्हे, अशी आपली समजूत करून घेऊन त्या कल्पनाकोषात आपण वावरत असतो. सुदैवाने आपला दोष आपल्याला क्वचित दिसला तरी आपल्या आत्म-निरीक्षण-प्रवृत्तीचेही आपल्याला कौतुक वाटते.

अशा कौतुकात **अपराधाची बोच** मनात कशी राहणार? ती नसेल तर आर्तता नाही व **आर्तता** नाही तर **अनन्य-शरणता** किंवा **निर्भरता** कशी येणार? **पारमार्थिक जीवनाची हीच मोठी शोकान्तिका आहे. हिच्या पायीच एक जीवनच काय अनेक जन्म वाया जातात.** तसे ते जाऊ नयेत यासाठी श्रीमहाराजांनी अपराधाचा तात्त्विक विचार कृष्णालहरीत वा अन्यत्र स्तोत्र-वाङ्मयात करून ठेवला.

आपल्या अपराधांची प्रथम निखळ कबूली देऊन पुढे अपराधाच्या तात्त्विक विश्लेषणात श्रीस्वामिमहाराज शिरले आहेत. ते म्हणतात,

आई, हा काय य:कश्चित् सामान्य अपराधी आहे असे माझ्याविषयी मनातही आणू नकोस. (अर्थात् बोलून दाखविण्याची गोष्ट दूरराहिली.) कारण माझ्या ठिकाणी सर्व पापांचे संघात दीर्घकाळाचेच ठाण मांडून बसले आहेत. ते कायमचेच नाहीसे करण्यासाठी कंबरेची गाठ पक्की करून ऊठ. (श्लोक ३५)

### अपराधाची मिमांसा

या श्लोकातील साऱ्याच शब्दांचे श्रीमहाराजकृत पदकृत्य अभ्यसनीय आहे. त्यामुळे आपल्या अपराधाविषयी आम्ही किती 'सतर्क' राहायला हवे याची शिकवण मिळते. समस्ताघौघा: साऱ्या पापांचे ओघ म्हणत असता

श्रीमहाराजांना ब्राह्मणांचा उपाकर्म श्रावणीविधी आढळून राहिला आहे. **"कायिक-वाचिक-मानसिक-सांसर्गिक-स्पृष्टास्पृष्ट-ज्ञाताज्ञात-भुक्ताभुक्त-पीतापीत-सकल-पातकांतिपातकोपपातक-लघुपातक-संकरीकरण-मलिनीकरणांपात्रीकरण-जातिभ्रंशकरण-प्रकीर्ण-पापानाम्।" (३२ व्याख्या)**

पापांची ही तालिका पाहिल्यानंतर कोणाला त्यातून सुटता येईल? ही पापे आली-गेली अशा स्वरूपात राहत नाहीत. उलट त्यांचे पक्के ठाण आपल्या ठिकाणी बसले असते. त्यातून आपल्या लेकरांची सुटका करण्यासाठी कृष्णामाईलाकेवळ सहजतेने हे काम होण्यासारखे आहे अशा भ्रमात राहता येणार नाही. "उत्तिष्ठ" ऊठ या कृष्णामाईला दिलेल्या हाकेत श्रीमहाराजांना तसे म्हणायचे आहे,

> **सावधानतया माम् उद्धर्तुम् उत्तिष्ठ उत्थिता भव । प्रमादं मा कार्षीः । (श्लोक ३५)**

माझा उद्धार करण्यासाठी अगदी जागरूक राहून ऊठ. जराही अवधान सुटू देऊ नको. (श्लोक ३५)

मूळ श्लोकात **'इत्यपि मनसि मा स्थापय'** अशी पदरचना आहे. त्याचा अर्थ - असे मनात देखील (हा काय सामान्य अपराधी आहे) मनात येऊ देऊ नकोस असा होतो. श्रीमहाराजांनी मात्र टीकेत अपि = देखील हा शब्त इति शब्दाशी न जोडता "मनसि अपि" = मनातदेखील अशा अर्थाने मनाशी जोडला आहे. 'इति' आणि 'मनसि' या दोहोंच्या मध्यभागी 'अपि' हा शब्द सापडला असल्याने उंबरठ्यावरील दिव्याप्रमाणे दोन्हीकडे प्रकाशार्थी वळविता येतो. त्यामुळे "असेही मनात आणू नकोस" आणि "मनातही आणू नकोस" असे दोन्ही अर्थ सुखाने साधू शकतात. तात्पर्य, आपला अपराध सामान्य कोटीतील मुळीच नव्हे असे श्रीमहाराजांना म्हणायचे आहे.

असा कोणता अपराध असू शकतो की जो सामान्य कोटीत मुळीच घालता येणार नाही? इथेच श्रीस्वामींची अपराधमीमांसा सुरू होते. ती श्रीस्वामींची स्वकपोल-कल्पित नाही. पूर्णतः वैदिक प्रमाणावर आधारलेली आहे. श्रीस्वामींच्या एकूणच प्रतिपादनात वैदिक विचारधारेला प्राधान्य असल्याने इथेही ते तसे असल्यास नवल नाही. **श्रीस्वामींच्या प्रतिपादनानुसार जर कोणता महापराध असेल तर तो आहे आत्मस्वरूपाची चोरी.**

**आत्मस्वरूपाचे भान आपल्याला रहात नाही ही वस्तुस्थिती आहे. ती आहे म्हणून जड–देहावर आपली पूर्ण ममता जडली आहे. त्याला धरूनच राग–द्वेष – मान–अपमान – सुख–दु:ख – दंभ–मोह इत्यादि विकारांचे आवर्त आपल्या जीवनात उठत असतात.**

श्रीमहाराज म्हणतात,

**मी नित्यशुद्ध–बुद्ध–मुक्त स्वभावाचा असून स्वत:ला अगदी उलट स्वरूपात पाहतो. स्वत:ला अनित्य–मर्यादित कर्ता भोक्ता असे समजतो. अशी उलटबुद्धी म्हणजेच चोरी.**

**श्रुत्युक्तक्षणस्यात्मनोऽन्यथा वेदनमेव चौर्यम् । टीका श्लोक ३५**

(वेदात आत्म्याचे जसे स्वरूप सांगितले त्याहून वेगळ्या स्वरूपाची बतावणी करणे म्हणजे चोरी.)

**योऽन्यथा सन्तमात्मानमन्यथा प्रतिपद्यते ।**
**किं तेन न कृतं पापं चौरेणात्मापहारिणा । टीका श्लोक ३५**

(जो पुरुष आत्मस्वरूप वेगळे असता (नित्य–शुद्ध इ.) त्याहून निराळ्याच रूपाची कल्पना करतो त्या आत्मस्वस्वरूपाची चोरी करणाऱ्याने कोणते पाप केले नसते?)

उपनिषदातील ही चोरीची संकल्पना आहे. चोर तरी काय करतो? जे स्वत:चे नव्हे ते स्वत:चे म्हणून सांगतो व जे स्वत:चे आहे ते लपवून ठेवतो. छांदोग्योपनिषदात ही संकल्पना आणखी स्पष्ट केली आहे. जुन्या काळात चोरीची शिक्षा करीत असता अग्निदिव्य करायला लावीत. या चालीचा उल्लेख करून छांदोग्य–उपनिषद म्हणते,

जो खरा चोर असतो तो मी चोरी केली नाही असेच म्हणत असतो. म्हणजे तो सत्य लपवून खोट्याच्या नादी लागलेला असतो. अशांच्या हातात, तापलेला परशु देतात. स्वाभाविकच तो तप्त–परशुने भाजला जातो. राजपुरुष त्याला पुढे मारतात.

**ज्याच्यावर चोरीचा केवळ आळच आलेला असतो त्याला लपवायचे काहीच नसते. तो मी चोरी केली नाही असेच खऱ्या चोरासारखे म्हणतो, पण त्याच्यात खोटेपणा काही नसतो. त्याने तापलेला परशु हातात घेतला तरी त्याला काहीच इजा होत नाही. त्याला राजपुरुष सोडून देतात. (छां. ६.१६.१)**

**चोरीच्या पापात वस्तूच्या अपरहणाला किंवा वस्तू उचलण्यास तेवढे महत्त्व नाही. तसे असते तर दोन वस्तू घेऊन जाणारा अपराधी ठरला असता.**

**किमपहरणमात्रेण बन्धनमर्हति, अन्यथा दत्तेऽपि धने बन्धन-प्रसङ्गात । (शांकरभाष्य ६.१६.१)**

खरे महत्त्व आहे खोट्या बतावणीला. आपण तसेच करतो. आत्मस्वरूपाशी ऐक्य करण्याऐवजी अनात्म पदार्थाला आत्मा म्हणून संबोधतो. त्यामुळे सारी पापे आपोआपच चालत येतात. मी शुद्ध-मुक्त बुद्ध आहे. या वस्तुस्थितीचा स्वीकार जर पुरुषाने केला असता तर हा संसार त्याच्यामागे लागला नसता. या साऱ्या संसारपाशाच्या मुळाशी तो पहिला अपराध आहे.

हाच आशय श्रीमहाराजांनी दुसऱ्या स्तोत्रातही आणला आहे. ते म्हणतात,

**काय वदू घडले किती पाप**
**अक्षय देईल जे बहु ताप**
**आसुर जो निजरूपचि चोरी**
**सर्व तयावरि ये अघ भारी** **(स्तोत्रसंग्रह ३१७)**

करुणात्रिपदीतील तिसरे पद **"जय करुणाघन"** याच महापराधाकडे साधकाची दृष्टी वळवू इच्छिते.

**'निज अपराधे उफराटी दृष्टि होऊनि पोटी भय धरू पावन'**

या पदातील निजापराध कोणता? **खरा निजापराध निजात्म्याचा विसर हाच होय. त्यामुळे विचारशील साधकाची दृष्टी गरगरू लागते.** स्वाभाविकच आपण केवढा अपराध केला या जाणिवेने मनात धाक निर्माण होतो. तोच परमार्थाचा आरंभ होय. **वरील पदात उफराटी दृष्टी या शब्दाने अनान्मजडदृष्टी अर्थात विपरीतदृष्टी असाही अर्थ घेता येईल.** त्यामुळे थोडा अन्वयाला ताण पडतो हे खरे. पण श्रीस्वामिमहाराजांच्या महापराध कल्पनेला त्या अर्थयोजनेने बळ मिळते. स्वतःच्या अपराधाची अशी तात्त्विक जागरूकता लक्षात घेतली तर मग कृष्णालहरीत ठिकठिकाणी वेगवेगळ्या प्रकाराने श्रीमहाराजांनी कृष्णामाईची जी क्षमा भाकली ती अर्थवादात्मक वाटत नाही. **साधकांनी त्यादृष्टीने पहायला मात्र शिकले पाहिजे.**

श्रीमहाराजांनी अपराधांचा पाढा असा वाचला आहे. "पुष्करतीर्थासारखी जी ख्यातनाम तीर्थे आहेत त्यांचा अवमान केला. इन्द्रादि-देवतांचा अपमान केला. कुणाला दान दिले नाही. यज्ञ-याग केले नाहीत. तलाव-विहिरी-उद्याने निर्माण करून इतरांना ती मोकळी केली नाहीत. तुझ्या सामर्थ्यावर भिस्त ठेवून तीर्थादिसाधनेकडे दुर्लक्ष केले." (श्लोक ३६)

सर्वांची अशी अवहेलना केल्याने कोणापुढे उभे रहायला आता तोंड उरले नाही. कोण आता माझा सांभाळ करील याचिन्तेने आकाशाकडे तोंड वासत राहणे मला भाग पडत आहे. त्यामुळे सर्वांच्याच उपहासाचा मी विषय होणार. अशा वेळी तत्काळ दिरंगाई न करता **'न तु कालान्तरे'** मला तू उचलून घे. (श्लोक २७)

"कृष्णे तू जेव्हापासून या जगात जलप्रवाहाच्या रूपाने अवतरलीस तेव्हापासून अपराध्यांना असे उचलून घेण्याचे काम तू करीतच आली आहेस हे खरे आहे. परंतु मी त्या सर्वांहून 'वरचढ' आहे. म्हणून म्हणतो तू जर उद्धाराचे सामर्थ्य बाळगून असशील (आहेस) तर मला वर घे आणि त्यासाठी ऊठ." (श्लोक ३१)

तू जर मला झिडकारलेस – 'मी तुला वर घेत नाही' असे म्हणून तर अगदी भेदरून गेलेल्या माझ्या अडाणी माणसाकडे कोण लक्ष देणार? कोण माझा वाली राहील? त्याचा मला एकच परिणाम दिसतो आणि तो म्हणजे आक्रन्दन करीत मृत्युच्या अधीन होऊन जाणे. तसा प्रसंग येऊ देऊ नकोस. तत्पूर्वीचा मला वर घे. प्रसन्न हो! (ईदगवस्थाप्राप्तेर्वागेवप्रसीदेति भाव:) (श्लोक २८)

### *अपराध निराकरणासाठी प्रार्थना व त्यासाठी युक्तिवाद*

याप्रमाणे श्रीमहाराजांनी अपराधाची शास्त्रीय-मीमांसा करून आपण अपराध्यांच्या मालिकेत कसे बसतो, हे अगदी काकुळतीने सांगून, कृष्णामाईला काही युक्तिवादात अडकविण्याचाही प्रयत्न केला आहे. अर्थात हे सारे प्रेमाचे युक्तिवाद होत. वादविवादातील युक्तिवादापेक्षाही प्रतिपक्षाला अधिक निरुत्तर करणारे!

ते म्हणतात, मी महापापी आहे. सारी (त्रिविध) दु:खे माझ्या वाट्याला आली आहेत. कोणी मला त्राता न उरल्याने मला कापरे भरले आहे. लोकदेखील माझी कीव करीनासे झाले आहेत. माझ्याकडे शिव्या हासडत उपहासाने बघत आहेत. या वस्तुस्थितीने मी तेवढा डगमगत नाही.

मला भीती वाटते ती वेगळ्याच गोष्टीची. तू मोठमोठी बिरुदे आजवर मिरवलीस. त्यांना आज तडा बसतो आहे याचेच मला वाईट वाटते. **(परकृतशापहास्योत्पन्नसंतापादपि त्वद्बिरुदावलिभङ्गादेव मे महद् भयं नान्यदित्यर्थ:) श्लोक २९**

ही बिरुदावली कोणती? तू त्रिताप - आधिदैविक-आधिभौतिक व आध्यात्मिक दु:खं दूर करतेस. अतिवृष्टी, अनावृष्टी, पोपट-उंदीर टोळधाडी यांच्यासारखे उपद्रव दूर करतेस. राज्यावर होणारे परचक्र किंवा अन्तर्गत संघर्ष यापासून बचाव करतेस. आपल्या भक्तांना हवे ते वर देतेस - देव-ऋषि-पितृ-ऋणापासून मुक्त करतेस. कायिक-वाचिक-मानसिक पापांचा नाश करतेस. दृष्ट व अदृष्ट भीती दूर करतेस. महापतितांचादेखील उद्धार करतेस. साऱ्या नद्यांत तू श्रेष्ठ आहेस. **ही सारी बिरुदे निरपवाद नाहीत, सापवादच आहेत, असा आता तुझ्यावर ठपका येणार आहे. आपली बिरुदे आहेत ती कायमची आहेत, औटघटकेची नाहीत असे जर तुला हवे असेल, तर तुला माझा उद्धार करायला हवा. तरच तुझी कीर्ती चिरंतन होईल. ततोऽयं ते बिरुद-निचय-चिरजीवी भविष्यतीति भाव:। श्लोक ३०**

माझ्या उद्धारामुळे तिन्ही लोकांत तुझ्या कीर्तीचा डिंडिम नव्याने गरजणार आहे हा तुझा मोठाच लाभ होय. असा अवसर तुझ्या वाट्याला पूर्वी कधीच आला नाही. तो आता येत आहे. माझादेखील मोठाच लाभ आहे. या लाभाला तुलना नाही. हा अतुलनीय लाभ कोणता?

इथेच श्रीमहाराजांनी सारा वेदान्त ओतला आहे. "**असङ्ग: अहम् उपरि अभयपदं यास्ये**" या श्लोकांशावरील श्रीस्वामींचे विवेचन पाहण्याजोगे आहे.

उपरि शब्दाचा "वर" हा साधा अर्थ इथे स्वामींना अभिप्रेत नाही. उपरि म्हणजे प्रयत्नाच्या बाहेर. उपरि म्हणजे कोणता तरी ब्रह्मलोकासारखा उत्तम लोक हा अर्थ स्वामींना विवक्षित नाही. प्रपंचाच्या बाहेर एक अद्वैत परमात्माच असतो. तोच अभय शब्दाचा अर्थ. भीती केव्हा असू शकते? दोन असतील तर एकापासून दुसऱ्याला भीती. अत्यंत अद्वैत अवस्थेत कुठला आला दोनपणा? अर्थात् तिथे भीतीचे काहीच कारण नाही. पद म्हणजे कोणते तरी स्थान असा अर्थ घ्यायचा नाही. **पद म्हणजे ज्ञानी पुरुष जी अवस्था गाठतात ती अवस्था. ती गाठायची म्हणजे नव्याने मिळवावयाची असा भाव नाही. ती सहज अवस्था आहे.** कोणतीही

आगन्तुक गोष्ट सहज होऊ शकत नाही. एखाद्या नव्या ठिकाणी जाणे असा जर अर्थ अभिप्रेत धरला, तर तिथून परत फिरणेदेखील संभवते. तसा प्रकार इथे नाही.

**यो हि गन्ता स प्रतीयभगतं पदं गच्छति गत्वा च निवर्तते तद्वदत्र गमनं न । (श्लोक ३३)**

**एकूण अभयपद म्हणजे पर-ब्रह्म हाच अर्थ इथे गृहीत धरला आहे. कृष्णामाईच्या कृपेने या अत्युच्च स्थितीची प्राप्ती होते असा स्वामींचा निर्वाळा आहे.**

कृष्णामाईची बिरुदावली जर पुढे आणली तर अपराध्यांची पापे म्हणजे जळत्या अग्नीपुढे टाकलेला वाळलेल्या बारक्या गवताचा ढिगारा म्हणता येईल. कृष्णामाईच्या पापविनाश सामर्थ्यापुढे त्याचा काय टिकाव लागणार आहे? पापांच्या पर्वतांचा जिथे चुटकीसरशी निकाल लागणार तिथे गवताचा व तोही वाळून गेलेल्या (शुष्काणि) बारक्या गवताचा **(प्रभूत-बालतृणानि)** ढिगारा कितीसा टिकणार? (श्लोक ४४)

जसा पापविनाशाच्या विषयात स्वामींचा हा वरील युक्तिवाद अगदी नवीन नसला तरी साधकाने स्वतःला धीर देण्याच्या दृष्टीने मननीय आहे, त्याचप्रमाणे स्वतःच्या स्तोत्ररचनेच्या संबंधातही त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. साधकाने ती शब्दतः नव्हे अर्थतः, मनात वागवून आपल्या विनम्रवृत्तीची सतत जपणूक करीत राहिले पाहिजे. **''माझिया दुर्वादाला ना न म्हणे की''** या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या भूमिकेचीच ती आठवण करून देते. ते म्हणतात, श्रीव्यास-श्रीशंकराचार्य प्रभृतींनी तुझी स्तुती केली. उपमा, दृष्टान्त प्रभृती कोंदाकोंदी असे तिचे स्वरूप. पण तुला ती आवडली नाही याचे इंगित मी समजलो. आपणच बोलविलेले शब्द बोबड्या माध्यामातून ऐकण्याची आईला हौस असते. तसा हा प्रकार आहे असे मी समजतो. त्यामुळे तुझ्या प्रेरणेने उमटलेली परंतु कशीतरी वठलेली ही स्तुती तुला आवडो, **तत्प्रेरणया यथा कथां चिदुच्चारितेयं मया तव स्तुतिस्तव मुदे भवत्वित्यभिप्रायः।** (श्लोक ४) - माझे मनोगत तू लक्षात घे. ''शृणु'' या क्रियापदाचा इथे ''ऐक'' हा नेहमीचा अर्थ तर स्वामींनी घेतलाच पण याच्या जोडीला ''अवधारय'' जाणून घे असा अर्थ घेतला. मी केलेली तुझी स्तुती ऐकताना माझी त्यापाठीमागील भूमिका काय आहे हेही तू जाणून घ्यायला हवी असे स्वामिमहाराज म्हणत आहेत हे त्यावरून सहज लक्षात

येते. प्रेमाच्या युक्तिवादात प्रिय व्यक्तीला कसे अडकविता येते व स्वतःची सुटका करून घेता येते ते यावरून कळून येते.

### कृष्णेचे ईश्वरी स्वरूप

हे सारे युक्तिवाद कृष्णामाईपुढे म्हणजे प्रत्यक्ष अवतार विग्रहापुढे चालले आहेत. हेही आम्ही मनोमन समजून घ्यायचे आहे. कृष्णालहरीत त्यादृष्टीने संक्षिप्त पण सुस्पष्ट दिग्दर्शन आढळते. अवतार-विग्रह म्हणजे सगुण रूप; याहून वेगळे ते निर्गुणरूप. या दोहोंचा परस्पर संबंध? कोणता त्यातील श्रेष्ठ-कनिष्ठ कोण इत्यादि शंका जिज्ञासूंच्या मनात येत राहतात. **श्रीस्वामिमहाराजांचे बोट पक्के धरून आपल्याला कसा विचार करता येईल तेवढेच इथे महत्त्वाचे.**

**'चतुर्बाहुः श्रीमत्'** या पहिल्याच कृष्णालहरीच्या श्लोकात कृष्णामाईच्या स्निग्ध-श्यामल, चतुर्भुज रूपाचा उल्लेख केला आहे. या सगुण-साकार विग्रहाचा महिमा इतका अपरंपार आहे, की सहस्रमुखाने प्रत्यक्ष शेष भगवन्तालादेखील यथार्थ वर्णन करता येत नाही (श्लोक २). त्यामुळे स्वामी म्हणतात, केवळ आपल्या वाणीला निर्भयता लाभावी हाच स्तुतिगानाचा उद्देश आहे व तोही संकोचशील मनाने हातात घेतलेला! (श्लोक २) **'श्रीकृष्णे'** या पदाचे स्पष्टीकरण करतांना महाराज म्हणतात,

> **श्रीमती स्वाभाविकषट्गुणैश्वर्यवती चासौ कृष्णा च तत्संबुद्धौ हे श्रीकृष्णे। (श्लोक २)**

**'श्रीकृष्णे'** पदातील **'श्रीमद'** स्वाभाविक षड्गुणैश्वर्याचे द्योतक आहे हा भावार्थ.

या श्लोकात श्रीकृष्णे हे संबोधन दोनदा आले आहे व लहरीचे चार दोन श्लोक वगळता पालुपद म्हणून ते प्रत्येक श्लोकातच येते. याचा अर्थ कृष्णामाईची दिव्य व नित्यसाकारता साधाकांनी नित्य डोळ्यापुढे ठेवायला हवी असा होतो. **स्वाभाविक म्हणजे वस्तूला जो कदापि सोडून जात नाही तो धर्म. जशी अग्नीची दाहकशक्ती किंवा सूर्याची प्रकाशशक्ती. ती गेली की वस्तूच गेली असे समजावे लागते.** परिमल गेला की कापूर उरेल काय किंवा गोडी गेली की साखर उरते काय? **षड्गुणैश्वर्य हा कृष्णामाईचा स्वभाव आहे तो या अर्थाने.** ती दिव्य ऐश्वर्याची मूर्ती असल्यानेच अनंत शेषाला यथार्थपणे तिची स्तुती करता येत नाही. केलेली

अफाट स्तुतीदेखील अपुरी ठरते. **असल्या वर्णनांना अर्थवादात्मक किंवा ''बहुवस'' ठरविण्याची काही लोकांची प्रवृत्ति असते. त्यांना अमर्यादाची कल्पना करतांना घेरी येते व ते स्वाभाविक आहेही. परंतु विचारशील माणसाने असा विचार केला पाहिजे की जिथे आकाशच कितीही पाहतो म्हटले तरी दृष्टीच्या कवेत येत नाही. तिथे त्यापेक्षाही व्यापक – निरतिशय व्यापक – परमात्मत्वतत्त्व पूर्णपणे आपल्या क्षितिजात कसे सामावले जाईल? आणि न जाता त्याचा संपूर्ण आलेख कसा काढता येईल?** कृष्णामाई म्हणजे परमात्वतत्त्व, पाण्याचा लोंढा नव्हे ही श्रीस्वामींची प्रत्यय-पूत भूमिका असल्याने त्या वर्णनात कोणताही अर्थ-संकोच करीत बसणे हे द्वाडपणाचे होय. कृष्णालहरीत सर्वत्र कृष्णामाईचा परमात्मभाव स्पष्ट केला आहे. श्रीकृष्णे या पदावरील श्रीस्वामींची ही टीप म्हणजे त्या विवरणाचे प्रवेशद्वार म्हणता येईल.

हे साकार रूप निर्गुण रूपाहून तत्त्वत: वेगळे नाही. ते (निर्गुण रूप) जसे अवाङ्मनंसगोचर तसेच हेदेखील. इथे प्रत्यक्षादि प्रमाणांची मुळीच मातब्बरी नाही. **(प्रत्यक्षादिप्रमाणै: अलक्ष्यं रूपम्) श्लोक ३**

पण असे अविषय – मन-वाणी इन्द्रिये इत्यादींना अविषय असणारे – निर्गुण-स्वरूप ज्ञानवृत्तीचा विषय तरी कसे व्हावे? त्यावर श्रीस्वामिमहाराज काय उत्तर देणार? ते म्हणतात, कसेबसे जाणून **कथमपिच अलौकिकत्वात् यथा कथंश्चिद्विज्ञाय गुरुप्रसादाज्ज्ञात्वा। श्लोक ३**

''कसेबसे'' हा 'कथमपि' या संस्कृत शब्दाचा केलेला अनुवाद तसा भ्रामक आहे. कारण त्यातून असा ध्वनि निघतो की झालेले ज्ञान खरे नाही, ते कसेबसे आहे. हा ध्वनि चूक आहे. झालेले ज्ञान कसेबसे नाही. ते कसे झाले हे लौकिक प्रमाणांनी सिद्ध करता येत नाही. गुरुकृपेने ते साधू शकले या अर्थाने ते कसेबसे म्हणायचे आहे. कसेबसे आपत्तीतून पार पडलो असे म्हणातांना आंपत्तीतून सुटका झाली या विधानाबद्दल कोणताही संशय मनात घ्यायचा नसतो. सुटकेचे कोणतेही समाधानकारक कारण मात्र देता येत नाही. तसाच आशय इथे अभिप्रेत आहे. **गुरुकृपा याप्रमाणे अत्यंत अमोघ साधन आहे. त्यामुळे ''अरुपाते रूप दाविन'' असा चमत्कार घडत असतो. निर्गुणदेखील सगुणरूपाने प्रत्ययाला येते.** निर्गुणांचा सगुणरूपाने परिणाम होतो असे मात्र म्हणण्याचे कारण नाही. तसे म्हटले तर निर्गुणपणा मोडला असा अर्थ निघू पाहतो व अनेक प्रमेयांचा चोळामोळा

होतो. या सगुण-निर्गुण संबंधाचा विचार, श्रीदत्तस्वरूपाचा विचार करतांना करायचा असल्याने इथे एवढेच पुरे.

कृष्णामाईच्या चतुर्भुज सगुणरूपाचा श्रीमहाराजांनी पुढेही उल्लेख केला आहे. आपल्या निजरूपाने प्रगट हो असे म्हणत असता निजरूप म्हणजे ध्यानमंगल चतुर्भुज असे स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे.

**"ध्यानमङ्गलं चतुर्बाहुः" इत्यादिना पूर्वं मयोक्तम् । श्लोक ३४**

हे चतुर्भुज रूप म्हणजे एखाद्या ब्रह्मांडान्तर्गत देवतेचे रूप असा अर्थ नाही. परमात्मतत्त्वाच्या वेद-उपनिषद-पुराणे इत्यादि प्राचीन ग्रंथांतून ज्या काही कळा वर्णन केल्या आहेत, त्या साऱ्या कृष्णामाईच्या ठिकाणी विराजमान आहेत. **ब्रह्मांडान्तर्गत देवतेला कोणी अवाङ्मनसगोचर म्हणतही नाही हे देखील तेवढेच खरे.**

**परमात्म्याच्या कळा त्या कोणत्या?**

अंतर्यामित्व ही मुख्य कळा. श्रीमद्भगवद्गीतेत **"सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो"** सर्वांच्या हृदयात मी नांदतो असे भगवंताने स्वमुखाने सांगितले आहे. कृष्णालहरीतही **"आखिल हृदयस्थे भगवति"** सर्वांच्या हृदयात निवास करणारी देवी असा उल्लेख आहे. **(श्लोक ३६)**

कृष्णामाई सर्वांच्या हृदयात निवास करीत असल्याने, आपल्या हृदयातील भाव नव्याने तिच्यापुढे सांगण्याची आवश्यकता नाही, पण समर्थापुढे सांगावेसे वाटते म्हणून हे आपले निवेदन आहे असे श्रीमहाराज म्हणतात.

परंतु एवढ्यावरच त्यांना तो विषय आटोपता घ्यायचा नाही. हे **अंतर्यामित्व** म्हणजे **साक्षित्व** किंवा **कूटस्थभाव** होय असे त्यांना म्हणायचे आहे. **एखादा जाणता पुरुष दुसऱ्याच्या हृदयातील भाव जाणू शकतो तो सहृदयतेने, त्यासाठी अंतर्यामित्वच असले पाहिजे असे नाही. पण तेवढी मर्यादित भूमिका कृष्णामाईकडे श्रीमहाराजांना द्यायची नाही**. ते म्हणतात,

**साक्षात्पश्यसीत्यत्र विकारमन्तरेण स्वाध्यस्तं**
**सर्वं साक्षादव्यवधानन स्वरूपबोधेनेक्षते**
**पश्यतीति निःसक्तं साक्षिस्वरूपत्वं विवक्षितम्। (श्लोक ३३)**

"तू साक्षात् बघतेस" असे जे श्लोकात म्हटले त्याचा अर्थ कोणतीही बुद्धिवृत्तीची परिणामप्रक्रिया न घडता स्वत:च्या मूळ स्वरूपावर भ्रमाने कल्पिलेले सर्व जगत् प्रत्यक्षपणे - थेट कोणतेही व्यवधान - प्रतिबंध - आड न येता स्वभावरूप ज्ञानाच्या भरवशावर पाहतेस या अर्थाने विवक्षित असणारे साक्षित्वरूप इथे विवक्षित आहे.

**श्रीमहाराजांच्या वरील अवतरणातील विकार, अव्यवधान, स्वरूपबोध प्रभृती शब्द अतिशय महत्त्वाचे आहेत. बघण्याची क्रिया इंद्रिये, मन, बुद्धी इत्यादींच्या सहाय्याने होत असते. परंतु तो विकार झाला. विकार म्हणजे परिणाम, बदल वगैरे. जिथे बदल असेल तिथे आदि-अंत येणार. क्रियेला नेहमीच आदि व अंत असतो.** साक्षीस्वरूपाच्या ठिकाणी जर याच पद्धतीचे "पाहणे" असेल तर ते नित्य म्हणता येणार नाही. **क्रिया ही कधीच नित्य नसते आणि 'स्वभाव' कधीही अनित्य असतो.**

**कृष्णामाई सर्वांतर्यामी राहून जी पाहते ती नित्यदृष्टीने पाहते. बुद्ध्यादिवृत्तींच्या आश्रयाने नव्हे. म्हणूनच ती अ-व्यवधानाने थेट पाहू शकते.** बुद्धिवृत्ती मात्र आत्म्याचा आधार घेऊन पाहते. तिला तसे राहणे भागच आहे. एरव्ही तिच्यात ज्ञानशक्ती कशी संचरणार? ती स्वत: जड आहे. तिच्यात स्वत:चे वेगळे ज्ञान सामर्थ्य असणे शक्य नाही.

वेगळ्या शब्दात असे म्हणता येईल, बुद्धी आत्मधार्जिणी असते व म्हणून ती पाहू शकते व तिचे ते पाहणे क्रियारूप, परिणामरूप व आदि-अंतरूप असते. अर्थातच अनित्य असते. त्याला स्वरूपबोध म्हणत नाहीत. स्वरूपबोध नित्य असतो त्याला आदि-अंत नसतो. जशी अग्नीची दाहकशक्ती.

कृष्णामाईची दृष्टी ही अशी नित्य आहे. इथे स्वरूपबोध शब्द मुद्दामच वापरला आहे. कारण कृष्णामाईच्या स्वरूप-लक्षणाचा त्यांना इथे विचार करायचा आहे. मण्याची कांती, सोन्याचे मार्दव किंवा पिवळेपण स्वरूपभूत असते. त्याला आदि-अंत नसतो. त्याला परिणाम प्रक्रियेची आवश्यकता नसते. घडण्याची वा घडविण्याची तिथे कल्पना नाही. तसे मानले की कृत्रिमपणा आला. मग तो स्वभाव होत नाही. **वस्तूबरोबर राहणारा जो धर्म तो स्वभाव होय. कृष्णामाईचा स्वरूपबोध त्या जातीचा आहे. त्याला कोणत्याही आगन्तुक प्रक्रियेची गरज नाही.**

कृष्णामाईला हे सारे अध्यस्त - भ्रमाने कल्पिलेले विश्व थेट पाहता येते. याचाच अर्थ तिला त्यासाठी बुद्धिवृत्तीचा आधार घेण्याची गरज नाही. बुद्धिवृत्तीची जर तिथेही आवश्यकता असेल तर भ्रमाने भासणारे सर्व विश्व तिला कसे पाहता येईल? कारण भ्रमाने भासणाऱ्या विश्वात बुद्धिवृत्तीचाही समावेश असतोच. तिला बघण्यासाठी बुद्धिवृत्तीच्या आश्रयावाचून पाहण्याची स्वतंत्र स्वरूपभूत ज्ञानशक्ती हवी. तिलाच श्रीमहाराज स्वरूपबोध म्हणत आहेत. अशा स्वयंभूज्ञानाची मूस म्हणजे कृष्णामाई, असे श्रीमहाराजांना म्हणायचे आहे.

ती जगाची उलाढाल करते हे तिचे "**तटस्थ**" **लक्षण** तर आपल्या स्वरूपभूत ज्ञानशक्तीने आपले साक्षिभूतपण ती निरंतर जोपासत असते हे तिचे **स्वरूप लक्षण**. पण हीही भाषाच झाली. हे जोपासण्याची तिला काही खटपट करावी लागते असा अर्थ मात्र नव्हे. क्रियेचा इथे स्पर्श नाही. आकाशाला पाहता येते, अशी जर क्षणभर आपण कल्पना केली तर आकाशाचे जसे' हालचाली वाचून पाहणे असू शकेल तसे हे पाहणे आहे.

**विकारमन्तरेण** - कोणत्याही परिणाम प्रक्रियेवाचून व **स्वरूपबोधेन** - स्वयंभू ज्ञानशक्तीने हे दोन शब्द इथे फार महत्त्वाचे आहेत. या स्वरूपभूत ज्ञानाचा श्रीमच्छंकराचार्यांनी बृहदारण्यकभाष्यात फार तात्त्विक विचार करून ठेवला आहे.

**"न हि द्रष्टुर्दृष्टेः विपरिलोपो वर्तते ।"**

(द्रष्ट्याच्या ज्ञानस्वरूपाचा कधीही अस्त होत नाही.)

या वचनावर भाष्य करताना ते म्हणतात,

**"ननु विप्रतिषिद्धमिदमभिधीयते द्रष्टुः सा दृष्टिर्न विपरिलुप्यते इति च । दृष्टिश्च द्रष्टवा क्रियते । दृष्टि-कर्तृत्वाद्धि द्रष्टेत्युच्यते । क्रियमाणच द्रष्टा दृष्टिर्न विपरिलुप्यत इति चाशक्यं वक्तुम् ।"**

**"नैष दोषः। आदित्यादिप्रकाशकत्ववद् दर्शनोपपत्तेः। यथा आदित्यादयो नित्यप्रकाश-स्वभावा एक सन्तः स्वाभाविकेन नित्येनैव प्रकाशेन प्रकाशयन्ति। न ह्यप्रकाशात्मानः सन्तः प्रकाशं कुर्वन्तः प्रकाशयन्तीत्युच्यन्ते। किं तर्हि स्वभावेनैव नित्येन प्रकाशन्ते। तथाऽयमप्यात्मा अविपरिलुप्तस्वभावया दृष्ट्या नित्यया द्रष्टेत्युच्यते।"**

"**यथा आदित्यादीनां प्रकाशयितृत्व नित्येनैव स्वाभाविकेनाक्रियमाणेन प्रकाशेन, तदेवच प्रकाशयितृत्व मुख्यं प्रकाशयितृत्वान्तरानुपपत्तेः। तस्मान्न द्रष्टुर्दृष्टिर्निपरिलुप्यते इति न विप्रतिषेध गन्धोऽप्यस्ति।**"

**बृ. शां.भा. ४.३.२३**

(शंका - **द्रष्ट्याची** (ज्ञात्याची) ती **दृष्टी** (ज्ञान) आहे असे एकीकडे म्हणायचे व दुसरीकडे ती लोप पावत नाही असे म्हणायचे! हे परस्पर विसंगत विधान आहे. कारण ज्ञान ज्ञात्याकडून होत असते (म्हणजेच ते क्रियारूप आहे) आणि अशा क्रियेचा जो कर्ता त्याला ज्ञाता किंवा द्रष्टा म्हणतात. अशी ज्ञात्याकडून होणारी किंवा घडणारी क्रिया (ज्ञानक्रिया) लोप पावत नाही असे विधान करणे कधीच शक्य नाही.)

**सिद्धान्त** - त्यात काहीच विसंगत नाही. सूर्याचा प्रकाशपणा ज्या जातीचा तसे हे द्रष्टेपण आहे. सूर्यादि (पदार्थ) जसे नित्यप्रकाश असूनच स्वतःच्या नित्य प्रकाशरूपानेच प्रकाश देतात असा त्यांच्या विषयात व्यवहार होतो, तसेच इथे समजावे. सूर्य पूर्वी प्रकाशरूप नव्हता, तो नव्याने प्रकाश देऊ लागला या अर्थाने सूर्य प्रकाश देतो असा व्यवहार होत नसतो.

तर मग कसा होतो? त्याच्या स्वतःसिद्ध नित्य स्वभावशक्तीने तो प्रकाश देतो असा व्यवहार होत असतो. (जातो, बोलतो इ. व्यवहारात जशी जाण्याची क्रिया पूर्वी नव्हती आता सुरू झाली, बोलणे पूर्वी नव्हते आता सुरू झाले अशी विवक्षा असते, तसा प्रकार इथे नाही.) **तसा आत्मादेखील स्वतःच्या अविनाशी नित्यज्ञान-शक्तीने ज्ञाता किंवा द्रष्टा म्हणविला जातो.**

तर हे द्रष्टृत्व गौण अर्थाने घ्यायचे काय? नाही. सूर्याचे प्रकाशकत्व ज्याप्रमाणे त्याच्या स्वतःच्या स्वाभाविक स्वरूपात असणाऱ्या नित्य प्रकाशरूप-धर्माच्या अर्थात् क्रियात्मकतेचा स्पर्श नसलेल्या वस्तुधर्माच्या विवक्षेने अभिप्रेत असते व तेच त्याचे मुख्य प्रकाशकत्व असते. तसाच इथे प्रकार आहे. याहून वेगळ्या तऱ्हेच्या प्रकाशकत्वाचा जर संभव असता तर मग गौण-मुख्य-विचार करता आला असता. परंतु तसा प्रकार नसतो. म्हणून सूर्याचे प्रकाशकत्व जसे एकाच प्रकारचे व तेच मुख्य समजले जाते त्याप्रमाणे आत्म्याची साक्षी अवस्थादेखील अशीच एका तऱ्हेची - अर्थात्

क्रियात्मकतेचा स्पर्श असलेली स्वाभाविक ज्ञानरूप असते.

**यावरून द्रष्ट्याच्या दृष्टीचा कधीच अस्त होत नाही या वेद वचनात विसंगतीचा जराही स्पर्श नाही. (भावार्थ)**

श्रीमच्छंकराचार्यांच्या सिद्धांताचे प्रतिबिंब श्रीमहाराजांच्या विवेचनात कसे पडलेले असते ते लक्षातयावे यासाठी जरा विस्ताराने हा विषय इथे घेतला. श्रीदत्तस्वरूप-विचार करताना, तो आणखी विस्ताराने घ्यावा लागणार आहे. म्हणून तूर्त इतके पुरे. परमात्म्याचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे **सम-भाव**. कृष्णामाईचे अंतर्यामीपण व साक्षीपणा प्रतिपादन करीत असताच श्रीमहाराजांनी कृष्णामाईचा **समभाव**देखील अनायासे सुचवून ठेवला असे दिसते. कारण,

**''समं साक्षात् पश्यसि''** या वाक्यात श्रीमहाराजांना सम शब्दाने सर्व जग असा अर्थ अभिप्रेत आहे. **साक्षात् पश्यसि** - थेट पाहतेस या शब्दाच्या जोडीला सम शब्द असल्याने त्याचा सर्व जग असा अर्थ योग्य होय. कृष्णामाईचे कूटस्थपण त्याच अर्थावर आधारलेले आहे हे आपण आत्तापर्यंत पाहिले. परंतु संदर्भप्राप्त अर्थ मान्य करूनही दुसरा अर्थ जर व्यापक संदर्भावर आधारित असेल तर श्रीमहाराज तो नाकरतील काय? मला तसे कारण दिसत नाही.

**वैषम्य-नैर्घृण्ये न सापेक्षत्वात् तथाहि दर्शयति । (ब्र.सू. २.१.३४)**

या ब्रह्मसूत्रात श्रीशंकराचार्यांनी ईश्वरावर वैषम्य व नैर्घृण्य हे दोन देष येऊ शकत नाहीत हे सोपपत्तिक दर्शविले आहे. त्याचाच आधार घेऊन आपल्याला इथेही कृष्णामाईचा समभाव श्रीमहाराजांना सुचवावयाचा आहे असे म्हटले, तर सिद्धांतहानि तर नाहीच, उलट कृष्णामाईच्या ईश्वरीरूपाचा सर्वंकष विचार इथे सुचविला आहे, असा अर्थ निघतो. श्रीमहाराज या अर्थ-व्यवस्थेला कशाला विरोध करतील? यादृष्टीने **''समं पश्यसि''** या वाक्याचा अर्थ तू सर्वांना समभावाने वागविलेस, तुझ्या ठिकाणी दुजाभाव नाही असा अर्थ झाला.

**स्वयंप्रकाशकत्व** - कृष्णामाईचे स्वयंप्रकाशकत्वसुद्धा श्रीमहाराजांनी ''स्वयंज्योतिः'' या संबोधनाने कृष्णालहरीत प्रतिपादन केले आहे. साक्षिभावामध्ये तो अर्थ येतोच. अंतर्यामित्व, साक्षित्व-स्वयंप्रकाशकत्व हे सर्व परमात्म्याचे विशेष, स्वरूपतः भिन्न आहेत असे समजण्याचे कारण नाही. वेगळ्या पैलूंनी तीच गोष्ट सांगायची असा प्रकार आहे. ते म्हणतात,

"तुझ्या प्रकाशाने सूर्य चन्द्र प्रकाशमान होतात. त्यामुळे तुला ते प्रकाशित करू शकत नाहीत. नक्षत्रे सूर्याला जशी प्रकाशित करू शकत नाहीत तसाच इथेही प्रकार." (भावार्थ ३९)

आपल्या या विधानाच्या पुष्ट्यर्थ श्रीमहाराजांनी कठोपनिषद व श्रीमद्भगवद्गीता यांच्या साक्षी घेतल्या आहेत. ब्रह्मसूत्राचीही साक्ष घेतली ती वेगळीच. कठोपनिषद सांगते,

**न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकम् ।**
**नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः ।**
**तमेव भान्तमनुभाति सर्वम् ।**
**तस्य भासा सर्वमिदं विभाति ।**

**कठ. ५.१५, मुण्डक २.२.११**

सूर्य सर्व सृष्टीला प्रकाशित करीत असला तरी तो आत्मस्वरूपाला प्रकाशित करू शकत नाही. चन्द्र, नक्षत्रे, वीजसुद्धा जिथे निष्प्रभ आहेत तिथे आमच्या नित्य पाहण्यात असलेल्या अग्नीबाबत वेगळे काय सांगायचे?

तो परमात्मा सारखा प्रकाशत असल्याने त्याच्या प्रकाशाने - त्याच्या मागोमाग हे सर्व जग प्रकाशू लागते. (ज्याप्रमाणे अग्नीच्या संयोगाने कोलीत जळत असते, स्वतः ते जळू शकत नाही.) त्याच्याच दीप्तीमुळे सूर्यवगैरे प्रकाशमान होतात. (भावानुवाद)

**"न तद्भासयते सूर्यो न शशाङ्को न पावकः।" (गीता १५.६)**

**यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम्**
**यच्चन्द्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धिमामकम्। (गीता १५.१२)**

(जिथे गेल्यानंतर लोक परत येत नाहीत ते माझे परम धाम होय. त्याला सूर्य, चन्द्र आणि अग्नी प्रकाशित करीत नाहीत. (१५.६)

आदित्यामध्ये असणारे जे तेज सर्व जगाला उजळत असते किंवा जे तेज चंद्रामध्ये वा अग्नीमध्ये निवास करीत असते ते माझे तेज होय. (१५.१२))

ही सारी अवतरणे देऊन श्रीमहाराज जो निष्कर्ष काढतात तो महत्त्वाचा आहे. तो लक्षात न घेतला तर तेज, प्रकाश इत्यादि शब्दांचे मर्म स्पष्ट होणार नाही. तेज, प्रकाश वगैरे शब्दांवरून परमात्माप्रस्तुत संदर्भात, कृष्णामाई म्हणजे एक अतिदिव्य तेजोगोल एवढाच अर्थ मनात येईल. कृष्णामाईचा

ईश्वरभाव सांगायला श्रीमहाराज निघाले आहेत हेही आपण इथे लक्षात ठेवायला हवे. त्यादृष्टीने श्रीमहाराजांचे निष्कर्ष वाक्य महत्त्वाचे आहे.

**त्वमेव जगत्कारणम्। श्लोक ३९**

(तूच जगाचे कारण आहेस.)

सूर्य-चन्द्रादि तेजोमय पदार्थांचे दृष्टान्त देण्यात भाव हा आहे की त्यांच्या **तेजामुळे वस्तूंना खरे अस्तित्व लाभते. अंधारात वस्तू असून नसल्यागत असते.** प्रकाशात ती उजळते याचा अर्थ तिला खरे ज्ञानमय अस्तित्व प्राप्त होते. एकूण **तेज ही एका दृष्टीने वस्तूला अस्तित्व प्रदान करणारी शक्ती आहे.** जगातील सर्व वस्तूला असे अस्तित्व कोण देऊ शकेल? ते सूर्यचंद्राचे सामर्थ्य असणे शक्य नाही. **जगाचे जे कारण असेल तेच असे अस्तित्व देऊ शकेल. घड्याला अस्तित्व कोण देईल? माती!! अलंकाराला अस्तित्व कोण देईल? सोने!! तरंगाला अस्तित्व कोण देईल? पाणी!! तात्पर्य कारणच कार्याला अस्तित्व पुरविते. परमात्मा जगाचा कारण म्हणून तोच जगाचा प्रकाशक - असित्व पुरविणारा. कृष्णामाई कोण आहे? जगाचे कारण असणारा परमात्मा!! मग तीच जगाची प्रकाशक असली तर त्यात नवल काय?**

त्वमेव जगत्कारणम् हे वाक्य या दृष्टीने महत्त्वाचे आहे. अंतर्यामित्व-साक्षित्व-स्वयंप्रकाशकत्व या सर्वांच्या मुळाशी हाच जगत्कारण विचार आहे, हे इथे लक्षात घेण्याजोगे आहे. हा महत्त्वाचा स्वयंप्रकाश विचार ज्या श्लोकात आला आहे त्याचा अन्वय श्रीमहाराजांच्या त्यावरील व्याख्येनुसार पुढीलप्रमाणे होतो व तो सुगम वाटू लागतो. तो अन्वय असा,

**भवति, ते भासा जगति तमोनुत् भास्वान् खलु।**

(अगे श्रीकृष्णे, तुझ्या प्रभेने जगात सूर्य, चन्द्र प्रकाशमान झाले आहेत.)

**स्वयंज्योतिः भं तपनमिव त्वां स न भासयते इत्।**

(हे स्वयंप्रकाशशालिनी कृष्णे, नक्षत्रे ज्याप्रमाणे सूर्याला, त्याप्रमाणे चन्द्र-सूर्य किंवा अग्नी तुला निश्चितच प्रकाशित करू शकत नाहीत.)

**अये, भाता त्वा अनुद्युमणि-सहितं सकलं भाति।**

(अगे श्रीकृष्णे तू प्रकाशमान असल्याने तुझ्या मागून सूर्यादि सारी सृष्टि भासते.)

याप्रमाणे अंतर्यामित्व-साक्षित्व व स्वयंप्रकाशकत्व या ईश्वरी कळांचा - स्वरूपभूत शक्तींचा विचार करून दुसऱ्याही काही कळांचा विचार कृष्णालहरीत केला आहे. **आतापर्यंतचा झालेला विचार प्रामुख्याने स्वरूप लक्षणात्मक तर यापुढील विचार प्रामुख्याने तटस्थ लक्षणात्मक म्हणावा लागेल.**

**जगन्निर्मिती**

वेदान्तसूत्रात परब्रह्माची ओळख प्रामुख्याने तटस्थ लक्षणाने करून देण्यासाठी **"जन्माद्यस्य यत:"** (१.१.२) हे सूत्र येते. **तटस्थ लक्षण म्हणजे वस्तूचे नैमित्तिक किंवा प्रासङ्गिक गुणवर्णन.** ज्यावर घड्याळ बसविले आहे ते अमक्याचे घर ही, अशीच ओळख होय. वेदान्त ग्रंथात तटस्थ लक्षणाचे उदाहरण - **'काकवद् देवदत्तगृहम्'** कावळा जिथे बसला आहे ते देवदत्ताचे घर - असे देतात. पण ते जरा टोकाचे उदाहरण होते. त्यावरून तटस्थ लक्षण म्हणजे अगदीच आगन्तुक लक्षण असा भाव होतो. कारण कावळा केव्हाही घरावरून उडून जाऊ शकतो. त्यापेक्षा पूर्वीच्या घड्याळाच्या उदाहरणात आगंतुकतेपेक्षा एकदेशितेचा विचार अधिक जाणवतो. घड्याळ लावलेला भाग म्हणजे सर्व घर नव्हे तर ते घड्याळदेखील काढून टाकता येते. कावळ्याइतके ते आगन्तुक नसले तरी ते पूर्ण घराशी संबंधित नसल्याने काही अंशाने आगंतुकदेखील म्हणता येईल. हा एवढा बारकावा इथे काढण्यात उद्देश एकच आहे की परमेश्वराचे जगन्निर्मातृत्व अगदीच आगन्तुक वाटू नये. ती भगवंताची लीलाच होय. आचार्य म्हणतात,

**यद्यस्माकमियं जगत्बिम्बरचना गुरुतरसंरम्भेवाभाति तथापि परमेश्वरस्य लीलैव केवलेयम् अपरिमित शक्तित्वात् ।**

**ब्र.सू. २.१.३३**

(जरी आम्हाला हा सारा अवाढव्य विश्वाचा व्यापच अचाट उलाढालीचे फलित म्हणून भासत असला, तरी परमेश्वराच्या लेखी ती केवळ लीलाच होय. कारण त्याची शक्ती अपरिमित आहे. - भावार्थ)

श्रीमहाराजांनीसुद्धा

**"विष्टभ्याहमिदंकृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्" इति ।**

**(गीता, कृष्णा ३१)**

(हे सारे जग एकाच अंशाने व्यापून तीन अंशाने मी उरलो आहे.)

अशी जगाची एकदेशिताच प्रामुख्याने सांगितली आहे. तात्पर्य - परमेश्वराचे जगन्निर्मातृत्व ही एकदेशी ओळख होय, पूर्ण नव्हे, पण अगदीच आगन्तुकही नव्हे.

वेदान्तसूत्रात प्रब्रह्म हे जगाच्या उत्पत्ति-स्थिती-संहाराचे कारण एवढाच मर्यादित निर्देश असतो. त्याचेच उपबृंहण पुराणात येते. कारण उत्तप्ति-स्थिति-लय हे समान व्यापार नव्हते. ते जर वेगळे आहेत तर त्याच्या पाठीमागच्या शक्ति वेगवेगळ्या मानल्या पाहिजेत. इथेच रजस्-सत्त्व-तमस् या तीन मायागुणांची संकल्पना व त्याला धरून ब्रह्मा-विष्णु-महेश या तीन देवता जगनिर्मितीच्या संदर्भात वर्णन केल्या जातात. श्रीमहाराज म्हणतात,

कृष्णामाई, तूच ब्रह्मदेवाच्या रूपाने विश्व निर्माण करतेस. विष्णरूपाने त्याचे पालन करतेस व हररूपाने त्याचा तू संहार करतेस. त्या जगाचे नियमन करण्यासाठी ज्या इंद्रादि देवता आवश्यक असतात त्यांनासुद्धा तू आपल्या कलेने निर्माण करतेस. महाप्रलयाच्या वेळी हे सारे जग तुझ्या पोटी विसावते. (श्लोक ३७)

प्रस्तुत श्लोकाला श्रीमहाराजांनी जी लहानशी अवतरणिका जोडली ती या संदर्भात फार अभ्यसनीय आहे. ते म्हणतात,

**ननु जगज्जन्मादिहेतुरात्मा साक्षी नाहमित्यत आह -**

(शंका - जगाच्या जन्म-स्थिति-संहाराला कारण साक्षी परमात्मा असतो, मी नव्हे असे जर तू म्हणशील तर...)

ज्याला उत्थाप्य शंका म्हणतात, तशी घेऊन कृष्णामाईच जगाच्या उत्पत्ति-स्थिति-संहाराचे कारण आहे हे, खुंटा बळकट करावा त्या न्यायाने इथे स्पष्ट केले आहे. या विधानाला आणखी एका दृष्टीने महत्त्व आहे. जन्म-स्थिति-संहाराचा अधिकार केवळ एकट्या परमात्म्याचाच असतो. तो दुसऱ्या कोणत्याही मुक्त पुरुषालासुद्धा घेता येत नाही, हे **'जगद्व्यापारवर्जम्'** (४.४.१७) **या वेदान्तसूत्रात स्पष्ट केले आहे**. एवढेच नव्हे तर श्रीमहाराजांनीसुद्धा **''दर्शयतध्वैवं प्रत्यक्षानुमाने''** (४.४.२०) या वेदान्तसूत्राचा दाखला देऊन ब्रह्मदेवाचासुद्धा मर्यादित अधिकार असतो, तो पञ्चमहाभूते निर्माण करू शकत नाहीत, केवळ चराचरसृष्टीचे भौतिक शरीर तो परमात्माज्ञेने निर्माण करीत असतो असे दाखविले आहे. ते म्हणतात,

**दर्शयतश्चैवं प्रत्यक्षानुमान इति न्यायेन परमात्मन एव पञ्च महाभूतस्रष्टृत्वं हिरण्यगर्भस्य तु परमात्माऽऽज्ञया चराचर सकल–भौतिक शरीरस्रष्टृत्वं चौक्तम् । (श्लोक ४१)**

**यावरून केवढा थोरला अधिकार कृष्णामाईला आहे ते स्पष्ट होते.** उत्क्रान्तीच्या प्रक्रियेतून मोठ्या पदाला अनुक्रमाने चढलेला तो विशेष जीव कृष्णामाई नव्हे, हे यावरून लक्षात यावे. तिच्या आज्ञेने अधिकार घेऊन इन्द्रादि–विभूती काम करीत असतात हेही वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही.

हे सारे जग तिच्यापासून निर्माण झाले असल्याने स्वाभाविकच या सर्व जगाचा विलय महाप्रलयकाली तिच्याच कुशीत होणार हे ओघानेच आले. घडा ज्याप्रमाणे मातीपासून आला असल्याने मातीतच विलीन होतो तसाच हा प्रकार होय. या विलयाची प्रक्रियासुद्धा श्रीमहाराजांनी स्पष्ट केली आहे. ते म्हणतात,

**ततो लयान्ते महाप्रलये सकलं सर्वं जगत् ते कुक्षिम् अव्यक्तरूपं वासना मानसात्मना विशति मुक्तौ वा सकलं कलाभिः सहितम् अधिकारी जगत् हे मङ्गलगते ते कुक्षि स्वरूपं नामरूपोपाधिपरित्यागेन विशति। (श्लोक ३७)**

महाप्रलयाच्यावेळी सारे जग तुझ्या कुशीत अर्थात सूक्ष्म वासनारूप अव्यक्त स्थितीत प्रवेश घेते आणि (अथवा)

मुक्तिसमयी सकल – कलांशाने निर्माण झालेले ब्रह्मादि अधिकारिक विश्व नामरूपोपाधीचा परित्याग करून तुझ्या स्वरूपाशी एकरूप होते. (भावार्थ)

एकरूपतेच्या या दोन प्रक्रिया श्रीमहाराजांनी सांगितल्या आहेत. त्यासाठी **सकल** हा क्लिष्ट शब्द उपयोगात आणला आहे. साऱ्या जगाचे महाप्रलयकाली परमात्म्याशी एकरूप होणे ही प्रक्रिया तत्त्वतः एकरूपतेची प्रक्रिया नव्हे. कारण या एकरूपतेतून पुनः उत्पत्तिकाली अनेकरूपतेत परतता येते. म्हणूनच या अवस्थेला अव्यक्तवासनावस्था असे श्रीमहाराज म्हणतात. प्रत्यक्ष एखादी गोष्ट आपल्याला न करता आली तर ती जशी आपण मनात ठेवतो तसाच हा प्रकार. झोपेतून माणूस परत जागा झाल्यावर जसे पूर्वीचे सारे संस्कार जागे होतात तसेच प्रलयकाली अव्यक्त झालेले विश्व पुनः उत्पत्तिकाली जसेच्या तसे प्रगट होत असते.

परंतु मुक्त पुरुषाचे एकरूप होणे वेगळे. त्या स्थितीतून परत येण्याची

गरज नसते. तिथे वासनारूप स्थिती नाहीच. त्या वासनेचा ज्ञानाने **केव्हाच** नाश झालेला असतो. **केव्हाच** असे म्हणण्याचे कारण ज्या मुक्त पुरुषांचे श्रीमहाराज इथे वर्णन करीत आहेत ते सकल पुरुष होत. जे विशेष अधिकार संपन्न झालेले ज्ञानी पुरुष असतात ते परमात्म्याचे कलावतार म्हणून त्याच्या आज्ञेने इथे या जगाची व्यवस्था चालविण्यासाठी आलेले असतात. तेवढा ते बजावून भगवद्रूपात प्रलयसमयी पूर्णपणे एकरूप होऊन जातात. आपले स्वतंत्र नामरूप उपाधिरूप असल्याने ते टाकून ते एकरूप होतात. हेच श्रीमहाराजांनी,

**''नामरूपेपाधिपरित्यागेन'' (कृष्णा ३७)**

या शब्दाने सांगितले आहे. मूळचे ते एकरूप असले तरी नामरूपाच्या स्वतंत्र अस्तित्वामुळे ते वेगळ्यासारखे भासतात. नामरूपाची स्वतंत्रता नाहीशी होताच ते चिदानन्दघन होतात हा अर्थ.

या अधिकारिक पुरुषाविषयी श्रीशंकराचार्य म्हणतात,

**यथाऽसौ भगवान् सविता सहस्रयुगपर्यंतं जगतोऽधिकारं चरित्वा तदवसान उदयास्तमयं कैवल्यमनुभवति । (शा.भा. ३.३.३२)**

(ज्याप्रमाणे हा भगवान सूर्य युगांची सहस्रसंख्या पूर्ण होईपर्यंत जगावर अधिकार चालवून पुढे ज्याला उदयास्त नाहीत अशा मोक्षपदाचा अनुभव घेतो.)

याप्रमाणे जगाच्या उत्पत्ति-स्थिति-प्रलयाचे मूळ कारण कृष्णामाई होय असा श्रीमहाराजांचा निर्वाळा आहे.

**नियमन सामर्थ्य** - निर्माण झालेल्या जगाचे नियमन हासुद्धा परमात्म्याचा मोठा अधिकार होय. या विषयात उपनिषद्वचनांचा साक्षाद् अनुवाद करूनच कृष्णामाईचे तेही सामर्थ्य श्रीमहाराजांनी वर्णन केले आहे. ते म्हणतात,

श्रीकृष्णे, तुझा प्रभाव एवढा अलौकिक की तुझ्या भीतीने सारे बिनबोभाट आपआपली नेमून दिलेली कमे करीत राहतात. अग्नी ज्वलनाचे काम करतो, वारा वाहतो, सूर्य उष्णता देतो, यमराज मृत्युपात्र पुरुषाला मृत्यू देतो, इन्द्र वृष्टि देतो व वसु प्रभृती अन्य देवतादेखील तुला करभार (आज्ञापालनरूप) अर्पण करीत असतात. (४३)

असे हे कृष्णामाईचे राज्य चालले आहे. कृष्णामाईच्या निरंकुश सत्तेचे वर्णन करीत असता श्रींच्या पुढे,

**भीषास्माद् वातः पवते। भीषोदेति सूर्यः।**
**भीषास्मादग्निश्चेन्द्रश्च मृत्युर्धावति पञ्चमः। (तैत्ति. २.८.१)**

**भयादस्याग्निस्तपति भयात्तपति सूर्यः।**
**भयादिन्द्रश्च वायुश्च मृत्युर्धावति पञ्चमः। (कठ. ६.३)**

ही उपनिषद्वाक्ये होती हे टीकाग्रंथ न वाचतासुद्धा लक्षात येण्याजोगे आहे. श्रींचा या विषयात साक्षेप असा की प्रस्तुत श्लोकात उपनिषद्वचनांचे प्रतिबिंब पडले असले तरी "भीतः" हा शब्द मात्र एकदाच आला आहे. त्यासाठी श्रीस्वामिमहाराज म्हणतात, **"अत्र सर्वत्र भीत इति विशेषणं प्रत्येकं संबध्यते। तथा श्रुतत्वात्।" (५४३)**

(या श्लोकात भीतः - भ्यालेला हे विशेषण अग्नी-वायू, सूर्य-मृत्यू-इन्द्र या सर्वांच्या विषयात लावायला हवे. कारण श्रुतीत तसे सांगितले आहे.

श्रुतिमाउलीचे बोट जराही सुटू द्यायचे नाही ही काळजी!!

आणखी एका श्रुतिवचनाचा संदर्भ देऊन कृष्णामाईचे जगन्नियन्तत्व किती सर्वंकष आहे ते श्रीमहाराज सांगत आहेत. **केनोपनिषदातील** हा प्रसंग. देवांनी असुरांवर जय मिळविला. देवांना वाटले हा आमचाच महिमा आहे. त्यांचा तो गर्व दूर करण्यासाठी परब्रह्म प्रगट झाले. परंतु देवांना परब्रह्माला ओळखता आले नाही. एकेक देवता त्याच्याकडे जाऊ लागली. परब्रह्मच त्यांना आपण कोण अशी पृच्छा करी. प्रत्येकजण आपली ओळख देत असे. परब्रह्म नंतर त्यांना त्यांच्या सामर्थ्याची चाचणी घेण्यासाठी म्हणत असे, हे गवत पुढे ठेवले आहे ते जाळून दाखव, उचलून दाखव. कोणालाही त्या परीक्षेत उत्तीर्ण होता आले नाही. शेवटी इन्द्राची पाळी आली. त्यावेळी तर ते परब्रह्म काही एक न बोलता गुप्त झाले. इन्द्राला फार चुटपूट लागून गेली. तो तिथेच ध्यान करीत बसला. त्याच्यावर करुणा करण्यासाठी परब्रह्म स्त्रीरूपात उमारूपाने प्रगट झाले. त्या दैदीप्यमान आकृतीकडे पाहून इन्द्राने ते गुप्त झालेले कोण होते असा प्रश्न केला. त्यावेळी शरीरधारी ब्रह्मविद्येने उमेने ते ब्रह्म होते असे सांगून त्यांच्यामुळेच तुम्हाला विजय मिळाला ही जाणीव देवांना करून दिली. केनोपनिषदातील हा सर्व कथाभाग श्रीमहाराजांनी कुमारशिक्षेत पद्यरूपात वर्णन केला असून प्रस्तुत उपनिषद्वचन तिथे सविस्तर स्वरूपात कुमारशिक्षेच्या टीकेत उद्धृत करण्यात आले आहे. इथे मात्र संक्षेप आहे, तो हा -

**"तस्मै तृणं निदधावेद्तदहेति तदुपप्रेयाय**

**सर्वं जवेन तन्न शशाक दग्धुम् ।" (केन. ३.१)**

(त्या ब्रह्माने (अग्नीपुढे) गवत ठेवले व म्हटले हे जाळून दाखव.)

अग्नी त्या गवताकडे आला. सारे सामर्थ्य त्याने पणाला लावले. परंतु त्याला ते जाळता आले नाही. (भावार्थ)

हा कथाभाग कुमारशिक्षेत येतो तो ईश्वराचे "प्रत्यक्ष अस्तित्व" सिद्ध करण्यासाठी. तिथे श्रीमहाराज म्हणतात,

**छन्दोगानां श्रुतौ तावदीश्वरास्तित्वमुच्यते। (कुमार ३२)**

**ईश्वरस्य प्रत्यक्षेणास्तित्वम् उक्तमस्ति। (टीका)**

इथे तेच केनोपनिषद्वचन उद्धृत करण्यात कृष्णामाई प्रत्यक्ष ईश्वररूप आहे व तिचे सामर्थ्य अगाध आहे, हेच श्रींना दाखवायचे आहे. कृष्णालहरीच्या प्रस्तुत श्लोकात सामर्थ्य निदर्शक "प्रभाव" शब्द घातला आहे.

**प्रभावस्तेऽपीदग् दहति दहनो वाति पवनो। (४३)**

सामर्थ्य शब्दापेक्षा तो अधिक अर्थवाहक आहे ही श्रीस्वामींची भूमिका दिसते. कारण या शब्दाचे श्रीमहाराजांनी दोन अर्थ केले आहेत.

**प्रकृष्टो भावः सत्ता स्वभावो वा**

(प्रभावः सामर्थ्यं वा । कृष्णालहरी टीका ४३)

प्रभाव शब्दात दोन घटक आहेत प्र आणि भाव. प्र म्हणजे आकृष्ट, उत्कृष्ट. भाव म्हणजे अस्तित्व. तात्पर्य प्रभाव म्हणजे स्वभावविशेष.

किंवा

प्रभाव म्हणजे सामर्थ्य!

हे दोन अर्थ देण्यात श्रीमहाराजांना हे दाखवायचे आहे की, लौकिक सामर्थ्य आविष्कारोन्मुख असले तरी आविष्कार काही नित्य नसतो. तो प्रसंगाने घडत असतो आणि त्याला काहीतरी व्यापार किंवा हालचाल अभिप्रेत असते. अस्तित्वाचा प्रकार तसा नाही. तो नित्यसिद्ध असतो. कृष्णामाईचे सर्व नियमन-सामर्थ्य प्रासंगिकही नाही किंवा व्यापररूपही नाही. मण्याची दीप्ति ज्याप्रमाणे मण्याच्या अस्तित्वाचाच भाग, तसे कृष्णामाईचे नियमन-सामर्थ्य. ते लौकिक सामर्थ्याच्या मिषाने मोजू नये, हा एकूण

अर्थ. कृष्णामाईचा साक्षि-भाव सांगताना जसे "**विकारमन्तरेण**" "**स्वरूप बोधेन**" असे श्रीमहाराज वर्णन करतात त्याचप्रमाणे तिच्या प्रभावाच्याही संबंधात श्रीमहाराजांना म्हणायचे आहे.

शारीरभाष्यात असा विषय येतो की, हे सर्व जग चालविण्यासाठी काहीतरी प्रवृत्तिशीलता आवश्यक आहे आणि परमेश्वर तर प्रवृत्तिशून्य. मग तो जगच्चक्र कसे चालवू शकेल?

आचार्य उत्तर देतात,

> **अयस्कान्तवद् रूपादिवच्च प्रवृत्तिरहितस्यापि प्रवर्तकत्वोपपत्तेः। यथाऽ-यस्कान्तो मणिः स्वयं प्रवृत्तिरहितोऽप्ययसः प्रवर्तको भवति यथा वा रूपादयो विषयाः स्वयं प्रवृत्तिरहिता अपि चक्षुरादीनां प्रवर्तकाः भवन्ति । एवं प्रवृत्ति-रहितोऽपीश्वरः सर्वगतः सर्वात्मा सर्वज्ञः सर्वशक्तिश्च सन् सर्वं प्रवर्तये-दित्युपन्नम् । (शा.भा. २.२.२)**

(लोहचुंबकाप्रमाणे व रूपादि विषयाप्रमाणे प्रवृत्तिरहित वस्तूच्या ठिकाणीदेखील प्रवर्तन सामर्थ्य असू शकते. ज्याप्रमाणे लोहचुंबक स्वतः हालचाल न करता लोखंडाला हलवितो किंवा रूपादि विषय स्वतः प्रवृत्तिस्वरूप नसले तरी नेत्रादि इंद्रियांचे प्रवर्तक होतात, त्याप्रमाणे परमात्मा प्रवृत्तिरहित असला तरी सर्वव्यापी, सर्वस्वरूप, सर्वज्ञ व सर्वशक्ती असल्याने सर्वांना प्रवृत्त करू शकतो हे विधान सुसंगत आहे. - भावार्थ)

कृष्णामाईचे नियमनसामर्थ्य निखळ सत्तास्वरूप आहे. लौकिक नियमन सामर्थ्याची तिथे सरमिसळ करण्याचे कारण नाही. यादृष्टीने प्रस्तुत श्लोकाच्या अवतरणिकेत, उपक्रमात व शेवटी व्याख्येच्या शेवटी (उपसंहारात) श्रीस्वामींनी जोडलेले वाक्य त्यांच्या स्वानुभूतीचे निदर्शक असल्याने अत्यंत मननीय आहे.

> **"त्वं साक्षाद् ब्रह्मेत्याह**
> **अतस्त्वं ब्रह्मासीति भावः" (कृष्णा ४३)**

आपल्या सत्तामात्राने सर्व नियमन करणारी कृष्णामाई प्रत्यक्ष परब्रह्म आहे असा भाव. अनुग्रह सामर्थ्य - तीर्थमाहात्म्याचे वर्णन करीत असता कृष्णामाईच्या अनुग्रह सामर्थ्याचा विषय आलाच आहे. इथे ईश्वरी स्वरूपाच्या संदर्भात एवढेच म्हणता येईल, की आर्तभक्तापासून तों ज्ञानी पुरुषापर्यंत सर्वांनाच समाधान देणारे तिचे स्वरूप आहे. ती वरदा व परदा आहे. (१२)

श्रीस्वामी म्हणतात,

**वरान्वरणीयानर्थान् ददातीति वरदा।**
**न केवलं वरदा किंच पर मोक्षं ददातीति परदा (२)**

(आपल्या दुष्ट कामना पूर्ण करणारी ती वरदा. केवळ वर देणारी नव्हे तर परदा मोक्ष देणारी ती आहे.)

असे तिचे उभयविध स्वरूप असल्याने एकीकडे वन्ध्येला पुत्रलाभ यासारखी लौकिककृपा तिने केली आहे. (१५) तर दुसरीकडे अभयपद देण्याचे समर्थ तिच्यात आहे (३२). **आभूः अत्यन्त व्यापक अस्तित्व असणारी** व म्हणूनच स्वतंत्र असल्याने तिच्या सामर्थ्याला मर्यादा पडण्याचे काही कारण नाही. श्रीस्वामी म्हणतात,

**आसमन्ताद्भवति अस्तीत्याभूः ... हे आत्मरूपिणि। अत एव अपारन्त्र्यात् हे स्वतन्त्रे, स्वच्छन्दे। अत एव सन् प्रशस्त प्रसन्नमन्त्रो गुप्तवादः यस्याः।**

हव्या त्या रूपाने प्रगट होऊन हव्या त्या कृपेचा वर्षाव करणारा कृष्णामाईचा हा करुणा विग्रह आहे. याप्रमाणे श्रीमहाराजांनी कृष्णामाईचे ईश्वरी स्वरूप सगुण-निर्गुण अशा दोन्ही अंगाने किंवा स्वरूप लक्षण - तटस्थ लक्षण अशा दोन्ही रूपात अथवा आर्तभक्ताची मायमाउली (१५) व ज्ञानी पुरुषांसाठी मोक्ष-दानी (अभयपद ३३) लीढ-मरणम् (२१) अशा उभयविध भूमिकेत चित्रित केले आहे.

### *हरिहरात्मत्व*

कृष्णामाईचे सगुणरूप वर्णन करीत श्रीमहाराज एका वैशिष्ट्याकडे सारखे लक्ष वेधत आहेत. ते आहे कृष्णेची हरिहर-रूपता. या विशेषाचा त्रोटक निर्देश पूर्वी आला आहे. इथे त्याचा थोडा तपशील द्यावासा वाटतो. कारण दत्तसंप्रदाय, वारकरीसंप्रदाय, शांकरसंप्रदाय या तिघांचे ते व्यावर्तक वैशिष्ट्य आहे. श्रीस्वामींच्या जीवन-निष्ठेचाही तो भाग आहे हे वेगळे सांगण्याची गरज नाही. प्रारंभीच ते म्हणतात,

कृष्णा हरिहरस्वरूपिणी आहे म्हणूनच ती दत्तप्रभूची आवडती झाली.

**हरीशात्मा कृष्णा यत इयमभूद् दत्त दयिता। (५)**

श्रीव्यासांनीसुद्धा, **कृष्णा विष्णुतनुः साक्षाद् वेण्या देवो महेश्वरः**

असे म्हटले होतेच. (लहरी टीका ५)

त्याच आधाराला घेऊन श्रीस्वामी म्हणतात, हरि व हर या दोन शब्दात मूळ एकच आहे आणि तो आहे हृ धातु. अंतर केवळ प्रत्ययाचे आहे. हृ + अ = हर, हृ + इ = हरि.

**प्रकृत्यैक्यं भिन्न न हरिहरयोः प्रत्ययवशाद् (२०)**

हृ धातु ही प्रकृती दोन्ही शब्दात एकच आहे. पण प्रकृती शब्दाचा गुणात्मक प्रकृती असा अर्थ घेतला तर मात्र हरीची सत्त्वगुणात्मक प्रकृती व हराची तमोगुणात्मक प्रकृती असा "प्रकृती"चा वेगळेपणाही दिसतो. पण पुढे आणखी विचार केला तर गुणात्मक प्रकृतीचा मुद्दा फारसा टिकत नाही. कारण सत्त्वगुणाचा वर्ण शुभ्र व तमोगुणाचा वर्ण काळा असे समीकरण दिसते. ते तर हरिहरांना मुळीच लागू होत नाही. 'हर' हे कर्पूरधवल तर 'हरि' हे मेघश्यामल आहेत. त्यामुळे गुणात्मक प्रकृतीचा मुद्दा मूलभूत म्हणता येत नाही. केवळ वरकरणी दाखविण्यासाठी हा पृथग्भाव आहे. मुळातील चैतन्यस्वरूपता एकच आहे.

**चिद्रूपेणैकत्वात् । (२० टीका)**

कधी द्व्यर्थी शब्दाच्या आडोशाने, कधी पौराणिक संदर्भाचा दाखला देऊन तर कधी वरीलप्रमाणे स्पष्ट शास्त्रीय विवेचन करून श्रीमहाराजांनी हरिहराद्वैतभावावर कृष्णालहरीत विशेष भर दिला आहे.

**श्रुतमपि यशोऽजस्य हि तदा ।।१९।।**

या श्लोकात श्रुत शब्दाचे दोन अर्थ श्रीमहाराज देतात,

**अजस्य = विष्णोः शंकरस्य च । (१९ टीका)**

कृष्णामाईचे दर्शन घडण्यासाठी काही पूर्वसुकृत गाठी असावे लागते. त्या अनेकविध सुकृतांपैकी एक आहे शंकराचे अथवा विष्णूचे कीर्ति-श्रवण!

अज शब्दासारखा दुसरा द्व्यर्थी शब्द आहे अ-भव.

श्रीमहाराज म्हणतात,

**अः वासुदेवः भवः शिवः। तत्स्वरूपिणी हरिहर स्वरूपिणी। (२८ टीका)**

कृष्णामाई वासुदेव व शंकर अशी उभयविध आहे. अ-भव शब्दाचा हा श्लेष महत्त्वाचा आहे, तो या दृष्टीने की याच "अभव" शब्दाचा

“भव निवर्तक = संसार निवर्तक” असा अर्थ यापूर्वीच्याच श्लोकात श्रीमहाराजांनी दिला आहे। (२७). यावरून कृष्णामाईचे संसार-निवर्तन-सामर्थ्य “अभवत्व” तिच्या या उभयविधत्वात हरिहात्मकतेत - अभवत्वात - निहित आहे असाही एक निष्कर्ष भाविक मनाला काढता येईल. कृष्णेचे **पूर्ण नाव कृष्णा-वेणी आहे.** केवळ कृष्णा नव्हे हे “अभवे” या शब्दाच्या विवरणावरून म्हणावेसे वाटते.

**अभवे कृष्णावेणि (२८)**

काही लोकांना अज, अभव इत्यादि शब्दांचे केलेले हे दोन अर्थ ओढाताणीचे वाटू शकतात. काहीचा श्लेषालाच आक्षेप असतो. काव्यात त्याला कितपत स्थान द्यावे याविषयीसुद्धा काही वर्तुळात चर्चा चालत असते. पण या ठिकाणी महत्त्वाचा मुद्दा आहे कृष्णामाईचे प्रत्यय-पूत उभयविधत्व. आपल्या अनुभवाचा एखादा विषय इतरांच्या दृष्टीला अ-प्रासंगिक वाटतो. या गोष्टीचा श्रीस्वामिमहाराज कशाला विचार करीत बसतील? त्यांना कोटीक्रम करीत वेगवेगळे अर्थशिल्प उभारीत बसायचे नव्हते. श्लेषालंकार त्यांना सोयीचा वाटला तो यासाठी, की त्या अलंकारात दोन्ही अर्थ “एकवृत्तगत फल-द्वय” न्यायाने सारखेच प्रस्तुत असतात. कृष्णामाईचे हरिहरात्मत्व पुराणांनीसुद्धा समर्थिले आहे. याचा अर्थ पूर्वापर अनुभूतीचा विषय असलेली ती सांस्कृतिक धारणा आहे. काही संप्रदायांचे ते उपासना-वैशिष्ट्य आहे. याचा अर्थ मनाची विशिष्ट पारमार्थिक घडण होण्यास त्या उपासना वैशिष्ट्याचा फार उपयोग आहे. असा हा अत्यंत महत्त्वाचा विषय श्लेषालंकाराच्या आश्रयाने जर प्रभावीरीतीने, प्रत्ययकारितेने मांडला जात असेल तर श्रद्धाशील मनाला त्यात आनंदच होणार. त्याला ती ओढाताण वाटण्याचे कारण नाही.

श्रीमहाराजांनी कृष्णामाईचे इतर लोकमताशी असलेले सौहार्द-संबंध चित्रित केलेले आपण पाहिले. त्यात वेणी-कृष्णा संगम, हरिहर भेटीचा प्रसंग त्यांनी मुद्दाम स्वतंत्र श्लोकात गुंफला आहे. तसा विचार केला तर कोयना-कृष्णा संगम प्रथम कऱ्हाडात होतो व नंतर वाडीजवळ कृष्णेला वेणी मिळते. परंतु अग्रक्रम श्रीमहाराजांनी कृष्णा-वेणीला दिला आहे. कोयना म्हणजे ब्रह्मदेव व कृष्णा म्हणजे विष्णु. अर्थात् हा पितापुत्राच्या भेटीचा प्रसंग होय. परंतु त्यालाही उपमानभूत असणारा कृष्णा-वेणी संगम होय असे श्रीमहाराजांना म्हणायचे आहे. ते म्हणतातच,

**अतोऽयं पितृ-पुत्र-सङ्गमः वेणी-कृष्णयोस्तुल्यत्वात् प्रीति-संगमः । (श्लोक ४१ टीका)**

वेणी-कृष्णा संगमासारखा असल्याने हा कृष्णा-कोयना संगम पिता-पुत्र भेटीचा प्रसंग - प्रेमप्रसंग होय. दोन पाणलोटांचे व तेही भौगोलिक कारणामुळे एकत्र येणे हा या संगमाचा अर्थ नाही. ते दोन हृदयांचे मीलन आहे. त्यातही कृष्णा-वेणीच्या संगमाचे स्थान आगळे आहे. कारण ते दोन अन्योन्य हृदयांचे अन्योन्य मीलन आहे. पिता-पुत्र संबंधात ज्येष्ठ-कनिष्ठतेचा भाव राहू शकतो. इथे तो संभव नाही. वरील वाक्यातील श्रीमहाराजांची पद-रचना फार मार्मिक आहे.

**वेणीकृष्णयोस्तुल्यत्वात्** - वेणी व कृष्णा तुल्य असल्यामुळे - असे श्रीमहाराज म्हणत आहेत. कोयना-कृष्णा संगम कृष्णा-वेणी संगमासारखा आहे हा एक अर्थ, पण त्यासोबतच वेणी-कृष्णा या समान आहेत, त्यात कोणीच ज्येष्ठ-कनिष्ट नाही, हा जो भाव "**वेणीकृष्णयोस्तुल्यत्वात्**" या पदरचनेतून श्रीमहाराजांनी सुचविला तो मला अपूर्व वाटतो. मित्र-मित्राचे नाते जिवाभावाचे - समभावाचे नाते असते. ते आत्मिक आहे. "आंगिक" नाही. म्हणूनच श्रीमहाराजांनी "मित्र मित्र जरी भांडती" (स्तोत्रादिसंग्रह ३२५) या एका अभंगात मित्रप्रेमाला अग्रमान दिला आहे. ज्ञानोत्तर भक्तीच्या सूर आळविणाऱ्या त्या गाण्यात मित्रप्रेमाची जी प्रथम आठवण श्रीमहाराजांना होते ती यदृच्छेने होते अथवा लौकिक मित्रांच्या स्मरणाने होते असेही समजण्याचे कारण नाही. त्या मित्रप्रेमाच्या तळाशी त्यांना जे हरि-हरांचे चिदैक्य (२०) जाणवते त्याचा हा खरा उद्गम आहे. परभक्तीच्या सुराला साथ लौकिक मित्रांची मिळेल की या अ-लौकिक मित्रांची? हरि-हराद्वैत हा कृष्णालहरीचा एक महत्त्वाचा संदेश होय यात शंका नाही.

### ***कृष्णेची आळवणी***

लहरी वाङ्मयात भाविक मनाचा लडिवाळपणा प्रतिबिंबित होणे स्वाभाविकच म्हटले पाहिजे. त्या अनुषंगाने आपल्या आराध्याचे गुणगानसुद्धा येणारच. तथापि ते विशेषणांची मुक्त उधळण करूनच होत असते असे नाही. कृष्णालहरीत मात्र तसे झाले आहे. साहित्यशास्त्रात "**परिकर**" नावाचा **अलंकार साभिप्राय विशेषणांच्या यथोचित मांडणीवरच आधारला असतो. कृष्णालहरीत त्याचे मनोज्ञ दर्शन घडते.** ही विशेषणे लहरीतील क्रमाहून वेगळ्या क्रमाने मांडता येतील काय हा एखाद्या प्रतिभासंपन्न

पुरुषाने चित्रित करण्याजोगा विषय आहे. कृष्णालहरीतील अर्थक्रम जसा पाठक्रमाहून वेगळा मानता येतो तसे विशेषणांचेसुद्धा का होऊ नये? **कृष्णेची स्निग्धश्यामल चतुर्भुज मूर्ती आणि तिने ल्यालेली ही विशेषणांची रत्नमालिका यांचा मेळ घालून असा प्रयत्न व्हावा.** कृष्णामाईची सगुण साकारता त्यामुळे आणखी उठून दिसेल. **प्रथमान्त विशेषणे व संबोधनान्त विशेषणे यांची येथील बेरीज साधारणतः दोनशेच्या घरात सहज जाते. शमिततृष्णे व गुरुमते** ही विशेषणे तर पालुपदाच्या स्वरूपात जवळ जवळ सर्व लहरीभर आळवली आहेत. इतरही पुनरावृत्त काही विशेषणे आहेत. त्यांचा साकल्याने विचार करता येण्याजोगा आहे. यावरून एक व्यक्तिरेखा साकारली जाईल. या विशेषण मालिकेवरून कृष्णामाईचा एक विशेष परिचय होऊ लागतो तो काहीसा लौकिक तर काहीसा अलौकिक म्हणता येईल.

कृष्णामाई राजकन्या आहे - धरेन्द्रतनया (४९), सह्यतनया (२१), तिचे रूप सावळे व नीटस आहे. असिता (३३, ४९), विमला (३३), अमला (४८).

तिच्या रूपाला वर्षाकालीन मेघाची स्निग्ध श्यामलता व इन्द्रनील मण्याची झळाळी आहे.

सजल जलद श्यामल तनु (१) मणिद्युति (४९) तिच्या चालण्याला एक डौल आहे.

सुगति (२५) यात मांगल्य भरले आहे. मंगलगति (३७) लगबग हा त्यातील विशेष द्रुत-रया (१३)

दिसायला ती सुन्दर आहे हे वेगळे सांगायला नको. उशती - कमनीया (३४) मनोल्हादा (४३) तिच्या रूपाचे अनेक आयाम आहेत.

लौकिक-अलौकिक व गुणमय.

लौकिकदृष्ट्या ती प्रवाहरूप - नदीरूप आहे हे तर स्पष्टच आहे.

वरोदा (२४), सरिता (२६, ३१), नदी (४९), उदकात्मा (३८), सरित प्रवर (४८), अम्मया (४९)

भाविक-अभाविकांना सहजदृश्य असणारे ते रूप होय.

दुसरे तिचे अलौकिक रूप - चतुर्बाहु, तडिद्वासस् इ. प्रथम श्लोकातच येते. ते मात्र दुर्लभ. निगमगणगेय, योगिध्येय, वेदवेद्य, देवेड्य (५१) भगनुत = सूर्यस्तुत (२९), सर्वमुनि-देव-तीर्थ वन्दित (४९), ते हेच रूप. याच रूपाला श्रीमहाराज निजरूप म्हणतात (३४). त्याच ध्यानमंगल रूपाच्या

दर्शनाची त्यांना ओढ आहे (३४).

या साकारतेसारखी तिची एक गुण-मय मूर्ती आहे. तिच्या अनंत गुणांचा तो मूर्तिमंत आलेख आहे. आर्त भक्तापासून तों ज्ञानी भक्तांपर्यंत सर्वांनाच त्यांचे गुंजन करता येईल. या रत्नावलीत मध्यमण्याचा मान कोणाला द्यायचा? उत्तर सोपे नाही. सर्वांनाच तो आलटून पालटून देता येईल असे देखील एक मत असू शकते. तथापि कृपा-कृष्टा (५१) अनुकंपोदया (४९) ही दोन विशेषणे प्रथम लक्ष वेधतात. कृष्णा हे नाव ज्या कृष् धातूपासून आले त्यालाच धरून कृपाकृष्ट हे विशेषण साधले आहे. कृष्णा पदाची दुसऱ्या श्लोकात दिलेली व्युत्पत्ती आणखी वेगळीच आहे.

(कृषिर्भूवाचकः अकारो (णकारो असावे) निवृत्तिवाचकश्च तद्योगात् सदानन्दरूपिणि कृष्णा - श्लोक)

अनन्ताचे गुण अनन्त असणार, पण कृपाकृष्ट व अनुकंपोदया ही दोन्ही विशेषणे काही अंशी समानार्थक व पुनः कृष् धातूशी निगडित म्हणून त्यांचा उल्लेख प्रथम केला एवढेच. तिच्या चिदानन्दरूपतेचे प्रतिबिंब याच विशेषणातून उत्कटतेने प्रत्ययाला येते. म्हणूनही या विशेषणाच्या जोडीला आगळे महत्त्व! कृपेने ती भक्ताकडे ओढली जाते किंबहुना कृपेचा उदयच तिच्यापासून झाला असा तिचा करुण विग्रह आहे. मूळच्या चिदानन्दतेची ती काढलेली आभा आहे. तिने सजल-जलद-श्यामल रूपसुद्धा कृपादृष्टीचे द्योतक म्हणूनच पत्करले आहे असे दिसते.

सत्यसंधा हे विशेषणसुद्धा तेवढेच अर्थगर्भ. संधा म्हणजे प्रतिज्ञा. तिची प्रतिज्ञा कोणती?

**सत्या सन्धा प्रतिज्ञा । न मे भक्तः प्रणश्यति इत्यादिरूपा । (५१)**

माझ्या भक्ताची कधीच हानी व्हायची नाही ही प्रतिज्ञा. या प्रतिज्ञेवर ती अढळ आहे. प्रतिज्ञेची ही सत्यतासुद्धा तिच्या नामातील अस्तित्व निदर्शक 'कृष्' (श्लो. २) पदाशी संवादिनी आहे. तात्पर्य, कृपाकृष्ट व सत्यसंध ही दोन्ही विशेषणे विशेष्यातूनच आली असल्याने स्वभावरूप आहेत. इतर सारी विशेषणे या दोन विशेषणांना मध्ये घालून तिचे प्रभावलय उजळत आहेत असे दिसते. त्यांचा अनुक्रम अथवा वर्गीकरण आपआपल्या अभिरुचीप्रमाणे अथवा भूमिकेप्रमाणे वेगळा राहू शकेल. श्रीमहाराजांनी मात्र तिची काही विशेषणे - नव्हे बिरुदे - एकाच श्लोकात घेतली आहेत.

त्रितापघ्नी - आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक दु:ख दूर करणारी.

ईतिघ्नी - अतिवृष्टि, इ. नैसर्गिक व राजकीय आपत्ति दूर करणारी.

विविधवरदात्री - आपल्या भक्तांना वेगवेगळे वर देणारी.

ऋणहरा - देव-ऋषि-पितृऋण दूर करणारी.

त्रितापघ्नी - कायिक-वाचिक-मानसिक पाप दूर करणारी.

भी-घ्नी - दृष्ट व अदृष्ट भय दूर करणारी.

पतितपावनी - महापापी पुरुषांनासुद्धा शुद्ध करणारी.

अघहरा - व्यसन दूर करणारी.

श्रीमहाराजांनी "**अहो दु:ख-व्यसनेष्वघम्**" - पाप-दु:ख अन् व्यसन असे कोशातील तीन अर्थ दाखवून **व्यसनहर्ती** असा अर्थ दिला आहे. (३०)

नद्यांत श्रेष्ठ (३) याप्रमाणे (२१) व (४९) हे दोन श्लोकदेखील विशेषण बहुल आहेत.

ही सारी विशेषणे इतकी सर्वंकष आहेत, की आता कोणत्याही जीवनाच्या समस्या उरल्या असतील असे वाटत नाही. "ईतीमध्ये" नैसर्गिक व राजकीय समस्या अन्तर्भूत होतात. 'ऋण' संकल्पनेमध्ये सांस्कृतिक, सामाजिक व कौटुंबिक समस्यांचा अंतर्भाव होतो. "त्रिताप" संकल्पनेमध्ये व "अघ" संकल्पनेमध्ये (३) अथवा आधि (मनस्ताप) (४८) संकल्पनेमध्ये व्यक्तिगत समस्यांचा अंतर्भाव होतो. त्या सर्वांच्या निराकरणासाठी एक शरण असणारी सहजप्राप्य असणारी कृष्णामाई आहे. ही सर्व बिरुदे न आठवली तरी "वरदे" "परदे" या दोन विशेषणात अभ्युदय नि:श्रेयसाच्या दोन्ही वाटेवरती जिचे बोट धरून निर्धास्तपणे चालता येईल असे कृष्णामाईचे "गुणमय" विभूतिमत्व आहे.

### *पूर्वसुकृत व कृष्णाप्रेम यांचा संबंध*

दुखण्यावर एखादा सुलभ उपाय असला तरी तो गवसण्यासाठी अनुकूल काळ यावा लागतो. ती अनुकूलता पूर्वसुकृताची असते. त्या पूर्वसुकृतात यज्ञ-याग-दानासारखे सत्कर्म, लोकोपयोगी कामाची उभारणी, स्वाध्याय, गायत्रीसारख्या जपाची यथाधिकार अनुष्ठाने, भगवद् गुणानुवाद श्रवण इत्यादींचा समावेश असतो. या पूर्वसुकृतामुळे ज्यांचे चित्त शुद्ध झाले असेल, त्यांना कृष्णामाईच्या सामर्थ्यावर विश्वास बसेल व ते तिच्या सेवेला लागतील. विश्वास किंवा श्रद्धा या दोन शब्दांचा अर्थ बुद्धीला रजा असा

लोकांना वाटतो व ते श्रद्धेच्या मार्गाला बिचकतात. श्रीशंकराचार्यांनी श्रद्धेचे केलेले विश्लेषण यादृष्टीने फार अभ्यसनीय आहे. ते म्हणतात.

**यद्यपि न्यायागमाभ्यां निर्धारितोऽर्थस्तथैवेव्यवगम्यते, तथाप्यत्यन्तसूक्ष्मेष्वर्थेषु बाह्यविषयासक्तमनसः स्वभाव प्रवृत्तस्यासत्यां गुरुतरायां श्रद्धायां दुरवगमत्वं स्यादित्याह श्रद्धत्स्वेति। श्रद्धायां तु सत्यां मनसः समाधानं बुभुत्सितेऽर्थे भवेत्ततश्च दर्यावगतिः। अन्यत्र मना अभूवम् इत्यादि श्रुतेः।**

**छां. ६.१२.२**

उपपत्ती व शास्त्रवचन यांच्या आधारे एखादी वास्तवता तशीच आहे असे जरी कळते, तथापि बाह्यविषयात मन रमलेल्या व निसर्गप्रवृत्तीनुसार वागणाऱ्या व्यक्तीला दृढतर श्रद्धा जर नसेल तर त्या वास्तवतेचे आकलन कष्टाने होते. श्रद्धा जर असेल तर मात्र ज्या विषयाचे ज्ञान करून घ्यायचे आहे त्याविषयी एकाग्रता होते व त्या वास्तवतेचा नीट बोध होतो. कारण श्रुतीत म्हटले आहे की, ''माझे लक्ष दुसरीकडे होते म्हणून मला ऐकू आले नाही.'' - भावार्थ.

**या अवतरणावरून श्रद्धा म्हणजे बुद्धीला रजा असा अर्थ नसून अत्यंत सूक्ष्मवस्तूच्या साक्षात्कारासाठी मनाने अवलंबिवेली एकाग्रता होय. पूर्वसुकृताने चित्त शुद्ध होते, याचा अर्थ कोणतेही इतर मलिन व स्थूल विषय मनात फारसे राहिनासे होतात व सूक्ष्म विषयाच्या ग्रहणासाठी मन मोकळे राहते. तसे नसेल तर या जन्मी तरी कृष्णामाईची सेवा करून - अवगाहन ही सेवाच आहे.**

**कृष्णां वृणुते स्नानादिना भजते । (५२)**

मन शुद्ध करून एकाग्रतेच्या प्रक्रियेकडे वळता येईल. इतर सारी साधने या एका साधनात आपले सामर्थ्य ओततील असा श्रीस्वामींना भरवसा आहे.

**''अपि स्नातं तीर्थं सकल'' (२५)**

हा श्लोक त्यासाठी. पण तिथेही ''विधिवत्'' (२५) शब्दाकडे लक्ष द्यायचे आहे हे विसरता येत नाही. ही एक परमार्थाची प्रक्रिया आहे. पळवाट नव्हे. त्यामुळे काही निर्बंध आवश्यक असणारच. पण या अटी न पाळल्याने सारे वाया जाईल असेही समजण्याचे कारण नाही. मागे हा विषय थोडा आला आहे. वस्तुशक्तीचा काही लाभ मिळतच असतो त्यामुळे अनेकांचा

उद्धार झाला हे मागे दर्शविले आहे.

### *कृष्णेने पावन केलेले जीव*

या उपकृत जड-जीवात जलचर, पक्षी, कृमी, कीटक, गाई, बैल यांसारखे ग्राम्यपशु, हरिणासारखे वनपशु अशा अनेकांचा समावेश आहे. केवळ स्नान व जलपान एवढ्या सामग्रीवर ते स्वर्गाचे अधिकारी झाले आहेत. (२३)

मनुष्यामध्येसुद्धा अत्यंत दुष्ट, व्यभिचारी, चोर व अत्यंत संस्कारभ्रष्ट जीव याच स्नान-पुण्याने स्वर्गगंतीला गेले आहेत. अशा निकृष्ट लोकांचे उदाहरण यासाठी द्यायचे, की जाणीवशून्य जीवनांना जर हा लाभ मिळू शकतो, तर ज्यांना शुद्ध संस्काराचा ब्राह्मणजन्म मिळाला असेल व शास्त्रशुद्ध आचरण ज्यांच्याकडून घडत असेल, त्यांना तसल्याच कर्मामुळे उत्तम गतीचा लाभ सुनिश्चितच मिळेल हे लक्षात यावे. (२४)

### *कृष्णेजवळ मागणे*

कृष्णामाईच्या सामर्थ्यामुळे अनेक लहान-थोर जीवांचा उद्धार झाला असला, तरी उद्धाराचे तात्त्विक स्वरूप काय हा प्रश्न उरतो. जीवनामध्ये अनेकविध समस्या असतात. वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, राजकीय असे त्यांचे स्वरूपदेखील वैचित्र्यपूर्ण असते. त्या समस्या उद्भवल्यानंतर त्यांना उत्तर देणे क्रमप्राप्त असते. अशावेळी कृष्णामाईच्या सहाय्याचा हात पुढे आहे ते तिच्या नानाविध बिरुदांवरून स्पष्ट आहे. परंतु यात अंतिम लक्ष्य कोणते हा महत्त्वाचा प्रश्न. एरवी समस्यामागून समस्या निर्माण होत राहतात व अंतिम उद्दिष्ट कधीच दृष्टीच्या टप्यात येत नाही. तसे होऊ नये व प्रासंगिक समस्या सोडवीत असता किंवा सुटत असता एक अवधान अंतिम बिंदूकडे असायला हवे. कृष्णालहरीत त्यासंबंधी सुस्पष्ट मार्गदर्शन आहे.

जीवनाची मुख्य समस्या 'तृष्णेची' आहे हे अगदी आरंभापासून श्रीमहाराज जीव तोडून सांगत आहेत. शमित-तृष्णे हे पालुपद त्यासाठीच आहे. मंत्रगर्भ स्तोत्रांची निर्मिती हे श्रीमहाराजांचे लेखनवैशिष्ट्य. कृष्णालहरीतील जर उघडा मंत्र कोणता असेल तर तो आहे,

**नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ।**

श्रीमहाराज कृष्णामाईला म्हणत आहेत, ''वणवण फिरलो, चारी दिशा पायाखाली घातल्या, जीवनाची संध्याकाळ येऊन ठेपली पण दुष्ट आशेने

माझा पिच्छा सोडला नाही. परंतु तुझी दृष्टी पडताच आशा शांत झाली (२२).'' श्रीमहाराज त्यावर निष्कर्ष काढतात,

**त्वदन्यन्नोवीक्षे सुलभशरणं लीढमरणम् । (२१)**

लीढ शब्द 'लिह्' - चाटणे या धातूपासून झाला आहे. हा विसावा घेतला की मृत्यू चाटून-पुसून जातो. त्याचे नाव उरत नाही असा अर्थ. कृष्णामाईचा विसावा लाभण्याचे हे सामर्थ्य आहे. एकूण कृष्णादर्शन - तृष्णाशान्ति - मृत्यूपासून सुटका - अशी ही साखळी आहे. आपल्या विविध आकांक्षा असल्या तरी व त्या पूर्ण करण्यासाठी कृष्णामाई तत्पर असली तरी अंतिम उद्दिष्ट वासनानिवृत्तीचे व मृत्युनिवृत्तीचे असले पाहिजे.

हे उद्दिष्ट नकारात्मक आहे असे सकृत्दर्शनी वाटते खरे पण ते तसे नाही, हे कृष्णालहरीच्या प्रथम श्लोकाच्या व्याख्येतच श्रीमहाराजांनी स्पष्ट केले आहे. परमानन्दावाप्ति हे जीवनाचे चरम लक्ष्य आहे असे तिथे प्रतिपादन आहे.

**ज्ञानं विना नित्य निरूपाधिक निरतिशय स्वरूपभूत परमानन्दता आत्मनावस्थानासंभवात् । (श्लोक १ व्याख्या)**

असे श्रीमहाराजांचे शब्द आहेत. **नकार हे अंतिम उद्दिष्टाचे पूर्वरूप तर सकार हे उत्तररूप असेही वेगळ्या शब्दात म्हणता येईल. तृष्णानिवृत्ती हे नकारात्मक पूर्वरूप तर आनंदप्राप्ती हे सकारात्मक उत्तररूप मानता येईल.**

कृष्णेजवळ आपले मागणे मागत असतांनासुद्धा श्रीमहाराजांनी नकार-सकाराची ही जोडी आणली आहे. ते म्हणतात, मला समृद्ध राज्य नको, देवदेवतांचे स्थान मला नको. इन्द्र-सूर्याचे अधिकार मला नकोत. पुनरावृत्तिरहित असणारे वैकुण्ठपद मला नका; तर श्रीदत्तात्रेयांच्या पावलांनी पावन झालेला तुझा किनारा मला हवा. (६)

मला विषयभोग नको, षडङ्ग योग मला नको, दुरितांचा नाश मला नको, वेदांचे सांग अध्ययन मला नको, आरोग्य मला नको. गंगाजल मला नको. यज्ञानुष्ठान नका, स्वर्ग मला नको, मला तुझा सतत योग हवा. (७)

नकाराची केवढी व्याप्ती या ठिकाणी श्रीमहाराज दाखवीत आहेत ते अभ्यसनीय आहे. **ज्या विषयांना आपले मन नकारात घालायला स्वप्नातही धजणार नाही, तेसुद्धा विषय श्रीमहाराजांनी पूर्णपणे**

**अव्हेरले आहेत. यालाच एकान्त-निष्ठा म्हणतात.** ज्या स्वरूपभूत आनंदाचा लाभ हे जीवनाचे अंतिम लक्ष्य आहे असे ते म्हणतात, तो या एवढ्या नकारावर आधारलेला असतो. या नकारातून पार गेल्यावाचून तो लाभ मिळायचा नाही हा श्रीस्वामींचा ठाम निश्चय आहे. केवळ मृत्युनिवृत्ती म्हणजेही सर्व काही नव्हे. तसे असते तर वैकुण्ठपदही नको असे ते कशाला म्हणाले असते? त्याविषयी ते म्हणतात,

> **ननु आ ब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावृत्ति न इति तदन्तानां पुनरा-वृत्तिश्रवणात्पूर्वोक्तसर्वपदापेक्षया पुनरावृत्तिरहितं वैकुण्ठाख्यं विष्णोः पदं तवाभिमतमित्यत आह वेवेष्टीति विष्णुः नारायणः तस्य पदमपि न ममाभिमतम् । (श्लोक ६ व्याख्या)**

"शंका - ब्रह्मभुवनापर्यंत सारी भुवने पुनरावृत्तीच्या चक्रात अंतर्भूत होतात. म्हणून पूर्वी वर्णन केलेल्या (इन्द्र-सूर्य प्रभृतींच्या पदापेक्षा) पुनरावृत्तिरहित असणारे, विष्णूचे वैकुण्ठ तुला हवे असेल?

उत्तर - सर्वांना व्यापतो तो विष्णुनारायण त्याचे पददेखील मला नको." (भावानुवाद)

मुद्दाम शंका घेऊन त्याचे निराकरण वरील विवेचनात करण्यात आले आहे. त्यातील भाव आपण ओळखायला हवा. काहीच नको असे म्हणता बरोबर जगातील कोणतीच व्यवस्था नको असा त्याचा अर्थ निघतो. राज्य नको या म्हणण्याचा अर्थ एकदाचा समजू शकेल. विषयभोगाची आवडसुद्धा त्याच जातीची, पण सांग वेदाध्ययन नको आणि आता वैकुण्ठदेखील नको या म्हणण्याचा अर्थ कसा करायचा?

त्याचा अर्थ एवढाच, की भगवत्प्रेम असेल तर या सर्व वैभवाला अर्थ; नसेल तर नाही, इतकी भगवत्प्रेमाची "**निरतिशयता**" लक्षात यावी. कृष्णालहरीच्या प्रास्ताविकातील "**निरतिशय**" शब्द फार महत्त्वाचा आहे. त्यापुढे आणखी कोणता आनंद जर उरत असेल तर व तो आणखी सरस असेल तर प्रास्ताविकातील "निरतिशय" शब्दाला कोणता अर्थ उरेल?

कृष्णामाईचे प्रेम म्हणजे आगन्तुक व्यक्तीविषयीचे प्रेम किंवा आत्मभिन्न देवतेविषयीचे प्रेम असाही भाव श्रींच्या मनात नाही. "तू साक्षात् परब्रह्म आहेस." (४३) असे त्यांनी मागे जे म्हटले ते कोणत्याही वेगळ्या - आत्मभिन्न देवतेविषयी म्हणणे शक्य नाही. कृष्णेविषयी श्रीमहाराजांची ही

भूमिका जर आपण लक्षात घेतली तर त्यांनी नकाराचा हा जो लांब पाढा वाचला त्याचा अर्थ लक्षात येतो. अडतिसाव्या श्लोकातदेखील **"आत्मरूपिणि" (आभूः - ३८ व्याख्या)** अशीच हाक ते देत आहेत. अशा या आत्मप्रेमापुढे इतर विषयांची मातब्बरी राहणे शक्य नाही, ही श्रीस्वामिमहाराजांची दृढ भूमिका असल्याने व कृष्णाप्रेम म्हणजे आत्मप्रेम हे समीकरण असल्याने त्याहून वेगळे काही नको, अशी त्यांची भूमिका सुसंगत ठरते व ती नकारावर आधारलेली आहे, असे म्हणताही येत नाही.

"वांझेला मुलगा झाला" ही घटना आठवल्याबरोबर कृष्णामाईपुढे लोटांगण घालणारे श्रीमहाराज (१५) अगोदरच्या श्लोकात मात्र (६ व ७) नकाराचा एवढा मोठा पाढा कशाला वाचत आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. दुसरीकडे एका स्तोत्रात,

**राज्य असता तू पहावया**
**येसि बा नसे ते कपाळि या। (स्तोत्र ३१६)**

असे ते म्हणतात हेही आम्ही लक्षात घेतले पाहिजे.

एकीकडे आपल्याजवळ राज्य नाही याची खंत तर दुसरीकडे राज्य नको ही मागणी. एकीकडे वांझेला पुत्र झाल्याचा आनंद तर दुसरीकडे दुरितभंग नको ही प्रार्थना. या परस्परविरुद्ध भावना नाहीत. **दोन्ही भगवत्प्रेमाचे वा कृष्णाप्रेमाचे उन्मेष आहेत**. कारण श्रीगुरूच्या आगमनासाठी जर राज्य-वैभव निमित्त होत असेल तर ते का नाकारायचे? वांझेच्या पुत्रलाभाने कृष्णामाईच्या सामर्थ्याचा डंका जर जोराने वाजविता येत आहे, तर त्या घटनेने लोटांगण घालण्याइतका आनंद का होऊ नये? **मुख्य सुवर्ण सूत्र भगवत्प्रेमाचे आहे. त्यात "हवे-नाहीच्या" साऱ्या भावना मण्यासारख्या ओवण्यासाठी आहेत. स्वतंत्रपणे त्यांना काही अर्थ नाही; ही श्रीस्वामिमहाराजांची स्पष्ट भूमिका आहे.**

याच प्रेमाने विवश होऊन कृष्णामाईपुढे श्रीमहाराज मन मोकळे करीत आहेत. आम्ही मन कसे मोकळे करावे याचा तो वस्तुपाठ आहे. **सत्पुरुषांचे या पद्धतीचे हृदयाविष्करण साधकांसाठीच असते.** एरव्ही ज्या कायिक-वाचिक-मानसिक पापांचा ते उल्लेख करीत आहेत ती त्यांना दुरून तरी शिवतील काय? ते म्हणतात,

दुर्जनांची संगती, परपीडा व परद्रव्यापहार ही शरीराने घडलेली पापे, मान्य देवता व सज्जन यांची निन्दा आणि कदन्नभक्षण हे जिभेने घडलेले पाप, त्याचप्रमाणे, विषयांचे चिन्तन व दुसऱ्यांचे वाईट चिन्तन हे मानस पाप, तू दूर सार. (४६)

कृष्णामाईकडे जाण्यापूर्वी आपले दोष ओळखण्यासाठी मनाचा केवढा तटस्थपणा हवा हे यावरून लक्षात येते.

दोष प्रांजळपणे पुढे ठेवून कृष्णामाईला आपल्या उद्धाराचे साकडे घालतांना श्रीमहाराजांनी जे विचार व्यक्त केले आहेत, ते अत्युच्च प्रेमाला कोणत्या तात्त्विक विचारांचे अधिष्ठान हवे, याची उत्कृष्ट संथादेणारे आहेत. एरव्ही प्रेमाचा उमाळा म्हणजे केवळ भावनिक उमाळा अथवा तरल संवदेनशीलता एवढाच त्याचा अर्थ होतो. त्यामुळे देखील काही काळ मन स्वस्थ होते व सात्त्विक आनंद देखील मनाला होतो. पण आनंद सात्त्विक न राहता "आत्मिक" होण्यासाठी तत्त्वज्ञानाची भरभक्कम बैठक हवी. श्रीमहाराजांनी ती कृष्णालहरीमध्ये विशेषत: स्वकृत व्याख्येच्या माध्यमातून दिली आहे. प्रस्तुत श्लोक त्यादृष्टीने फार महत्त्वाचा आहे.

**ममोद्धारेणाद्य त्रिजगति सुकीर्तिर्भवतुं तेऽसितेऽतीते काले न खलु विमले त्वीदृगभवत् । प्रसङ्गोऽसङ्गोऽहं तत उपरि यास्येऽभयपदं नमः श्रीकृष्णे। (३३)**

माझ्या उद्धाराने आज तिनही जगात तुझी मोठी कीर्ती होणार आहे. (ती होऊ दे) भूतकाळात असा प्रसङ्ग कधीच तुला लाभला नव्हता. माझाही त्यात मोठा लाभ आहे. कारण मी सर्वसङ्ग-वर्जित होऊन अभयपदाला प्राप्त होणार आहे. (भावार्थ)

या श्लोकात खूप मोठा अर्थ भरला आहे, असे प्रथम लक्षातही येत नाही. परंतु यापूर्वीच्या आणि यानंतरच्या श्लोकाला श्रीमहाराजांनी जी टीप - अवतरणिका जोडली आहे त्यावरून व या श्लोकाला श्रीमहाराजांनी केलेले विस्तृत विवेचन बघून मात्र त्यांच्या मनातील खोल आशय पुसटसा का होईना, दिसू लागतो. आगील-मागील हे तीनचार श्लोक तसे अत्यंत भावगर्भ आहेत. त्यातही प्रस्तुत श्लोकात सारे वेदान्तसार त्यांनी ग्रथित करून ठेवले आहे. प्रस्तुत श्लोकाची पार्श्वभूमी अशी आहे. श्रीमहाराज कृष्णामाईला म्हणतात,

आई, हा एक सामान्य पुरुष दारी आला असे समजू नकोस. सारे पापांचे ओघ किती एक काळापासून माझ्यात जमून बसले आहेत. तरी तूही तेवढाच निर्धार करून जराही अवधान ढळू न देता बद्धकटी होऊन माझ्या उद्धारासाठी सज्ज हो.

या श्लोकाला श्रीमहाराज अवतरणिका देताना,

**''मदुद्धरणकाले सावधानतोत्तिष्ठेत्याह ।।'' (अवतरणिका ३२)**

(माझ्या उद्धाराच्या वेळी नीट सावध राहून उभी रहा (खंबीर).

श्लोक संपताच पुढील श्लोकाला ''एवमुद्धरणे को लाभ इत्यत आह'' अशी अवतरणिका श्रीमहाराजांनी जोडली आहे. (अव. ३३)

(असा उद्धार केला असता (मला) कोणता लाभ मिळणार ते सांगतात. - भावार्थ)

कृष्णामाईच्या ईश्वरी स्वरूपाचा जो तात्त्विक विचार श्रीमहाराजांनी केला आहे (ज्याची यापूर्वी थोडी चर्चा झाली आहे) त्या पार्श्वभूमीवर ही अवतरणिका वाचायची आहे.

दारी आलेला हा अतिथी साधी भिक्षा घेऊन समाधान मानणारा नाही. त्यासाठी तो दारी आलादेखील नाही. या अर्थाने तो असामान्यच आहे.

शारीर-वाचिक-मानसिक पापांची जी तालिका मागे उद्धृत केली तेवढीच पापाची मर्यादित कल्पना या अ-सामान्याची नाही.

**'का वदू घडले किती पाप**
**अक्षय देखील जे बहु ताप**
**आसुर जो निज-रूपचि चोरी**
**सर्व तयावरि ये अघ भारी' (पूर्वोद्धृत)**

अशी आगळी वेगळी कल्पना घेऊन हा अ-सामान्य दारी आला आहे. म्हणून त्याच्या उद्धारासाठी खासच प्रयत्न कृष्णामाईला करावा लागणार ही जाणीव करून देऊन त्याच्या परिणामी आपल्या वाट्यालादेखील अ-सामान्य लाभ येणार आहे, हे या दोन अवतरणिकांतून श्रीमहाराजांना सुचवायचे आहे.

लाभाचे अ-सामान्य स्वरूप स्पष्ट करण्यासाठी श्रीमहाराजांनी या श्लोकात सारा वेदान्त-ब्रह्मसूत्राच्या फलाध्यायातील महत्त्वाचा भाग ओतून ठेवला आहे.

असङ्गोऽहं ततअुपरि यास्येऽभयपदम् । (३३)

या वचनावरील श्रीमहाराजांची टीप :

**तत उद्धरणात् अहम् असङ्गो निःसङ्गः पुरुष इति यावत्। असङ्गो ह्ययं पुरुष इति श्रुतेः। स्वेन रूपेणाभिनिष्पन्नः सन् उपरि प्रपञ्चाद् बहिर्भूतम् । बिभेत्यस्मादिति भयं द्वितियाभिनिवेश–हेतुभूतम् अन्तरं भेददर्शनमिति यावत्। 'भयं द्वितीयाभिनिवेशतः स्यात्' इति भागवतोक्तेः। न विद्यते भयं भेददृष्टिर्यस्मिन् तदभयम्। पद्यते गम्यते ज्ञातिभिरिति पदम्। परं ज्योतिर्ब्रह्मेति यावत्। अभयं च तत्पदं च अभयपदं तद्यास्ये अभेदेन तास्मिन्पदे स्थास्ये इति भावः।**

**यो हि गन्ता प्रतीपमगतं पदं गच्छति गत्वाच निवर्तते तद्वदत्र गमनं न। ब्रह्मप्राप्तौ सर्व गतीनां प्रत्यस्तमितत्वात्।**

**(३३ व्याख्या)**

''ततः उद्धरणात् = त्यामुळे, उद्धारामुळे, अहम् = मी, असङ्ग = सङ्गवर्जित असा पुरुष. आत्मा हा असङ्ग असतो असे श्रुतीत सांगितले आहे. स्वेन रूपेणाभिनिष्पन्नः सन् = आपल्या स्वरूप स्थितीला पात्र होऊन.

उपरि = वर, प्रपंचाच्या बाहेर.

भय = ज्याच्यामुळे भीती वाटते – भीती वाटण्यासाठी दुसऱ्या वस्तूची कल्पना आवश्यक आहे. त्यामुळे भय शब्दाचा इथे भीती वाटण्यासाठी आवश्यक असणारे (अन्य) वस्तूचे भान असा अर्थ आहे.''

''श्रीभागवतात म्हटले आहे, दुसऱ्या वस्तूच्या कल्पनेने भीती निर्माण होते.''

''पद = ज्ञानी जिथे जातात ते पद. पद् म्हणजे जाणे. एकूण पद शब्दाचा अर्थ परब्रह्म असा होय.''

''अभयपद म्हणजे जिथे दुसऱ्या वस्तूचे भान नाही असे परब्रह्म. तिथे मी जाईन याचा अर्थ मी तिथे तत्स्वरूप होऊन जाईन.''

''जाणारा पुढे जातो आणि मागे परततो. त्याप्रमाणे येथे जाणे संभवत नाही. कारण ब्रह्मप्राप्ती झाल्यानंतर जाणे येणे इ. क्रिया पूर्णपणे अस्ताला गेल्या असतात.'' (भावार्थ)

उद्धार शब्दाचा तात्त्विक अर्थ इथे श्रीमहाराजांनी स्पष्ट केला आहे.

असङ्ग, उपरि, अभय व पद असे चार शब्द इथे आहेत खरे, पण ते एकाच वस्तुस्थितीचे निदर्शक आहेत. असङ्ग म्हणजे सङ्गरहित. कोणताही लौकिक सङ्ग एवढा मर्यादित अर्थ इथे विवक्षित नाही. ज्या श्रुतिवचनांचा प्रमाण म्हणून – "असङ्गो पुरुषः" ते इथे उल्लेख करीत आहेत तिथे त्याचा मर्यादित अर्थ अभिप्रेत नाही. प्रकृतितत्त्वाचा सङ्ग असा व्यापक अर्थ तेथे अभिप्रेत आहे. प्रकृतीचा सङ्ग सुटता बरोबर प्रकृतीचा परिणाम असलेल्या या प्रपंचाच्या बाहेर होणे क्रमप्राप्तच होय. तेच श्रीस्वामींनी "उपरि" = वर या शब्दाने दाखविले आहे.

प्रपंचाच्या बाहेर होणे याचा तरी अर्थ काय? प्रपंच म्हणून जर काही वस्तू असेल तर तिच्या अस्तित्वामुळे भयाची संभावना राहणारच. प्रपंच आहे पण तो भीतिदायक नाही असा अर्थ श्रीस्वामींना अभिप्रेत नाही. भीती म्हणजे मोकळेपणाची जाणीव. प्रपंचाच्या वेगळेपणाची जाणीव असेल तर भय निर्मूल होणार नाही. म्हणूनच श्रीमहाराज म्हणतात, भेददृष्टीच नको,

**न विद्यते भयं भेददृष्टिर्यस्मिन् तदभयम्।** जिथे वेगळेपणाची – अन्तराची जाणीव नाही ते अभय. कृष्णालहरीच्या शेवटच्या श्लोकात ज्या "निरन्तर" पदाचा उल्लेख आहे ती ही अवस्था आहे. आता प्रकृती किंवा प्रपंच म्हणून काही स्वतंत्र वस्तूसत्ताच उरली नाही. म्हणून त्यापासून भयाचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

पद शब्दाचा पाऊल हा अर्थ इथे अभिप्रेत नाही. ज्ञानी पुरुष जिथे जातात ते पद असा अर्थ श्रींनी दिला आहे. परंतु त्या अर्थानेसुद्धा नीट स्पष्टीकरण होत नाही. हे लक्षात घेऊन श्रीस्वामींनी पुढे विवरण केले आहे. ते म्हणतात,

पद शब्दाचा व्यवहारात जरा वेगळा अर्थ होतो. जाणारा ज्या दिशेने तो चालत आला तिच्या विरुद्ध दिशेने, उलट्या बाजूने जातो. जिथे तो पोचतो तिथे तो पूर्वी (पोचला) नव्हता. असा अर्थ विवक्षित असतो. या "नव्या" ठिकाणी पोचल्यानंतर तो मागील ठिकाणी परतू शकतो. याप्रमाणे जाणे या क्रियेला "आगील मागील"पणा (अर्थात दिशेची संकल्पना त्यात आलीच) अभिप्रेत असतो. या ठिकाणी मात्र पद शब्दाचा तसा अर्थ नाही. जर दुसरी वस्तू नाही तर दिशा तरी कुठून येणार? अत्यंत अद्वैत स्थितीत ज्याप्रमाणे

भीतीला स्थान नाही त्याचप्रमाणे जाण्या-येण्यालासुद्धा काही अवकाश नाही असे हे अभयपद आहे. त्यामुळे तिथे जाणे म्हणजे "राहणे" होय. इथे श्रीमहाराजांनी शब्दरचना करतांना फारच बारकावा दाखविला आहे.

"यास्ये" हे "या" जाणे या धातूचे भविष्यकाळी रूप आहे. त्यासाठी जो पर्याय श्रीमहाराजांनी दिला तो "स्थास्ये" हा होय. 'स्था' धातू प्रतिनिवृत्ती दाखविणारा आहे. ("ष्ठा गति-निवृत्ती") गत्यर्थक "या" धातू कुणीकडे तर नेमका गतिनिवृत्ती दाखविणारा "स्था" धातू कुणीकडे? परंतु द्वैताचे भानच आटल्यानंतर जाणे ही क्रिया संदर्भशून्य ठरते. त्यामुळे "जाणे"चा अर्थ 'असणे' असा पर्यवसित होतो. याप्रमाणे **"असङ्गः" या पदापासून "स्थास्ये" या पदापर्यंत अद्वैतस्थितीचाच, पण चढत्या श्रेणीने बोध करून देण्याचा श्रीस्वामींनी इथे प्रयत्न केलेला दिसेल.**

**असङ्गः** या पदाने प्रकृतीचा सङ्ग तेवढा नाकारला, तिचे अस्तित्व मात्र नाकारले नव्हते. उपरि या पदाने आत्मतत्त्व प्रकृतीहून वेगळ्या स्वरूपाने - विरुद्ध धर्माचे - आहे हे दाखविले. प्रकृतीत ते मुळीच सामावणारे नाही, हे स्पष्ट केले. प्रपञ्चाद् - बहिर्भूतम् - प्रपञ्चाच्या अतीत - प्रपञ्चावेगळे हा शब्द त्यादृष्टीने पुरेसा बोलका आहे. परंतु या शब्दानेही प्रकृतीच्या स्वतंत्र अस्तित्वाला धक्का लागत नाही.

**अभयम्** - हे पद मात्र ते काम करू लागते. कारण भय शब्दाचा अर्थ श्रीस्वामींनी भेददर्शन = भेददृष्टी असा केला आहे. अर्थातच अभय म्हणजे अभेददृष्टी. पुरुषाहून प्रकृती वेगळी नाही, एकच आहे हा भाव 'अभय'पदामुळे आला.

**पद** शब्द अभेददृष्टीचे स्पष्टीकरण करतो. कारण **"ज्ञानिभिः गम्यते तत् पदम्"** असा पद शब्दाचा अर्थ श्रीस्वामिमहाराज देतात. **एकूण अभेददृष्टी येण्यासाठी ज्ञान आवश्यक आहे असा अर्थ झाला.**

प्रकृतितत्त्वाला वेगळे अस्तित्व आपण कां देतो? आत्मतत्त्वासारखेच जर ते चैतन्यस्वरूप असेल तर त्याला वेगळे अस्तित्व देण्याचे कारण नाही. त्याला वेगळे लेखणे याचाच अर्थ चैतन्याच्या एका अद्वितीय सत्तेहून वेगळी जडवस्तूची सत्ता मानणे. ती मानली की, भय-दुःख इ. विपरीत जाणीवांचा संसार सुरू होतो. तो जाण्यासाठी ज्ञान हवे. **ज्ञान हे अ-ज्ञानाच्या विरोधी असल्याने अज्ञानाने मानलेला प्रकृतीचा वेगळेपणा ज्ञान प्राप्त होताच**

**संपतो. प्रकृती नावाचे कोणतेही जडतत्त्वच उरत नाही.** सर्वत्र ज्ञानमय अस्तित्वाचा प्रत्यय येतो. हीही एक प्रकारची पांगळी भाषाच होय. प्रत्यय येण्यासाठी तरी दुसरी वस्तू असावी लागते. दुसरी वस्तूच नाही तर प्रत्यय येणे, कोणतीही क्रिया घडणे, जाणे-येणे घडणे इत्यादि व्यापाराला काही अर्थच उरत नाही. म्हणूनच श्रीमहाराज ''यास्ये'' या क्रियापदक पदाचा ''स्थास्ये'' असा निखळ अस्तित्वपर अर्थ घेतात. **ज्ञानाने हे सर्व साधते.**

म्हणून ज्ञानाचे महत्त्व पहिल्याच श्लोकाच्या अवतरणिकेत श्रीमहाराजांनी स्पष्ट केले आहे. कृष्णामाई या स्थितीला आपल्या भक्ताला आणून ठेवते, हा एकूण भाव.

जीवनाचे हेच अंतिम लक्ष्य होय हे स्पष्ट करण्यासाठी श्रीमहाराजांनी प्रस्तुत श्लोकाच्या व्याख्येत,

**''संपद्याविर्भाव: स्वेन शब्दात्''** ४.४.१ ब्र.सू.
**''मुक्त: प्रतिज्ञानात्''** ४.४.२. ब्र.सू.
**''आत्मा प्रकरणात्''** ४.४.३. ब्र.सू.

या तीन ब्रह्मसूत्रांचा उल्लेख केला आहे. यावरून उद्धार शब्दाने त्यांना किती खोल आशय अभिप्रेत आहे ते कळून येते.

उद्धार म्हणजे पूर्वीच्या निकृष्ट अवस्थेपेक्षा उत्कृष्ट अवस्थेचा लाभ असे आपण समजतो. उद्धार शब्दाचा तसा मर्यादित अर्थ इथे अभिप्रेत नाही. त्यासाठीच श्रीमहाराजांनी वरील तीन ब्रह्मसूत्रांचे इथे प्रमाण दिले आहे. तिथे श्रीशंकराचार्यांनी असा विषय मांडला की मोक्ष हीसुद्धा एक अवस्था असल्याने तिथे काही तरी नवी वैशिष्ट्यपूर्ण स्थिति अपेक्षित आहे. ज्या श्रुतिवचनात या स्थितीचे वर्णन येते तिथेसुद्धा

**''स्वेन रूपेण अभिनिष्पद्यते''** असे शब्द आहेत. अभिनिष्पत्ति म्हणजे उत्पत्ति.

**अभिनिष्पद्यते इतिचोत्पत्तिपर्यायत्वात् । (ब्रह्मसू.भा. ४.४.१)**

**नव्या कोणत्याही आत्मसात केलेल्या स्थितीला, स्व शब्दाने संबोधणे स्वाभाविक असल्याने त्याला धरून वरील वचनात ''स्व'' शब्द वापरला आहे. याप्रमाणे उत्पत्ति निदर्शक अभिनिष्पत्ति शब्द व ''आत्मसात्'' करण्याच्या प्रक्रियेचा निदर्शक स्व-शब्द या दोन प्रमाणांवरून ही मोक्षस्थिती म्हणजे एक नवे परिवर्तन आहे असे**

मानावे लागते. उद्धार शब्दाचासुद्धा तोच अर्थ आहे. आचार्य त्यावर उत्तर देतात,

**वरील उद्धरणात स्व शब्द ''आत्मसात्'' केलेले या अर्थी वापण्याचे काही कारण नाही. रूप शब्दावरून तो बोध सहज होऊ शकला असता. रूप शब्दाला स्व या विशेषणाची जोड हेच दर्शविते की, मोक्षस्थितीत नवे कोणते परिवर्तन नसून मूळ स्थितीचीच ती प्राप्ती असते.**

**अभिनिष्पत्ति शब्दसुद्धा अनेकदा मूळ स्थितीच्या प्राप्तीच्या संदर्भात वापरण्यात येतो असे आढळते. ''रोग जाऊन तो आरोग्यसंपन्न झाला'' अशा अर्थानेसुद्धा अभिनिष्पन्न शब्द वापरण्यात येतो. (ब्र. सू. ४.४.१/२)**

वरील ब्रह्मसूत्राची साक्ष काढण्यात श्रीमहाराजांना उद्धार शब्दाने स्वरूपस्थितीचा लाभ हाचअर्थ अभिप्रेत आहे हे लक्षात आणून द्यायचे आहे. ''मला राज्य नको, मला काही नको''असे जे नकाराचे गाणे सुरुवातीलाच कृष्णालहरीत गायिले आहे त्याच्याशी अगदी सुसंवादी असणारी ही उद्धार संकल्पना आहे. जे काही आगन्तुक असेल ते नाकारल्यावाचून मूळ स्थितीकडे कसे वळता येईल?

ही उद्धार संकल्पना मागे ज्या अपराध संकल्पनेचा आपण विचार केला, (कृष्णालहरीत ती उद्धार संकल्पनेनंतरच मांडली आहे. आपण ती काही सोयीसाठी पूर्वी घेतली इतकेच काय ते) त्याचीच उत्तर बाजू होय. आपल्याकडून स्व-स्वरूपाच्या चोरीचा मोठा अपराध घडला असे ते म्हणतात. चोरीच्या अपराधात वस्तूचे अपहरण व खोटी बतावणी हे दोन मोठे प्रमाद असतात. त्यातही अपहरणापेक्षा खोट्या बतावणीलाच अपराधाच्या दृष्टीने अधिक महत्त्व आहे, हे आपण मागे पाहिले. खोटी बतावणी टाकून दिली तर माणूस चोर ठरत नाही.

परमार्थात खोटी बतावणी ही, की मूळ आत्मवस्तूचे ज्ञान व आनंद हे दोन विशेष, आपण आत्मवस्तूचे न मानता प्रकृतीचे मानतो. आणखी थोडे स्पष्टपणे मांडायचे झाल्यास असे म्हणता येईल की आपण ज्ञान हा धर्म शरीर, इंद्रिय व बुद्धी यांनी बनलेल्या संघाताचा मानला, व आनंद हा बाह्य विषयाचा धर्म मानला. आपला सारा व्यवहार त्याला धरूनच होत

असतो. ज्याक्षणी हा प्रमाद घडला असे लक्षात येईल त्याक्षणी अपराधाचे पाश शिथिल होत जातील व उद्धाराकडे - सुटकेकडे प्रवास सुरू होईल. उद्धाराचा आरंभ ''अ-संगा''पासून सुरू होतो हे श्रीमहाराजांनी दाखविलेच आहे. प्रकृतीचा संग सुटता बरोबर तिच्या नावाने वळते केलेले ज्ञान व आनंदाचे धन परत आत्म्याच्या खाती जमा होणार हे ओघानेच आले. आता अपराध तो कणता राहिला? ज्याची वस्तू त्याला मिळाली व आपली खोटी बतावणी - प्रस्तुत ठिकाणी संग - सुद्धा संपली. हीच मूळ स्थिती होय. हाच उद्धार. यात नवे परिवर्तन नाही. प्रमादाने घडलेल्या परिवर्तनाला इथे विराम आहे.

इथे आणखी एक महत्त्वाचा विषय श्रीमहाराजांनी आणला आहे. वेदामध्ये - उपनिषदामध्ये अनेक उपासना सांगितल्या आहेत. त्यांचे तपशीलवार वर्गीकरण श्रीमहाराजांच्या ''युव-शिक्षा'' या प्रकरणग्रंथात आढळते. त्यातील काही उपासना उत्तरायण मार्गाने - सूर्यमार्गाने - ब्रह्मलोकाला घेऊन जाताता. पुढे कल्पान्ती ब्रह्मदेवाबरोबर ब्रह्मलोकातील या मार्गाने गेलेले अधिकारी उपासक मुक्त होतात. यालाच क्रम-मुक्तीचा मार्ग म्हणतात. कृष्णालहरीत उद्धाराच्या संदर्भात ज्या अभयपदाचा उल्लेख येतो तो तसल्याच स्थितीचा निदर्शक मानायचा काय, हा इथे महत्त्वाचा प्रश्न उद्भवतो. हा प्रश्न उद्भवण्याचे कारण असे आहे की मुक्तीचे विवेचन करणारी व नुकतीच उद्धृत केलेली जी ब्रह्मसूत्रे आहेत त्यात आधारादाखल घेतलेल्या उपनिषद्वचनात ज्योतिष शब्द येतो. क्रममुक्तीचा मार्ग सूर्यमार्ग व प्रस्तुत वचनातदेखील सूर्यवाचक ज्योतिष शब्द उल्लेखिलेला. स्वाभाविकच मुक्ति म्हटली की तिथे सूर्यलोकाशी संबंध असावा अशी कल्पना होते. श्रीमहाराजांनी प्रस्तुत कल्पनेचे कृष्णालहरीत निराकरण केले आहे व तेदेखील आचार्यांचे बोट धरून. श्रीमहाराज म्हणतात,

> **अत्र श्रुतिस्थ ज्योति: शब्देनोपासकानामिव सूर्यलोकद्वारा ब्रह्मप्राप्तिरिति नोच्यते। आत्मा प्रकरणात् इति न्यायात्। ज्योति:शब्देनात्र परमात्मा ग्राह्य:। कुत: प्रकरणात्। अलमतिविस्तरेण। (कृ. श्लो. ३३ व्याख्या)**

उपनिषद्वचनातील ज्योतिष शब्दावरून उपासकांना ज्याप्रमाणे सूर्यलोकद्वारा ब्रह्मप्राप्ति होते तशी इथे कल्पना करू नये. ''**आत्मा प्रकरणात्**'' या सूत्रात आचार्यांनी हे स्पष्ट केले आहे. एकूण ज्योतिष

शब्दाचा इथे परमात्मा हा अर्थ घ्यावा. प्रकरणाला - संदर्भाला धरून तोच अर्थ होतो. अधिक विस्तार पुरे. (भावानुवाद)

मुद्दाम हा विषय इथे श्रीमहाराजांनी जो चर्चेला घेतला त्यात मोठे औचित्य आहे. कृष्णामाईची सेवा किंवा कृष्णामाईची कृपा हा क्रममुक्तीचा मार्ग नव्हे, तो सद्योमुक्तीचा मार्ग आहे, हे श्रीमहाराजांना इथे निक्षून सांगायचे आहे. पुष्कळदा उपासना शब्द अभ्यासकांना घोटाळ्यात टाकतो. उपासना ही उपनिषदातील असो की पुराणातील असो किंवा कृष्णालहरीसारख्या स्तोत्रात सुचविलेली असो, ती क्रममुक्तीकडेच घेऊन जाणार, असे अभ्यासकात समीकरण रूढ होऊन गेले आहे. श्रीमहाराजांना ते मान्य नाही. **कृष्णामाईची भक्ति ही ज्ञानमार्गाची वाट आहे व म्हणूनच तिथे सद्योमुक्तीच (ज्ञानमार्गात असते तशी) प्रस्तुत आहे.** क्रममुक्ती नव्हे, हे श्रीमहाराजांनी इथे स्पष्टपणे दर्शविले आहे. याविषयी श्रीमहाराजांची भूमिका पुढे मांडायची असल्याने या विषयाचा इथे अधिक विस्तार करीत नाही.

उद्धार शब्दाचा असा तात्त्विक आशय स्पष्ट केल्यानंतर श्रीमहाराज कृष्णामाईला म्हणतात,

> **अतः प्रादुर्भूत्वा परम-निज-रूपेण सहसा ममाघाद्रीन् भित्वा सकल मलहन्त्रीह सहसा कृपाक्षीरं धृत्वाङ्क इशति च मे देहि सहसा। श्रीकृष्णे नमः ।।३४।।**

सर्व दोष निवारण करणाऱ्या व रम्यरूप धारण करणाऱ्या श्रीकृष्णे, म्हणून (मी म्हणतो की) तू आपल्या श्रेष्ठ चतुर्भुज रूपाने, वेळ न दवडता, प्रगट होऊन, आपल्या सामर्थ्यानिशी माझ्या पापांचे पर्वत फोडून टाकून, आपल्या मांडीवर मला घेऊन स्मितवदनाने कृपादुग्धाचे पान मला घडव.

वरील श्लोकात आरंभालाच श्रीमहाराजांनी **अतः** = म्हणून हे हेत्वर्थक अव्यय वापरले आहे व प्रस्तुत श्लोकाच्या अवतरणिकेतही

**यत एवमतः** = ''ज्या अर्थी असे आहे त्या अर्थी'' असे म्हटले आहे. त्यावरून ज्या अभय पदाची ज्ञानगम्य अद्वैत - अनुभूतीची - आकांक्षा पूर्वीच्या श्लोकात वर्णन केली ती पूर्ण करण्याचे सामर्थ्य कृष्णामाईच्या कृपेत निहित आहे, असे श्रीमहाराजांना म्हणायचे आहे. इथेच कर्ममार्गाच्या व प्रेममार्गाच्या सीमा वेगळ्या होत जातात. कर्माचरण चित्तशुद्धीपर्यंत सोबत करते. पुढील प्रवास मात्र ज्ञानमार्गाने होतो असे वेदान्तशास्त्र (अद्वैत)

सांगते. कृष्णालहरीच्या प्रस्तावनेत श्रीमहाराजांनी "**ज्ञानोत्पत्तेश्च प्रतिबन्धक पापक्षयापेक्षत्वात्तदर्थं सर्व पाप-परिहरण-क्षमाया: श्रीकृष्णाया: स्तुतिरारभ्यते।**" (श्लोक १ व्याख्या)

ज्ञानाच्या उत्पत्तीसाठी प्रतिबन्धक पापाचा विनाश होण्याची गरज असल्याने त्यासाठी सर्व पाप-निवारण करण्याला समर्थ असणाऱ्या श्रीकृष्णेची स्तुती आरंभिली जात आहे (भावार्थ), असे म्हटले आहे. त्यावरून चित्तशुद्धी करणाऱ्या कर्ममार्गाचाच एक पर्याय हा प्रेममार्ग आहे असा समज होण्याचा संभव आहे. याच संदर्भात "मोक्ष-साधन सामग्र्यां भक्तिरेव गरीयसी" (मोक्षाची जी साधने आहेत त्यात भक्ति हीच श्रेष्ठ आहे),

हे आचार्यवचनसुद्धा पुढे करण्यात येते, त्यात भूमिका अशी असते की प्रेम-मार्ग श्रेष्ठ खरा, पण साधन म्हणून. कर्माचरण जसा साधनमार्ग तसाच हाही. थोडा त्यापेक्षा सरस इतकेच काय ते.

श्रीमहाराजांची मात्र ही भूमिका दिसत नाही. पापाचे पर्वत भस्म झाल्यावर आईच्या मांडीवर पहुडत ज्या कृपादुग्धाचे प्राशन करण्याची श्रीमहाराजांना आस आहे ती कोणत्याही रीतीने कर्ममार्गाच्या कक्षेतील आहे असे म्हणता येत नाही. मोक्षाच्या वाटेत येणारे प्रतिबंधक पाप तेवढे दूर सारण्याचे मर्यादित प्रयोजन जर इथे विवक्षित असते तर पुन: कृपादुग्धाची भाषा इथे येण्याचे कारणच नव्हते. **चित्तशुद्धीचे प्रयोजन संपले की ज्याप्रमाणे कर्मानुष्ठान गतार्थ होते, पुढे त्याची रुढित: अनुवृत्ती असली तरी तत्त्वत: असण्याचे कारण उरत नाही, तसा प्रकार इथे नाही. प्रतिबंधक पाप असेतोपर्यंत पापनिवृत्तीसाठी व ते निवृत्त झाल्यावरही पुढे पुन: सोबत करण्यासाठी कृष्णामाईच्या कृपेची साऊली अपेक्षितच आहे, अशी श्रीमहाराजांची भूमिका आहे.** ती साक्षात् परब्रह्म आहे, ती आत्मरूपिणी आहे, ती परदा आहे, ती नि:श्रेयस देणारी आहे, तीच सृष्टी निर्माण करते, तिच्या नियंत्रणाने हे सर्व जग चालले आहे, ही व अशीच सारी गुणमालिका काय दर्शविते? प्रतिबन्धक पाप निवृत्त होताच निवृत्ति सुचविणारा एक तरी शब्द या गुणमालिकेत आढळतो काय?

"**एवं पापपरिहारं कुरु वा तनवाऽथाप्येवमस्त्विति प्रार्थयति।**"

(पापांचे निवारण कर वा करू नकोस, पण एवढे मात्र कर. - भावार्थ)

हे वाक्य काय दर्शविते? कृष्णामाई जर आत्मरूप आहे तर ती

निवृत्त कशी होणार? आत्मा आत्म्यापासून निवृत्त होतो असे म्हणण्यासारखा तो प्रकार होईल. कृष्णामाईचे प्रेम निवृत्त होण्यासाठी नाही. कारण ते स्वयंज्योति:स्वरूप आहे. श्यामल-चतुर्भुज रूपाने प्रगट होऊन आत्मप्रेमाचा निरंतर आस्वाद घडविण्यासाठी तिच्या सगुण-साकार मातृविग्रहाची निरंतर प्रतीती श्रीमहाराजांना इथे अपेक्षित आहे.

ती ओढ व्यक्त करण्यासाठी श्रीमहाराजांनी इथे "**सहसा**" = एकदम हा शब्द लागोपाठ तीनदा वापरला आहे. परंतु अर्थाची पुनरुक्ती टळावी यादृष्टीने त्यांनी काढलेला श्लेषही तेवढाच मनोरम आहे. सहसा = एकदम = विलंब न करता.

१) (सगुण रूपाने प्रगट होण्यासाठी विलंब न करता)
सहसा - सहस: बळ - सहसा = बळाने

२) (पापांचे विदलन करण्यासाठी बळाचा वापर करून)
स-हसा = हस = स्मित - स-हसा = सस्मित होऊन

३) (स्मित वदनाने बाळाकडे बघत आई जशी मुलाला स्तनपान घडविते त्याप्रमाणे कृपादुग्ध देत).

याप्रमाणे कृष्णामाईच्या प्रेमाची अनावर ओढ श्रीमहाराजांनी इथे प्रगट केली.

आता ते या प्रेमाची लौकिक अभिव्यक्ती कशी व्हावी यासंबंधी आपले मनोगत बोलत आहेत,

**त्वदीयात्मसृष्ट:** - तुझ्या प्रवाहावरून येणारा वारा मला स्पर्शू दे. तुझे पाणी माझ्या मुखात पडू दे. तुझ्या हिमशीतल पाण्यात माझे शरीर पडू दे. (कृष्णा. ४७)

या प्रेमापुढे त्यांना पाप-क्षालनाच्या उद्दिष्टाचेही महत्त्व वाटत नाही. कृष्णामाई सर्व पापांचे क्षालन करू शकते, किंबहुना इतर सारी प्रायश्चित्ते तिच्या या सामर्थ्यापुढे नगण्य आहेत असा विश्वास (कृष्णा ४४/४५) असूनसुद्धा या प्रेमापुढे श्रींना पापक्षालनाची मातब्बरी वाटत नाही. वर उद्धृत केलेली प्रस्तुत श्लोकाची अवतरणिका

**पापक्षालनं कुरु न वा ----**

व याच श्लोकात शेवटी अभिव्यक्त केलेला अभिप्राय,

"तावता कृतकृत्यः स्याम्"

(तेवढ्याने मी कृतकृत्य, धन्य होईन.)

श्रीमहाराजांचा कृष्णामाई विषयक निर्हेतुक प्रेमाची साक्ष देतो. पुढेही ते म्हणतात,

**"अक्षये वपुषि तेऽसिते भवतु दृक्त्वदीयेऽम्मये" (५४९)**

हे श्यामले, तुझ्या या जलमय नित्य रूपावर माझी दृष्टी (नित्य) असू दे.

कृष्णामाईचे रूप एका बाजूने अम्मय - जलमय तर दुसऱ्या बाजूने अ-क्षय आहे असे ते म्हणतात. श्रीमहाराजांच्या दृष्टीने ब्रह्मा-विष्णु-महेशांचा जसा जगाच्या सृष्टी-स्थिति-प्रलयासाठी आविष्कार (३७) तसा हाही पापी लोकांच्या पाप-क्षालनासाठी घडलेला, स्वच्छन्द परमात्म्याचा उदकरूप अवतार (३८) आहे. वेदान्तात नित्य-वस्तूचे दोन वर्ग करतात. प्रवाही किंवा परिणामी नित्य व दुसरे कूटस्थ नित्य. प्रवाहरूप पाणी हे पहिल्या प्रकारासाठी उदाहरण म्हणून घेतात, तर पर्वतशिखर दुसऱ्या प्रकारासाठी उद्धृत करण्यात येते. दोन्ही नित्य असले तरी त्यांच्या नित्यतेच्या स्वरूपात अंतर असते. प्रवाही नित्य वस्तूची, तीच ही वस्तू अशी ओळख होत असली तरी ती प्रामुख्याने सादृश्यमूलक असते. कारण प्रवाही वस्तूत सारखा बदल होतच असतो. मूळ वस्तूचा "तोचपणा" या बदलात कसा कायम राहणार? श्रीमहाराज कृष्णामाईला प्रवाही-नित्यवस्तूच्या सदरात ढकलून तिला अक्षय म्हणतात काय? हाच इथे महत्त्वाचा प्रश्न. आत्तापर्यंत कृष्णामाईच्या स्वरूपाची जी ओळख श्रीमहाराजांनी करून दिली त्यावरून तरी असा विचार मनात येऊ नये. आत्मा कधीतरी परिणामी नित्य होईल काय? तोच जर तसा झाला तर या परिणामी नित्य जगाला आधार कोणाचा राहील? या विषयाचासुद्धा तात्त्विक विचार अद्वैत सिद्धांताला धरून स्वतंत्र मांडण्याची गरज आहे. तात्पर्य, कृष्णामाईचा करुणा-विग्रह इतरांना जरी जलमय दिसत असला तरी श्रीमहाराजांना मात्र तो नित्य-कूटस्थरूपच प्रत्ययाला येत आहे हा भाव कृष्णामाईच्या नित्यसान्निध्याचा अर्थात्श्रीदत्ताचे नित्यसान्निध्य असा समीकरणात्मक भाव श्रीमहाराजांच्या मनात असल्याने कृष्णामाईशी बोलत असता आता भारतवाक्यात - शेवटच्या श्लोकात ते श्रीदत्ताशीसुद्धा एक शब्द बोलून घेत आहेत. तसे आरंभीच्या श्लोकात श्लेषार्थाने श्रीदत्ताला वन्दनामध्येदेखील (श्लोक ५, ६,

१६, १७) श्रीदत्त निर्देश व प्रत्येकच पदात "गुरुमते" हे संबोधन आलेच आहे. पण हे सारे वर्णनात्मक निर्देश म्हणावे लागतात. आत्म-निवेदनाचा वा संवाद सुखाचा त्यात भाग नसतो. कृष्णामाईपुढे केलेले आत्मनिवेदन अथवा प्रेमाचे अभिवाचन श्रीदत्तापुढेही व्हावे असे वाटून श्रीमहाराज आता म्हणतात,

**देवेड्ये वेदवेद्ये। (५१)**

देवांना स्तुत्य असणाऱ्या, वेदांना वेद्य असणाऱ्या व भयहरण करणाऱ्या श्रीकृष्णे, तुझा जय असो, तुझा जय असो!

दयेने सांद्र असणाऱ्या कृष्णे, संसारभय निपटून टाकणारे तुझे गोंडस नाव घेणाऱ्याचे तू रक्षण कर!

माझ्या भक्ताचे कधीही अकल्याण होत नाही ही सत्य प्रतिज्ञा करणाऱ्या कृष्णे, तू मला निरन्तर अभयवचन देत रहा.

हे मन:कामपूरका दत्ता, या कृष्णातीरावर संसारमोह नाश करणारी जी तुझी पवित्र मूर्ती नांदते ती माझ्या मनात व डोळ्यात आदराचे नित्यस्थान मिळवीत राहू दे!

या श्लोकात कृष्णामाई व श्रीदत्त या दोहोंपुढे श्रीमहाराज मागणे मागत आहेत - या दोहोंच्या नित्य प्रेमात आपण निरंतर रहावे हीच श्रीमहाराजांची खरी आकांक्षा आहे. प्रस्तुत श्लोकाच्या व्याख्येत ते म्हणतात,

**नेत्राभ्यां तादृशमूर्तेरवलोकनेन मनसा ध्यानेन चाहं कृतार्थः स्यामिति भावः। (५१ व्याख्या)**

डोळे भरून 'ती' मूर्ती पाहून व मनाने तिचे चिन्तन करून मी कृतार्थ होऊन जाईन.

मागे ४७ व्या श्लोकातही हीच कृतकृत्यतेची भाषा आहे. इथेसुद्धा तेच शब्द आहेत. याचा अर्थ प्रत्येकाच्या जीवनाचे हेच अंतिम लक्ष्यअसावे, असा होतो. यापुढे साऱ्या आकांक्षा गौण आहेत. ते लक्ष्य पूर्ण करण्यासाठी तृष्णेकडे पाठ फिरवून कृष्णेला संमुख होणे, हाच एकमात्र मार्ग श्रीमहाराजांना दिसतो. म्हणून ते म्हणतात-

**कृष्णां यो वृणुते भक्तः**
**पदं यायान्तिरन्तरम्**
**तृष्णां यो वृणुतेऽभक्तः**
**खेदं यायान्तिरन्तरम् ।।५२।।**

वरील श्लोकात "कृष्णा" व "तृष्णा" "पद" व "खेद", "भक्त" व "अ-भक्त" हेच तेवढे शब्द वेगळे आहेत. पण परस्परांना छेद देणारे ते शब्द आहेत. यातून एकाच जोडीची निवड करायची आहे; ती आहे भक्तीची, कृष्णेची व निरन्तर पदाची.

कृष्णालहरीचा हाच एकमात्र संदेश आहे.

**।। समाप्त ।।**

# परिशिष्ट

१) श्लोक ५ – हरीशात्मा कृष्णा

मातरं सर्वतीर्थानां नदीनामग्रजां त्वहम्
स्म्रक्ष्यामि पूर्ववत्कृष्णामन्मयीं जगतः स्थितेः ।
तीर्थानां हि प्रभावेण कलिकल्मषशत्रुणा
कृष्णायाश्चापि सान्निध्यात् पापं नैव भविष्यति । (कृष्णामाहात्म्य)

कृष्णेयं कृष्णरूपस्य तनुर्मम जलात्मिका
मतः कृष्णा समुत्पन्ना तत्प्रभवं परं विदुः । (पूर्वोक्त)

शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः । (स्कन्दपुराण)

२) श्लोक ९ – हरेः साङ्घ्र्युद्भूता

स एव द्रवरूपा सा गङ्गा गोलोकसंभवा
राधा–कृष्णाङ्गसंभूता भुक्ति–मुक्ति–फलप्रदा ।
पुरा बभूव गोलोके सा गङ्गा द्रवरूपिणी
राधाकृष्णाङ्गसंभूता तदंशा तत्स्वरूपिणी ।।
ब्रह्मणो वचनं श्रुत्वा स्वीचकार च सस्मिता
बहिर्बभूव सा कृष्णपादाङ्गुष्ठनखाग्रतः ।
गोलोके च स्थिता गङ्गा वैकुण्ठे शिवलोके ।
ब्रह्मलोके स्थिताऽ–न्यत्र यत्र यत्र पुरःस्थिता ।
तत्रैव सा गता गङ्गा चाज्ञया परमात्मनः ।
निर्गता विष्णुपादाब्जात्तेन विष्णुपदी स्मृता । (देवी भागवत)

एवमेषा जगन्माता कृष्णा विष्णुतनुःस्वयम् ।
माहात्म्यमस्यास्त्यखिलमनेकं को वदिष्यति । (कृष्णामाहात्म्य)

३) श्लोक ११ गतेजीवे –

यः कृष्णवेणीं मनुजः प्रयाति कन्यागते देवगुरौ प्रयत्नात् ।
स चायुरारोग्य–महाविभूतिं स धर्मसिद्धिं लभते मनुष्यः ।

तस्मात् सर्व प्रयत्नेन कन्याराशिगते गुरौ ।
कृष्णावेणीं समासाद्य प्रायश्चित्तं चरेत् सुधीः ।
मुण्डनं चोपवासं च हिरण्यश्राद्धमत्र ते ।
करिष्यन्ति नरा भक्त्या पितृनुद्धारयन्ति ते ।
कन्यागते गुरौ यस्तु तीर्थश्राद्धं करोति वै ।
पितरो द्वादशाब्दं तु तृप्तिं यान्ति नचान्यथा । (कृष्णामाहात्म्य)

तीर्थोपवासः कर्तव्यः शिरसो मुण्डनं तथा
शिरोगतानि पापानि यान्ति मुण्डनयोगतः । (काशीखंड)

यानि कानि च पापानि ब्रह्महत्यासमानिच
केशानाश्रित्य तिष्ठन्ति तस्मात् केशान्वपाम्यहम्
मुण्डनं चोपवासश्च गोदायां सिंहगे गुरौ ।
कन्यागते तु कृष्णायां न तु तत्तीरवासिनाम् । (स्कंदपुराण)

४) श्लोक १३ पित्रृनुद्दिश्यैकम्
यत्र चायं दशरथो वालुकापिण्डमुत्तमं
सीता हस्तगतं प्राप्य लेभे पदमनुत्तम्।
पितृन् संतर्प्य विधिवज्जामदग्न्यः प्रतापवान्।
ययौस्वधाम सहसा आनन्दित विभावनः। (कृष्णामाहात्म्य)

५) श्लोक १४ महापाप्याकल्पं यदि।
(ब्रह्महा हेमहारीच सुरापो गुरुतल्पगः।
महापातकिनस्त्वेते ते तत्संसर्गीच पञ्चमः)
न करोति वृषोत्सर्गं सुतीर्थे वा जलाञ्जलिम्।
न ददाति सुतो यस्तु पितुरुच्चार एव सः।
एकादशेऽह्नि प्रेतस्य यस्य नोत्सृज्यतेवृषः।
प्रेतत्वं सुस्थिरं तस्य दत्तैः श्राद्धशतैरपि। (मत्स्यपुराण)

एवं कृत्वा ह्यवाप्नोति फलं वाजिमखोदितम्।
यमुद्दिश्योत्सृजेन्नीलंस लभेत् परां गतिम्। (भविष्यपुराण)
वृषोत्सर्गो यदि भवेत्प्रेतत्वान्मुच्यते तदा।

तस्मान्वृषं त्वमप्येवं वृषोत्सर्गं कुरु प्रभो। (गरुडपुराण)

लोहितो यस्तु वर्णेन मुखे पुच्छे च पाण्डुरः।
श्वेतः खुर-विषाणाभ्यां स नीलो वृष उच्यते। (ब्रह्मपुराण)

वृषोत्सर्जनवेलायां वृषाभावः कथंचन ।
मृद्भिःपिष्टैश्च दर्भैर्वा वृषंकृत्वा विसर्जयेत् ।
न शक्यते वृषोत्सर्गो होमं वा तत्तु कारयेत् । (गरुडपुराण)

नारायणबलिं सम्यग् यः करोति मृतस्य च ।
प्रेतश्चापि च कर्ता च उभौ तौ फलभागिनौ ।
अपमृत्यु-वनिष्टानां नारायणबलिः शुभः ।। (महाभारत)

यद्येतत् क्रियते विष्णोर्बलिसंज्ञं विधानकम् ।
यथावित्तं यथाकालं लोकानन्त्याय कल्पते । (महाभारत)

एवं कृते विधाने वै सर्पसंस्कारकर्मणि ।
सर्पहिंसाकृतात्पापान्मुच्यते नात्र संशयः । (शौनक)

बालायुवानो वृद्धाश्च कुले यस्य मृता ननु ।
लुप्तपिण्डा लुप्ततोयाः स्नानधर्मं विना मृताः ।
एवं नानाविधा विप्राः प्रेत्य प्रेता भवन्ति ते ।
स्त्रियश्च पुरुषाश्चैव इहैवाप्यन्यजन्मनि
कुले ग्रामे वने गेहे पीडां कुर्वन्ति ते च वै ।
तेषां पीडाविनाशार्थं त्रिपिण्डीश्राद्धमाचरेत् । (स्कंदपुराण)

६) श्लोक १५ सुतं लेभे वन्ध्या
अनपत्या भवेद् वन्ध्या मृतवत्साऽपरा स्मृता ।
स्त्रवद्गर्भा तथैवान्या कालवन्ध्याऽपरा भवेत् । (वायुपुराण)

गर्भपातं प्रकुरुते तामसो यो नराधमः ।
जन्मान्तरे तु तद्दोषान्मृतपुत्रो भवेन्नर : ।
अश्वहन्ता च गोहन्ता वन्ध्यात्वं प्रतिपद्यते।
परद्रव्यापहर्ताऽपि मृतपुत्रो भवेन्नरः ।
लोहाश्मदारुचूर्णानि प्रयत्नाज्जरयेत्पुमान् ।

ब्रह्मस्वं त्रिषु लोकेषु कः कथं जरयिष्यति ।
प्रेतौर्ध्वदैहिकं कर्म प्रायश्चित्तपुरःसरम् ।
कारयित्वाङ्ग भर्त्रा त्वं मासमात्रं व्रतं चर ।
कृष्णापञ्चनदीयोगे स्नात्वा श्रीगुरुपादुकाम् ।
उदुम्बरं चाष्टतीर्थस्नानपूर्वं समर्चय ।
ब्राह्मणान्भोजयित्वाऽथ शतद्रव्यं द्विजातये ।
देहि शौनकगोत्राय शुद्धस्तेनैव ते सति। गुरूसंहिता

(कृष्णामाहात्म्य)

(गंगाधर ब्राह्मणस्त्री कथा)

(श्लोकांना अध्याय संदर्भ : पं. उपाध्ये यांच्या तळटीपात दिला नाही. तो मुळातून अभ्याकसांना शोधून घ्यावा लागेल. कंसात दिलेल्या काही श्लोकांचा ग्रंथ संदर्भसुद्धा दिलेला नाही. तोसुद्धा शोधावा लागेल.)

# श्रीकृष्णालहरी भाष्यातील काही प्रमुख शब्दांची अनुक्रमणिका

**आकडा – श्रीकृष्णालहरी श्लोक क्रमांकसूचक**


**अ –** अग्नि ६, अध ४६ (पाय शब्दसुद्धा बघावा), अज ६, अतिवृष्टि ८, अधिकरणन्याय ३१, ३३, ३९, ४१, अनावृष्टि ८, अनुमान ९, अभियुक्त ३१, अर्थवाद ४२, असंग ३३, अंहस् २९.

**आ –** आधिदैविक, आधिभौतिक, आध्यात्मिक १५, आन्ध्र १७, आशा २२.

**इ –** इन्द्र ३७, इन्द्र-विरोचन ३३.

**ई –** ईति ८, ३०.

**उ –** उडुगण १, उपमा ४.

**औ –** औरस ६.

**ऋ –** ऋण १५, ३०.

**क –** कलुषविलय २१, काम १, कुंकुम १, कुरुपुर १७, कूपाराम २६, कृमि-कीटक २३, कृच्छ्र ४४, कृषि २, कैमुतिक १२, १६, १८, ४०.

**ग –** गरुड ६, गङ्गा १.

**च –** चोर २३, ३५.

**ज –** जलचर २१, जार २४, जीव ११.

**त –** तट ६/१६, तप १, तिलक १, तीर्थ १, १२, १६, २५, त्रिपात ३१, त्रिपिण्डीश्राद्ध १४.

**द –** दत्तात्रेय ५, दान १, दुरित ६, दुःख १५.

**न –** नदी १, नाममाहात्म्य १८, निगम २१, नित्य निरुपाधिक निरतिशय १, निवापाञ्जली १३, नीला १, नृसिंहवाटिका १६.

प – पद ३३, पताका १०, परमानन्द १, परप्रसिद्धी ३१, पातक १, पाप १, ३२, ३०, पितर १३, पूर्त १९, पौराणिक ९, प्रतिबन्ध १, प्रपद ६, १७, प्रशस्त १.

ब – ब्रह्म १, ३३, ब्रह्मा २, १२, ४१, ब्रह्मा-विष्णु-रुद्र ३७, २८, ब्राह्मण १, १३, १५, १७, ४२, बिरुद २९, ३०, बृहस्पति ११.

भ – भगवान् १७, भागवत ६, ३३, भास्वत् १, भौम १.

म – मल ७, १२, ३३, महेश्वर १, महापातकी १४, महापाप १४, २९, ३०, महाभाष्य २३, मुक्ति १०, मुनि ५, मूषक ८, मौलि १, मोक्ष १.

य – यमनियमासनादि २१, यज्ञ १, योग ६, २१.

व – वचन २, वन्ध्या १५, वर २, वासुदेव १२, विबुध ६, विष्णु १, ६, वेणी १, वैकुण्ठ ६, वैश्य १३, व्यास १६.

र – रसज्ञा ५.

ष – षड्गुणैश्वर्य २.

श – शलभ ८, शाप ३८, श्यामला १, श्रीकृष्णा १, २, श्रीहरि १०, श्रुति ६, श्रौत १९, शिखरिणी १, शिशु ४, शुचि २, शुक ८, शूद्र १३, शंकराचार्य ४.


स – सनक ५, सह्य १७, साधन १, साहित्य ३, साक्षात् ३६, साक्षात्कार १, सुख १५, स्वर्ग ६, स्मार्त १९, स्मृति १५, ३९, स्वधीत १९.

ह – हरिहर ५, २०.

क्ष – क्षत्रिय १३.

ज्ञ – ज्ञान १.

# सर्व उपदेशाचे सार



१) मुक्तीचा लाभ करून घेणे हे मनुष्य जन्माचे कर्तव्य आहे.
२) त्याकरिता प्रथम मन स्थिर व्हावे या उद्देशाने वर्णाश्रमविहित धर्माचे यथाशास्त्र आचरण झाले पाहिजे.
३) वेदान्ताचे श्रवण, मनन, निदिध्यासन नित्य करावे.
४) मुख्यत: लक्षपूर्वक श्रवणाने मनातील आसक्ती कमी होईल.
५) सात्त्विक प्रवृत्तीनेच मानवाची उन्नती होते.
६) सात्त्विक प्रवृत्ती होण्याकरिता आहार हा हित, मित व मध्ये म्हणजे पवित्र असण्याकडे लक्ष दिले पाहिजे.
७) आपली प्रकृती सात्त्विक झाली आहे हे ओळखण्याची खूण अशी की, स्वधर्मावर दृढ श्रद्धा बसून स्नानसंध्या, देवपूजा, पंचमहायज्ञ हे वेळेवर करणे, अतिथिसत्कार, गोसेवा, मातापितरांची सेवा ही हातून घडणे, कथा-कीर्तन, भजन-पुराण यांचे श्रवण होणे, सर्वंबरोबर गोड बोलणे, दुसऱ्याचे नुकसान होईल असे न वागणे, स्त्रियांनी सासरी राहून सासूसासरा व इतरही वडील माणसे यांच्या आज्ञेत पतीची दृढ निष्ठेने सेवा करणे इ. गुण आपल्यामध्ये येणे. आपली प्रकृती सात्त्विक बनल्याची ही चिन्हे आहेत.
८) उदरनिर्वाहाकरिता व्यापार, शेती, नोकरी, कोणताही व्यवसाय केला तरी वेदविहित कर्म व गुर्वाज्ञापालन कधीही सोडू नये.
९) स्वकर्म केले तरच अन्त:करण शुद्ध होते.
१०) अन्त:करण शुद्ध झाले तर उपासना स्थिर होते.
११) उपासना स्थिर झाली तर मनाला शांती मिळते.
१२) आणि मनाची गडबड थांबली म्हणजे आत्मज्ञान होऊन मोक्षाचा लाभ होतो. याप्रमाणे जो वागेल तो शेवटी पूर्ण सुखी होईल.

**श्री प.प. वासुदेवानंदसरस्वती स्वामिमहाराज**

## ● श्रीवासुदेव निवासमध्ये उपलब्ध असलेल्या ग्रंथाची सूची

१. श्री दत्तमाहात्म्य (मराठी)
२. भावार्थ दत्तपुराण (मराठी)
३. समश्लोकी गुरुचरित्र (श्री गुरुसंहिता)
४. शिक्षात्रयम् (संस्कृत व मराठी अर्थासहित)
५. स्त्रीशिक्षा (मराठी)
६. श्री दत्तचंपू (संस्कृत मराठी अर्थासहित)
७. श्री सप्तशतीगुरूचरित्रसार (मराठी)
८. श्री सत्यदत्तपूजा - कथा (संस्कृत व मराठी अर्थासहित)
९. श्री दत्तभावसुधारस स्तोत्र (संस्कृत व मराठी अर्थासहित)
१०. श्री दत्तलीलामृताब्धिसार
११. श्री कृष्णालहरी (संस्कृत)
१२. श्री कृष्णालहरी तरंग सौंदर्य (मराठी)
१३. नित्यउपासनाक्रम (संस्कृत व मराठी संमिश्र)
१४. द्विसाहस्त्री (संस्कृत) (गुरूचरित्र)
१५. द्विसाहस्त्री (मराठी) (गुरूचरित्र)
१६. त्रिशतीकाव्य (संस्कृत व मराठी अर्थासहित)
१७. सार्थ रत्नावली स्तोत्र - (संस्कृत व मराठी अर्थासहित)
१८. स्तोत्रादिसंग्रह (संस्कृत)
१९. पदसंग्रह (मराठी)
२०. श्री दत्तात्रेय १०८ नामावली
२१. श्री दत्तात्रेय षोडशावतार पूजाविधान
२२. श्री. प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती विरचित प्रश्नावली
२३. प. प. श्री स्वामी महाराज लिखित / समग्र ग्रंथ संपदा
२४. योगवाणी (मराठी)
२५. महायोग विज्ञान (मराठी)
२६. सूत संहिता रहस्य भाग १ (मराठी परिचय)
२७. सूत संहिता रहस्य भाग २ (मराठी परिचय)

२८. प.प.श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराज वाङ्मयसंपदा आणि जीवनदृष्टी

२९. श्री. गुरुदेवचरित्र (प.प.श्री वासुदेवानंद स्वामी महाराजांचे चरित्र)

३०. श्री नारायणस्वामी चरित्र

३१. प. प. श्री लोकनाथतीर्थ स्वामी महाराजांचे चरित्र

३२. श्री गुरु वामन त्रिपदी (योगीराज श्री गुळवणी महाराजांचे ओवीबद्ध चरित्र)

३३. श्री सद्‌गुरू साधक सुसंवाद

३४. श्री गुरुगीता (योगीराज श्री गुळवणी महाराजांचे ओवीबद्ध चरित्र)

| | | |
|---|---|---|
| ३५. जीवन गंगा | आद्यकलश | योगिराज श्री गुळवणी महाराजांचे संपूर्ण चरित्र |
| ३६. जीवन गंगा | द्वितीय कलश | |
| ३७. जीवन गंगा | तृतीय कलश | |
| ३८. जीवन गंगा | अंतिम कलश | |

३९. स्मर्तृगामीच्या स्मृती.

४०. पत्रबोध संग्रह

४१. प. पू. श्री. दत्तमहाराज कवीश्वर यांचे चरित्र

४२. प. पू. श्री. दत्तमहाराज लिखित विचारधन भाग १

४३. प. पू. श्री. दत्तमहाराज लिखित विचारधन भाग २

४४. प. पू. श्री. दत्तमहाराज लिखित विचारधन भाग ३

४५. दत्तवाक्सुधा

४६. उपायवनवसंत

४७. श्री वासुदेव मनन

४८. मंत्रविधानम्

४९. वेदपादस्तुतिः

५०. वेध वामनाचा

५१. मूर्तिमंत भागवत

५२. निंबार्क दर्शन

५३. प. प. श्री वासुदेवानंद सरस्वती १५० वी जयंती विशेषांक

५४. कृपेची सावली (मराठी)

५५. माघ माहात्म्य

५६. गणेश वंदना

५७. प. प. श्री स्वामी समाधिशताब्दी चर्चासत्र स्मरणिका

५८. श्रीगुरुचरितम्

५९. योगिराज (मराठी)

६०. योगिराज (इंग्रजी)

६१. THE GOSPEL (प.प.श्री लोकनाथतीर्थ स्वामी महाराजांचे इंग्रजी चरित्र)

६२. TOWARDS ENLIGHTENMENT (योगवाणी इंग्रजी भाषांतर)

६३. दत्त माहात्म्य (कानडी)

६४. श्री गुरुदेवचरित्र (कानडी)

**प्रकाशक – श्रीवासुदेव निवास विश्वस्त मंडळ,**
**श्रीवासुदेव निवास, ४२/१७, एरंडवणे,**
**कर्वे पथ, पुणे ४११००४.**

# कृष्णा माहात्म्य

ब्रह्मदेवांनी सृष्टि निर्माण करून श्रीविष्णूंची
प्रार्थना करून प्रश्न केला की – ''आकल्पांत,
ह्या सृष्टीची स्थिती कशी होईल?'' त्यावर श्रीविष्णू म्हणाले –

मातरं सर्वतीर्थांना नदीनामग्रजां त्वहम्।
स्त्रक्ष्यामि पूर्ववत् कृष्णां मन्मयीं जगतः स्थितेः ।।
तीर्थांना हि प्रभावेण कलिकल्मषशत्रुणा ।
कृष्णायाश्चापि सान्निध्यात्पापं नैव भविष्यती ।।१।।

(कृष्णा माहत्म्य)

---

कृष्णा ही हरिहर स्वरुपिणी आहे – कारण
शिवस्य हृदयं विष्णु विष्णोश्च हृदयं शिवः ।।

(स्कंदपुराण)

---


भगवान शंकर स्कंदास सांगतात –
कृष्णेयं कृष्ण रूपस्य तनुर्मम जलात्मिका ।
मत्तः कृष्णा समुत्पन्ना तत्प्रभावं परं विदुः ।।

(कृष्णा माहात्म्य)



प.प. श्री स्वामी महाराजांची

# ग्रंथ संपदा



प.प. श्रीवासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज

**मौल्यवान, दुर्मिळ,**
**१२ खंडात्मक ९ ग्रंथ संच, थोड्याच प्रति,**
**रिप्रिन्ट होणार नाही रु : १५००**

## प.प. श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंबे स्वामी) महाराजांची ग्रंथसंपदा

**प्रथमं पुष्पम् :-** वर्णाश्रमधर्माचे महत्त्व सांगणारा 'शिक्षात्रयम्' हा ग्रंथ या खंडात असून तो संस्कृत भाषेत आहे. कुमारशिक्षा, युवशिक्षा आणि वृद्धशिक्षा असे त्याचे तीन भाग आहेत.

**द्वितीयं पुष्पम् :-** या ग्रंथाचे नाव 'स्तोत्रादिसंग्रह' असून स्वामी महाराजांनी वेळोवेळी केलेल्या स्तोत्रांचा, प्रार्थनांचा, अभंगांचा संग्रह म्हणजे हा ग्रंथ होय. यातील बऱ्याच रचना संस्कृतमध्ये आहेत. मराठीतही काही पदे, अभंग आहेत.

**तृतीयं पुष्पम् :-** सप्तशतीगुरुचरित्रसार, श्रीदत्तलीलामृताब्धिसार, माघमाहात्म्य, स्त्रीशिक्षा, प्राकृतमनन अशा छोट्या मराठी प्रकरण ग्रंथांचा समावेश असलेला हा ग्रंथ आहे.

**चतुर्थं पुष्पम् :-** 'दत्तमाहात्म्य' नावाचा हा ग्रंथ स्वामींच्या 'दत्तपुराण' या ग्रंथातील उपासनाकांडावर आधारित आहे. ग्रंथाची रचना अत्यंत सुबोध, सोप्या मराठीत असून सर्वांना वाचता येण्यासारखा आहे.

**पंचमं पुष्पम् :-** गुरुचरित्रकाव्य म्हणजेच त्रिशतीकाव्य (दत्तकाव्य) आणि दत्तचम्पू या दोन संस्कृत ग्रंथांचा समावेश या खंडात आहे. या दोन्ही ग्रंथांवर स्वामींनी स्वत: संस्कृतमध्ये टीकाही लिहिली आहे.

**षष्ठं सप्तमं च पुष्पम् :-** सहा आणि सात अशी दोन पुष्पे एकत्र असलेल्या या खंडात 'दत्तपुराण' या ग्रंथाचा समावेश आहे. दत्तदेवतेचा संपूर्ण इतिहास सांगणारा हा ग्रंथ, ही स्वामींची स्वतंत्र ग्रंथनिर्मिती असून ती संस्कृतमध्ये आहे. या ग्रंथाची प्रासादिक रचना, मंत्रमयता आणि समृद्ध तत्त्वचिंतन लक्षात घेता या ग्रंथाची तुलना श्रीमद्भागवत पुराणाशी करता येईल.

**अष्टमं नवमं च पुष्पम् :-** आठ आणि नऊ या दोन पुष्पांमध्ये 'द्विसाहस्री' हा ग्रंथ आहे. मराठी गुरुचरित्राचे सार दोन हजार श्लोकात सांगणारा हा ग्रंथ संस्कृत भाषेत असून त्यावर श्रीस्वामींचे भाष्य आहे. ते शंकराचार्यांच्या ब्रह्मसूत्रभाष्यासारखे आहे. यात शेवटी योगरहस्य आणि बोधरहस्य नावाच्या योग आणि ज्ञान या दोन मोक्षमार्गांचे विवेचन करणारे दोन संस्कृत प्रकरण ग्रंथही आहेत.

**दशमं एकादशं च पुष्पम् :-** दहा आणि अकरा या दोन पुष्पांचा मिळून 'समश्लोकी गुरुसंहिता' हा ग्रंथ आहे. दत्तसंप्रदायाचा वेद असलेल्या मराठी गुरुचरित्राचे स्वामी महाराजांनी केलेले हे संस्कृत भाषांतर आहे.

**द्वादशं पुष्पम् :-** ब्रह्मश्री श्रीदत्तमहाराज कवीश्वरांच्या समर्थ लेखणीतून साकारलेले श्रीस्वामीमहाराजांचे चरित्र म्हणजे हा शेवटचा बारावा खंड आहे.

**ग्रंथ मिळण्याचे ठिकाण** - श्रीवासुदेव निवास, ४२/१७ एरंडवणे, महर्षी कर्वे पथ, पुणे - ४११००४.
फोन : ०२०-२५४५५५८४
website : www.vasudevniwas.rog / Email : info@vasudevniwas.org